# Marathi Culture & Festivals

## Diwali 2022



www.marathicultureandfestivals.com

# Table of Contents


| | |
|---|---|
| Editor's Desk | Aishwarya Kokatay, Los Angeles,CA, USA |
| Editorial Team | Ashutosh Bapat, Pune, India |
| Editorial Team | Shobana Daniell, Philadelphia, USA |
| Editorial Team | Nanda Marathe, Fontana, USA |
| Design Team | Sheetal Ranganekar and Supriya Kulkarni Los Angeles,CA, |
| **Articles and Stories** | |
| मंदिराचे अंतरंग... | आशुतोष बापट, पुणे |
| संस्कृती म्हणजे नक्की काय? | संध्या (सामंत ) सावंत, ठाणे |
| मिरची, पुदिना, स्पर्श ज्ञान आणि वैद्यकीय नोबेल २०२१ | डॉ.अंजली कुलकर्णी, पुणे |
| Experience of Learning in Indian and US Education Systems | Smita Dandekar, California |
| अतिलघुकथा | हेमंत वि. पोहनेरकर. संभाजीनगर |
| मी व माझा पेरुचा बाग | पुंडलिक सहादु देंडगे, पुणे |
| आनंद श्रमदानाचा | अलका मुळे फ्रीमॉन्ट, कॅलिफोर्निया |
| कवितेची जन्मकथा: ऋण - श्री.दि.इनामदार | किरण शिवहर डोंगरदिवे, बुलडाणा |
| चौल: छोट्या गावाची मोठी गोष्ट | संजय नाईक,पुणे |
| कुंकू | प्रतिमा खरे, पुणे |
| परभांची (पाठारे प्रभू) दिवाळी | सौ. प्रणिता प्रभाकर, मुंबई |
| Shree Chhatrapati Shivaji Maharaj Museum | |
| The Unfoldment Journey | Omkar Udas, Canada |
| माळरानाची वाघीण | भाग्यश्री संजय महाजन, नाशिक |
| आता मी "नाही" म्हणायला शिकले! | उर्मिला देवेन. जपान |
| मंगळसूत्र विशेषांक | |
| टी ब्रेक | सुप्रिया वारे, मुंबई |
| अस्मिता | श्रीपाद टेंबे, पुणे |
| अनुमती | अमित भावे,कैलिफोर्निया |
| The Empty Envelope | Natasha Dighe Badri, New Jersey, USA |
| सिनेमातील सायन्स: नाकतोड्याचे घड्याळ | सीमंतिनी, कॅलिफोर्निया |
| आज जाने की जिद ना करो | श्रेया राजवाडे, मुंबई |
| घरोघरी मातीच्या चुली | कांचन अकोलकर, कॅलिफोर्निया |
| दिवाळी आणि रांगोळी | चित्रा मेहेंदळे, मुंबई |
| भारताचे सर्वोच्च न्यायालय आणि स्वामी विवेकानंद | संजय श्रीकृष्ण पाठक, मालेगाव कॅम्प |
| Maratha Warrior Queen Ahilyabai Holkar | Dr Major Nalini Janardhanan, Pune |
| अनुक्रमणिका नंबर अकरा | महेश सोवनी, नांदेड |
| वर्डलमहिमा | डॉ. गौतम पंगू, न्यू जर्सी |
| मदर्स डे | संजय गोखले, न्यू यॉर्क |
| थोडीशी गफलत | अरविंद देशपांडे, पुणे |
| अध्यात्म आणि आपण | श्री. वसंत प्रल्हाद कुलकर्णी, पुणे |
| जपुया आपल्या वेलींना | डॉ शिल्पा चिटणीस जोशी स्त्रीरोग व वंध्यत्वतज्ञ कोथरूड पुणे |
| वेळ | सौ. सुजाता काळे, पाचगणी |
| ठेच | निशा गायकवाड |
| उलट्या नामे तरला वाल्या जाणा मतितार्थ | मुग्धा माधव केळकर, बडोदा |
| कुसुमची दिवाळी | जयवंत नारायण चव्हाण, रत्नागिरी |
| मिलन | किशोर श्रीकांत केळापूरे, नागपूर |
| सोशल मीडिया आणि समाज स्वास्थ्य | विंग कमांडर (निवृत्त) डॉ राजेश शांताराम जोशी |




**Recipes**

| | |
|---|---|
| 6 minute Veg Biryani | Kirti Shrikhande, Pennsylvania |
| Baked Bakarwadi | Sandhya Nadkarni, Boston |
| Shakun Unde | Shruti Nargundkar, Melbourne, Victoria, Australia |

**Poems**

| | |
|---|---|
| आली दिवाळी | विंग कमांडर (निवृत्त) डॉ राजेश शांताराम जोशी, सातारा, महाराष्ट्र |
| पाऊस माझा | रसिका दास्ताने-सांगवीकर |
| नवीन वर्ष | जयवंत नारायण चव्हाण, रत्नागिरी |
| खेळत नाहीत मुले | किरण शिवहर डोंगरदिवे, बुलडाणा |
| तुझं माझं नातं | श्रेया राजवाडे, मुंबई |
| ही समोर बसलेली एक | अमिता कोकाटे, मुंबई |
| चांदोबा, तू बाळांचा मामा पुन्हा होशील का ? | श्री. वसंत प्रल्हाद कुलकर्णी, पुणे. |
| मातीतच राहतो मी.... | सुजाता काळे, पाचगणी. |
| माय मराठीचा सोहळा | सुजाता काळे, पाचगणी |
| मी कोरडी | उमा पाटील, धुळे |
| अशी आई तू | निकिता सातव, सिएटल |
| तू आणि मी एकच | निकिता सातव |
| गुलमोहर माझ्या मनातला | मुग्धा माधव केळकर. |
| Three charolya | भूषण सहदेव तांबे, मुंबई |



Cover photo: Ms Kanchan Deochake and Ms. Arohee Temurnikar on the front and back cover.

Copyright : www.marathicultureandfestivals.com
No part of this document can be copied or reproduced without the written permission of the owner and managing editor.
Disclaimer: Any views or opinions presented in the articles, story, poems, videos or advertisements in this Diwali digital magazine and printed version, are solely those of the author [user generated ] and do not necessarily represent those of Marathi Culture and Festivals site. The owners, editors and the whole team accepts no liability for the content or for the consequences of any actions taken on the basis of the information provided under the article/ story/poem, recipe, advertisement or any other content in this magazine.

# From the Editor's Desk



Aishwarya Kokatay
Founder and Managing Editor
Marathi Culture and Festivals
Los Angeles, CA, USA

Namaskar,
We are very happy to publish our 8th Diwali Digital Magazine. We have grown from just a few special pages of the Diwali festival on Marathicultureandfestivals.com website to this global publication. Now that we have learned how to deal with the bad times of the Covid pandemic, we can enjoy bright lights again, we can meet our near and dear ones to celebrate the queen of Indian festivals-Diwali!

Every year, we try to do something new and special and this year we had a writing competition for Marathi content. We got a few generous sponsors to award the prizes. You will see the "award winner" tag on the articles and stories who won the prizes, and a special corner on details of prizes and sponsors. It was very hard to select winners as all were so very good. I thank all the writers who sent their entries, all the content was very good. Some of the writers did not participate in the competition but their content was outstanding, so we added it to this magazine.

This year our cover story in Marathi is " मंदिराचे अंतरंग" written by our team member Shree Ashutosh Bapat. There are so many things we do and see when we visit a temple, so why do we ring the bell? Why do we find ultimate peace when we sit inside the temple? All these questions and some unknown facts of temples plus a few must visit temples are covered in the cover story and in the publication program. The program video is available on the website and on our Youtube channel.

Last year we registered as a non-profit organization [501c3] under the name MCF Foundation [ Marathi Culture and Festivals Foundation]. We organized a few virtual events of local talents and we continue to do so along with some philanthropic work. You all are more than welcome to join our team of volunteers and bring project ideas. Please email mcfplatform@gmail.com for further inquiries.

Social media: If you have not done this yet, please do join our Facebook group under Marathi Culture and Festivals' and subscribe to our Youtube channel under the same name. Please share with your friends and family and help us spread the word about this initiative.

As usual, you will be able to enjoy the children and young adult section, art work, recipes, stories and poems in this magazine. So sit back, relax and enjoy reading with a choice of your Diwali snack. The competition winner details will be on one page.

You all are aware that this digital magazine is completely free to read and we have a team of volunteers who spend their

valuable time on this initiative besides their own day to day work and responsibility. It is easier said than done and I really admire them from the bottom of my heart, so thank you my team, I am proud of you!

Let me introduce you to my awesome team:
**Ashutosh Bapat**, Pune, India: Ashutosh is an established writer who regularly writes for Indian newspapers and magazines. He helped in selecting and editing Marathi content.
**Shobana Daniell**, Philadelphia, USA: Shobana worked in education, writing and editing at public radio and advertising agencies. She also helps her husband Prof. Daniell in editing research papers.She helped in editing English content.
**Supriya Kulkarni**, Northridge, USA: She is an architect by profession. She helped in overall design and page layouts and designing of various pages and content.
**Sheetal Rangnekar**, Los Angeles USA: Graphic designer and illustrator. She created the cover and back of the magazine and background illustrations, kids and jewelry page design.
**Smita Dandekar**, Simi Valley, USA: Coordinated children and young adult section, and helped with script of publication program.
**Nanda Marathe**, Fontana, USA: Helped with grading the articles and stories.
**Sagar Sabade**: Helped with grading the articles and stories.
**Kedar Deshpande**: Video editing.
Advisers: **Mr. Sharad Dandekar, Madhav Kale, Shrinivas and Shailaja Mate**.
**Deepali Natu Kelkar**: Master of ceremonies of publication program.

I cannot thank our sponsors enough for their generosity - Marathi Maherwashini USA, two anonymous donors, Ms. Sneshlata Choudhary and Mr. Ashok Mahajan, India. Every contribution, however big or small, powers our initiative and sustains our future. Support the MCF Foundation from as little as $5 – it only takes a minute. If you can, please consider supporting us with a regular amount each month. Visit the website and click on Donate Here Thank you.

This year we had invited entries from Singapore Marathi youth to appear on the front and back cover of the magazine and we selected Ms Kanchan Deochake on the back voc and Ms. Arohee Temurnikar on the front, congratulations!

Wish you all a very Happy Diwali, a Health and Prosperous New Year!

*Wish You All A Very Happy Diwali & Prosperous New Year.*




# Editorial Team



आशुतोष बापट, पुणे

मराठी कल्चर अँड फेस्टिवलच्या जगभर पसरलेल्या तमाम वाचकांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा. म्हणता म्हणता आपल्या इ दिवाळी अंकाला ८ वर्ष पूर्ण झाली. सहज मागे वळून बघताना किती गोष्टी डोळ्यासमोर येतात. अगदी नवीन असतानाची नवलाई. अंक कसा होईल, वाचकांना आवडेल का इथपासून ते कुठले लेख घ्यायचे, कुठले नाही घेता येणार इथपर्यंतच्या अनेक गोष्टी. मुंबई पत्रकार संघाच्या पुरस्कारामुळे एक नवी उर्जा आम्हा सगळ्यांना मिळाली. पण खरी उर्जा मिळते ती वाचकांच्या प्रतिसादाची. जगभर पसरलेले वाचक जेव्हा आपल्या अंकाची वाट बघत असतात आणि तो अंक वाचून त्यावर प्रतिक्रिया देतात, ती उर्जा सर्वात महत्त्वाची. काही वर्ष आपण एखादी विशेष संकल्पना घेऊन अंक काढू लागलो. आणि या वर्षी आपण कथा स्पर्धा जाहीर केली. त्या स्पर्धेच्या बक्षिसाची जबाबदारी काही मंडळींनी स्वखुषीने स्वीकारली हीच खरंतर आमच्या कामाची पोच पावती म्हणावी लागेल.
वाचन संस्कृती कमी होते आहे अशी सगळीकडे ओरड सुरु असताना, या कथा स्पर्धेसाठी जो काही प्रचंड प्रतिसाद मिळाला ते पाहून आम्ही सुद्धा थक्क होऊन गेलो. दिवाळी अंकासाठी इतक्या मोठ्या संख्येने आलेले साहित्य बघून वाचन संस्कृती अजूनही टिकून आहे एवढेच नव्हे तर ती वृद्धिंगत होते आहे याची खात्री पटली. एखादी आगळीवेगळी संकल्पना वाचकांच्या समोर मांडायची आमची परंपरा आम्ही या वर्षीसुद्धा पाळली आहे. यावेळी आपण मंदिर या विषयावर विस्तृत चर्चा करत आहोत. मंदिर कसे बघावे ? ही खरंतर ती संकल्पना. काही जणांना असं वाटेल की मंदिर कसं बघावं हा काय विषय होऊ शकतो का. लहानपणापासून असंख्य वेळा मंदिरात गेलेलो आम्ही, हे काय मंदिर न बघताच परत येतो का. पण तसं नाहीये. मंदिर कसं बघावं हा खरंच एक निराळा विषय आहे. मंदिराबद्दल अनेक गोष्टी सर्वसामान्य माणसांना माहिती नसतात. मंदिर हे जसं देवाचं निवासस्थान आहे तसंच ती एक सामाजिक संस्था सुद्धा आहे. याचा काय अर्थ ? हे सगळं तपशीलवार यावेळच्या लेखातून उलगडून सांगितलं आहे. मंदिरामध्ये अनेक गोष्टी असतात जी खरंतर निरनिराळी प्रतीकं आहेत. त्या गोष्टी देवाच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांना काही ना काही तरी सांगत असतात, सुचवत असतात. ती कुठली प्रतीकं आहेत, आणि ती काय सांगत असतात हे सगळं समजलं की आपण एका नव्या दृष्टीने मंदिर बघू लागतो. आणि म्हणूनच हा नेहमीचाच, सगळ्यांना माहिती असलेला पण एक वेगळे परिमाण असलेला विषय यावेळी वाचकांच्या समोर मांडतो आहोत. कल्चर अँड फेस्टिवलच्या ई दिवाळी अंकाचं हेच तर वेगळेपण आहे. वसुधैव कुटुंबकम् या उक्तीला जागून जगभरातल्या मराठी मंडळींचा विचार करून एकाचवेळी या सर्वांना दर्जेदार साहित्य उपलब्ध करून द्यायचे ही आमची परंपरा आम्ही सतत जोपासत आहोत.
या अंकात दर्जेदार कथा, साहित्य वाचायला तर मिळणार आहेच. त्याचसोबत विविध विषयांची ओळखसुद्धा या अंकातून वाचकांना होणार आहे. जगभर पसरलेल्या तमाम मराठी मंडळींना या अंकाच्या रूपाने एका धाग्यात गुफुन घेण्याचे जे स्वप्न अमेरिकास्थित श्रीमती ऐश्वर्या कोकाटे यांनी बघितले होते, ते आता पूर्णतेच्या दृष्टीने पुढे सरकत आहे. हा दिवाळी अंक करताना अनेकांचे सहकार्य आम्हाला मिळाले त्यामुळेच एक साहित्याचे शिवधनुष्य आम्ही पेलू शकलो. मराठी वाचकांना उत्तमोत्तम साहित्य उपलब्ध करून देण्याचे कार्य यापुढेही सतत सुरु राहील याची ग्वाही देतो. आपली सर्वांची दिवाळी मंगलमय, आनंददायी आणि वाचनीय होवो याच आपणां सर्वांना शुभेच्छा !!



Shobana Daniell, Philadelphia, USA

Bharath, with its thousands of years of history is a vast repository of traditions which encompass our life, relationship, spiritual growth and ultimately the development of civilized societies. By honoring these traditions and culture we acknowledge the strength of our foundations and longevity of the shared values.

Cultural traditions are remarkable as they not only continue the tried and true ways but also adapt to societal changes. The key is resilience - the ability to adapt and recover. Marathi culture as celebrated overseas has to take into account the local milieu. This is true especially for the first generation – those born overseas. For them it is important to understand the meaning of the traditions and Aishwarya, her team and the people of global Marathi mandals make that happen by their work on social media and in this case, the Marathi Culture and Festivals Diwali Ank.
This is the 8th annual Diwali issue and a testament to the steady growth in the depth and range of the website and 'Ank'. There are usually several English articles, however this year saw a bit of a dip – we hope next year will be an increase. Please do encourage your family and friends to send in articles, poems, and artwork of whatever topic that appeals to them. A wide range is always welcome. By sharing your thoughts, stories and experiences of Marathi traditions you will keep the culture shining as well as teach the youth the wisdom and knowledge of the previous generations. It will help them adapt and perhaps even add new layers.

With Best Wishes for a Happy and Healthy Diwali to All



Nanda Marathe, Fontana , USA

दिव्यादिव्यांच्या ओळीमधुनी मने मने जुळवावी
त्या ज्योतींच्या तेजमधुनी स्नेह्ज्योत उजळावी
मांगल्याची समृद्धीची होवो दीपावली
सौख्यद जावो वर्ष तुम्हा ही इच्छा शुभकाळी

बघता बघता ८ वर्षांचा पल्ला गाठला आणि “मराठी कल्चर अँड फेस्टिव्हल्स”ने देशोदेशीच्या वाचकांच्या मनात एक कायमची जागा मिळवली या यशाचे शिल्पकार अनेक आहेत पण, आपले इतर सगळे व्याप आणि जबाबदाऱ्या सांभाळत या अंकाची यशस्वी वाटचाल चालू आहे ती ऐश्वर्या कोकाटे यांच्या अथक प्रयत्नांमुळे हे अगदी निर्विवाद. सतत नवनवीन कल्पना मनात आणून त्या प्रत्यक्षत उतरवण्याची किमया ऐश्वर्या कोकाटे अविरतपणे करत असतात.या वर्षाचा नवा उपक्रम म्हणजे कथा आणि ललितलेख स्पर्धा ! त्याला मिळालेला प्रतिसाद अगदी स्तिमित करणारा आणि परीक्षकांची परीक्षा घेणारा होता हे माझे अनुभवाचे बोल! स्वतःच्या घरातून रुजवलेली ही चिमुकली वेल बघताबघता जगभर पसरली आणि पसरत राहील याची ग्वाही वाढत्या वाचक आणि लेखक संख्येवरून येतच असते. देशोदेशीचे आपण सगळे या धाग्याने सदैव बांधलेले राहूच आणि हे बंध नेहमी आपुलकीचे आणि मैत्रीचेच असतील हे मनोमनी माहीत आहे तरीही सर्व लेखक वाचकांना मनःपूर्वक धन्यवाद द्यायलाच हवेत या Marathi Culture And Festivals ची यशस्वी वाटचाल तुम्हा सर्वांच्या साथीने दीर्घकाळ चालू राहो या सदिच्छेसह सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा. करोनाच्या विदारक काळोखातून बाहेर येत असलेलं अखिल विश्व नव्या वर्षात तेजाच्या दिशेने वाटचाल करत राहो आणि ही दिवाळी सर्वांना आनंदाची आणि सुखाचे जावो

## Graphic Design Team



Sheetal Rangnekar
Los Angeles, CA, USA



Supriya Kulkarni
Los Angeles, CA, USA

# मंदिराचे अंतरंग



आशुतोष बापट, पुणे

संपूर्ण भारतवर्षात किंवा खरंतर जगाच्या पाठीवर जिथे जिथे भारतीय माणूस वसला आहे त्या जगाच्या कानाकोपऱ्यात साजरा होणारा, अत्यंत लोकप्रिय असा दिपावलीचा सण हा दिव्याचा, प्रकाशाचा, उजेडाचा उत्सव होय. हा आनंदाचा सण जसा घराघरात साजरा केला जातो तसाच तो सार्वजनिक स्वरुपात देखील तेवढ्याच दिमाखात साजरा करायची पद्धत आहे. दिव्याचे आपल्या आयुष्यातील असलेले अनन्यसाधारण महत्त्व या सणाच्या निमित्ताने अधोरेखित केले जाते. अंधःकारावर मात करून उजेडाच्या, उन्नतीच्या, प्रकाशाच्या वाटेवर जाताना हे असंख्य दिवे आपल्याला उजेड दाखवतात. मग ते पणतीच्या स्वरुपात असतील नाहीतर समईच्या स्वरुपात असतील. अखंड तेवत राहणे आणि पथिकाला मार्ग दाखवत राहणे हेच या लक्षलक्ष दिव्यांचे उद्दिष्ट असते. याचेच प्रतिबिंब आपल्याला मंदिर स्थापत्यामध्ये जागोजागी दिसून येते. नुसते दिवेच नाहीत तर इथे असलेली अनेक प्रतिके, चिन्हे, शिल्पं आपल्याला भक्तिमार्गावर सतत मार्गदर्शन करीत असतात. त्यांचा अस्तित्वाने आपल्याला अनेक गोष्टींचे ज्ञान होते. आयुष्यातील अनेक घटनांचे प्रतिनिधित्व ह्या गोष्टी करत असतात. मंदिराच्या अंतरंगात डोकावताना ही विविध प्रतीके आपल्याला मंदिरांचा एक वेगळाच आयाम उलगडून दाखवतात.

मंदिर हे केवळ देवाचे निवासस्थान नसून ती एक सामाजिक संस्था आहे. इथे अनेक लोकांचा सतत वावर होत असल्यामुळे त्यांच्या शिकवणुकीसाठी, त्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी, तत्त्वज्ञान खूप सोप्या पद्धतीने त्यांच्या आयुष्यात रुजवण्यासाठी मंदिरांची, त्यावरील शिल्पांची, आणि इतर गोष्टींची निर्मिती झाली असे म्हणता येईल. मंदिराच्या प्रांगणामध्ये असलेल्या दीपमाळा या देखील काही विशिष्ट उद्देशाने बांधल्या गेल्या असे म्हणता येईल. दीपमाळा ही खास मराठी स्थापत्याची खूण आहे. महाराष्ट्र सोडून इतर आपल्याला दीपमाळा दिसत नाहीत. महाराष्ट्रातील मंदिरांमध्ये असलेल्या दीपमाळा या खूपच आगळ्यावेगळ्या आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मंदिराच्या प्रांगणात असलेल्या दीपमाळा साऱ्या परिसराची शोभा वाढवतात. महाराष्ट्रात जवळजवळ सर्व महत्त्वाच्या देवळांमध्ये सुंदर आणि कलात्मक दीपमाळा पाहायला मिळतात. मुख्यत्वे शंकराच्या मंदिरात असलेल्या दीपमाळा या त्रिपुरी पौर्णिमेच्या दिवशी दिव्यांनी उजळलेल्या दिसतात. त्रिपुरी पौर्णिमेला या दीपमाळांवर त्रिपुरवात लावणे यालाच कोकणात 'टिपर पाजळणे' असे म्हटले जाते. पुण्याच्या जवळ असलेल्या चास या गावची दीपमाळ अशीच भव्य, देखणी आणि आगळीवेगळी आहे. चास हे गाव पहिल्या बाजीराव पेशव्याचे सासुरवाडीचे गाव होय. या गावचे ग्रामदैवत असलेल्या श्री सोमेश्वर मंदिराच्या प्रांगणातच एक भव्य मोठी अशी दीपमाळ आहे. २५६ दिवे असलेली अशी ही डौलदार दीपमाळ त्रिपुरी पौर्णिमेच्या रात्री अनेक दिव्यांनी उजळते. त्रिपुरीला रात्री सोमेश्वरावर रुद्राचा अभिषेक होतो आणि आणि सगळा आसमंत त्या लक्ष दिव्यांनी उजळून निघतो.

या दीपमाळे प्रमाणेच गरुडस्तंभ आणि नंदीस्तंभ आपल्याला मंदिराच्या आवारात पाहायला मिळतात. महाराष्ट्रामध्ये ह्यांचे दर्शन अगदी दुर्मिळ असे आहे पण कर्नाटकातील मंदिरांमध्ये हे अगदी आवर्जून पाहायला मिळतात. विष्णू मंदिराच्या प्रांगणात उंच



असा खांब असून त्यावर एक छोटीशी घुमटी बांधलेली असते. त्या घुमटीमधे हात जोडलेल्या स्थितीमधील गरुडाचे शिल्प पाहायला मिळते. अगदी तशाच स्वरुपात शिवमंदिराच्या प्रांगणात त्या घुमटीमधे बसलेला नंदी पाहायला मिळतो. जसे विजयस्तंभ खूप उंच आणि मोठे बांधायची प्रथा आहे त्याच प्रमाणे हे गरुडस्तंभ आणि नंदिस्तंभ आपल्याला मंदिराच्या प्रांगणात पाहायला मिळतात. बरेच वेळा त्या खांबांवर मोठ्या प्रमाणात नक्षीकाम केलेले आढळते. उत्तर कर्नाटकातल्या शिरसी, शिमोगा आणि आसपासच्या बळ्ळीगावी, बनवासी, बंदलिके, कोटीपुरा, केळदि या ठिकाणी असलेल्या मंदिरांमधील हे उंचच्या उंच गरुड किंवा नंदिस्तंभ पाहण्यासारखे आहेत. बेलूरच्या चेन्नकेशव मंदिरातील गरुडस्तंभ केवळ देखणा आणि आवर्जून पाहण्यासारख आहे.

मंदिरामध्ये आणि परिसरामध्ये अशा अनेक गोष्टी आहेत की ज्या आपल्या निव्वळ अस्तित्वाने सतत मार्गदर्शन करत असतात. कीर्तिमुख हा सुद्धा त्यातलाच एक प्रकार आहे. अनन्यसाधारण भक्ती कशी असावी याचे हे एक द्योतक आहे. याची आपल्याला काही माहिती नसते आणि म्हणून ते काय आहे त्याचे मंदिरावर प्रयोजन काय याचा आढावा घेणे गरजेचे ठरते. मुख्यत्वे शंकराच्या मंदिरात, गर्भगृहाच्या उंबरठ्यावर एक राक्षसाचे तोंड कोरलेले असते किंवा चित्रित केलेले असते. त्याला कीर्तिमुख असे म्हणतात. याबद्दलची एक कथा पुराणामध्ये सापडते. जालंधर नावाचा एक राक्षस होता. त्याला प्रचंड भूक लागायची. कितीही खाल्ले तरी त्याची भूक कधी शमायची नाही. त्याचे शिवाची आराधना केली आणि या पासून मुक्ती देण्याची प्रार्थना केली. शिवाने त्याला सांगितले की तू स्वतःला पायापासून खायला सुरुवात कर. शिवावर अपार भक्ती असल्याने त्याने ताबडतोब हा आदेश मान्य करून स्वतःला पायापासून खाण्यास सुरुवात केली. शेवट फक्त तोंड राहिले तरीही त्याची भूक काही संपायची चिन्ह नाहीत. शेवटी शिवाने त्याला सांगितले की तू माझ्या मंदिराच्या उंबरठ्यावर बस. माझे भक्त तुझ्यावर पाय देऊन आत मध्ये येतील तेंव्हा तू त्यांची पापे खा. तुला आयुष्यात कधीही कमी पडणार नाही !! आपण शंकराच्या मंदिरात गेल्यावर आपली पापे नष्ट करायची देवाचीच ही कल्पना. त्या जालंधर राक्षसाचे तोंड पुढे कीर्तिमुख म्हणून प्रसिद्ध झाले. देवावर असलेली अनन्यसाधारण भक्तीचे ते एक प्रतिक झाले. आपण पापमुक्त होऊन देवाच्या दर्शनाला जावे या साठी देवानेच केलेली ही सोय खूपच वैशिष्ट्यपूर्ण आहे नाही का ? पुढे कीर्तिमुख हे एक डेकोरेटिव्ह मोटिफ म्हणून मंदिर स्थापत्यामध्ये वापरले जाऊ लागले. मंदिराच्या बाह्यांगावर जसे गजथर, अश्वथर असतात तसेच कीर्तिमुखथर सुद्धा दिसू लागले. दक्षिणेकडे होयसळ राजवटीमध्ये बांधल्या गेलेल्या बेलूर, हळेबिडू इथल्या मंदिरांवर हा कीर्तीमुखाचा थर प्रकर्षाने पाहायला मिळतो. अनेक मंदिरांच्या छतावरसुद्धा कोनामध्ये ही कीर्तिमुखे कोरलेली पाहायला मिळतात.

मंदिरात गेल्यावर अगदी प्रत्येक ठिकाणी दिसणारी गोष्ट म्हणजे घंटा. मंदिर कितीही छोटे अथवा मोठे असू देत, छताला टांगलेली घंटा ही अगदी न चुकता दिसणारी गोष्ट आहे. मूर्तीशास्त्राचे गाढे अभ्यासक आणि तज्ञ डॉ. देगलूरकर सर या घंटेचे प्रयोजन सांगताना असे म्हणतात की सामान्य लोकांचा असा समज असतो की घंटा वाजवली की देव जागा होतो आणि भक्ताकडे त्याचे लक्ष जाते. वस्तुतः परिस्थिती काहीशी निराळी आहे. घंटा ही देवासाठी नसून ती भक्ताने जागे होण्यासाठी आहे. आपण घंटा वाजवतो तेंव्हा आपण स्वतःचे लक्ष एकाग्र करून देवाकडे वळवतो. आपल्या मनामध्ये चालू असलेले अनेक विचार बंद करून आपले चित्त देवाच्या स्मरणात, देवाच्या पायाशी स्थिर व्हावे यासाठी घंटेचे प्रयोजन केलेले आहे. आपण अनेकदा जसा स्वतःला चिमटा काढून बघतो, याचाच अर्थ आपण जागे आहोत स्वप्नात नाही याची खात्री करून घेतो, अगदी तसेच प्रयोजन या घंटेचे आहे. आपण घंटा वाजवतो म्हणजे स्वतः जागे असल्याची खात्री करून घेतो. आपला कॉन्शस, आपली सत्सद्विवेकबुद्धी जागृत आहे याची आपली आपणच खात्री करून घेतो आणि मग देवाच्या दर्शनाला जातो. देव कधीच झोपलेला नसतो आणि त्याचे सतत आपल्या भक्तांकडे लक्ष असते. गरज भक्तांना असते की आपल्या मनात चालू असलेले असंख्य विचार बाजूला ठेवून आपण ईश्वरचिंतनात तल्लीन व्हावे आणि म्हणून



घंटा वाजवून आपण आपले चित्त एकाग्र करतो. वस्तू नेहमीचीच असते पण भक्तिमार्गावर वाटचाल करताना तिचे प्रयोजन किती समर्पक रीतीने केलेले असते हे आपल्याला या विषयाचा अभ्यास करू लागलो की समजते. प्रत्येक ठिकाणी भक्ताला योग्य मार्गदर्शन कसे मिळेल याचा बारीकसारीक विचार मंदिराच्या स्थापत्यकरांनी केलेला आढळतो.

मंदिराच्या सभामंडपात मधोमध एक मोठी दगडी शिळा दिसून येते. अनेक ठिकाणी हा पांडवांचे जेवायचे ताट होते असे सांगितले जाते. मुळात याला रंगशिळा म्हणतात. देवाला दोन प्रकारचे भोग चढवतात. एक अंगभोग आणि दुसरा रंगभोग. अंगभोगामध्ये देवाला पंचामृत, सुगंधी द्रव्य यांनी स्नान घालणे, त्याला गंधाने विलेपन करणे, फुले, हार, वस्त्रे, विविध अलंकार यांनी मूर्ती सजवणे, त्याला विविध पदार्थांचा नैवेद्य दाखवणे हा विषय येतो. तर रंगभोगात देवापुढे कीर्तन, प्रवचन, नृत्य, वादन इत्यादी कला सादर करणे हा विषय येतो. ही कला ज्या शिळेवर बसून किंवा उभे राहून सादर केली जाते तिला म्हणतात रंगशिळा. ही रंगशिळा प्राचीन मंदिरांतून हटकून बघायला मिळतेच. पुढे पुढे ही रंगशिळा लोप पावून तिचे स्थान कासवाने घेतलेले दिसते.

कासव हे सुद्धा कणखर, चिवट भक्तीचे प्रतिक म्हणूनच मंदिरामध्ये दाखवलेले असते. कासवाची पाठ टणक असते. त्याला चार पाय, एक डोके व एक शेपूट असे सहा अवयव असतात. आपल्या मनामध्ये असलेल्या षड्रिपूंचे प्रतिनिधित्व हे कासव करत असते. ज्याप्रमाणे कुठलेही आक्रमण झाले की कासव आपले हे सहा अवयव आपल्या पोटात ओढून घेते आणि टणक पाठ फक्त वरती राहते त्याच प्रमाणे आपल्या मनामध्ये असलेले सहा रिपू आपण आतमध्ये घेऊन कासवाच्या पाठीसारखे टणक होऊन देवाच्या भेटीला गेले पाहिजे हे त्यामागचे प्रयोजन असते.

मंदिरामध्ये प्रवेश केल्यावर मुख्य देवतेची मूर्ती ही गर्भगृहामध्ये बसवलेली असते. गर्भगृह हा शब्द सुद्धा किती समर्पक वापरला गेला आहे नाही का. ज्या ठिकाणी गेल्यावर आपले मी पण गळून पडते. आपली साक्षात ईश्वराशी गाठ पडते. आणि मी आणि तो भगवंत एकाच आहोत याची जाणीव होते. याचे ज्ञान प्राप्त होते. याचाच अर्थ आपला पुन्हा एकदा जन्म होतो. त्यामुळे जन्म होण्याची जागा ती म्हणजे गर्भगृह. अर्थातच इथे अंधार असला पाहिजे. फक्त तेवणारी एक समई आणि त्या गूढ प्रकाशामध्ये आपल्याला झालेली स्वतःची ओळख. अत्यंत पवित्र, अत्यंत अर्थपूर्ण आणि ज्ञानामुळे स्वतःला होणारी स्वतःची ओळख असे हे गर्भगृह. या गर्भगृहाच्या दरवाजावर एक छोटी चौकट असते आणि त्यात एक देवतेची मूर्ती स्थापित केलेली दिसते. त्या चौकटीला म्हणायचे ललाटबिंब. मुख्य गाभाऱ्यात कोणती देवता आहे, किंवा ते मंदिर हे कोणत्या देवतेचे आहे हे सांगणारे ठिकाण म्हणजे हे ललाटबिंब. एखादे मंदिर हे कोणत्या संप्रदायाला समर्पित केलेले आहे, ते शैव, वैष्णव, शक्ती, अशा कोणत्या संप्रदायापैकी असेल तर त्या संप्रदायाच्या देवतेची एक छोटी प्रतिमा या ललाटबिंबामध्ये कोरलेली आढळते. मंदिर शिवाचे असेल तर तिथे गणपती, शिव, भैरव अशांच्या मूर्ती आढळतात. ते वैष्णव असेल तर तिथे विष्णूची आसन प्रतिमा किंवा शेषशायी विष्णूची प्रतिमा पाहायला मिळते. ते मंदिर जर देवीचे असेल तर त्या ठिकाणी देवीप्रतिमा पाहायला मिळते. ललाटबिंब हे अनेकदा मंदिराच्या सभामंडपात प्रवेश करण्यासाठी असलेल्या दरवाज्यावर सुद्धा पाहायला मिळते. मंदिराचे अंतरंग उलगडून दाखवण्याकरता ललाटबिंब देखील प्रकाशवाटांचेच काम करते. या सगळ्या गोष्टी आपल्या सारख्या भक्तांना मार्गदर्शन करण्यासाठीच मुद्दाम निर्मिलेल्या आहेत. त्यांचे प्रयोजन समजून घेऊन जर आपण भक्तीमार्गावर चालू लागलो तर निश्चितच त्याचा खूप मोठा उपयोग होऊ शकतो.

अनेक बारीकसारीक गोष्टी आपल्याला बरेच काही शिकवतात, आपल्या बुद्धीला चालना देतात, आपल्याला आश्चर्यचकित करून टाकतात. मंदिर स्थापत्यामध्ये असलेले बारकावे अभ्यासू लागलो की त्यामागची कलाकाराची दृष्टी, त्यामागचे तत्त्वज्ञान ते सर्वसामान्य लोकांपर्यंत पोचवण्याची तळमळ समजून येते. मंदिराच्या बाह्यभिंतींवर असणारी अप्सरांची शिल्पे ज्यांना सुरसुंदरी असे म्हटले जाते हे याचेच एक उदाहरण आहे. या अत्यंत आकर्षक आणि डौलदार असलेल्या अप्सरांची शिल्पे ही मानवाच्या मनातील विविध विकारांची प्रतीके आहेत. साखरेचे वेष्टन असलेली खरंतर ही कडू गोळी आहे. काम, मद, मत्सर हे आपल्या मनातील भाव हे त्या अप्सरांच्या रूपाने शिल्पित केलेले आढळतात. त्या कायम मंदिराच्या बाह्य भागावरच असतात. अनेक लोकांकडून गैरसमजुतीमधून एक चूक अशी होते की मंदिरात दर्शनाला गेल्यावर आधी देवाचे दर्शन घेऊन नंतर प्रदक्षिणा घातली जाते. परंतु बाह्यदर्शन प्रथम या न्यायाने या सर्व अप्सरा ज्या आपल्या मनातील विकारांचे प्रतिनिधित्व करतात त्यांचे दर्शन आधी हवे. हे सगळे विकार मानवाला आहेतच ते असेच बाहेर ठेवायचे. जसे आपण चपला बूट बाहेर काढून नंतर मंदिरात जातो त्याच न्यायाने हे विकार पण बाहेर काढून ठेवून निर्मल मनाने आपण भगवंताच्या दर्शनाला जावे हा त्या मागचा उद्देश आहे. त्यासाठीच त्यांचे अंकन हे मंदिराच्या बाह्य भागावर केलेले आढळते. मराठवाड्यातील अनेक मंदिरे ही या सुरसुंदरींसाठी प्रसिद्ध आहेत. पानगाव, निलंगा येथील मंदिरांवर तर अत्यंत देखण्या या अप्सरा कोरलेल्या आढळतात. त्यांना विविध नावे सुद्धा दिलेली आहेत. डालमालिका, कर्पूरमंजरी, आलसा, दर्पणा, शुकसारिका, नुपूरपादिका, पत्रलेखिका, मेनका यासारखी नावे त्यांना दिलेली आहेत. अत्यंत सुडौल आणि बांधेसूद असे त्यांचे अंकन केलेले आढळते. नगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातील टाहाकारी इथल्या मंदिरांवर सुद्धा अत्यंत आकर्षक अशा या अप्सरा कोरलेल्या दिसतात. मनातील



विकारांवर त्या भाष्य करतात आणि माणसाच्या आयुष्यातील त्यांचे अपरिहार्य असलेले स्थान त्या विदित करत असतात.

मंदिरांवर दिसणारे आणि इतिहासाच्या अभ्यासासाठी अत्यंत पूरक असलेली अजून एक गोष्ट म्हणजे शिलालेख. मंदिर बांधणी केल्यानंतर ते मंदिर कोणी बांधले, कोणत्या राजाने त्यासाठी पैसे पुरवले होते, कोणत्या भक्ताने देणगी दिली होती, या आणि अशा असंख्य गोष्टी आपल्याला या शिलालेखातून सापडतात. काहीवेळेला मंदिर पडून गेलेले असते परंतु तिथे शिलालेख सापडतात आणि त्यामुळे त्या भागाचा सारा इतिहास आपल्यासमोर उलगडला जातो. शिलालेखात ते मंदिर बांधल्याचे साल कोरलेले असते. कर्नाटक राज्यात असलेल्या बदामी जवळच्या ऐहोळे इथल्या मंदिरावर असलेला सम्राट पुलकेशीचा शिलालेख प्रसिद्ध आहे. त्या शिलालेखानुसार पुलकेशी राजाची वंशावळच अभ्यासता येते. अंबरनाथ इथल्या शिवमंदिरावर असलेल्या शिलालेखामुळे ते मंदिर इ.स. १०६० साली बांधले आणि ते भारतातील पहिले 'भूमिज पद्धतीचे मंदिर' असल्याचे सिद्ध झाले. तमिळनाडूमधे चोळांच्या मंदिरावर असलेले शिलालेख म्हणजे जाऊन इतिहासाचे पुस्तकच आहे. इतके मोठे आणि विस्तृत शिलालेख जगात कुठेही दिसत नाहीत. चोळांचा सर्वंकष इतिहास या शिलालेखातून समजून येतो. एकवेळ मंदिरावर शिल्पकला कमी असेल पण चोळांची मंदिरे शिलालेखांनी नटलेली असतात. त्यातूनच मग चोळांच्या काळातली लोकशाही व्यवस्था, चोळ राजांनी बांधलेली रुग्णालये आणि त्यांची व्यवस्था या खूप आगळ्यावेगळ्या विषयावर उजेड पडतो. अनेक बौद्ध लेण्यांमध्ये असे शिलालेख कोरलेले आढळतात. कोण भक्ताने दिलेल्या दानातून, देणगीमधून हे लेणे कोरून घेतले आहे याचा उलगडा या शिलालेखांवरून होतो. सर्वात मोठा शिलालेख आपल्याला जुन्नरच्या जवळ असलेल्या नाणेघाटाच्या तोंडाशी कोरलेल्या लेणीमध्ये पाहायला मिळतो. सातवाहन साम्राज्याची राणी नागनिका हिने तो कोरला आहे. नाणेघाटाच्या तोंडाशी असलेल्या लेणीच्या तीनही भिंतींवर ब्राह्मी लीपिमधील हा शिलालेख मुद्दाम जाऊन पाहण्यासारखा आहे. काय काय रहस्य दडलेली आहेत त्यात हे तिथे गेले की समजते. या लेखात सातवाहन घराण्यातील राजांची नावे, नागनिका राणीने केलेले विविध यज्ञ, त्या यज्ञाच्या वेळी कार्षापण या चलनात दिलेली दाने या आणि अशा अनेक गोष्टींचा उल्लेख या शिलालेखातून होतो. पुण्यामधील प्रसिद्ध पुरातत्वज्ञ कै.डॉ. शोभना गोखले यांनी आपले सारे आयुष्य या शिलालेखांच्या अभ्यासासाठी वेचले.

शिलालेखाप्रमाणेच अजून एका गोष्टीवरुन इतिहासातील घटनांवर उजेड पडतो ते म्हणजे ताम्रपट. तांब्याच्या पत्र्यावर ठोकून किंवा कोरून काढलेला मजकूर हा अनेक ऐतिहासिक घटनांवर उजेड टाकतो. बरेच वेळा राजसत्तेकडून जेंव्हा विविध दाने दिली जात होती तेंव्हा ती ताम्रपट या स्वरुपात देत असत. ताम्रपट हे धातूचे पत्रे असल्यामुळे ते टिकाऊ होते आणि ती दाने वंशपरंपरागत दिलेली असल्यामुळे ती अनेक शतके टिकून राहणे अध्याहृत होते आणि म्हणूनच ती ताम्रपटाच्या स्वरुपात दिलेली असत. रत्नागिरी जिल्ह्यातल्या आडिवरे या महाकालीच्या गावाजवळच कशेळी नावाचे गाव आहे. गावात कनकादित्य असे सूर्यमंदिर आहे. या मंदिरात ४ पत्रे असलेला एक सुंदर ताम्रपट पाहायला मिळतो. जाड पत्रा असलेला इ.स. ११९१ सालचा शिलाहार भोजराजाचा हा ताम्रपट म्हणजे त्या राजाने या मंदिराला दिलेले दानपत्र आहे. अनेक ताम्रपटांमुळे खूपच महत्त्वपूर्ण ऐतिहासिक बाबी उघडकीला आल्या आहेत.

मंदिर ही एक सामाजिक संस्था आहे. तिथे अनेक प्रकारचे लोक येत असतात, भेटत असतात, चर्चा करतात. प्राचीन काळापासून मंदिरांचा उपयोग हा केवळ देवाचे निवासस्थान या स्वरुपात न करता एक सामाजिक संदर्भ म्हणून केला जायचा. तिथे होणारे उत्सव, समारंभ, जत्रा-यात्रा यांचा उद्देश परिसरातील लोकांनी त्या निमित्ताने एकत्र यावे हाच होता. मंदिराच्या संदर्भात वर उल्लेखिलेल्या या सर्व गोष्टी येणाऱ्या भाविकाचे प्रबोधन व्हावे, त्याला काही तत्त्वज्ञान सांगावे, त्याच्या मनाच्या अवस्थांचे प्रातिनिधिक स्वरूप त्याच्या समोर उभे करावे या उद्देशाने केल्या गेल्या. याचाच अर्थ भक्तिमार्गावर वाटचाल करणाऱ्या भाविकाला वाट दाखवण्याचे, प्रकाश दाखवण्याचे काम ही सर्व प्रतीके वर्षानुवर्ष करत आली आहेत. अज्ञानाचा अंधःकार नाहीसा व्हावा आणि ज्ञानाचा उजेड त्याच्या आयुष्यात पडावा यासाठी केलेला हा सारा खटाटोप होता असे समजते. मंदिरावर असलेली कोणतीही मूर्ती, प्रतिमा, चिन्हे ही केवळ उगाच केलेली नाहीत. त्यांच्यामागे काही तत्त्वज्ञान काही ठाम वैचारिक बैठक नक्कीच आहे. या गोष्टींचा मागोवा घेताना तो विचार, ते तत्त्वज्ञान काही प्रमाणात जरी आपल्या मनात भिनले तरीसुद्धा ही दिवाळी निश्चितच प्रकाशमय झाली असे म्हणता येईल. ह्या सर्व गोष्टी मंदिरे आपल्याला सांगत असतात. मंदिरांचे हे अंतरंग आपण जाणून घेतल्यानंतर जेव्हा आपण आता कुठलेही मंदिर बघायला जाऊ तेव्हा या मंदिरांच्या अंतरंगाप्रमाणेच आपलेही अंतरंग उजळून निघेल. आपले पर्यटन अधिक समृद्ध होईल, अधिक संपन्न होईल.

# आली दिवाळी


**विंग कमांडर (निवृत्त) डॉ राजेश शांताराम जोशी**

**सातारा, महाराष्ट्र**


आली दिवाळी आली दिवाळी
आली दिवाळी आली दिवाळी
उजळून दीप मनाच्या दीपमाळी
दूर करु विषयतमाची काजळी

पहिला दिवस वसुबारसेचा
गाईवासरांच्या कोडकौतुकाचा
पुरणपोळीचा घास भरवून
कृतज्ञतेने करूया पूजन

दुसरा दिवस धन्वंतरी पूजन
आणि धनत्रयोदशीचा सण
धनधान्य आणि सुखसमृद्धी
होऊ शतायुषी करू आरोग्यवृद्धी

तिसरा दिवस नरकचतुर्दशी
अभ्यंगस्नान करुनी या दिवशी
धुवून टाकू किल्मिषांचा असुर
मन स्वच्छ करू ठेवू षड्रिपू दूर

चौथ्या दिवशी पूजूनी लक्ष्मी
मागणे मागतो नको कशाची कमी
सुजनांच्या घरी असो तुझा वास
सर्वांच्या मुखी सुखाचे चार घास

बलिप्रतिपदा नि दिवाळी पाडवा
दिवस दिवाळीचा आनंदी हा पाचवा
बलिसम नम्रता नि उदारता ठेवा
पतीपत्नीतील वाढू दे गोडवा

दिवस सहावा भाऊबीजेचा
भाऊबहिणीच्या अतूट मायेचा
असू आम्ही श्रीमंत वा निर्धन
हे प्रभू नको तुटू दे प्रेमाचे बंधन

सैनिक बांधव आणि शेतकरी
एक शेतात अन् दुसरा सीमेवरी
त्यांच्यावाचून ही दीपावली अपूरी
ठेवा दोन घास अन् दोन दिवे दारी

आली दिवाळी आली दिवाळी

# संस्कृती म्हणजे नक्की काय?

प्रथम पारितोषिक



संध्या (सामंत ) सावंत , ठाणे

’हे आमच्या संस्कृतीत येत नाही ‘  असं खूपदा ऐकायला मिळतं.
पण कधी विचार केलाय का की हे बोलणं बरोबर आहे का?. संस्कृती म्हणजे स्वभाव आहे का..तर नाही. मग संस्कृती म्हणजे धर्म आहे का? मुळीच नाही. संस्कृती ही पुणेरी किंवा महाराष्ट्रीयन असू शकते का? की संस्कृती काळानुसार प्राचीन किंवा अर्वाचिन असू शकते? संस्कृती ही भारतीय किंवा पाश्चात्य असू शकते का की हिंदू किंवा द्रविडी अथवा युरोपीय किंवा ख्रिस्ती किंवा इस्लामी असू शकते ? तशीच ती आदिवासी किंवा कृषीही असू शकते नाही का!. म्हणजे अशा विविध स्वरूपात आपण संस्कृतीला संबोधतो. मग नेमकं ‘संस्कृती’ म्हणजे काय असा प्रश्न नाही का पडत?.

जेव्हा आपण ‘सांस्कृतिक कार्यक्रम’ संभोधतो, त्यात प्रामुख्याने येते ते गायन-वादन, नृत्य-नाट्य किंवा त्यापलीकडे जाऊन येते ती भाषा. मग ह्या सर्वाचा मिलाप म्हणजे संस्कृती असेल का?

की आपल्या राहण्याची पद्धती, बोलणे, वागणे, पेहराव हे बदलत गेले, कालानुरूप बदलत गेली ती संस्कृती नव्हे का?

आपल्या प्रमाणेच हजारो वर्षे ह्या पृथ्वीवर वास करणारे प्राणी




असो किंवा  मुंगीचे वारूळ, चिमणीचे घरटे, बेडकाची राहण्याची पद्धती हे सारं बदलू शकले नाही. परंतु मनुष्य प्राणी एकमेव असा जीव आहे जो सर्व गोष्टी बदलत जातो आणि पुढच्या पिढीला प्रदान करतो. मग ह्यास जर आपण संस्कृती संबोधले तर निदान असे म्हणता येईल की परिवर्तन आणि गती ही संस्कृतीची ‘वैशिष्ट्ये’ आहेत.

संस्कृती आपल्याला समजते तेवढीच, दिसते तेवढीच नसून ती अधिक व्यापक आहे. पण आपल्याकडे संस्कृतीचा अर्थ प्रादेशिक, धार्मिक, वांशिक, जातीय, प्रांतीय इत्यादी दृष्टीने मर्यादित केलेला आढळतो. एका संस्कृतीला दुसऱ्या संस्कृतीपेक्षा उच्च किंवा कमी लेखणे, दुसऱ्यापेक्षा आपली संस्कृती किती चांगली हे दाखवत राहणे हेच सर्वत्र आढळते. म्हणून पडलेला प्रश्न की संस्कृती म्हणजे नक्की काय? आणि जे त्याचा उल्लेख वारंवार करतात त्यांना तरी माहित आहे का संस्कृती म्हणजे नक्की काय ?

चला आपण थोडंसं खोलात जाऊ. संस्कृती याचा संस्कृतमध्ये जर अर्थ शोधला तर ‘चांगले करणे’ असा होतो. म्हणजेच संस्कृतीची फोड केली तर होते संस्कार आणि कृती . आता संस्कार म्हणजे काय तर ‘दिले जाणारे ज्ञान किंवा सुधारल्या जाणाऱ्या चुका’ अशी साधारण व्याख्या पकडू. संस्कार हे सामान्यपणे शारिरीक, मानसिक, आध्यात्मिक, सामाजिक या प्रकारात मोडतात. आणि ते चांगले किंवा वाईट दोन्ही असु शकतात. कृती म्हणजे क्रिया. इथे आपण (चांगला अर्थ काढण्यासाठी ) असं पकडू की संस्कृती ह्या जोडाक्षराचा सामान्य अर्थ चांगली कृती करणे आणि जे मुळात आहे ते अधिक सुंदर करणे म्हणजेच परिवर्तन.

संस्कृती म्हणजे इंग्लिश मध्ये Culture. आणि हा शब्द फ्रेंच शब्दापासून आला आहे. त्याचे मूळ ‘colere’ या लॅटिन भाषेतील शब्दात आहे. ‘Culture’ म्हणजे मशागत करणे. नंतर जीवनाच्या मशागतीला हा शब्द रूढ झाला. ( अर्थातच त्यालाही व्यापक अर्थ आहे ) पुढे त्या शब्दाचा अर्थ ‘एखाद्या समाजाच्या किंवा देशाच्या चालीरीती, कल्पना, श्रद्धा कला, साहित्य, संगीत वगैरे.’ अशा स्वरूपाचा झाला.

मानव इतर मानवापासून परंपरागत वस्तूंचा व मूल्यांचा वारसदार होऊ शकतो; म्हणून ‘संस्कृती’ निर्माण होते. मनुष्य आपल्या इच्छा आकांक्षा मधून, बुद्धीचा वापर करून, भोवतालच्या सृष्टीतून आपल्या उपयोगाचे पदार्थ निर्माण करतो, मग ती कला इतरांना शिकवतो, ते पदार्थ इतरांना उपभोगास ठेवून जातो.  एकमेकांशी वागावे कसे, संघटित जीवन  जगावे कसे, योग्य-अयोग्य, न्याय्य-अन्याय्य, धार्मिक-अधार्मिक, पाप-पुण्य, देव-राक्षस, ईश्वर व सृष्टी ह्या सर्व साचेबंद कल्पना  एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असतात. पण आपण कधीतरी असा विचार केला आहे का, की ज्या संस्कृतीचे आपण पालन करीत आहोत ती आत्मसात कशी झाली, कोणी सुरुवात केली? चांगल्या-वाईटाचे तारतम्य येण्याआधीच आपण त्या त्या धर्माचे, संस्कृतीचे अनुयायी झालेले आहोत. आपण धर्म किंवा संस्कृती स्वीकारली नाही, धर्माने किंवा संस्कृतीने जन्मानुसार आपणास स्वीकारले आहे, आत्मसात केले आहे हे आपण विसरतो.

कला व ज्ञान हे काय एका व्यक्तीने व एका पिढीने निर्माण केलेले असते का ? तसेच स्वराज्य,  कुटुंब, पापपुण्य ह्या समाजसंस्था व मूल्ये काय एका व्यक्तीने बनविलेली असतात का ? त्यात अनेक पिढ्यांचा हाथभार असतो. त्या त्या काळात जो राजा होऊन गेला तो आपले शासन ‘ईश्वरप्रणीत’ कसे आहे हे दाखवीत असतो. त्याच्या जीवनकाळात सर्व प्रकारची माणसं असतात. म्हणजेच त्याला मानणारी किंवा जुमानणारी.  मग त्याची प्रजा आणि पुढची पिढी त्याचे कर्तृत्व पुढे नेऊन किंवा काहीवेळेस कथा रचवून, लोकांना पटतील असे उल्लेख देऊन एक नवीन समाजसंस्था निर्माण करीत असते. ज्यात एक विशेष छाप दिसून येतो आणि बदल म्हणून स्वीकारला जातो. आज कोणी सांगू शकेल का विवाहसंस्था कोणी निर्माण केली? अमुक नीतिनियम कोणत्या व्यक्तीने

घातले? भारतात असंख्य जाती जन्माला कोणी बनविल्या?स्त्रियांच्याबद्दलचे नियम कोणी आखून दिले? हे प्रश्न असेच अनुत्तारित आहेत. कायदे कोणी एका व्यक्तीने जाणूनबुजून केले असे म्हणणे चूक नाही का होणार!.

आपण अश्म युगात डोकावले तर मनुष्याकडे काहीही नव्हते म्हणजे ना कपडे ना जाती धर्म ना संस्कृती. तेव्हा मनुष्य बरेचसे स्वतंत्र असे समाजजीवन जगत होता . तेव्हा दैनंदिन जीवन कसे जगावे ह्यावरच भर होता. त्यातूनच हत्यारे, पोषाख, खाणे-पिणे, आचार-विचार ह्यांत बदल घडत गेले. कल्परतवे नवनवीन भावनांचा उदय झाला. गरजा बदलू लागल्या. मनुष्य स्वार्थी, आक्रमक होऊ लागला. जनसंख्या वाढत गेली आणि आपले वर्चस्व सिद्ध करायची वेळ त्याच्यावर आली. त्यातच तो एका प्रदेशातून तो दुसरीकडे विस्थापित होऊ लागला. जशी भौगोलिक परिस्थिती तशी त्याची गरज बनू लागली. म्हणजे गरम प्रदेशातील कपडे वेगळे तर थंड मधील वेगळे तसे ज्याची वस्ती नदी, समुद्राकाठी त्याची खाद्यसंस्कृती वेगळी आणि डोंगरमाथ्याशी राहणाऱ्याची वेगळी होत गेली. नंतर हळूहळू भाषा विकसित झाली आणि इतरही अनेक बदल होत गेले. म्हणजेच काय ज्या संस्कृतिबद्दल सर्रास बोलले जाते ती आली कुठून तर तत्कालीन प्रादेशिक परिस्थितीवरून, गरजांमधून.

नित्योपयोगी वस्तुंपासून ते आध्यात्मिक विचारापर्यंत प्रत्येक समाजाची कृती इतर समाजांपेक्षा थोडीथोडी निराळी होऊ लागली व देशकालपरत्वे त्याला संस्कृतीचे रूप प्राप्त झाले. म्हणजेच काय तर संस्कृतीच्या निर्मितीला अनेक पिढ्यांतील अनेक व्यक्तींचे थोडेथोडे कर्तृत्व उपयोगी पडते. कोणतीही एक व्यक्ती संस्कृती घडवूही शकत नाही किंवा बदलूही शकत नाही.

एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला संस्कृतीची देवाणघेवाण होताना तिच्यात बदलही घडत असतो. कोणतीही संस्कृती स्थिर व अचल नसते. काही कालखंडात मोठे फरक पडतात तर एरवी हळूहळू संस्कृती बदलत असते. व्यक्ती ज्या संस्कृतीत जन्माला येते त्याप्रमाणे तिचा जीवनक्रम ठरतो , हे बऱ्याच अंशी खरे असले तरी व्यक्तीला स्वत:चा जीवनक्रम घडविण्याची स्वतंत्रता आहे व तसे करीत असताना सामाजिक संस्कृती बदलली जाऊ शकते.

आज आपण समाजाचे एक घटक आहोत, आपण सर्व एक आहोत, सारखे आहोत, ही भावनाच शिल्लक उरलेली नाही.कोणतीही संस्कृती एकटी विकसित होत नसते. विविध संस्कृतींच्या आधारातून, सानिध्यात ती विकसित होत असते. त्यामुळे आमची संस्कृती तुमच्यापेक्षा उत्कृष्ठ म्हणणे म्हणजे अज्ञानाचे प्रदर्शन करणारे ठरेल. कारण प्रदेश, राष्ट्र-राज्य, संस्कृती या माणसांनी अगदी अलीकडे जन्माला घातलेल्या नाहीत.संस्कृतीवरून एकमेकांना हिणवणे योग्य नाही.

संस्कृती 'जोडणारी' असली पाहिजे, 'तोडणारी' नाही. संस्कृती ही मानव कल्याणासाठी असली पाहिजे. विशिष्ट संस्कृतीमुळे समाजात गट पडू नयेत, दुफळी माजू नये, यासाठी आपण सतर्क राहिले पाहिजे. योग्य बदल स्वीकारले पाहिजे. तरच चांगल्या 'संस्कृती'चे जतन होईल.

बदलू लागल्या. मनुष्य स्वार्थी, आक्रमक होऊ लागला. जनसंख्या वाढत गेली आणि आपले वर्चस्व सिद्ध करायची वेळ त्याच्यावर आली. त्यातच तो एका प्रदेशातून तो दुसरीकडे विस्थापित होऊ लागला. जशी भौगोलिक परिस्थिती तशी त्याची गरज बनू लागली. म्हणजे गरम प्रदेशातील कपडे वेगळे तर थंड मधील वेगळे तसे ज्याची वस्ती नदी, समुद्राकाठी त्याची खाद्यसंस्कृती वेगळी आणि डोंगरमाथ्याशी राहणाऱ्याची वेगळी होत गेली. नंतर हळूहळू भाषा विकसित झाली आणि इतरही अनेक बदल होत गेले. म्हणजेच काय ज्या संस्कृतिबद्दल सर्रास बोलले जाते ती आली कुठून तर तत्कालीन प्रादेशिक परिस्थितीवरून, गरजांमधून.

नित्योपयोगी वस्तुंपासून ते आध्यात्मिक विचारापर्यंत प्रत्येक समाजाची कृती इतर समाजांपेक्षा थोडीथोडी निराळी होऊ लागली व देशकालपरत्वे त्याला संस्कृतीचे रूप प्राप्त झाले. म्हणजेच काय तर संस्कृतीच्या निर्मितीला अनेक पिढ्यांतील अनेक व्यक्तींचे थोडेथोडे कर्तृत्व उपयोगी पडते. कोणतीही एक व्यक्ती संस्कृती घडवूही शकत नाही किंवा बदलूही शकत नाही.

एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला संस्कृतीची देवाणघेवाण होताना तिच्यात बदलही घडत असतो. कोणतीही संस्कृती स्थिर व अचल नसते. काही कालखंडात मोठे फरक पडतात तर एरवी हळूहळू संस्कृती बदलत असते. व्यक्ती ज्या संस्कृतीत जन्माला येते त्याप्रमाणे तिचा जीवनक्रम ठरतो , हे बऱ्याच अंशी खरे असले तरी व्यक्तीला स्वत:चा जीवनक्रम घडविण्याची स्वतंत्रता आहे व तसे करीत असताना सामाजिक संस्कृती बदलली जाऊ शकते.

आज आपण समाजाचे एक घटक आहोत, आपण सर्व एक आहोत, सारखे आहोत, ही भावनाच शिल्लक उरलेली नाही.कोणतीही संस्कृती एकटी विकसित होत नसते. विविध संस्कृतींच्या आधारातून, सानिध्यात ती विकसित होत असते. त्यामुळे आमची संस्कृती तुमच्यापेक्षा उत्कृष्ठ म्हणणे म्हणजे अज्ञानाचे प्रदर्शन करणारे ठरेल. कारण प्रदेश, राष्ट्र-राज्य, संस्कृती या माणसांनी अगदी अलीकडे जन्माला घातलेल्या नाहीत.संस्कृतीवरून एकमेकांना हिणवणे योग्य नाही.

संस्कृती 'जोडणारी' असली पाहिजे, 'तोडणारी' नाही. संस्कृती ही मानव कल्याणासाठी असली पाहिजे. विशिष्ट संस्कृतीमुळे समाजात गट पडू नयेत, दुफळी माजू नये, यासाठी आपण सतर्क राहिले पाहिजे. योग्य बदल स्वीकारले पाहिजे. तरच चांगल्या 'संस्कृती'चे जतन होईल.

## नवीन वर्ष

**जयवंत नारायण चव्हाण, रत्नागिरी**

कॅलेंडर बदललं कि वाटतं,
आयुष्यही नवं झालं
रोजच्या जगण्यातला
तोचपणा जरासा विरतो झालं!

मागल्या वर्षी राहून गेलेलं,
यंदाच्या वर्षी घडेलंसं वाटतं
मागचे हिशोब चुकते करताना
मात्र.. मन जरासं काहुरतं!

नव्या वर्षात नवी स्वप्नं पडतात
कधी जुनीच स्वप्नं नव्याने येतात
आस मनाला लावतात,
पुन्हा नवे धुमारे फुटतात!

जणू पहिल्या पावसात झाडं,
नव्या पालवीने बहरतात
मनाला चिंब चिंब भिजवतात,
अन आशेचे पाखरू स्वैर उडतात!

तांबड्या क्षितिजावर अलगद
सूर्यही घेतो नवा आकार
नवेच किरण, नवेच आकाश,
नव्या वर्षाचाच हा सारा थाटमाट

नवेनवेसे दिवस असे कितीसे असतात
वर्षे अशीच पाठ फिरवून सरतात
दरवर्षी असेच कॅलेंडर बदलतात
नव्या आयुष्याची हुलकावणी देऊन जातात!!!

# मिरची, पुदिना, स्पर्श ज्ञान आणि वैद्यकीय नोबेल २०२१



डॉ. अंजली कुलकर्णी, पुणे

लेखाचे शीर्षक वाचून तुम्ही आश्चर्यचकित झाला असाल ना? एकमेकांपासून इतक्या वेगळ्या घटकांची मी एकत्र मोट कशी काय बांधू शकते हा विचार तुमच्या मनात आला असणार. पण लेख वाचलात की तुम्हाला या रहस्याचा उलगडा होईल.

मिरची ही आपल्या दैनंदिन परिचयाची आहे. पण तुम्हाला हे माहीत आहे का की मिरचीचे झाड मूळचे भारतीय नाही तर दक्षिण अमेरिकेतील आहे. पोर्तुगीज आक्रमकांनी पंधराव्या शतकात भारतात प्रथमच मिरचीची लागवड सुरू केली. या मिरच्यांच्या बिया त्यांनी दक्षिण अमेरिकेतून चोरून आणल्या होत्या. त्या आधी पदार्थांना तिखटपणा देण्यासाठी भारतात काळ्या मिरीचा वापर केला जाई.

Capsicum annuum var annuum L. या शास्त्रीय नावाच्या वनस्पतीची फळे म्हणजे मिरच्या. मिरचीमध्ये स्वादाबरोबरच जिवाणूरोधक, वेदनाशामक व कॅन्सर प्रतिबंधक गुणधर्म आढळले आहेत. मिरचीचा तिखटपणा 'कॅप्सेसिन' व त्यासारख्या आणखी काही रेणूंमुळे असतो. हे रेणू मिरचीच्या बियांमध्ये असतात व पाण्यात विरघळत नाहीत. त्यामुळेच मिरचीचा तिखटपणा घालविण्यासाठी पाणी फारसे उपयोगी पडत नाही पण स्निग्धांश असलेले थंड दूध किंवा लस्सी उपयोगी पडते.

मिरचीचा तिखटपणा मोजण्यासाठी डॉ. स्कोविल यांनी ठरवलेले मापक वापरतात. हिरव्या मिरचीचा तिखटपणा साधारण १०,००० स्कोविल युनिटच्या आसपास येतो. प्रजाती व हवामानानुसार यात बदल होऊ शकतो. भारतातील सर्वात तिखट मिरची आहे आसाममध्ये वाढणारी 'भूत जोलकिया' / 'नागा जोलकिया'. हिचा तिखटपणा साधारण १०,४१,४२७ स्कोविल युनिटच्या आसपास येतो!

मात्र मिरचीचा तिखटपणा पेशींच्या पातळीवर कसा समजला जातो हे आपल्याला आजवर नीटसे कळले नव्हते. तसेच पुदिन्याची पाने चावल्यावर तोंडात जो थंडावा पसरतो त्याचेही पेशींच्या पातळीवर नीटसे आकलन झाले नव्हते.

डॉ. डेविड ज्यूलियस यांनी प्रथम दाखवून दिले की हा तिखटपणा व थंडाव्याचा संदेश, विशिष्ट प्रकारच्या प्रथिनांमुळे (proteins) आपल्या मेंदूपर्यंत पोचविला जातो (आकृती क्र. १).

मिरचीतील 'कॅप्सेसिन' हा रेणू आपल्या तोंडातील मऊ अंतर्त्वचेत असलेल्या टी.आर.पी.व्ही.-१ या प्रथिनाबरोबर म्हणजेच प्रोटिनबरोबर बंध निर्माण करून तिखट व गरम अशा दोन्ही भावना तोंडात तयार करतो. या बंधनामुळेच मानवी मेंदूला तिखटपणा व गरमपणा यांची जाणीव होते. हे टी.आर.पी.व्ही.–१ प्रथिन, आपण खूप गरम वा तिखट पदार्थ खाल्ल्यास आपल्या मेंदूला, तोंडातील बदललेल्या तापमानाची व चवीची, चेतासंस्थेद्वारे त्वरित जाणीव करून देते; जेणेकरून प्रतिक्षिप्त क्रियेद्वारे अति गरम व अति तिखट पदार्थ थुंकून दिला जातो व तोंडातील आतील नाजूक त्वचेला इजा पोचत नाही.


आकृती क्र.१ आकृती क्र.२

Mentha spicata L. हे शास्त्रीय नाव असलेल्या छोट्या झुडुपांपासून पुदिन्याची पाने मिळतात. ही पाने चावल्यावर त्यातून सुगंधी व रोगाणू प्रतिबंधक 'मेंथॉल' नावाचे रेणू आपल्या तोंडात पसरतात व थंडावा निर्माण करतात. या रेणूंमध्ये जिवाणू प्रतिबंधक गुणधर्मही आढळले आहेत. टी.आर.पी.एम्.-८ नावाचे, आपल्या तोंडातील मऊ अंतर्त्वचेत असलेले प्रथिन (protein) पुदिना पानातील मेंथॉलचे रेणू बांधून ठेवते व या बंधनामुळे, मेंदूपर्यंत संदेश पोचून गारपणा व थंडाव्याची जाणीव होते. थोडक्यात, टी.आर.पी.एम्.-८ हे थंड तापमानाची जाणीव करून देणारे प्रथिन आहे.


गरम व गार तापमानाचे नियमन करणारी वरील दोन प्रथिने (proteins) शोधण्याच्या कामासाठी २०२१ या वर्षातील वैद्यकीय विषयातील नोबेल पारितोषिक डॉ. डेविड ज्यूलियस यांना विभागून दिले गेले. ही दोन्ही प्रथिने मानवी शरीराचे तापमान ३७°से. ला कायम राखणे, पेशीदाह व इतर आंतर व बाह्य अवयवांच्या वेदनांचे मेंदूपर्यंत वहन करणे व संरक्षक प्रतिक्षिप्त क्रिया नियंत्रित करणे यात महत्त्वाची भूमिका बजावतात. यावर आधारित औषधांचा शोध लावण्याची स्पर्धा विविध औषध कंपन्यांमध्ये सुरू झाली आहे.

नोबेल पुरस्कारातील दुसरा अर्धा भाग मिळाला डॉ. अर्डेम पाटापुतीयन यांना. त्यांनी स्पर्श ज्ञान व शरीरावरील दाबाचा संदेश मेंदूपर्यंत पोचविण्यास मदत करणाऱ्या पिझो-१ या प्रथिनाचा शोध लावला (आकृती क्र. २). नवीन संशोधनातून असे दिसले आहे की पिझो-१ हे प्रथिन रक्तदाब योग्य राखणे, श्वसन नियंत्रित करणे, शारीरिक इजा रोखणे व मूत्राशयाचे काम नियंत्रित करणे अशा वेगवेगळ्या ठिकाणी संतुलन राखण्याचे काम करते. या प्रथिनावर आधारित औषधे तयार करण्याची स्पर्धा विविध औषध कंपन्यांमध्ये सुरू झाली आहे.

मानवाच्या आसपासच्या वातावरणातील महत्त्वाच्या संदेशांचे वहन करणाऱ्या प्रथिनांचा शोध ही फार मोठी बाजी आहे. दोन्ही वैज्ञानिक २०-३० वर्षे न थकता ही अतिशय







सूक्ष्म प्रमाणात मिळणारी प्रथिने शुद्ध स्वरूपात गोळा करण्यासाठी धडपडत होते. त्यांच्या चिकाटीला सलाम! यातून मानवाचे दु:ख व वेदना दूर करणारी औषधे लवकरात लवकर तयार व्हावीत हीच सदिच्छा.

आकृती क्र.३

टीप: लेखातील तिन्ही चित्रे मूलत: नोबेल पारितोषिकांच्या संकेतस्थळावर आहेत. येथे ती सुधारित स्वरूपात वापरली आहेत.



# Experience of Learning in Indian and US Education Systems



Smita Dandekar. California

“उच्च शिक्षण” हे जगातील सर्व देशात वैयक्तिक, सामाजिक व आर्थिक उन्नतिचे एक कारण मानले जाते. त्यामुळे उच्च शिक्षणाची सोय स्वदेशात शक्य नसेल तर परदेशात जाऊन अशा संधीचा लाभ घेणे देखील जगभर प्रचलीत होते व अजुनहि आहे. 1960 ते 2022 या काळात भारतातुन शिक्षणानिमित्त अमेरिकेत आलेल्या विद्यार्थ्यांचे अनुभव संकलित करणे हा या लेखाचा मुख्य उद्देश आहे. अनेक वर्ष भारता बाहेर वास्तव्य असल्यामुळे अनेकांचे अनुभव त्यांनी आंग्ल भाषेत व्यक्त केले आहेत.

Erin Duffin published an education related report in 2022, which included some USA education statistics. The report indicated that in the 1960’s, about 40% of the total US population was high school graduates and about 7.7% of the total population held a college degree. That number increased significantly by the year 2021. By 2021, 90 % of the population was high school graduates and about 37.9 % held a college degree. This statistic includes public and private schools and colleges data. Introduction of the Higher Education Act by President Johnson in 1965 and the Federal TRIO program promoted education for all citizens. Fulbright scholarships were offered to students enrolled in the Masters or PhD programs and that attracted the cream of the crop foreign students to study in the USA.

I requested Indian American - immigrants as well as first generation - students from different decades to share their education and learning experiences from both countries. They also shared their one positive and one negative experience from both systems. In the early sixties, foreign students initially faced cultural, social and economic differences. Communicating with the families back home was a challenge. In later years, due to cell phones and the Internet, communication with the families, school friends and foreign Universities became easier for students.

Personal experiences of students, (1964 - 2022):

**Shrinivas M**, came to Kansas State University in 1964 from India. He graduated with M.Arch.in June,65. He noted that the Indian education system’s learning assessment process, i.e. examinations, assessed what the students did not know about the subject matter they were studying and the US system assessed what the students knew about the subject matter. He was fortunate to have a professor who taught in both systems and he agreed with Shrinivas’s assessment of the examination process in both systems.

**Subhash K** came from IIT Mumbai to USA in 1969 to attend the University of Illinois and received his master’s in 1971 and then PhD in Material Science Physics in 1976. He indicated that the US education system tested for the student’s thorough knowledge and understanding of the subject matter of their education/degree. Prepared all students to use logical /rational thinking for problem solving and did not mainly tax their memory. He also mentioned that the independent testing and studying style of learning may not be suitable for all students. Some may need more one on one training and hence may require coaching. According to him, the Indian education system places too much pressure and emphasis on the annual final examinations. A short period of one week of exams covers all subjects, causing too much pressure during exams and many sleepless nights to prepare for it.

**Sharad D**, came to the US in 1969 after completing two engineering degrees in India. He attended University of Southern California, to complete his MS in Computer Science. He mentioned that the open communication between faculty and students was one of the key differences in the US educational system. In USC, each class size was very small and a system of having a ‘Teaching Assistant’ was quite helpful. Following the American accent, English was initially a bit difficult. Students needed to put a lot of effort in taking an initiative to do research and expand their learning experience. Gaining the knowledge and deep comprehensive understanding of the relevant subject and its application/s in real life was the primary focus of learning. Coming from Marathi medium until high school and then switching to English medium in college was a challenge in the Indian system. The Indian system lacked practical training at the undergraduate level. Grading system was based on the final exam percentage. One can study for the last few weeks of the year and still manage to get good grades.

**Rajani R** came to the US to join her husband who was doing his PhD in the University of Texas in Dallas (UTD) in Jan 1972. She completed her MS in Molecular Biology in 1974. Attending lectures that were taught by German / British professors in accents different from what I was used to in India was quite challenging initially. However, recording the lectures made the process a bit easier. “I think the semester system in the US was better as opposed to the year-end exams in the Indian education system.” In the US, the learning process involved doing independent research by the student and limited instructions by the teacher. In the Indian system, a lot of information was spoon-fed by the instructors. Not much awareness or scope for researching course material or expanding one’s curiosity. The Indian system had boundaries for learning and expectations were set quite rigidly. This, to her, was not very conducive to a student’s growth and learning. In the US, what took her a long time to get used to was the informality of the class atmosphere. In those days, many students used to smoke in the classroom. Entering/exiting the classroom at one’s will, drinking coffee or eating food during classes, less than decent manner of wearing clothes, looking unkempt, keeping their feet up on the benches during

course lectures …all that felt impolite and quite odd to her for quite a while!

**Anil J.** came to the USA in 1976, to join the Robert Fulton, Jr high school in Los Angeles, CA at the 8th grade level. He was amazed by the multimedia communication tools used to educate students and a wide variety of subjects such as wood working, plastics, metal and even horticulture that were offered in his Junior High. His school experience was very positive. "It really depended on the student's commitment to gain knowledge. Some students took undue advantage of their freedom to even distract the class and slow them down. There was no corporal punishment meted out to students who weren't paying attention and didn't complete their homework." His church based English Medium school in Mumbai was very strict. He appreciated his Indian school teachers skills and commitment to stuff knowledge into students even though the class size was very large and teachers barely had any audio visual aids. The Indian school structure was very rigid and offered very traditional classes. Innovative subjects were not offered as the school lacked basic sports equipment and educational materials. The teacher provided information that was mostly in the textbooks and the students were expected to memorize. There were never any projects that brought out students' creativity.

**Rohini A.** came to the US in 1986 and attended Syracuse University NY to get her MSEE. She noticed that the program emphasis was on application oriented learning. Such projects gave a glimpse of real world problems and helped her build confidence. The application-oriented approach to learning was difficult for foreign students at a later stage as they did not belong to any peer study group and the TA/Instructors did not facilitate formation of new groups either. In Delhi, India, college fees for girls were highly subsidized by the Government; ~ 2$/month fees offered a huge benefit to the female students. Due to the teacher's strike for an entire semester, the final exam was based on a very limited portion of the syllabus. Most of the students got good grades on the finals but they suffered as they did not learn much in that class.

**Varsha J** came to the USA in 1989 and attended the University of Kansas, University of Southern Indiana, Chubb Institute NJ to do MBA and Computer Programming Diploma. She indicated that the US education system combines conceptual learning with its practical application in a seamless fashion. Whether it is theoretical mathematics or management classes, one learns and applies the concepts as well to gain confidence.

A tremendous flexibility in the academic programs caters to varied needs and age groups. The options and freedoms to choose one's courses, their sequence, the professors who teach them and timings as well can sometimes offer too many options leading to confusion and indecisiveness on part of students.

When she was doing her undergrad degree in Economics and Masters in Business Economics in India, the academic programs were highly structured with defined learning materials and their learning order. Some may view this as lack of flexibility. On the other hand it can be viewed as a simplified path to learning for those who learn well in a structured environment. However, the course work could have included more ways to apply the theoretical knowledge to practical real-world situations.

**Smita D,** did MS in Public Health in 1991 from Cal State Northridge. Working full time and having a family affected her "University learning" experience. Her employer paid for all her college education fees, books etc. and expected her to get a minimum of "C" grade in that subject. Getting higher education in the relevant subjects was valued as an employee enrichment. An asset for the employer. During one of the class finals, her professor trusted her word for her need to take the final examination at home as her daughter had chickenpox. Mutual trust was a very rewarding experience for her. Learning the subject matter, theory and practical applications were the focus of learning in the US. Her Immunology class was a perfect example of the real time curriculum update. Her instructor used a copy of the recent publication as the textbook supplement.

Forming a formal study group was also a kind of new experience for her. About 28 books were on her study list. For this activity dividing the total number of books among 12 students was very helpful. Most of the books on the Master's program reading list were on the undergrad program study list hence other students had an advantage over her as she joined them during her Master's program. She felt that, in India, it was possible to study for the "Final" exam. Studying with friends or by yourself was certainly an option. It was also possible to leave a big part of the curriculum for "Option". Meaning choose not to study that portion of the curriculum at all. Final exam questions offered an option to select the part A or B. of that question and respond to that part only. Getting a better percentage in the final exam became the goal of learning for many students. Her degree course curriculum was set, did not change often and student's input/feedback was almost never taken into consideration by the Universities in early sixties. Disagreement with the teachers or even suggesting a different approach was very much out of the norm and at times not rewarded. Cold memorization of the key concepts without really truly understanding them was possible and sometimes that did translate into good grades in the final exam.

**Mallika J**'s experience was unique as she left the US education system in second grade. She went to India with her parents and completed her education until high school,12 grades in India and returned to the USA to study in a community college. She attended a pre-school in the US. That part was mainly learning to be in school without parents, making new friends and learning a few songs and stories. Then she went to India in October, 2012. Schools in India started in June. Adjusting for her was relatively easy as a second grader and making new friends was a lot easier as they all stayed together for a long period of time during the school days. In high school as a competitive gymnast, 7 hours of practice and 8 hours of school became challenging for her. She switched to the National Institute of Open schooling (NIO) board open school system during 9th and 10th grade and switched again to the regular system for the 11th and 12th grade. All logistic experiences of change were not easy but she somehow managed it.

The onset of COVID added another major change of "Online" learning. Before coming to the USA, at the last minute her teacher decided to have a quiz for 4 subjects. Taking the quiz

and passing it was necessary to clear (Pass) the 12th grade. She finished it all by 5PM and her flight to the US was two hours later. She is a perfect example of an ideal person that rolls with the punches and does their best to stay focused on the goal. She is currently attending a community college to study Graphic design and expects to transfer to a university in fall of 2023. She says blending in the Indian school system at a very young age was easy and now as a mature young student she is enjoying learning more about graphic design in the US system. With a very positive, adjusting, creative approach to learning anything is possible.

**Ashish J.** came to the US in 1993. His college experience in India was very delightful and his friends played a role in motivating him to study together. He felt like the curriculum was fixed. Students did not have any say in that matter. They needed to just follow it and the final examination performance at the end of the year decided how well they understood the subject. For him the US system felt very inclusive of student input into deciding a plan for themselves that had a layered class system. How to execute this plan was also kind of left up to the student. You could pick and choose the classes you want to take during next quarter. Allowing him to make small decisions towards getting a degree felt very rewarding when he completed his Bachelors in Computer Science.

**Ajit M**. came to the USA in 2005, to attend the University of Minnesota, Duluth, to do MS in Computer science. He also said that the practical knowledge and learning of the US learning system was very much appreciated. Due to an overtly individualistic culture and education system, professors and other students were not very approachable. Whereas in India, as he grew up there, accessing teachers, peers and other resources was relatively easy. Practical application of the Undergrad degree from India warranted some efforts.

**Aakash C.** came to the USA in 2018, and did his Ph D. at Purdue University in Gifted, Creative, and Talented Studies. He was blessed to have intense training in research methodology, in which he took10 courses to learn different quantitative and qualitative research methods. This knowledge raised his confidence in conducting research, and as a result, he could publish ten articles in international journals and books. The research infrastructure, including access to a world-class library, was the best of his experiences in the USA's Higher Education system.

Compared to the US, the research infrastructure in India is not as developed as it is in the USA. On the other hand, he pointed out that the US education system is quite transactional. That is, most human interactions are seen as transactions-- some sort of a give and take. Sometimes, this system reduces humans to mere objects of benefits and liabilities. I believe humans are much more than just objects of use. For example, CV points such as the number of publications, grants, and awards matter a little too much in the US education system and the job market. Also, the research is heavily driven by market forces such as industries.

Sadly, academicians have little control over what research gets funded. It is usually the big companies that decide what type of research would benefit them and hence get funded accordingly.

Resultantly, STEM research gets more traction and funding than, e.g. education, which is undoubtedly very important for humanity's overall progress. The US education system, economic progress matters more than anything else.

In India, institutional culture, encouragement, and resources needed to produce high-quality educational research are limited. But human connection is very much enjoyed in India. The interactions with peers and professors/teachers were much easier and friendlier compared to the US. He valued human connections a lot, and therefore, always felt a great sense of belonging.

**Siddha N**. came to the USA in 2020. She mentioned that her Marketing class teachers at the Long Beach State College partnered with some big corporations / companies. The company shared their projects with students and students worked on real life projects, developed an action plan, implementation strategy, and presented their plan to the company officials. Definitely a win-win scenario for all. She was also very much taken by surprise when the US University asked the students to evaluate their teacher's performance and asked for their feedback regarding a need to change the course curriculum or the teacher. Real time update in the contents, evaluation and its presentation system. Improving the learning experience almost in real time was immensely appreciated. She said that her counterpart Chinese students were already familiar with coding as it was included in their high school curriculum. The Indian system was still using the same curriculum for high school and undergrad degrees. Cold memorization of the information was still very much alive. Focus was on that annual final exam and getting good grades was the target to achieve.

In summary, in 2022, if we ask ourselves a question, "Is it still desirable for students to attend US universities?" then of course the answer will be student specific and kind of based on their current needs.

Sharing some relevant historic data. The Bureau of Educational and Cultural Affairs' (ECA) is a government agency. Their mission is to increase mutual understanding between the people of the United States and the people of other countries by means of educational and cultural exchanges that assist in the development of peaceful relations. International student mobility data is crucial to US higher educational professionals for making informed decisions regarding their future strategies. The ECA annual report provides a wealth of information regarding international students. According to the November 2021, ECA sponsored data report, by "Open Doors", the US hosts the largest international student population in the world, 914,095 students. April,2022 data suggests that a fifth of the international student population comprises students from India, 167,582 students. UNESCO data shows that Indian students studying outside India rapidly increased by 163% between 1999 and 2006 to reach 145,539 students as compared to slower growth of 25% between the years 2006 and 2013 to reach 181,872 students.

US Universities do encourage foreign students to attend their universities. They are actively engaging their students with a balance between theory and practicality of the knowledge and expertise gained. They offer on campus and off campus

experiences to equip their students with skills to help them better engage in the current global workforce.

Opportunity to study and graduate from the US universities, currently offers better international corporation employment prospects and as a result attracts more foreign students. Students get higher starting pay with better skill sets and more networking opportunities. US and Canada now offer a stay back option on student visas which lets international students stay back and search for employment after the completion of their course. The salaries one receives abroad is much higher as compared to the salary one would get in India. Hence a little easier to pay back the student loans and settle down.

Finally, the "Immigration to USA opportunities" is also a consideration. The stay back policy offers an opportunity to stay in the USA for an extended period of time. Historically most of the students who studied in the USA, did desire to migrate to the USA. The global political and economic environment can certainly impact the number of foreign students attending US universities. The number of foreign students attending US universities might reduce in future as other countries are also improving their education quality and standards. However, the desire to obtain a higher and quality education will certainly remain forever.

Reference: https://www.statista.com/statistics/184260/educational-attainment-in-the-us/



Mangala Tata, California

# अतिलघुकथा:

हेमंत वि. पोहनेरकर. संभाजीनगर

१. त्याने भिकाऱ्याला काही पैसे देऊ केले
आणि त्याच्या गालात एक जोरात चापट मारली.
भिकारी एकदम त्याच्या अंगावर धाऊन गेला.
त्याने लगेचच भिकऱ्याचे पाय धरले आणि म्हणाला,
"सद्गुरूंच्या आदेशाचे पालन करतो आहे.
'मनुष्याला त्याचा अभिमान सर्वस्वी असतो',
हे प्रत्यक्ष अनुभवन्याचे".

२. "संसाराच्या रहाटगाडग्यात स्वतःच्या आवडी-निवडी जपायच्या राहून गेल्या",
निवृत्त झाल्याच्या दिवशी त्याने मित्राजवळ खंत व्यक्त केली.
"वेडा आहेस?", मित्र म्हणाला,
"नीट बघ. बालपणापासूनची 'आपली मैत्री' आपण जपली आहे ना!"

३.एकदा एका नवोदित प्राध्यापकाने वर्गात एका कॉलेजकुमाराला विचारले,
"तुझा आवडता विषय कोणता?"
"रॅगिंग", तो उत्तराला.
वर्गात एकच हशा पिकाला.
मग शांतपणे त्या प्राध्यापकाने त्या कॉलेजकुमाराची रॅगिंग घेतली.
आता कुणीही हसले नाही.
त्यावर तो प्राध्यपक म्हणाला,
"बहुदा माझी अपॉइंटमेंट तुमचे 'आवडीचे विषय' बदलण्यासाठीच झाली आहे."

४. 'समरस भारतीय समाज निर्मितीसाठी 'समरसता' प्रत्येक भारतीयाच्या जीवनात यावयास हवी',
एका संतांनी या आशयाचा विषय एका संत संमेलनांत मांडला.
नि दुसऱ्या दिवशीपासून
'हा उदात्त विचार मांडणारे संत आमच्या जातीतील',
असे म्हणत, काही लोक त्यांना त्यांच्या जाती पुरते मर्यादित करू लागले.

५. त्याने नुकतीच 'तत्त्वज्ञान' विषयात पीएचडी पूर्ण केली.
तारुण्यातील सळसळता उत्साह घेऊन तो नेहमीच 'तत्त्वज्ञान' मांडायचा.
एकदा एका व्याख्यानात तो म्हणाला,
"मनुष्य सगळ्यात जास्त कोणावर प्रेम करत असेल तर ते स्वत:वर".
प्रचंड टाळ्यांचा कडकडाट घेऊन तो पत्नीसह घरी निघाला.
परंतु तिच्या प्रश्नापुढे त्याचे तत्त्वज्ञान हतबद्ध झाले.
ती म्हणाली,
"वडिलांचे घर सोडून सासरी येणारी मुलगी सगळ्यात जास्त कोणावर प्रेम करत असते?"

# मी व माझा पेरुचा बाग



पुंडलिक सहादू देंडगे, पुणे

सह्याद्रीच्या मावळातील जांबे नामक एका दुर्गम खेड्यात माझा जन्म झाला. मावळ प्रांताच्या टोकाच्यापेरुंच्या बागा व पुर्ववाहिनी पवना नदीच्या कुशीत वसलेल्या या माझ्या जन्मगांवाला बरीचशी नैसर्गिक वरदानमिळाली होती. यामुळे तेथील संस्कृती व समाज जीवनाशी माझी सोयरीक झाली होती. इथल्या पवनामाईचनितळ व थंडगार गोड पाणी पिऊन मी वाढलो. पावसाळ्यात इथ रात्रीच्या अंधारात वळचणीच्या पाण्याच्याताल संगीतावर बेडकांच किर्तन रंगात आलेल असे. हिवाळ्यातील उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या कडाक्याच्या थंडीतधुक्याची शाल पांघरुन माझ गांव शेकोटी करुन बसत असे. घाटमाथ्यावरील इथल्या रात्रीच्या मंद वाऱ्यातमावळी मोहाच्या दारुसारखा मादकपणा होता. उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या थंडीत पेरुंच्या वनराजीच्या किंचिततुरट व कडवट सुगंधाने भरलेला आल्हाद दायक वाहणारा थंड वारा, हे आमच्या गांवाला मिळालेल नैसर्गिकनिद्राशामक पेय्य होत. अशा अमृतमय पेय्याचा आस्वाद घेत मी निद्रादेवीच्या कुशीत भविष्याची सुख स्वप्ने रंगवित असे. इथल्या दिवाळीत काजव्यांची दीपमाळ गांवच्या वेशीवर टांगलेली असे. पिंगळा पक्षाच गायन हेइथल्या दिवाळी पहाटेच वैशिष्ठ होत. रातकिड्यांच्या ताफ्यातील कलाकार या मैफिलीच्या पार्श्व संगीताचनियोजन करीत असत. आमच्या गावच्या पेरुच्या दक्षिणोत्तर ताटीत आमचा पेरुचा बाग होता. अशा रितीने यावडीलोपार्जित बहुगुणी पेरुशी माझे जन्मापासून ऋणानुबंध जडले होते. ही पेरुंची ताटी आमच्या गावच्याउगवतीच्या पवना नदी पर्यंत पसरली होती. मोगलाईच्या काळात परांगदा झालेल्या आमच्या बाप-जाद्यांनाचिंचवड देवस्थानाच्या या नदी काठच्या जमिनी इनाम म्हणून मिळाल्या होत्या. या कोरडवाहू पडीक जमिनीतकाहीच पिकत नसे. आमच्या पुर्वजांनी घाम गाळून या जमिनी वहिवाटी खाली आणल्या. या जमिनींनापाण्याची सोय नव्हती. त्यासाठी दक्षिणेच्या माथ्यावरच्या ओढ्याच पाणी अडवून त्यांनी आडव्या पाटाच्यापाण्याची सोय केली. अशा या कष्टान फुलविलेल्या पेरुच्या बागा हे आमच्या गावच वैभव होत. आमच्या याठिपकेदार पातळ सालीच्या गोडसर गराच्या पेरुंची चव सर्व दूर पसरली होती.

या बागेशेजारच्या माझ्या घरी माझ बालपण गेल. पहाटेच्या ३IIच्या सुमारास डालक्या खालचा आमचाकोंबडा आरवला कि साखर झोपेतच उगवणाऱ्या सूर्य नारायणाची चाहूल माझ्या बाल मनाला स्पर्श करायची. आईच चूल पेटवण सुरु झाल कि गोवरीच्या खांडावर घासलेट ओतून ती चूल पेटवायची. चुलीतल्या त्यारॉकेलच्या जाळाचा पहिल्या भपक्याचा उजेड व वास गोधडीत गुरगटलेल्या माझ्या नाका डोळ्यांनाजाणवायचा. घरातल्या आवाजान गोठ्यातल्या जनावरांची वैरणीसाठी चुळबूळ सुरु झालेली असायची. गाईचाहंबरडा सकाळच्या धारेची आठवण करुन द्यायचा. मोठ्या कोबंड्याच्या अरेरावीन खुराड्यातल्या कोंबड्यांचागलका वाढलेला असायचा. अशा वातावरणात जाग आली कि मी आळोखे पिळोखे देत उठून चुलीपुढबसायचो. चुलीपुढ शेकत मी गोवरीच्या राखेन दात घासायचो. तोंड धुवेस्तो पर्यंत आमच्या आबान गाईची धारकाढलेली असायची. फेसाळल्या त्या धीरोष्ण दुधाची चव दिवसभर माझ्या जीभेवर रेंगाळत असे. मग वडीलनाहीतर भावाबरोबर मी गरम पाण्यान अंघोळ करीत असे. थंडीच्या दिवसात गरम पाण्याचा पहिला तांब्याडोक्यावर पडला कि माझ्या अंगातली थंडी गायब व्हायची व उरला सुरला आळस पळून जायचा. सकाळी दाटधुक पडलेल असायच. अशातच नदीच्या वाफाळलेल्या पाण्यातून सुर्योदय व्हायचा. नदीच्या पात्रातला तोसुर्योदय मला या फेसाळलेल्या वाफेच्या गरम दुधात बुडवलेल्या लालसर बटरा सारखा भासत असे. आमच्याकौलारु घराच्या परढ्यात सूर्याच्या पहिला किरण पडलेला असायचा.

पूर्वेकडच्या घरामागील आमच्या या पेरुंच्या बागातील धुक्याच्या चादरीतून सूर्यदेवान डोक वर काढलेलअसायच. सूर्यदेवाला नमस्कार केला कि हा आमचा पेरुचा बाग मला किन्हांड्या गोळा करायला बोलवायचा. मग मी दुरडी घेऊन पाय वाटेन निघायचो. सुरुवातीलाच पांढऱ्या चाफ्याच्या भल्या मोठ्या वृक्षाची भेट व्हायची. खाली फुलांचा खच पडलेला असे. चुकुन एकाद्या फुलावर पाय पडला कि मला गुन्हा केल्या सारख वाटायच. या महावृक्षाच्या मोठ्या ढोलीत पोपटांची घरटी असायची. त्यांची पिल्ल खायला सोकावलेले साप आले किपोपटांचा गलका वाढायचा. असा हा ऋषितुल्य चाफा वडीलकीच्या नात्यान चार फुल सकाळीच माझ्या दुरडीतटाकीत असे. या मंद वासाच्या नैसर्गिक धूपकांडीन माझ्या मनोदेवतेला आनंद होई व त्या धुंदीतच माझी पावलझपाट्यान पुढ पडत. अशातच बागेच्या बांधावरच्या त्या भोकराच्या झाडाशी माझी गळा भेट होई. माझा हाबाल मित्र आमची कधीही अशी भेट झाली कि माझ्या मनाच्या झोळीत दोनेक ओंजळी भोकर हक्कान टाकतअसे. अशा अवस्थेत मी आमच्या पेरुच्या बागेत प्रवेश करी. माझ्या पावलांची चाहूल लागताच तेथील खारुताईआपल्या गोतावळ्या सहीत झुपकेदार शेपट्या उडवत त्यांच्या भाषेतला राग मल्हार आळवित माझ स्वागतकरत असत. या रागाच्या साज संगीताची जबाबदारी वेगवेगळ्या पक्ष्यांचा सरंजाम सांभाळीत असे. राघूकावळ्या सारखे कितीतरी पक्षी या संगीत समारोहात आपली हजेरी लावत असत. अशा या निसर्ग संगीतउपासकांची कला उपभोगण्याची संधी मला माझ्या आई बापाच्या पुण्याईन मिळाली होती. मग मी व माझ्याधाकट्या बहिणीची किन्हांड्या गोळा करण्याची शर्यत सुरु होई. कधी कधी एकाच किन्हांडीवर आमची धडकझाली कि आम्हा बहीण-भावाची भांडण होत. आमच हे प्रेमाच भांडण सोडवण्यात आमचा प्रेमळ मोगऱ्या कुत्रातरबेज होता. त्याच ते लाडिक कु कू करण व शेपूट हलवण पाहिल कि आपण कशासाठी भांडत होतो हे आम्हीविसरुन जायचो. अशा चांगल्या दुरडीभर किन्हांड्या जमा व्हायच्या. मग आमची किन्हांड्याची तपासणी सुरुव्हायची. दातांच्या खुणांवरून खारी, घुबडे व वटवाघळांच्या, तसेच चोचींच्या खुणावरून पक्षांच्या किन्हांड्याओळखण्यात आमची अनुभवी नजर तयार झालेली होती. किन्हांड्याच्या संखेवरुन या निसर्ग मित्रांचा आम्हालाअंदाज येई. चोखंदळ पोपट व खारी चांगल्या व शेलक्या पेरुंवर डल्ला मारीत. त्यांच्या खालोखाल कावळ्यांचानंबर असे. चांगले पेरु न मिळेनासे झाले कि त्यांना साधारण चवीचे पण पिकलेले पेरु चालत. या उलटवटवाघळाचा स्वभाव असे. म्हशी सारखच या खादाड पक्षाला कच्चे,पिकलेले व बेचव पेरुही चालत. खाण्याबरोबरच पेरुंची नासाडी करण्यात वटवाघळे व घुबडांचा सिंहाचा वाटा असे.

एवढ सगळ होईस्तो पर्यंत दिवस चांगला हातभर वर आलेला असे. आमच्या पेरुच्या बागातून मारुतीचमंदीर दिसल कि मला शाळेत जायची आठवण होई. देवळात भरणाऱ्या या शाळेत शाळेच्या घंटे नंतरयेणाऱ्यांना छडीचा प्रसाद मिळत असे. भर वर्गातला हा प्रसाद आठवला कि आजही माझ्या अंगावर काटा उभारहातो. शाळेच्या ओढीन दुरडीच ओझ सांभाळीत पाटाच्या वाटेन आम्ही घराकड परतायचो. या वाटेवरच्याभल्या मोठ्या बोरीच्या झाडाखाली असंख्य बोरांची रास पडलेली असे. ही हिरवी-तांबडी-पिवळी कच्ची वपिकलेली आंबट-गोड बोर बघितली कि आमच्या चटावलेल्या जीभेला पाणी सुटे. मग ही बोर वेचतांना वखातांना वेळेच भान रहात नसे. कोणत्याही फळ बागेला पशु पक्षापेक्षा मानवी चोरटे पणाचा शाप लागलेलाअसतो. त्यातच या सगळ्या बागा गांवाला खेटूनच असल्याने हंगामात दिवस उजाडल्या पासून मावळे पर्यंतराखण करावी लागे. त्यामुळ शाळेचा वेळ सोडून माझा मुक्काम बागेतच असायचा. आम्हाला दिवाळीच्यासुट्टीत एखादा निबंध लिहून आणायची सक्ती असे. यासाठी आमचा पेरुचा बाग मित्रा सारखा माझ्या मदतीलाधाऊन येई. मग नकळतच या मैत्रीची अक्षरे कागदावर उमटत. या निबंध दुरुस्तीचे काम माझे पक्षी मित्र करतअसत. शाळेतील वर्गात हा निबंध आमच्या गुरुजींनी कौतुकाने मुद्दाम वाचून दाखविला कि मला अंगावर मुठभरमांस चढल्याचा भास होई.

गणपतीच्या टायमाला बागेत पेरुंच्या झाडांना बारीक पांढरी फुल लागायला सुरुवात व्हायची. पानातदडलेली ही फुल व त्यांच्या भोवतालचा भुंगे व मधमाशांचा खेळ बघतच माझा शालेय जीवनाचा गृहपाठ मीआमच्या या पेरुच्या बागेत गिरवला. सरकत्या काळात बारीक बोरा सारखे हिरवेगार पेरु लागत. दिवसा गणीकही फळ झपाट्यान वाढीला लागत. पेरुच्या पानापेक्षा या कच्च्या पेरुंचा गडद हिरवा रंग मला जास्त आवडायचाव मला पिकलेल्या पहिल्या पेरुची ओढ लागायची. असा पिकलेला पहिला पेरु घरी आणला कि आम्ही त्याचानैवेद्य करुन सर्व जण त्याचा प्रसाद म्हणून खायचो. दिवाळीच्या टायमाला असा हा आमच्या पेरुंचा हंगाम सुरुव्हायचा. या कामात घरातल्या प्रत्येकाचा हात अडकलेला असे. चोरा चिलटांच्या भितीन डोळ्यात तेल घालूनराखण करावी लागे. चांगल्या २-३ पुरुष उंचीच्या या झाडांच्या खालच्या फांद्यांची फळतोड हातान करता येतअसे. वरचे पेरु काढण्यासाठी कळकाच्या काठीला लावलेली आकडी वापरली जायची. गळ्यात धोतराच्याकापडाची धोळी अडकून मग आकडीन ही पेरुतोड करावी लागे. आकडीन उडवलेला पेरु हवेतच पकडण्यातआमचे हात तरबेज असत. सुरुवातीला पाट्या दोन पाट्या माल सापडे व असा दिवाळीच्या लक्ष्मी पुजनालालक्ष्मीचा गृहप्रवेश आमच्या घरात होई. सुरुवातीला आठवड्याला एक तोडा होई. पण भर हंगामातआठवड्यातून दोनदा पेरुतोड व्हायची. जसा हंगाम वाढत जाई, तशी तोडलेल्या पेरुंची संख्या

वाढे. आतापाव्या ऐवजी हाऱ्यांनी माल सापडे. माझ्या बहिणी डोक्यावर पेरुची पाटी घेऊन दारोदारी जाऊन पेरू विकत. सायकलवर पेरुचा हारा बांधून माझे भाऊ तळेगांव, देहूरोडच्या डेपोवर माल घेऊन जात. पगाराच्या दिवशीचांगली विक्री होत असे. दिवाळी झाली कि अंदर मावळ व कोकणात दरवर्षी आमची हळी जायची. त्यासाठीआम्ही पेरु व भुईमुगाच्या शेंगा बैलगाडीन घेऊन जायचो. त्यावेळी खेड्यातल्या लोकांकडे पैसे नसत. तिथभाताच्या बदल्यात ऊधीरीवर माल खपायचा. शिमग्याच्या वेळेस मग भात वसुली केली जायची. तळेगांव, चाकणच्या आठवडे बाजाराला ५-६ करंडे माल विकला जायचा. माझे भाऊ करतुकीला आल्यावर आम्हीशेजारच्या बागांची एक रकमी बोलीन खोती घ्यायचो. बागातच तोडलेल्या पेरुंचे ढीग लागत. मग खालीवरपेरुची पान लाऊन बांबुच्या करंड्यात प्रतवार माल भरला जाई. असा चांगला १०-१५ करंडे माल बैलगाडीनजवळच्या देहूरोडला नेला जायचा. तेथून दलाला मार्फत पेरु मुंबईला पाठविले जात. असा हा पेरूचा हंगामतिनेक महिने चालायचा. त्यातून मोठी एकहाती रक्कम जमा होत असे. मग बरेच दिवस रखडलेले व्यवहार मार्गी लागत.

या पेरुच्या बागाची आम्ही दुभत्या जनावरा सारखी डोळ्यात तेल घालून निगा राखत असू. बागेची स्वच्छताहा एक महत्वाचा घटक असतो. कारण ओल्या पाला पोचोळ्यान डास वाढतात. हे डास पेरुच्या फळावर अंडीघालतात. त्यामुळ पेरुला अळी लागते व पेरु नासतात. त्यासाठी हंगामात नेमाने बागेतल्या पाला पाचोळा जमाकरुन बाग स्वच्छ ठेवला जायचा. बागेतच असलेल्या उकिरड्यात हा कचरा टाकून खत तयार केल जायच. दरवर्षी उन्हाळ्यात बागाला ताण दिला जायचा. त्यासाठी बागाच पाणी तोडल जायच. या काळात झाडाचीआळी फोडून मुळ उघडी केली जायची. अंग मेहनतीने पुन्हा मोठी खोलगट आळी बनवून खोडाला गादीवाफ्याची भर लावली जायची. अशा या भर उन्हाळ्यातल्या ताणान झाडाची पान गळती वाढून झाड सुकायलालागायची. शिमग्यातल्या वळवाच्या पावसान या झाडांचा कोरडा पडलेला घसा ओला व्हायचा. मग नेहमीचापावसाळा सुरु झाला कि झाडाची पानफुटी सुरु व्हायची. झाडाला पान यायला लागली कि त्याच्या फांद्यासूर्यप्रकाशाच्या दिशेने वाढत जातात. त्यामुळे वरचे पेरु काढण जड जात. त्यासाठी वर्षा आड उन्हळ्यातबागाची वाकवणी केली जात असे. वाकवणी करतांना या वर गेलेल्या फांद्या अर्धवट तोडून खालच्या जाडफांद्यात अडकवल्या जातात. वेळे प्रसंगी या फांद्या २-३ जणांना लोंबकळून वाकवाव्या लागतात. अस हेजडीपाच काम करतांना अंगातून घामाच्या धारा वाहत असत. वाकवणी करतांना पेरुच्या लहान मोठ्याफांद्यापासून वर्षभर पुरेल इतक सरपण निघायंच. अस हे पेरुच झाड नारळाच्या झाडा सारखच कल्पवृक्षाचीभुमिका बजावत असे. आरोग्यदायी पेरूच्या या फळा बरोबर त्याची पाने, फुले व साल अनेक आजारावरघरगुती उपाय म्हणून आम्ही वापरत असू. असा या पेरुच्या बागेचा सहवास मला माझ्या पुर्वसंचित पुण्याईन लाभला. त्याच्या सहवासात राहून मी सर्वकाही शिकलो. माझ्या या निसर्ग मित्रान मला आयुष्यभर खर प्रेम व आनंदाची अनुभूती दिली. आजही दुपारच्यावामकुक्षीच्या वेळी हा माझा पेरुचा बाग आठवला कि त्याच्या छायेतील स्वर्गसुख देणारी झोप मला प्रेमानेआपल्या कुशीत घेते. त्यामुळ मला बाजारात पेरु दिसले कि मी वेडा होतो व चांगले ५-६ शेलके पेरु तरीनक्कीच खरेदी करतो. माझे मित्र व कुटुंबीयांना पेरु खाऊ घातले कि मला समाधान लाभत. या तोडांतदरवळणाऱ्या पेरुच्या चवीन आयुष्यात भेटणाऱ्या प्रत्येकावर प्रेम करा व त्या बदल्यात सुख मिळवा, असासल्ला हा माझा प्रेमळ मित्र मला नेहमीच देत असतो.

सुरुवातीला आठवड्याला एक तोडा होई. पण भर हंगामातआठवड्यातून दोनदा पेरुतोड व्हायची. जसा हंगाम वाढत जाई, तशी तोडलेल्या पेरुंची संख्या वाढे. आतापाव्या ऐवजी हाऱ्यांनी माल सापडे. माझ्या बहिणी डोक्यावर पेरुची पाटी घेऊन दारोदारी जाऊन पेरू विकत. सायकलवर पेरुचा हारा बांधून माझे भाऊ तळेगांव, देहूरोडच्या डेपोवर माल घेऊन जात. पगाराच्या दिवशीचांगली विक्री होत असे. दिवाळी झाली कि अंदर मावळ व कोकणात दरवर्षी आमची हळी जायची. त्यासाठीआम्ही पेरु व भुईमुगाच्या शेंगा बैलगाडीन घेऊन जायचो. त्यावेळी खेड्यातल्या लोकांकडे पैसे नसत. तिथभाताच्या बदल्यात ऊधीरीवर माल खपायचा. शिमग्याच्या वेळेस मग भात वसुली केली जायची. तळेगांव, चाकणच्या आठवडे बाजाराला ५-६ करंडे माल विकला जायचा. माझे भाऊ करतुकीला आल्यावर आम्हीशेजारच्या बागांची एक रकमी बोलीन खोती घ्यायचो. बागातच तोडलेल्या पेरुंचे ढीग लागत. मग खालीवरपेरुची पान लाऊन बांबुच्या करंड्यात प्रतवार माल भरला जाई. असा चांगला १०-१५ करंडे माल बैलगाडीनजवळच्या देहूरोडला नेला जायचा. तेथून दलाला मार्फत पेरु मुंबईला पाठविले जात. असा हा पेरूचा हंगामतिनेक महिने चालायचा. त्यातून मोठी एकहाती रक्कम जमा होत असे. मग बरेच दिवस रखडलेले व्यवहार मार्गी लागत.

या पेरुच्या बागाची आम्ही दुभत्या जनावरा सारखी डोळ्यात तेल घालून निगा राखत असू. बागेची स्वच्छताहा एक महत्वाचा घटक असतो. कारण ओल्या पाला पोचोळ्यान डास वाढतात. हे डास पेरुच्या फळावर अंडीघालतात. त्यामुळ पेरुला अळी लागते व पेरु नासतात. त्यासाठी हंगामात नेमाने बागेतल्या पाला पाचोळा जमाकरुन बाग स्वच्छ ठेवला जायचा. बागेतच असलेल्या उकिरड्यात हा कचरा टाकून खत तयार केल जायच. दरवर्षी उन्हाळ्यात बागाला ताण दिला जायचा. त्यासाठी बागाच पाणी तोडल जायच. या काळात झाडाचीआळी फोडून मुळ उघडी केली जायची. अंग मेहनतीने पुन्हा मोठी खोलगट आळी बनवून खोडाला गादीवाफ्याची भर लावली जायची. अशा या भर उन्हाळ्यातल्या ताणान झाडाची पान गळती वाढून झाड सुकायलालागायची. शिमग्यातल्या वळवाच्या पावसान या झाडांचा कोरडा पडलेला घसा ओला व्हायचा. मग नेहमीचापावसाळा सुरु झाला कि झाडाची पानफुटी सुरु व्हायची. झाडाला पान यायला लागली कि त्याच्या फांद्यासूर्यप्रकाशाच्या दिशेने वाढत जातात. त्यामुळे वरचे पेरु काढण जड जात. त्यासाठी वर्षा आड उन्हळ्यातबागाची वाकवणी केली जात असे. वाकवणी करतांना या वर गेलेल्या फांद्या अर्धवट तोडून खालच्या जाडफांद्यात अडकवल्या जातात. वेळे प्रसंगी या फांद्या २-३ जणांना लोंबकळून वाकवाव्या लागतात. अस हेजडीपाच काम करतांना अंगातून घामाच्या धारा वाहत असत. वाकवणी करतांना पेरुच्या लहान मोठ्याफांद्यापासून वर्षभर पुरेल इतक सरपण निघायंच. अस हे पेरुच झाड नारळाच्या झाडा सारखच कल्पवृक्षाचीभुमिका बजावत असे. आरोग्यदायी पेरूच्या या फळा बरोबर त्याची पाने, फुले व साल अनेक आजारावरघरगुती उपाय म्हणून आम्ही वापरत असू. असा या पेरुच्या बागेचा सहवास मला माझ्या पुर्वसंचित पुण्याईन लाभला. त्याच्या सहवासात राहून मी सर्वकाही शिकलो. माझ्या या निसर्ग मित्रान मला आयुष्यभर खर प्रेम व आनंदाची अनुभूती दिली. आजही दुपारच्यावामकुक्षीच्या वेळी हा माझा पेरुचा बाग आठवला कि त्याच्या छायेतील स्वर्गसुख देणारी झोप मला प्रेमानेआपल्या कुशीत घेते. त्यामुळ मला बाजारात पेरु दिसले कि मी वेडा होतो व चांगले ५-६ शेलके पेरु तरीनक्कीच खरेदी करतो. माझे मित्र व कुटुंबीयांना पेरु खाऊ घातले कि मला समाधान लाभत. या तोडांतदरवळणाऱ्या पेरुच्या चवीन आयुष्यात भेटणाऱ्या प्रत्येकावर प्रेम करा व त्या बदल्यात सुख मिळवा, असासल्ला हा माझा प्रेमळ मित्र मला नेहमीच देत असतो.

# चांदोबा, तू बाळांचा मामा पुन्हा होशील का ?

**श्री. वसंत प्रल्हाद कुलकर्णी, पुणे.**

चांदोबा आता तू बाळांचा मामा राहिला नाही
निंबोणीचे झाड आता शोधून सापडत नाही
चार घास भरवताना आईची दमछाक व्हायची
तुला दाखवता दाखवता पार दमून जायची
दमली तरी आई खुशीत असायची
झोपलेलं बाळ बघून हरखून जायची
आता मोबाईलमधला चंद्र खुदुखुदु हसतो
गाण्याच्या तालावर छान छान नाचतो
हे सारं पाहत बाळ चार घास जेवतं
हळूच मग मोबाईल कुशीत घेवून झोपतं
कुशीतलं मोबाईल काढला की बाळ रडू लागते
त्याला शांत करता करता आई दमून जाते
चांदोबा, असं बाळ तुला दिसत नाही का ?
मामा बनून पुन्हा तू धावून येणार नाही का ?
झाड नाही तर इमारतीआड तू लपशील का ?
हळूच खिडकीतून तू बाळाला दिसशील का ?
चांदोबा, तू बाळांचा मामा पुन्हा होशील का ?
चांदोबा, तू बाळांचा मामा पुन्हा होशील का ?

# आनंद श्रमदानाचा



अलका मुळे फ्रीमॉन्ट, कॅलिफोर्निया

गेल्या दोन वर्षांपासून घराबाहेरच्या social activities बंद पडल्या व झूम आणि फोनचा वापर वाढला. झूम मुळे virtual contact होऊ शकतो लोकांचे चेहरे दिसतात तेवढंच समाधान. जेव्हां East Bay महाराष्ट्र मंडळ ने seniors साठी Art class घ्यायचा ठरविलं व आम्ही उत्साही बायका विद्यार्थिनी होऊ म्हणून कळविलं.

मागचे अनेक seasons फिरायला निघाले की निरनिराळी फुलं, पानं, झाडांचे वेगळे वेगळे आकार मला आकर्षित करू लागले. फारसे drawing केलेले नसले तरी सुप्त आवड होती. ती आता उफाळून आली . फिरता फिरता पानं गोळा करू लागली त्यांत wild flowers पण छान दिसायची. सगळी घरी आणून वजनाखाली वाळवायची. काही खराब होत असत तर काही चांगले राहायचे, थंडीत फुलं लवकर खराब व्हायची. रंग पण खराब होत नसे.

मी poster board वर नवनवीन रचना करून ती चिकटवू लागले. कुणाचे वाढदिवस, anniversary, सणाला मी card पाठवू लागले व लोकांना ते खूप आवडायचे.

याच कलेचा मला उपयोग झाला. माझा ८० वा वाढदिवस नुकताच झाला. कुठल्याही तऱ्हेने गरजूला मदत करावी असं सारखं मनात येत होतं पण काय करावे हे पटकन सुचत नव्हते आणि जे करीन ते माझ्याच श्रमाचे असावे असं वाटत होते. एक दिवस TV वर अपंग मुलांची त्यांच्या हॉस्पिटल मध्ये कशी व्यवस्था करतात ते बघितलं. मुलं खूप विकलांग असूनही hospital staff , doctors, नातलग त्यांचं सगळं खूप प्रेमाने करतात. खूप प्रकारची machines त्यांना व्यायाम करायला होती. हे सगळं करायला लोकांकडून donation पण हवे असतेच . मी ती advertisement बघितली कि नेहमी वाटायचे त्यांना आपण फुल नाहीतर फुलाची पाकळी या रूपाने मदत करू. माझ्या मुलांना म्हंटले असते तर त्यांनी सहज monetary donation पाठविले असते पण माझेच मन मानेना. श्रमदान करायचे हा माझा निर्णय तर पक्का होता. एका रात्री कल्पना आली आपण ही फुलं वापरून greeting cards करायची व विकायची.

झालं! मार्ग सापडला आणि मी भरभर कार्ड बनवू लागले. आधी फुलं पानं व्यवस्थित दाबून वाळवायची. नंतर ती ठराविक size च्या पेपर वर आकर्षक रित्या वेगवेगळ्या तऱ्हेने चिकटवायची. वाळली कि gloss लावायचा ज्या मुळे उठाव आला. बाहेर रचना व आत बारीक किनार किंवा लहानसे design काढून बाकी जागा message साठी ठेवली. Message ज्याचा त्याने लिहावा, व सोबत मापाचा लिफाफा पण दिला.

मित्रमंडळाने वओळखीच्या मंडळींनी ती कार्ड्स घेतली व जवळ जवळ ७०-८०





कार्ड्स विकल्या गेलीत. परत आणखी करून द्या अशी विनंती आली. वाढदिवसाच्या दोन दिवसात Shriners Children's Hospital ला $३०० डोनेशन म्हणून पाठविले सोबत मुलाच्या कंपनी ने matching contribution केल्याने ते दुप्पट झाले.

माझ्या श्रमाचे चिज झाले आणि या उपक्रमामुळे मात्र खूप समाधान मिळाले व श्रमदानाचा आनंद लाभला. एक साधन मिळाले आता अजून कुठे कोणाला donate करता येईल अशी प्रेरणा मिळाली.

# कवितेची जन्मकथा :- ऋण : श्री.दि.इनामदार

**द्वितीय पारितोषिक**



किरण शिवहर डोंगरदिवे, बुलडाणा

एखादा सहज प्रसंग, किंवा आपला भोवताल आपल्या मनावर सतत मोहिनी घालत असतो. त्याचे पडसाद आपल्या मेंदू आणि मनावर पडत असतात. हे पडसाद जेंव्हा शब्द रूप घेऊन साकार होतात तेंव्हा ती एक चिरंतन रचना असते असे मला नेहमीच वाटते. एखादा बैल आपल्याला सहज दिसतो आणि त्याच्याकडे पाहिल्यावर एखादेवेळी संपूर्ण जीवनाचे तत्वज्ञान सांगणारी कविता निर्माण होते ही खरी प्रतिभेची देणगी आहे. एखादा कवी किंवा लेखक समोरच्या जीवाची वेदना स्वतःची समजून व्यक्त होतो आणि त्या दुःखाची सल त्याला स्वतःला बोचायला लागते तेंव्हा त्याच्या मनावर उमटणारे स्पंद हे निश्चितच त्याच्या सर्वोत्कृष्ट निर्मितीची पायाभरणी करत असतात. अशीच एका प्राण्याकडे पाहून त्या प्राण्यांच्या मनाच्या तळापर्यंत जाऊन त्या प्राण्यांच्या मनात काय भाव असतील ह्याचा शोध घेत कवी श्री.दि. इनामदार ज्यांचा जन्म 5 फेब्रुवारी 1928 रोजी खामगाव ह्या गावी झाला. (त्यांना 'मराठवाड्याचे रवींद्रनाथ टागोर असे म्हटलें जायचे ) ह्यांनी लिहिलेली ऋण ही अशीच एक कविता होय. इयत्ता 6 वी च्या अभ्यासक्रमात ही कविता मुलांना शिकवीत असतांना एका वेगळ्याच भावविश्वाची निर्मिती व्हायची. आज शहरामध्ये बैल डोळ्याने दिसत नाही. काही ठिकाणी तर ट्रॅक्टरचा पोळा भरल्याच्या बातम्या येतात. म्हणजे बैल ह्या सजीवांची आपल्याला गरज नसल्याचे आपण पक्के ठरवून टाकल्याची ती पावती असते असे मला वाटते. बैल हा पूर्वपार काळापासून शक्तीचे प्रतीक आहे, आपल्या संस्कृतीत प्रत्येक कामाच्या प्राणिमात्राचे दैवतीकरण केल्या जात असल्याने बैल ह्या शेती उपयोगी आणि शक्तीचे प्रतीक असलेल्या प्राण्याला महादेवाच्या मंदिरापुढे नंदी म्हणून तसेच महादेवाचे वाहन म्हणून स्थान देण्यात आले. ह्या दैवतीकरणात किती तथ्य आहे किती श्रद्धा आणि अंधश्रद्धा आहे ह्यापेक्षा बैल मानवाचा पोशिंदा आहे ही जाणीव अधिक महत्वाची होती. सम्राट अशोकाच्या अशोक स्तंभावर बैल असणे ही बैलाच्या कष्टाचा गौरव करणारी बाब होती असे मला वाटते. ईनामदार ह्यांनी ही कविता लिहिताना ह्या कष्टकरी आणि जगपोशिंदा असणाऱ्या प्राण्यांकडे पाहत त्याच्या डोळ्यातील कणव पाहिली. म्हातारंपण ही अशी देणगी असते की जी स्वतःचे असले तरी स्वतःला नको असते मात्र ते कुणालाच चुकत नाही हे ही तितकेच खरं. श्री दि ईमानदारी ह्यांनी ही कविता म्हाताऱ्या बैलाचे दुःख मांडण्यासाठी लिहिली की अन्योक्ती ह्या काव्य प्रकारानुसार लेकींबोली सुने लागे ह्या म्हणी प्रमाणे बैलाच्या प्रतिकातून म्हाताऱ्या माणसाचे मत व्यक्त केले हे सांगणे कठीण आहे. श्री दि ईनामदार हे बालसाहित्य लिहून मनोरंजन आणि बोध देणारे साहित्य देण्यासाठी प्रसिद्ध होते त्यांना एक बैल खुंट्याला बांधलेला दिसला, तो बैल म्हातारा झाल्याने आता शेताच्या कामात येत नव्हता त्यामुळे मानवाच्या स्वाभाविक वृत्तीनुसार त्याला चारा पाणी करताना हाथ आखडता घेणे, त्याची खायला काळ भुईला फार असे म्हणून संभावना करणे. त्याला शिव्या देणे, तो उठत नसल्यास त्याला कोरड्याने (आसुडाने) मारणे, डंगऱ्या, म्हाताऱ्या म्हणणे इत्यादी बाबी कवींनी जवळून पाहिल्या. हाच बैल जेंव्हा तरुण होता तेंव्हा मालकाच्या गळ्यातील ताईत असेल, कितीतरी कोड कौतुकाचे क्षण त्याने अनुभवले असतील मात्र आणि काम नाही म्हणून त्याला दाम नाही ही जाणीव कवीला अस्वस्थ करून गेली. त्या बैलाच्या डोळ्यांतील दुःख कवीला अस्वस्थ करून गेले आणि त्याच वेळी संपुर्ण हयातीत कुटुंबासाठी खस्ता खाणाऱ्या माणसाच्या वाट्यालाही असेच दुःख येते ह्या जाणिवेतून ते आणखी अस्वस्थ झाले आणि एकाचवेळी घरातील वृद्ध व्यक्ती आणि खुंट्यावरील म्हातारा बैल ह्यांची वेदना नेमकेपणाने मांडणारी शब्द आरास उभी राहिली. कवितेतील साधे शब्द, सरळ भावना ग्रामीण असो वा शहरी भाग मात्र काव्यपार्श्वभूमीचा साधारणपणे सर्वांनी फार जवळून घेतलेला हा दाहक अनुभव ह्यामुळे वाचकांच्या मनाला पीळ पाडणारी ही कविता मनात खोलवर रुतत जाते, जितकी आत उतरत जाते तितकी सलत जाते असा अनुभव कविता वाचताना येतोच.

तुझ्या शेतात राबून माझी सरली हयात,

नको करू हेटाळणी आता उतार वयात

नाही राजा ओढवत चार पाऊल नांगर,

नको बोलूस वंगाळ नको म्हणूस डंगर !

आपल्या धन्याच्या शेतात सारी हयात कष्ट करत राबत खपत, आयुष्यभर प्रचंड काम करत नांगर, वखर, बैलगाडीतून मालाचे ओझे वाहून राब राबून थकून भागून आयुष्याच्या उतारवयात आलेल्या बैलाची ही कैफियत आहे असे म्हटले तरी चालेल वा संपूर्ण आयुष्य घरादाराची गरज पूर्ण करत पायाला चाके आणि हृदयात घड्याळ ठेवून जगणाऱ्या कुटुंब प्रमुखाची ही व्यथा आहे असेही आपणास म्हणता येईल. सारे आयुष्य त्यानी शेतात आपल्या धन्यासाठी किंवा लेकरांच्या कल्याणासाठी कष्ट करण्यात घालवली आहेत आणि आता त्याच्याकडून काम होत नाही तेंव्हा त्याची हेटाळणी होऊ नये असे त्याला मनोमन वाटणे साहजिकच आहे. मात्र दुर्दैवाने तसे होत नाही. खुंट्यावरच्या बैलाला आणि घरात म्हाताऱ्या माणसाला हेटाळणीयुक्त बोल व्यथित करतात. आयुष्यभर आपण ज्यांच्यासाठी राबलो कष्टलो त्यांच्या कडून होणारी ही निर्भत्सना त्याला सहन न होणारी असते. ग्रामीण भागातील शेतकरी असो वा शहरी भागातील सेवानिवृत्त कर्मचारी किंवा खुंट्यावरच्या बैलाच्या वाटयाला येणारी ही हेटाळणी ही नवीन पिढीच्या कृतघ्नतेचे लक्षण आहे ह्यात शंका आहे. म्हातारंपणी ज्यांची हेटाळणी केली जाते त्यांच्या ऐन उमेदीच्या काळात हीच तरुण पिढी कशी वागत असेल ह्याचा विचार करत असताना कवींनी लिहिले.

माझ्या ऐन उमेदीत माझी गाईलीस ओवी,

नको चाबकासारखी आता फटकारू शिवी

माझा घालवाया शीण तेव्हा चारलास गूळ,

कधी घातलीस झूल कधी घातलीस माळ

ह्या ओळीतून बैल म्हणतो की त्याच्या ऐन उमेदीत म्हणजे तरुणपणी जेंव्हा त्याच्या अंगी दहा हत्तीचे बळ होते अन प्रचंड कष्ट करण्याची क्षमता होती तेंव्हा त्याचा धनी त्याची अपार स्तुती करत होता. आमचा बैल किती ओझं ओढतो, ह्या वाक्यापासून तर शंकरपटात बैल जिंकल्यावर गावातून मिरवणूक काढणे इत्यादी सर्व केल्या जात होते. पोळ्याच्या दिवशी तर मारुतीच्या पारावर तोरणा घालून असा देखणा बैल मिरवताना धनी छाती पुढे काढून चालत असे. शर्यतीत जिंकलेल्या बैलाच्या तोंडात गूळ घालणे आणि साज शृंगार करून बैलाच्या अंगावरून झुल टाकून मिरवणे हे ही धनी गर्वाने करत असे.जसे बैलाचे तसेच माणसाचेही नाही का? जोपर्यंत बाप कमावत असतो आणि मुलं लहान असतात त्यावेळी बाप त्यांच्या अस्मितेचा मुद्दा असतो. "तुझ्या बापाला काही येत " असे कुणी लहानपणी म्हंटल की मुलांचा चढणार पारा प्रसंशनीय असतो मात्र तोच मुलगा मोठा झाला की त्याच बापाला ,"तुम्हाला अक्कल नव्हती" अस बोलतांना विचार करत नाही. जगातील सर्वात चांगली पिठलं भाकर मायच्या हाताची म्हणणारा मुलगा घरात त्यांची बायको आली की त्याला आईच्या हाताच्या भाज्या बेचव आणि पोळ्या जाडसर वाटू लागतात. हे दुःख आणि खंत श्री दि ईनामदार ह्यांनी बैलाच्या प्रतिकातून व्यक्त केली आहे. ह्या अश्या अनेक गोड आठवणी बैल असो वा मनुष्य असो त्याला मरेपर्यंत जपाव्या वाटत असतील ह्या

विचारातून कवींनी पुढे लिहिलेले कडवे फार महत्वाचे ठरते.

अशा गोड आठवणी त्यांचे करीत रवंथ,

मला मरण येऊ दे, तुझे कुशल चिंतीत

मेल्यावर तुझे ठायी पुन्हा एकदा रुजू दे,

माझ्या कातड्याचे जोडे तुझ्या पायात वाजू दे ....

बैल म्हणतो की, "अशा गोड आठवणींची मी रवंथ करीन, वाईटाच्या आठवणी आपल्या शेवटीच्या दिवसात आठवू नये. जे काही चांगले क्षण आपल्या वाट्याला आलेत त्याचे रवंथ करत म्हणजेच खाल्लेला चारा पुन्हा तोंडात आणून त्याचे बारीक चर्वण करण्याचा बैलाचा गुणधर्म ह्या ठिकाणी कवींनी कवितेत खूप चपलखपणे वापरला आहे.आणि तुझी खुशाली चिंतताना मला मरण येऊ दे ह्या भूमिकेतून आपल्या धन्याचे कुशल आणि मंगल झालेले पाहून मरण यावे ही बैलाची उदात्त भावनाही कवींनी मांडली आहे. वर्तमाना काळात माणसाच्या मनातही एकमेकाप्रती ऋणानुबंधाच्या स्नेहभावना उरल्या नाहीत, अश्या काळात एका प्रामाणिक प्राण्यांचा हा जिव्हाळा पाहून डोळ्यातून अश्रू येतात. त्याच्यावर केलेल्या मायेचे ऋण चुकवण्यासाठी त्याला पुन्हा बैलाचाच जन्म हवा आहे आणि तोही याच धन्याच्या शिवारात हवा आहे बरं यावरच तो थांबत नाही त्याची अखेरची इच्छा व्यक्त करताना तो म्हणतो की, " मी मेलो तर माझ्या कातड्याची इतस्ततः विल्हेवाट न लावता त्याचे जोडे करून धन्याने ते पायी घालावेत, तेव्हढीच माझ्या धन्याची पायधूळ कातडीस लागेल. अशीच अपेक्षा व्यक्त करत कित्येक म्हातारी माणस लेकच्या पोटी पुन्हा जन्म घेतो असे म्हणत जीव सोडताना आपण पाहिले आहेत. स्नेह, माया, आस्था आणि जिव्हाळा यांचा ऋणानुबंध काळजाला भिडेल अशा शब्द शैलीत मांडून ग्रामीण जीवन आणि प्राण्यांची प्रामाणिक भावना अतिशय प्रवाहीपणे कवितेतून मांडणारी ही कविता संवेदना बधीर झालेल्या माणसांना बरेच काही सुचवून जाते असे म्हणावे लागते. जगण्याचे आणि मरण्याचे इप्सित काय असू शकते याचे हळुवार वर्णन ही कविता करते.

शेतीमातीत रमलेला शेतकरी आणि त्याच्या खांद्याला खांदा लावून काम करणारा बैल ह्यांचे वर्णन करणारा वृषभसूक्त नावाचा संपूर्ण कविता संग्रह ज्या प्रभावीपणे विठ्ठल वाघाच्या मनातील बैलाचे विविध रंग दाखवितो किंवा लोकनाथ यशवंत ह्यांची शेतमजुरांचे दुःख संदर्भातील बैल ही कविता ज्यात शेवटी बैल एक व्याकुळ प्रश्न विचारतो "अन मालक तरीही तुम्हीच आत्महत्या करता?" ही अंगावर येणारी परिणामकारकता असो वा ऋण कवितेतील श्री द ईनामदार ह्यांनी घरातील वयोवृद्ध आणि खुंट्यावरील म्हातारा बैल ह्यांचे तादात्मीकरण करून एका विलक्षण भावपातळीवर माणसाच्या कृतघ्न वृत्तीवर मारलेला फटकारा असो, सर्वच चिंतनीय आहे. मात्र मोहंजोदरो आणि हडप्पा संस्कृती पासून बैल हा एक श्रमिक प्राणी आहे, शक्तीचे प्रतीक आहे, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक प्रतिष्ठा लाभलेल्या ह्या प्राण्यांचे जीवन जाणणारा संवेदनशील माणूस या कवितेत आर्त भाव मांडतो आणि तेवढीच संवेदनशीलता मनामध्ये हिरवी असेल तर वाचक तो भाव सहज उमजून घेतो, ज्यांची मनेच बधीर झालीत अन संवेदना बोथट झाल्यात त्यांना ह्या कवितेकडे एक शब्दलयबद्धता म्हणून पाहण्याची दृष्टी आपण बदलू शकत नाही हे ही तेवढेच खरे. 31 डिसेंबर 2013 रोजी निधन झाले तरी ऋण सारख्या भावनिक कवितामुळे श्री दि इनामदार कायमस्वरूपी आपल्या मनात घर करून आहेत . अनेकांना वरील तुकड्यातून व्यक्त होणाऱ्या काव्यापेक्षा कविता सलग वाचावी अशी प्रबळ भावना असते त्यांच्या साठी संपूर्ण कविता,

तुझ्या शेतात राबून माझी सरली हयात

नको करू हेटाळणी आता उतार वयात ॥ १ ॥

नाही राजा ओढवत चार पाउले नांगर

नको बोलूस वंगाळ नको म्हणूस डंगर ॥ २ ॥

माझ्या ऐन उमेदीत माझी गाईलीस ओवी

नको चाबकासारखी आता फटकारु शिवी ॥ ३ ॥

माझा घालावाया शीण तेव्हा चारलास गूळ

कधी घातलीस झूल कधी घातलीस माळ ॥ ४ ॥

अशा गोड आठवणी त्यांचे करीत रवंथ

मला मरण येऊ दे तुझे कुशल चिंतीत ॥ ५ ॥

मेल्यावर तुझे ठायी पुन्हा एकदा रुजू दे

माझ्या कातड्याचे जोडे तुझ्या पायात वाजू दे ॥ ६ ॥

# खेळत नाहीत मुले

## किरण शिवहर डोंगरदिवे, बुलडाणा

बाहुलीच्या लग्नात आजकाल खेळत नाहीत मुले,
खेळण्यातली बंदूक घेऊन हसत नाहीत मुले ||

न जाने कोठे हरवली निष्पाप नजर ओळखीची,
गोष्टी परीच्या ऐकून आताशा झोपत नाहीत मुले
फुलपाखरांशी ओळख ना कळ्यांशी नाते कुठले,
बाग बगीच्यात फुलासमान फुलत नाहीत मुले ||

मातीने माखत नाहीत कधी त्यांची इवली पाऊले,
पण चमकणाऱ्या ताऱ्यांनाही मोजत नाहीत मुले|
कसे कोरडेच दिसतात आतून बाहेरून सारे,
चिंब पावसात कधी मनसोक्त भिजत नाहीत मुले
पहा कसा दुष्काळ घेऊन फिरतात हा आसवांचा,
आजी आजोबा मेल्यावरही रडत नाहीत मुले ||

कोठून अनोळखी सावल्या येऊन हसतात येथे,
हृदयाचे तुकडे असून हृदयास जपत नाही मुले



# चौल: छोट्या गावाची मोठी गोष्ट




संजय नाईक,पुणे

चौल .. मध्ययुगीन काळातील भरभराटीचे बंदर .. एवढ्याशा छोट्या ओळखीने चौल चे महत्व पटणार नाही . या भुप्रदेशाची खरी ओळख आपल्याला चौल ला भेट दिल्या नंतरच पटू शकेल.

चौल , विष्णू पुराणातील एक प्राचीन शहर, येथील चाफ्याच्या फुलांच्या झाडामुळे याला कदाचित चंपावती असे ओळखले जाऊ लागले किंवा कोण चंपा राजाच्या नावावरून या प्रदेशाला चंपावती म्हणून ओळखले जात असावे .

मध्ययुगीन काळातील महत्वाचे बंदर असल्याने येथे अनेक व्यापारी, पर्यटक भेट देऊन गेले . प्रत्येकाने येथे आपल्या भाषेच्या परीने याची नोंद करून ठेवली. त्यांच्या भाषेप्रमाणे चौल ला अनेक नावाने ओळखले जाऊ लागले. पेरिप्लस ऑफ एरीथ्रीन सी मध्ये याचे नाव " सिमोला " अशी नोंद आहे. तर झुआन एक्सांग या बुद्ध भिक्षुकाने त्याच्या ६ व्या शतकातील प्रवास वर्णनात " चीमालो " तर ९ व्या शतकातील अरब भूगोलाकार अल मसुदी किंवा अल बेरुनी तर काही अरब प्रवाशानी चौल चा उल्लेख सैमुर किंवा जैमूर असा केला आहे. मोगल इतिहासात याचे मामले मूर्तजाबाद असा उल्लेख आहे.

चौल चा एक महत्वाचा उल्लेख मुंबई येथील कान्हेरी गुहा मध्ये एका इ. स. १५० च्या काळात लिहिलेल्या शिलालेखामध्ये आढळतो . येथे एक जलकुंभ बांधण्यासाठी चौल च्या सुवर्णकाराने देणगी दिल्याची नोंद आहे यावरून येथील भरभराट



किती असेल याची प्रचिती येते. जग प्रसिद्ध टोलेमी ला चौल ची माहिती एका हिंदू व्यापाऱ्याने ई. स. १५० साली अलेक्झान्ड्रा येथे मिळाली असे लिहिले आहे.

चौल ने अनेक राजसत्ता पहिल्या , १३०० सालापर्यंत इथे हिंदू राजे राज्य करीत होते याचे अनेक दाखले इतिहासात मिळतात . या इतिहासाची नोंद असणारे अनेक शिलालेख , वीरगळ किंवा गधेगळ परीसरात आजही पहायला मिळतात. चौल येथील तेराव्या शतकातला श्रीरामचंद्रदेव यादव याचा शिलालेख मध्ये तेराव्या शतकात चौलवर देवगिरीच्या यादवांचे राज्य होते. असा उल्लेख येथील गधेगळी वर आहे.

यातील महत्वाची नोंद ई. स. ८१० ते १२६० या कालावधी मध्ये इथे शिलाहार वंशी राजा कडे ही शहर होते. या नंतर येथे सुलतानी अंमल सुरु झाला . या नंतर दक्षिणी मुसलमान, विजयनगर च्या हिंदू राजघराण्या पैकी अनेगुडी राजाची सत्ता होती. या नंतर पुन्हा लगेचंच निजामशाही सत्ता येथे आली. या नंतर पोर्तुगीज अशा अनेक राजवटी नी येथे राज्य केले

चौल चा उल्लेख १४ व्या शतकाच्या सुरुवातीला अफानसी निकीतीन या रशियन पर्यटकांच्या नोंदी मध्ये सापडते. १४६९ साली या पर्यटकाने चौल ला भेट दिल्याचे नमूद केले आहे. भारत रशिया मैत्री चे प्रतीक आजही चौल च्या पिळणकर हायस्कुल मध्ये बघावयास मिळते . यांनी चौलचा चिमोलो असा उल्लेख केला आहे.

या काळात अनेक मशिदी , चर्च, ज्यू सिनागोग आणि अग्नी मंदिरे असल्याचा उल्लेख आहे. १४ व्या शतकातील बहामनी साम्राज्याचा एक भाग म्हणून चौल चा उल्लेख आहे या नंतर बहामनी साम्राज्याचा एक भाग म्हणजे अहमदनगर ची निजामशाही , या साम्राज्याचे वर्चस्व येथे आढळते. चौल बंदर अरबी समुद्रावरील व्यापार या दृष्टीने अनेकांचे हे लक्ष्य ठरले. यामुळे निजामशाही , नंतर विजापूर ची आदिलशाही यांनी कोकणवर आपली सत्ता गाजविली. याच निजामशाही आदिलशाही चे काही अवशेष आपल्याला चौल मध्ये बघायला आजही मिळतात.

चौल मध्ये आजमितीला फिरताना आजही या इतिहासाच्या काळखुणा आपल्याला खुणावत आहेत. यातील काही चौल निजामशाही अवशेष पैकी सर्वात महत्वाचा असा हमामखाना आहे. चौल हे मध्ययुगीन काळात जागतिक स्तरावरील बंदर असल्याने पर्यटकांसाठी बांधलेला हा एक पब्लिक बाथ " हमामखाना " पाहायला मिळतो. याची बांधकाम शैली तुर्कस्थान मधील काही वस्तूशी जुळती आहे. ही जागा आंघोळीसाठी वापरली जात असे. हमाम म्हणजे आंघोळ. फार कमी ठिकाणी असा हमामखाना पाहायला मिळतो. महत्त्वाचे म्हणजे त्यासाठी पाण्याचे पाट करण्यात आले होते, कारंजी बांधण्यात आली होती. मसाज, गरम पाणी, सोना बाथ अशा सर्व सोयी करण्यात आल्या होत्या. आतील तापमान बाहेरील तापमानापेक्षा कमी ठेवण्यासाठी भिंतींच्यामधून पाणी वाहण्याची सोय केलेली होती. या वास्तूचे छत खूपच नाजूक परिस्थितीत आहे. घुमटा वरील कोरीव काम लक्षणीय आहे.

या परिसराला आज काटकर आळी म्हणून ओळखले जाते . येथे एक मशीद पाहायला मिळते. येथील दोन शिलालेख आहेत यावरील नोंदी नुसार १४ व्या शतकात याची दोन टप्प्यात निर्मिती केली गेली. याला वस्तु ला " अरिह मशीद : या नावानेही ओळखले जाते. याची निर्मिती चौल खाडीच्या काठावर केली आहे. या बरोबर येथील राजकोट आळी या परिसरात इतर अवशेष खासकरून चौल राजकोटची संरक्षक भिंत, काही कबरी , प्रवेश द्वारे आपल्याला पाहता येतील



चौल च्या भोवाळे परिसरात  तलावा काठी असेलले घुमटी  किंवा सराई परिसरात " कलावांतीन वाडा म्हणून ओळखली जाणारी वास्तु बांधकाम शैली तील अप्रतिम उदाहरण आहे.  चौल ल एके  काळी खूप मोठ्या प्रमाणात वस्ती असल्याचे अनेक नोंदी पाहायला मिळतात . रशियन पर्यटक यांच्या नोंदीतून तयार केलेल्या चित्रामध्ये याची  प्रचिती येते.

चौलच्या व्यापारी बंदरातून त्या काळात  जगभरातील अनेक समुद्री व्यापार, किनारपट्टी वरील शहराशी व्यापार आणि आंतरदेशीय व्यापार होत असे. यामुळे  चौल ने  अनेक आक्रमणे पहिली, अनेक वेळा चौल ला भस्मसात केले, यामध्ये १५०८ सालची  चौल चे खाडीतील युध्द  इतिहासात सुद्धा प्रसिद्ध आहे.

१५०८ सालातील युद्धात पोर्तुगीज यांच्या बरोबरीने गुजरात सुलतान , डेन्मार्क आणि अनेक मोठ्या देशनी युद्ध केले परंतु येथे त्यांना हर पत्करावी लागली . या नंतर ची एक महत्वाची  नोंद गुजरात मधील दीव येथील युद्धाची आढळते. येथून  त्यांनी पोर्तुगीजानी आपला व्यापार सुरू केला.  पोर्तुगीजांनी  १५१६ साली   बुऱ्हान निजामशहाबरोबर करार करून चौल च्या पश्चिमेला एक फॅक्टरी बांधायला परवानगी घेतली होती . ह्या करारात पोर्तुगीजांनी काही नाममात्र ३०० घोडे निजामशहा ला द्यावेत .  १५२१ साली लोवर चौल च्या जागेत पोर्तुगीजांनी किल्ला बांधला  अशा या चौल ला निजामशाही काळात अप्पर चौल – मोहम्मदीन चौल  आणि लोवर चौल म्हणजे आजचा रेवदंडा भागाला पोर्तुगीज चौल म्हणून ओळखले जायचे.

चौल वर १६७० साली छत्रपती श्री शिवाजी महाराज यांनी आपले अधिपत्य गाजविले. नंतर १७४० साली मराठ्यांनी इथे आपली सत्ता केली. या नंतर कान्होजी आंगरे आणि मराठी आरमार उदयास आले आणि  चौल ने पुन्हा  एकदा एका वेगळ्या इतिहासाची नोंद केली.

या सर्व काळात चौल चे बंदर म्हणून असलेले महत्व कमी झाले. यामुळे याचे रूपांतर येथील पात्रात  गाळ भरणे सुरू झाले आणि नंतर नंतर चौल चे बंदर म्हणून महत्व कमी झाले. नंतरच्या काळात पेशवे आणि कान्होजी यांनी पोर्तुगीजाना चौल सोडण्यास भाग पडले. १८१८ नंतर चौल इंग्रजाच्या ताब्यात गेले.

या काळातील १५१६ ते १५७० काळात " फोर्टेलेजा  दे चौल" हा किल्ला म्हणजेच आजचा रेवदंडा किल्ला या नावाने ओळख असलेला ही किल्ला इतिहासाच्या अनेक काळखुणा जपत आला आहे.

पोर्तुगीज : रेवदंडा किल्ला  : Fortaleza de Chaul

चौल च्या पश्चिम भागात  समुद्र किनारी सर्व प्रथम एक फॅक्टरी साठी  चौकोनी बुरूज  अशी वस्तु १५१६  साली बांधण्यात आली आणि १५२१ नंतर येथे तटबंदी केली गेली. १५२१ ते १५२४ असे सर्व बांधकाम झाल्या नंतर वेगवेगळ्या वस्तु किल्ल्यामध्ये उभारल्या गेल्या. या मध्ये कॅथेड्रल ( १५३४ ) चर्च ऑफ दी फ्रान्सिस्कन ( १५३४ ) चर्च आणि डॉमिनिकन मठ ( १५३४ ) हौस ऑफ मर्सि ( १५५० ) जरस्यूट मोनेस्टरि अर्थात कॉलेज ( १५८० ) आणि या नंतर सेंट बार्बरा टॉवेर अर्थात आजचे सात खणी हा उंच मनोरा अशा  इमारती उभारल्या गेल्या. या च परिसरात ख्रिस्ती धर्मगुरू फ्रान्सिस झेविएर यांनी आपल्या धर्माचा संदेश दिल्याची नोंद आहे  १५४४ साली त्यांनी या ठिकाणी वास्तव्य केले याच वास्तूला सेंट फ्रान्सिस झेविएर चॅपल म्हणुन ओळखले जाते. अशा बऱ्याच नोंदी असलेले पोर्तुगीज भाषेतील शिला लेख आजही  बघायला मिळतात . किल्ल्याला दोन दरवाजे  आहेत यांना दक्षिण दरवाजा " कॅप्टन प्लेस " १५७७ साली बांधण्यात आली यालाच  दक्षिण दरवाजा , पाण्याच्या बाजून येणारा दरवाजा " पोट्रा  दे मार "  आणि पूर्वेकडील  दरवाजा  किंवा जमिनी च्या बाजूचा दरवाजा" पोट्रा  दे टेरा   आपल्याला पाहायला मिळतो.

कोरलई  किल्ला    : Morro de Chaul :  पंडीत महादेवशास्त्री जोशींनी याचे काव्यात्मक वर्णन केलंय कुडंलिकेने सिंधूसागराला अलिंगण दिले त्या प्रीतीसंगमावरचा हा तीर्थोपाध्यायच आहे असे गौरवोद्गार काढले आहेत.   कोर्लईचा किल्ला एका चिंचोळ्या डोंगरावर बांधला असून तो एक किलोमीटर लांबीचा दक्षिणोत्तर पसरला आहे. बालेकिल्ल्यास चारी बाजूने तटबंदी असून त्याची रुंदी तीस मीटर आहे, उंची काही ठिकाणी 80 ते 90 फुटांपर्यंत आहे. येथे अनेक तोफा आहेत तसेच या किल्ल्याची माहीती देणारे अनेक पोर्तुगीज भाषेतील शिलालेख आहेत . या ठिकाणी पाण्याची टाकी आहे ती बंदिस्त केली केली असून गरजेनुसार पाणी टाकीतून बादलीने काढता येते.  या किल्ल्यास सहा दरवाजे आणि दोन मुख्य बुरुज आहेत त्याची नावे सा दियागो आणि सा फ्रान्सिको अशी होती. 1739 साली चिमाजीआप्पानी सुभानरावकरवी हा किल्ला जिंकून घेतल्यावर त्यांची नावे पुस्तीबुरूज आणि गणेश बुरुज अशी ठेवली होती. येथे 8000 शिंबंदी होती व त्यांची राहण्याची सोय तेथे आता भग्न अवस्थेत असणाऱ्या खोल्यांत केली होती.या किल्ल्यावरून संध्याछायासमयी विहंगम दृष्य दिसते. या किल्ल्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. हा किल्ला जगातील काही किल्ल्यापैकी एक असे मानली जाते.  १५२१  साली पोर्तुगीज अधिकारी डोम फिल्पे याने हा किल्ला बांधला. येथे आजमितीला किल्ल्याचे अनेक पुरातन वास्तू बघायला मिळतात.  किल्ल्यावर  500 वर्षे पुरातन चर्च ,  तत्कालीन काही इमारतीचे अवशेष , अनेक तोफा आणि सभोवताली असलेल्या निसर्ग सौंदर्याचे अनेक आविष्कार पाहायला मिळतात.

किल्ल्याच्या पायथ्याशी असेलेल्या गावात कोळी लोकांची घरे  आपले लक्ष्य वेधून घेतात. कोरलई गावा  मध्ये १७१३  साली बांधलेले एक माऊंट कारमेल चर्च आहे. ईस्टर ,गुड फ्रायडे ,नवीन वर्ष , माय  देऊस यात्रा असे सगळे सण साजरे केले जातात .या साठी  होली रोझरी ,होली क्रॉस, माऊंट मेरी, कारमेल माता आणि संत जोसेफ असे पाच विभागातर्फे याचे आयोजन केले जाते.

येथे मुख्य पोर्तुगीज वंशाचे ख्रिस्ती बांधव कोर्लई गावात राहातात, मजबूत बांधा असणारे



काटक, कष्टाळू, मेहनती आहेत ते भाजीपाला, शेती व इतर जोडव्यवसाय करतात यांच्या स्त्रियाही शेतीकामात मदत व भाजीपाला विक्री करतात. या स्त्रिया विशिष्ट पद्धतीने लुगडे परिधान करतात याच्या बोलीभाषेत पोर्तुगीज शब्दाचा अधिक भरणा असतो. या भाषेला लुसो- इंडियन पोर्तुगीज क्रियोल भाषा संबोधतात . गावात अनेक घरात आजही भाषा बोलली जाते. येथे कॅथलिक पंथाची २००- २५० घरे आहेत. ज्या मध्ये रोजरीयो , परेरा , डिसूझा , मार्टीस , वेगास, रोच, पेना आणि गोमस ही प्रमुख सात घराणी आहेत. यांच्या घरामध्ये त्यांच्या खाद्य संस्कृतीचे दर्शन होते .

चौल . प्राचीन मंदिराचे शहर ..

चौल च्या पुरातन नोंदीमध्ये अजून एक महत्वाचे वैशिष्टये म्हणजे इथली मंदिरे, एके काळी येथे ३६० मंदिरे हॉटेल असा उल्लेख आहे. यातील काही मंदिरे आजही येथे पाहायला मिळतात. खासकरून , चंपावती देवी , रामेश्वर , मुखरी गणपती, शितलादेवी , डोंगरावरील दत्त मंदिर, हिंगलाज माता मंदिर, भगवती एकविरा, जाखमाता आणि बरीच काही . याच मंदिरांच्या शेजारी अनेक ठिकाणी पाण्याची तळी पण आढळतात.

रामेश्वर मंदिर – चौल चे ग्राम दैवत सोळाव्या शतकात या मंदिराची नोंद आढळते. येथील बाजारपेठेत वसलेले ही मंदिर वास्तु कलेचे उत्तम प्रतीक आहे. मंदिराच्या सभागृहात अग्निकुंड , उत्तरेस नारायणाच्या मूर्ती समोर कमानी खाली पर्जन्य कुंड , दक्षिणेस श्री गणेशाच्या च्या मूर्तीखाली वायुकुंड आहे. ज्यावेळी हवेतील उष्मा नाहीस होतो त्यावेळी अग्नि कुंड तर वारा पडला तर वायु कुंड आणि पाऊस पडला नाही तर पर्जन्य कुंड असा संदर्भ इथे सांगितला जातो. जून १७३१ मध्ये पर्जन्य वृष्टी व्हावी या हेतूनेयेसाजी आंगरे यांनी पर्जन्य कुंड उघडल्याचे दाखला मिळतो आणि या वेळी पाऊस पडला असेही सांगितले जाते. या नंतर १७९०, १८५७ ,१८७६ ,१८९९ आणि १९४१ साली ही पर्जन्य कुंड उघडले होते अशी नोंद आहे. मंदिराच्या उत्तरेस २२५ वर्षे जुने आशापुरा देवीचे मंदिर आहे आणि येथे नवग्रह पण आहेत.

मंदिराच्या मागील बाजूस एक जुनी दगडी वास्तू आहे. नारळाच्या झाडांनी आच्छादलेली वाडी या वास्तूला पूर्णपणे झाकाळते ज्यामुळे ती बाहेरून लवकर लक्षात येत नाही. ही वास्तू आंग्रे काळात बांधलेली असल्याचे समजते. येथील राहणाऱ्या ग्रामस्थांच्या मते ही आंग्रे घराण्यातील कोणी व्यक्तीची समाधी आहे. या समाधीवरील फुलांचे कोरीवकाम अजूनही पाहता येते. समाधीच्या बाजूलाच नंदीची मूर्तीही आहे. या समाधीचा बराचसा भाग हा मोडकळीस आल्याने काही ठिकाणची दगडे वास्तूच्या भिंतींमधून निखळलेले दिसतात. या समाधीचे छत पडलेले आहे व फक्त काही भिंती आणि खांब उभे आहेत.

चौल दत्त मंदिर : चौल च्या सभोवताली अनेक डोंगर आहेत यापैकी एका डोंगरावर शिवकळी श्री दत्त मंदिर आहे. सभोवतालच्या परिसराचे विहंगम दृश्य येथून पाहायला मिळते. आजचे भगव्या कळसा चे मंदिर स्वामी ब्रह्मेंद्र यांनी बांधल्याचे सांगितले जाते. श्री दत्तात्रेयाची सर्वांग सुंदर काळ्या पाषाणातील मूर्ती षडभुज आहे. परिसरात शिव लिंग, मी जानकीबाई आणि हनुमान दास बाबा यांचा मठ आहे.

याच मंदिराच्या जवळ काही बुद्ध लेणी आहेत, या बुद्ध लेण्यामध्ये काही गुहे मध्ये मानिर वसविलेले आहे. कच्छ मधील भानुशाली समाजाची किंवा महाराष्ट्रातील भावसार समाजाची ही कुलदेवता हिंगलाज या नावाने ओळखली जाते.

चौल च्या सौंदर्यात इथल्या निसर्गाचे अनेक पैलू आहेत . या मध्ये येथील जैव विविधता , येथे अनेक प्रकारच्या वृक्ष संपदा , इथली फुले आणि फळ बागा. इथे अनेक आयुर्वेदिक वनस्पती बघता येतील , या करिता वृक्ष मित्र श्री राजाभाऊ राईलकर यांच्या बागेत एक तासाची सफर घडवित येते . तसेच गावामध्ये इतरही काही बागा , चोर चिंच, रेवदंडा येथील वडाच्या झाडावरील गरुड घरटे , गावातील अनेक प्रकारचे चाफ्या ची झाडे , ताडगोळे, जायफळ अशा अनेक वनस्पती नी समृद्ध अशा इथल्या नारळ सुपारीच्या बागा आहेत.

चौल , जैव विविधते मध्ये येथे असणाऱ्या पक्षांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच हिवाळ्यात समुद्र मिणारी येणारे परदेशी पाहुणे येथे येणाऱ्या पर्यटक मित्राना भुरळ घालतात. येथे आढळणारी विविध रंगाची फुलपाखरे ही पण आकर्षणाचा विषय आहे.

चौल मध्ये ज्यू लोकांचे खूप प्रमाणात वास्तव्य आहे, यांना इथे शनिवार तेली म्हणून ओळखले जायचे , त्यांचे तेलाचे घाणे, पुरातन घरे आणि प्रार्थना मंदिरे " सिनेगॉग " आजही येथे पाहावयास मिळतात. रायगड जिल्ह्यात अशा प्रकारची अनेक मंदिरे आहेत परंतु सर्वात जुने असे या सिनागोग ला बेथ एल , देवाचे घर , BETH EL SYNAGOGUE (1848) म्हणून ओळखले जाते.

चौल पर्यटन : भारत वर्षातील समृद्ध वारसा आज खूप वाईट परिस्थितीत खितपत पडलेला आहे. रेवदंडा येथील कुंडलिका खाडी आज गाळाने भरलेली आहे, आपल्या समृद्ध इतिहासाची अनेक पुरावे या गाळात दडलेले आहेत याचे उत्खनन होणे आवश्यक आहे. या पोर्तुगीज किल्ल्याची आणि चौल मधील निजामशाही अवशेष आणि चौल च्या समृद्ध भूमीची माहिती पर्यटक मित्रांना होणे आवश्यक आहे. पर्यटनासाठी एक नवीन दालन या निमित्ताने अनेकांना खुले होईल. या करिता पायाभूत सुविधांचा अभाव आहे.



# कुंकू



प्रतिमा खरे, पुणे

आपल्या भारतीय संस्कृतीत 'कुंकू' हे सौभाग्याचे प्रतिक मानले गेले आहे.

कपाळावर कुंकू, हातात बांगड्या व विवाहीत स्त्रियांच्या गळ्यात मंगळसूत्र ही त्रिसुत्री आपल्या संस्कृतीत सौभाग्याशी जोडली आहे.आजच्या बदलत्या काळात मात्र हे समीकरण थोडं बदलत असल्याचं प्रत्ययास येते.पूर्वी लाल कुंकवाची(म्हणजेच ओल्या गंधाची)छोटी बाटली घराघरात असायची. अलिकडे या कुंकवाची जागा टिकलीने (बिंदीने)घेतलेली दिसून येते.ओले कुंकू कपाळावर गोलाकार लावण्यास लागणारा वेळ किंवा ते घामाने ओघळून जाण्याचा प्रश्नच या टिकलीने सोडवल्याने हल्ली स्त्रिया कुंकवा ऐवजी टिकली लावणे पसंत करतात.कुंकू,बिंदी किंवा टिकली ही कपाळावर लावावी असा संकेत आहे. मात्र हल्ली टिकली कपाळाच्या खाली,दोन भुवयांच्या मध्ये लावण्याची नवीनच फ शन आहे,तीही ठिपक्यासारखी अगदी बारीक. काही पोक्त बायका मात्र बुबुळा येवढे मोठे ठसठशीत कुंकू लावतात.आवड ज्याची त्याची.पण कुंकू लावणे......वगैरे बुरसटलेपणाचे लक्षण समजणाऱ्या अधुनिक स्त्रियां कुंकूही लावत नाहीत अन् बांगड्या व मंगळसूत्रही घालत नाहीत. याउलट एकट्या रहाणाऱ्या विधवा स्त्रिया मात्र सुरक्षितता म्हणून व आपण एकट्या नाही हे दाखवण्यासाठी कुंकू लावतात, मंगळसूत्रही घालतात.

एकूण काय तर कुंकू लावणे न लावणे व मंगळसूत्र घालणे..... वगैरे गोष्टीं आता ऐच्छिक झाल्या असून त्यासाठी कुठलेच निकष लावणे दुरापास्त झाले आहे. नुकतेच पुण्याच्या शेफाली वैद्य हिने कुंकू(बिंदी) विषयासंबंधाने एका ब्रँडेड कंपनीच्या विरोधात जाऊनआवाज उठवला.दिवाळी सारख्या मोठ्या हिंदू सण समारंभाच्या निमित्ताने त्या कंपनीच्या जाहिरातीत सर्व शृंगारासहीत सुंदर वस्त्र परिधान केलेल्या मा डेलच्या कपाळावर कुंकू मात्र नव्हते ते पाहून आपल्या हिंदू संस्कृतीत महत्वाचे मानले गेलेले सौभाग्याचे प्रतिक नेमके 'कुंकू' कां नसावे हा शेफालीचा प्रश्न होता.शेफालीचे म्हणणे अगदी रास्त होते. हिंदूच्या सणानिमित्ताने अशा जाहिरातीं दाखऊन कंपन्या आपला माल खपवतात व रग्गड पैसाही कमावतात मग हिंदूंच्याच सणाला हिंदूसंस्कृतीचे शुभ कारक प्रतिक असलेले कुंकू मात्र मा डेलच्या कपाळी कां नसावे?अशा गल्लेभरु कंपन्या हिंदूसंस्कृतीचा जाणीवपूर्वक अवमान करतात हे शेफालीला तीव्रतेने जाणवले व तिने निषेध नोंदवला. अशा कंपन्यांचा माल आपण हिंदूनी कां घ्यावा?शेफालीचे हे म्हणणे बरोबरच होते.एरवी कुंकू लावणे न लावणे बाबत किंवा इतर वस्तुंच्या जाहिरातींमधे कुंकू न लावणे बाबत शेफालीचा अक्षेप नव्हताच.दिवाळी सारखा हिंदूंचा येवढा मोठ्ठा सण,तो साजरा करताना सर्व शृंगारात महत्वाचे ते नेमके 'कुंकू' नसणे हे शेफालीला खटकले. हिंदू संस्कृतीला टारगेट करुन जाणूनबुजून केलेली ही उपेक्षा आणि हा अपमान आपण कां सहन करायचा?यासंबंधाने मिडीयावर शेफालीच्या #NoBindiNoBusinessचा खूप गाजावाजा होऊन सध्या हे प्रकरण खूप चर्चेत आहे. तिला लोकांचा चांगला पाठींबा मिळत आहे.निस्वार्थपणे एकटीने लढून शेफालीने हा लढा जिंकून कंपनीस ती जाहिरात अखेर मागे घ्यायला लावली. चुकीच्या गोष्टीं विरुद्ध हिंमतीने कुणीतरी असा आवाज उठवायला लागतोच.

टिकलीवरुन एक प्रसंग आठवला.

मी त्यावेळी साधारणपणे ४०-४२ वयाची असेन. नित्याप्रमाणेच संध्याकाळी मी बाहेर फिरायला(वा कला) गेले असताना एक विचित्र घटना घडली.माझ्या कपाळावरची टिकली वाटेत कुठे कशी पडली मला कळले नाही,माझी लाजीरवाणी स्थिती झाली.पर्समधे नेहमी टिकल्यांचे पाकीट असते पण वा कला जाताना मी बरोबर पर्स घेतली नव्हती.आता वाटेत कुणी ओळखीचे भेटले तर ते काय म्हणतील या विचाराने मी पार गोंधळून गेले.तोंड लपवत खाली मान घालून क्षणभर विचार केला की रिक्षाने थेट घरी जावे.तरीही दरम्यांत कुणी ओळखीचे भेटले तर नांवं ठेवतील हा विचार मनाला भेडसावत होताच.पण दुसरा पर्याय तरी काय होता माझ्याजवळ?मी रिक्षा करुन थेट घरी परतले. सुदैवाने वाटेत मला कुणी पाहिले नसावे असे वाटले अन् हायसे वाटले.घरी येताच हा झालेला प्रकार घरच्यांना ऐकवला असता घरच्यांनी मात्र त्या विषयाचं गांभीर्य समजून घेण्याऐवजी 'त्यात काय येवढं?' म्हणून माझीच खिल्ली उडवली.त्यामुळे काहीच कळेनासे झाले. खरंच पण मग त्याक्षणी मी नेमकं काय करायला हवं होतं याचं उत्तर मात्र आजवर मला सापडलेलं नाही. पण येवढ्याशा टिकलीने घडलेले ते रामायण आजही आठवले तरी मनात येते की इतक्या क्षुल्लक गोष्टीसाठी आपण अपराधीपणाने असं गोंधळून जाणे हा आपला वेडगळपणा होता का?कुठलाही दोष नसताना केवळ लोक काय म्हणतील या भीतीने व लज्जेने मला अपराध्यासारखे कां वाटावे?रुढीपरंपराचा आपल्या मनावर पगडा असतो तो असा !! याला कुणी मागासलेपणा म्हणोत किंवा काहीही म्हणोत.पण त्यावेळी मात्र त्या स्थितीत मला टिकली शिवाय काहीही सुचत नव्हते हे शंभर टक्के सत्य आहे.

मग सहजच मनात विचार आला की हल्लीच्या नवविवाहीत लेकींसुनां या लोक काय म्हणतील या विचारा पेक्षा प्र क्टिकली जे योग्य आहे तेच आचरणात आणतात त्यात गैर काय?(एरवी नाही पण कधीतरी शुभप्रसंगी त्या टिकली हौशीने लावतात.)

संस्कृतीचा रास्त अभिमान आपल्याला असावा.तोआहेही.पण काहीवेळा विचित्र पेचप्रसंग निर्माण होतात,अशावेळी त्याप्रसंगी डोळसपणे सुसंगत विचारांची जोड हवी ना !!

संस्कृतीचं लेबल लाऊन आपल्याकडे पूर्वापार चालत आलेल्या परंपरा हट्टाने, कधी अंधश्रद्धेने पाळल्या जातात. स्त्रिपुरुष,जातपात,श्रेष्ठकनिष्ठ अशा भेदभावातूनही कितीतरी जाचक परंपरा आजवर बिनबोभाट आपण निरंतरपणे पाळत आलो.समाजात रहायचं तर समाज काय म्हणेल याचा विचार करत समाजाच्या भीतीपोटी असा अन्यायअत्याचार निमुटपणे सहन करणे कितपत योग्य आहे?सुदैवाने पूर्वीच्या तुलनेने आजच्या बदलत्या काळात लोकांची मानसिकता बदलते आहे व जनजागृतीतून आता लोक व्यक्त होऊ लागलेत ही चांगली गोष्ट आहे. पाच हजार वर्षांची परंपरा असलेल्या भारतीय संस्कृतीची संकलित माहिती कै.श्री.महादेवशास्त्री जोशीं यांच्या 'भारतीय संस्कृती कोष' या ग्रंथातून मिळते. समता बंधुभाव व आपल्या शुद्ध आचरणाने तिचे जतन व संवर्धन करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य ठरते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'सबका साथ,सबका विकास' या त्यांच्या घोषवाक्यानुसार प्रगतीच्या वाटा सर्वांसाठी खुल्या केल्या आहेत.

प्रथा परंपरां मध्ये काही तृटी असतील तर वेळीच त्या दूर केल्या पाहिजेत.अन्यथा समाजात असंतोष निर्माण होतो.असंतुष्ट समाज त्याविरुद्ध आवाज उठवल्याशिवाय रहात नाही.अलिकडेच कोल्हापूरमधील हेरवाड ग्रामपंचायतीतल्या स्त्रियांनी ते दाखऊन दिले आहे.विधवां संबंधीत जाचक प्रथा बंद व्हाव्यात यासाठी मोर्चे काढून अनिष्ठ प्रथांविरोधात एकजुटीने आवाज उठऊन त्या प्रथा बंद पाडण्याचे त्यांनी जे धारिष्ठ्य दाखवले त्यात कितीतरी अडाणी, गरीब व पिडीत स्त्रियांचाही समावेश होता. पण अखेर त्यांनी शासनाला त्याची दखल घेणे भाग पाडले.ही बाब जाणकार,संस्कृती रक्षकांनी लक्षात घ्यावी अशी आहे.

विधवांवर अन्याय अत्याचाराची खरी सुरवात कुंकू लावण्याचा त्यांचा अधिकार हिराऊन घेण्यापासून होते आणि तेथूनच पुढे विद्रुपीकरणातून सारा जन्म अलवणात राहून विधवांच्या वाट्याला जीर्ण नकोसं करणारा प्रवास सुरु होतो पण आता परिस्थिती खूप बदलली आहे. आपल्या या अशा अनिष्ठ प्रथा परंपरां मधे जखडलेल्या पिडीतांच्या सोशिकपणावर तर आपली संस्कृती उभी नाही ना?याचाही विचार व्हायला हवा.

आज "२३ जून जागतिक विधवा दिन" या दिवसाचे औचित्य साधून शासनाने आता विधवांसाठी चांगल्या योजना आखल्याचे समजते ही विशेष जमेची बाजू म्हणता येईल. पूर्वीच्या तुलनेने विधवांचे जीणें आता बरेचसे सुसह्य झाले असले तरी काळाच्या अनुशंगाने येणाऱ्या समस्यांची उकल जाणकारांकडून वेळोवेळी झाली तर सकारात्मक परिवर्तनातून आपल्या संस्कृतीची उज्वल प्रतिमा अभिमानास्पद व नेहमीच सर्वांसाठी आदर्श राहील. कारण रुढीपरंपरा म्हणजे संस्कृतीचे वैभव असते.

# परभांची (पाठारे प्रभू) दिवाळी



सौ. प्रणिता प्रभाकर, मुंबई

दिवाळीचा सण हा सर्व सणांचा राजा मानला जातो व तो आहेच.प्रत्येकाच्या घरी दिवाळी अगदी आनंदाने साजरी केली जाते. गोडा धोडाची रेलचेल, दिव्यांचा झगमगाट , विविध आकारांचे व रंगांचे आकाश कंदील खिडकीत किंवा बाल्कनीत टांगलेले , लहान मुलांची फटाक्यांची आतषबाजी, मुली-स्त्रिया आपल्या घराच्या दरवाज्यात किंवा अंगणात विविध प्रकारची रांगोळी काढून त्यावर पणत्यांची आरास करतात.तसेच सुगंधी उटणे, चंदनाचा साबण नवीन कपडे व दागिने घालून मिरवणे, असे दृश्य साधारणपणे सगळीकडेच दिवाळीच्या ४-५ दिवसात दिसेल.

पण आज खास पाठारे प्रभू ज्ञातीची दिवाळी थोडी हटकेच असल्याने त्याचे वर्णन मी तुम्हाला सांगू इच्छिते . पाठारे प्रभू ज्ञातीतील लोकांना “परभू” या नावाने संबोधले जाते. त्यामुळे पाठारे प्रभूंची दिवाळी म्हणजेच परभांची दिवाळी हा परवलीचा शब्द झाला. तर ही परभांची दिवाळी थोडी थोडकी ४ दिवस नसून चांगली १२ दिवसांची असते.दिवाळीची चाहूल लागते ती अश्विन महिन्यातील कृष्ण पक्षातील कालाष्टमी पासूनच . ह्या दिवशी घरी फराळ तयार करायला व दारात किंवा अंगणात रांगोळ्या काढायला सुरवात होते. ह्या रांगोळ्या ठिपक्यांच्या, पानाफुलांच्या किंवा देखावे वगैरे नसून पारंपरिक भौमितिक कलाकृती(Geometrical Design) असते व त्याला नाव ‘रांगोळी’ नसून ‘कणा’ असे आहे. पूर्वी परभांची वस्ती पालवावर म्हणजे ठाकूरद्वार भागात असल्याने प्रत्येकाच्या घरापुढे अंगणात किंवा दरवाज्यात हा कणा काढलेला दिसे व ह्या बायका इतक्या हौशी की साधा कणा काढायला सुद्धा नटून थटून तयार तयार व्हायच्या.अजूनही साठीच्या घरातील बायका हे असे कणे काढताना दिसतील. इतकेच नव्हे तर अष्टमी पासून ते भाऊबीजे पर्यंत काढण्यात येणाऱ्या सर्व कण्यांना नावे दिली गेली आहेत.उदा:१) आसन्या, २) बोण्डल्या, ३) तेंडल्या , ४) खाम्बल्या, ५) पांच देवळ्या, ६) नांगऱ्या,७) पोखरण, ८) रवळी, ९) धनदीवे, १०) पट, ११) स्वस्तिक, १२) भाऊबीज आरती. त्याच प्रमाणे फराळालाही दिवाळीची ‘सुखडी’ म्हणतात. खास करून कारंज्यांना ‘शिंगड्या’ म्हणतात व त्या भाजलेल्या असतात. ह्या शिंगड्या करताना त्याला कॉर्न फ्लोअर किंवा तांदूळ पीठ व तुपाचा साठा तयार करून मैद्याच्या पोळीवर लावून असे तीन थर तयार करून मग शिंगड्या बनवायच्या. खासियत अशी कि शिंगड्या तीन प्रकारच्या असतात, ओला नारळ, दुधी हलवा आणि खिमा.तसेच मथलेले बेसन लाडू असतात. म्हणजे चण्याच्या डाळ्यांपासून तुपात डाळ्यांचे पीठ मथून मग लाडू बनवायचे . म्हणून ते मथलेले बेसन लाडू होत. हे सहसा दुकानांमधून विकायला दिसत नाहीत.

वर नमूद केल्या प्रमाणे प्रत्येक दिवसाच्या रांगोळीचे (कण्याचे) महत्व आहे. कालाष्टमीच्या दिवसापासून खऱ्या अर्थाने प्रत्येक प्रभू कुटुंबात ( परभांच्या घरी) दिवाळीला प्रारंभ होतो.त्याला ‘आठविंदा’ म्हणतात व आठविंद्यापासून फराळ (सुखडी) करायला सुरवात करायची. त्या प्रारंभाला घरी नैवेद्य म्हणून गुरवळ्या (साखरेच्या पुऱ्या /गोड पुऱ्या) करतात. त्या दिवशी ‘आसन्या’ ची रांगोळी/कणा काढतात.‘आसन्या’ म्हणजे बैठक. फराळ/सुखडी करण्यासाठी खाली बसायला आसन हवे म्हणून असन्या होय. तसेच वसू बारस किंवा गोवत्स द्वादशीला हाताने नांगरून जे पिकते ते खायचे म्हणून नांगऱ्यांचा कणा काढतात. ह्या दिवशी पिठाचा दिवा म्हणजे पणती तयार करून दिव्याची देवघरात पूजा करून मग तो दिवा बाहेर काढलेल्या ‘नांगऱ्याच्या’ कण्यावर ठेवायचा असतो. ह्या दिव्याला यमदीप म्हणतात. हा यमदीप द्वादशी व त्रयोदशीला पूजतात. नंतरचा दिवस धनतेरस किंवा धनत्रयोदशी. ह्या दिवशी दिवेलागणीच्या सुमारास गृहिणींनी आपल्या धनाची (दागिन्यांची) पूजा करावयाची असते. संध्याकाळी ‘पोखरणीची’ रांगोळी/ कणा काढावयाचा. कारण दुसऱ्यादिवशी नरक चतुर्दशी ,दिवाळीचा पहिला दिवस.... पहाटे उठून अभ्यंग स्नान करावयाचे म्हणून आदल्या दिवशी पोखरणीतून पाणी आणून घरात साठवायचे. पोखरण म्हणजे छोटे तळे ...ह्या उद्देशाने ‘पोखरण’चा कणा काढतात. नरकचतुर्दशीच्या दिवशी पहाटे सूर्योदयापूर्वी उठून सुगंधी तेल,उटणे लावून आंघोळ करावयाची . ह्या अंघोळीला परभांच्या कडे पहिली आंघोळ म्हणतात. विशेषतः घरातील पुरुष मंडळी व लहान मुलांना रांगोळी काढून त्यावर पाट ठेऊन, पाटावर बसवून तेल-उटणे लावले जाते व केसांना नारळाचे दूध(शिरे) लावले जाते. त्या नंतर प्रत्येकाच्या अंघोळी वेळेस एक तरी फटाका किंवा फुलबाजी लावायची. आंघोळीला जाताना दातवण व चिराटे घेऊन जायचे.दातवणाने आंघोळी पूर्वी दात घासायचे व आंघोळ झाल्यानंतर चिराटे पायाने फोडायचे. ...नरकासुराचा वध केल्याचे प्रतीक. ते झाल्यानंतर पिठाची कोडी करून त्यात तेलवात घालून पेटवायची व पाय त्यावरून फिरवायचा म्हणजेच नरकासुराचा वध केल्यानंतर पाय दिव्याच्या प्रकाशासारखे लख्ख झाले पाहिजेत.तसेच ह्या दिवशीचा कणा म्हणजे रवळी... आदल्या दिवशी पोखरणीतून पाणी आणल्यावर अभ्यंग स्नानासाठी रवळीत पाणी भरायचे म्हणजे मातीचा घडा होय किंवा घंगाळ म्हणूयात आपण. नरकासुराचा वध केल्यानंतर त्याचा आनंदोत्सव म्हणून दुसऱ्यादिवशी अमावास्या, सकाळी द्यूत किंवा पटाची रांगोळी काढावयाची . ह्या दिवशीही तेल उटणे लावून अभ्यंग स्नान करावयाचे. संध्याकाळी लक्ष्मी पूजन/चोपडा पूजन करावयाचे. परंतु परभांच्या कडे ‘धनदीवे’ असतात.लक्ष्मी म्हणजे धन व हे धन सहजासहजी मिळत नसते. धन मिळविण्याकरिता अपार कष्ट, परिश्रम किंवा मेहनत करावी लागते व त्याचे प्रतीक म्हणून कि काय काटेरी निवडुंगांची पूजा केली जाते. ह्या निवडुंगाचे १६ समान भाग करून एका बाजूने फुलवात मावेल इतके कोरून ते उन्हात सुकवायचे व संध्याकाळी ह्या १६ निवडुंगाच्या तुकड्यांमध्ये फुलवात व तेल घालून चांदीच्या बाजवटावर (चौरंग) ठेऊन त्याची गंध अक्षत व फुलांनी पूजा करून त्याच्या पुढ्यात छोट्या पाटावर केळे-विडा,सुपारी, नारळ व नैवेद्याला बेसन लाडू ठेऊन निरांजन व उदबत्तीने ओवाळून ते सर्व दरवाज्यात काढलेल्या रांगोळीवर ठेवतात. धनदिव्यांच्या दिवसाची रांगोळी किंवा कणा असतो पाण्यावरील दोन हंस व डोक्यावर आरती ( धनाचे प्रतीक हंस व दिव्यांचे प्रतीक आरती होय). ह्या धनदिव्यानं ‘जावई’ म्हणतात. वर सांगितल्या प्रमाणे पालवावर प्रभू लोकांची किंवा परभांची स्वतःची घरे होती व त्यामुळे हे धनदीवे उर्फ जावई बाहेर कण्यावर ठेवले की मग घरातील गडी माणसे (नोकर) आपल्या दारातील एक किंवा दोन जावई उर्फ धनदीवे उचलून शेजारील घराच्या दरवाज्यात ठेवायचे. ते करताना त्या शेजारील घरातील गड्याने(नोकराने) ह्याला भिजवायचे. परंतु भिजवून न घेता परतण्यात खरे वकूब असते. ही एक गमतीदार प्रथा होती. आजकाल फ्लॅट सिस्टिम मध्ये हे करणे अशक्य. असो. त्या नंतर फटाक्यांची आतषबाजी..., हजार-दोन हजार फटाक्यांची माळ लावायची, त्या माळीमध्ये अनार - भुईचक्र इत्यादी ठेवायचे म्हणजे आतषबाजीला मजा येते. भुईचक्र जमिनीला समांतर तर अनार आकाशाच्या दिशेने उडतात. हे बघण्याची किंवा ह्या देखाव्याने डोळ्यांचे पारणे फिटते. ह्या आतषबाजीला फटाक्यांचा कोट म्हणतात. ह्या आतषबाजीला फटाक्यांचा कोट म्हणतात. फटाक्यांच्या माळीच्या एका टोकाला फटाक्यांची चवड ठेऊन त्यावर कागदाचा किल्ला ठेवलेला असतो, म्हणून तो कोट होय. मग

दुसऱ्याबाजूने ही फटाक्यांची माळ पेटवायची. ह्या दिवसाला परभांच्या घरी एक वेगळ्या दृष्टी कोनातून पहातात. तो म्हणजे सणाची मौज -मजा व आनंद लुटणे होय. ह्या दिवशी जेवणाचा खास सामिष मेनू असतो व तो म्हणजे हिरव्या चटणीचे भरलेले सरंगे (पापलेट). हे झाल्या नंतर दुसरा दिवस म्हणजे बळी प्रतिपदा उर्फ दिवाळीचा पाडवा. ह्या दिवशी पहाटे सूर्योदयापूर्वी उठून घरातील कचरा काढून त्याची पूजा करावयाची असते बिना अंघोळीने. त्या पूजेत आदल्या दिवसाच्या पूजेतील एक निवडुंगाच्या तुकडा उर्फ जावई पूजेकरिता ठेवायचा असतो. पूजा झाल्यावर सुपडी किंवा थाळा घेऊन त्यावर लाटण्याने वाजवून तो पुजलेला कचरा घरातील सर्व खोल्यातून फिरवून व फिरवताना ‘ईडा पीडा टळो व बळीचे राज्य येवो’ असे म्हणावयाचे. ह्याचा अर्थ असा की, घरातील सर्व पीडा जाऊन देत व बळीचे राज्य म्हणजे सुख-समाधान लाभू देत !हे केल्यावर घराच्या बाहेरील चौकात तो कचरा एका बाजूला ठेऊन त्याच्या सोबत ज्या झाडूने कचरा काढलेला असतो तो ही टाकून द्यायचा असतो. त्या नंतर घरातील सर्व मंडळींनी अभ्यंग स्नान करून नवीन कपडे घालून मग घरातील स्त्रियांनी दरवाज्यात स्वस्तिकची रांगोळी/कणा काढावयाचा. स्वस्तिक हे आपल्याकडे शुभ मानले जाते.तसेच पाडवा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. बलिप्रतिपदेच्या दिवशी बळीराजाची म्हणजे त्याच्या चांदीच्या प्रतिमेची पूजा करावयाची असते.ह्या दिवशी ‘सगण’ म्हणजे मीठ विकायला येतात. हे सगण घेताना भाव विचारायचा नसतो तसेच आपण जितके पैसे देऊ ते काहीही न बोलता घेऊन जातात.हे मीठ नंतर स्वयंपाक घरातील मिठाच्या बरणीत एकत्र करावयाचे असते. मीठ हे लक्ष्मीचे प्रतीक असल्याने घरात सुख, समाधान व समृद्धी नांदते, असे पूर्वीचे लोक म्हणायचे.यामुळे सगण घेण्याची प्रथा होय. बळीराजाची पूजा करून चांदीच्या बाजवटावर ठेवलेली ही मूर्ती (धनदिव्याप्रमाणे) स्वस्तिकाच्या कण्यावर नेऊन ठेवायची व मग फटाक्यांचा कोट लावायचा. बळीराजाच्या दिवशीही सामिष जेवणाची पद्धत आहे. केशरीभात (साखरभात)व मटणाचा घाट असतो. त्यानंतर भाऊबीजेचा दिवस. ह्या दिवसाची रांगोळी/ कणा म्हणजे आरती

होय. आम्हा परभांच्याकडे भाऊबीजेच्या ओवाळणीला, भाऊ-भावजय ह्या दाम्पत्याला मान दिला जातो व बहीणही त्या दाम्पत्याला भेट वस्तू देते.

एकूण काय तर दिवाळीचा सण पाठारे प्रभू ज्ञाती मध्ये मौज-मजा-धमाल ह्या दृष्टीनेच साजरा केला जातो.

## SHREE CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ MUSEUM & INDIAN HISTORY

"A few distant centuries ago, on a nondescript day

I can barely imagine

Upon what craggy hilltop, within a dense sunless forest

O sovereign Shivaji

Lightning-like, across your forehead, there flashed

The thought from above

"With a singular religious thread, this torn up, fragmented

Bharata, I shall bind in One."*

These lines are from Nobel Laureate Rabindranath Tagore's poem on Chhatrapati Shivaji's role in inspiring and uniting India. One of the greatest warriors in Indian history, Shivaji's life is a testament to his bravery and spirit.

Most Indians, especially Maharashtrians learn about his valor in defending his motherland and also know about the impressive Chhatrapati Shivaji Maharaj Vastu Sangrahalaya (museum) in Mumbai. However, Francois Gautier, a French journalist was inspired by the Maharaj's fight to protect all, to construct a museum in Pune that will give an in-depth look into some aspects of Indian history.

SHREE CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ MUSEUM & INDIAN HISTORY

A museum by the people, showcasing our history to the future generations. The museum's work is in progress. With more support from the public, it will near its completion. Wadgaon Shinde Road, Pune, Maharashtra 411047, India

https://www.factmuseum.com/

Museum description from its website: Bharath, with its thousands of years of history is a treasure trove of cultural, social, anecdotal and most importantly spiritual information. Due to extensive periods of colonization and subjugation, the history that is taught to us is written by invading victors and has been subject to vast distortions driven by political or ideological power struggles.



However, learning our true unbiased history is necessary for cultural confidence, increasing self-awareness and for strategic policy making.

The Chatrapati Shivaji museum of Indian history was founded in 2010 by renowned journalist and writer Francois Gautier. Many prominent well-wishers including Sri Sri Ravi Shankar and the Dalai Lama extended generous help. It has been bringing alive various facets of true Bharatiya history through its various galleries and exhibits. The founding organization is FACT (Foundation for Advancement of Cultural Ties). FACT was formed by Francois Gautier using the prize money he received by winning the 'Nachiketa' award of excellence in journalism. FACT is committed to highlighting the magnificence of India and the threats to its sovereignty.



Kedar Deshpande, California

# The Unfoldment Journey



Omkar Udas, Canada

Ten years ago, I was working in Mauritius as a corporate marketer. As a new team leader, I found myself failing. No one in my team was willing to walk with me on the journey we had set for ourselves. I was convinced I was doing everything right, following all effective management mantras, showing the vision, leading by example and everything I learned from school and leadership blogs. Yet I found myself disintegrating from the team and failing.

I tried everything I knew...(even free team lunches as a last resort :)) First time in my life I was feeling that the situation was slipping out of my control. Consuming one cup of coffee a day increased to 4 cups of coffee a day. I was holding my nervousness within, and it started showing on my body – starting with hair loss, hypothyroidism, acidity, loss of hunger, vertigo, always tired, not excited about weekends or travel and not getting deep sleep. In retrospect, as a person who was in his early 30's, I can say the situation was grim. I knew I was NOT in depression. Every morning I woke up and I went to work convinced that today I will win my team and that today I will change the game and that today I will turn this page of failure. A failure - that is how I was judging myself. For 4 months, each day I tried hard to win, but it did not happen.

One day I was speaking to the HR Director, not directly about what I was going through, but she reminded me that I should see this coach who was hired by the company. "Who Ehsaan?" I asked "Yes, Ehsaan. Here's his cell number, call him." she said.

I had tried everything I knew of, let me just meet Ehsaan once and get that ticked off from my things to do. So at least then no one can blame me, including myself, that I did not try everything to overcome failure. I was convinced this would be a one-off meeting and I will be done with it quickly. To my surprise, the conversations became very revealing of myself. Meeting him once turned twice, meeting him twice turned thrice, and then I started seeing him every week.

After 2 months of coaching, I was delighted I had a breakthrough. I learnt that unlike the work culture that I was used to, where work and goals came first, in this company human connection was valued more and first. Human connection in work context has become far more spoken of in the last 5 years, especially in work context. Connecting with each team member as a person was something I was missing. Having those genuine corridor conversations, learning more about each other's families, even mingling with them after work, and showing a genuine interest in connecting with each person in the team as a person is what mattered. This was so insightful for me, which is probably an obvious thing to do for many. For me at that juncture of my life, it wasn't obvious. That's what coaching helps with. A coach is skilled to have conversations with you, asks you the right questions, to help you understand yourself deeply and to see things that are obvious to others but not to you. As a result, it enables you to reduce your suffering.

With this newfound insight of human connection first, I was on a roll at work. I made great relationships with my teammates, we had fun while working hard for long hours (and partied harder), work did not seem energy draining anymore, we did great for the company, and we all got big bonuses. This is how I would have loved the story to culminate :)

What really happened was, with the newfound insight of human connection first, I started putting great effort to socialize with my team.I was like a divorced troubled parent who projects his suffering by overcompensating his child with his favorite food, gifts, and outings. Unfortunately, often it seems, the child gets even more difficult; despite my genuine efforts, my team too became more difficult to work with. In retrospect, probably I was too late to extend a genuine effort.

The surprise gift of this Mauritian chapter of my life was that while I did not necessarily succeed to become the leader of that team, I still excelled in my career and immensely as a person. As an indirect outcome, coaching got me onto the path of self-discovery, I became more sensitive, listening to my intuition better, grounding myself into what I am and not getting drained by what the world wants to see of me do.

A coach is someone who meets you. Meets you as a unique being, with openness and freshness. For most of us, we are responding (or reacting) to the world to be "legitimate". Being legitimate at work, amongst friends and even in family. Your legitimacy is by pleasing others, conferring to people, seeking it outside. Very often, people in their life do not meet anyone who sees them as legitimate. A coaching relationship is meeting the person as is, you are legitimate already. There is no other way you are supposed to be. You are not being judged or you do not have to earn praise from the coach. This creates a possibility of finding new parts (and many times existing but new parts) within yourself. Thus, enabling you to unfold to your true being.

Fast forward to 2022, I am now in Montreal. I continue to be a corporate marketer, but now I am also an Integral Coach who has helped several others to unfold their lives. I am also a certified yoga trainer and have been a student of Vedanta for the last 2 years. This rounded conscious development in me would have not been possible had I not got onto a coaching journey in 2015. I've also engaged with other coaches since. I believe I have become a little wiser, more genuine in my interactions, a better leader, a better parent, a better spouse, and perhaps I am

also responding to life with greater wisdom. The unfoldment of my life journey continues.

Probably some of you are more curious about my Unfoldment journey or about who is a coach and how a coach could help you in your present juncture of life. Some of you may be in search of a desired outcome or even trying to get rid of a monkey off your back. Finding a coach to speak to is my suggestion. Or I'm also available for a heartfelt conversation; no judgements guaranteed.


# ही समोर बसलेली एक

**अमिता कोकाटे, मुंबई**

विणते आहे कालपासून
की केव्हापासून-पण मनापासून,
टाके उलटसुलट-आडवेउभे,
लालपिवळे-मागून पुढून,
नाजूक हळव्या-कणखर विणींचे...
ती विणतेय जाळे परंपरांचे,
...केव्हापासून-अनादी काळापासून...
एक एक धागा संस्कृतीचा- समजूतींचा
पेलतेय हळूवारपणे सुईच्या समंजस अग्रावर,
...ती विणतेय केव्हापासून-
संपत नाही तिच्याजवळचा जादुई गुंडा
की होत नाही अखेर तिच्या चिवटपणाची,
-ती विणते आहे अनादी काळापासून
तिच्या आई-आजी-खापरपणजीच्या वेळेपासून...
तिच्या बोटातून अखंडपणे वाहत राहते असहाय्यता...
प्राचीन नदीसारखी...
काळाच्या तीक्ष्ण अग्रावर,
उलगडत जाते 'तिच्या असण्याची'
खरंतर 'नसण्याची'-'चित्रकथा'
बाजूला पडलेल्या विणीत पटातून...
तिला आवरता येत नाही पसारा
तिच्या भोवतीचा-अनंत काळाचा,
...ती विणत राहते अव्याहत
जाळे परंपरांचे सोशिक ताण्याबाण्यातून,
तिच्या 'स्त्रीत्वाचे' सनातन दुःख पाझरत राहते
अतीव समंजसपणे काळाच्या असंवादी नदीतून.........



Meenakshi Ingle, Dubai



# माळरानाची वाघीण

उत्तेजनार्थ प्रथम



भाग्यश्री संजय महाजन, मालेगाव नाशिक

दिवस जसा जसा माथ्यावर येत होता; तशी रामाच्या जीवाची घालमेल होत होती. मनातल्या मनात संतापाने तो आक्कीला शिव्या देत होता. सकाळपासून तो माळावर मेंढर घेऊन आला होता. समुद्रासारखा अथांग चहूबाजूंनी माळ पसरला होता,सगळीकडे ओबडधोबड खडक आणि काटेरी झुडपे यांचे प्रमाण अधिक होते. मध्येच कुठेतरी पाणी असल्याने थोडस पेरलेले आणि कांद्याचं रिकामं शेत असे याच ठिकाणी रामाच्या मेंढरांना थोडंफार काही चरायला मिळत होत. उन्हाळ्याचे दिवस असल्याने माळ आग ओकायचा; एकही प्राणी त्या ठिकाणी सहजासहजी नजरेस पडत नसे. परंतु मेंढर त्याला अपवाद होती. माळावरच्या त्या काटेरी वनस्पती पाला-पाचोळा यावरच ती जगत होती अस म्हणा. रामा प्रत्येक वर्षी याठिकाणी आपला वाडा घेऊन येत होता. त्याची पत्नी आक्की, तीन वर्षाचा मुलगा व सोबतीला चाळीस मेंढर,दोन घोडी आणि त्यांचा लाडका कुत्रा 'लाल्या' असा त्यांचा लवाजमा होता. रामा सकाळी सकाळी मेंढर घेऊन जायचा आणि आक्की मागुन स्वयंपाक करून त्याला घेऊन जायची; असा त्यांचा दिनक्रम होता. पण आज मात्र दिवस पार डोक्यावर आला होता तरी आक्कीचा पत्ताच नव्हता. जेवणाची वेळ टळल्याने त्याच्या पोटात भुकेचा डोंब उसळला होता. त्याच्या मनात विविध शंकाच काहूर माजल होतं! उन्हाचा ताप वाढल्याने मेंढरसुद्धा हळूहळू बाभळीच्या आडोशाला येऊन बसू लागली होती. इतक्यात एक मेंढी कळपातुन उठुन जोराने पाळायला लागली; तसा रामाला तिचा खूपच राग आला त्याने हातातली काठी आडवी धरून जोराने तिला मारून फेकली आणि तिला उद्देशून बड्बडू लागला. "तुझ्या तर मायला! इथं जीव जातुया आन तुझा शिन डोक्याला; हि पण ईना वाघांन गिळली का काय? यिवु दे पेकाटातच लाथ घालतो! कितीतरी वेळ तो असाच बडबडत राहिला. मेंढरसुद्धा आता शांत बसली होती. माळ मात्र एकदम सामसूम दिसत होता. एव्हड्यात कुत्र्याने कान टवकारले व उठून तो शेपूट हलवु लागला. दूर माळाच्या दिशेने आक्की डोक्यावर टोपल व एका बगलेत पोराला घेऊन येत होती. ती जशी जवळ येत होती तसा त्याचा संताप वाढत होता. ती झाडाखाली येताच त्याने तिला एक जोरदार शिवी दिली. "ए भवाने! लाज कुठं सोडून आलीय; दुसऱ्याच्या जीवाच काय हाय का तुला! सगळं सगळं तिने निमूटपणे ऐकून घेतलं व डोक्यावरच टोपल खाली उतरवलं. पोराला मांडीवर घेऊन त्याला वाढु लागली. तिला अस गप्प पाहून त्याला आणखीच चेव आला आणि म्हटला "ए दातखिळ बसली का? एव्हडा टाईम कशापायी केला? आता मात्र तिला राहवले नाही तिचा कंठ दाटून आला होता; आवंढा गिळत ती म्हणाली. "मला का हौस हाय तुम्हाला उपासी मारायची पर बाळ सकाळपासुन लैच आजारी झालं; सारख उलट्या करतय, काय करावं तेच उमजत नव्हतं! अस सांगून त्याला पोटाशी धरून मुसुमुसु रडायला लागली. हे ऐकल्यावर त्याला खूपच शरमल्यासारखे झाले. थोडावेळ शांत राहून तोच म्हटला. "बर मग तु मेंढराकड थांब! मी इथं मळ्यात कुणाजवळ औषधपाणी मिळत का ते पाहून येतो; फरक नाही पडला तर त्याला शहरात डॉक्टरकडच घेऊन जाऊ! तू जेवून घे मी जाऊनच येतो; पोरगं लैच खराब झालं! एव्हड सांगून तो उठला व माळाच्या पलीकडे दूर दिसणाऱ्या घरांच्या दिशेने झपाझपा जाऊ लागला.

ऊन कमी झालं तस एक-एक मेंढरु उठून काटे-कुटे खायला लागलं होत. ती पण बराच वेळ बाळाला पदराखाली घेऊन बसली होती; आता ऊनसुद्धा तिच्या अर्ध्या अंगावर यायला लागलं होत. मेंढर माळावर पांगल्याने बाळाला झाडाखाली बसवून त्याच्या हातावर तिने भाकरीचा तुकडा दिला आणि ती त्यांच्या मागे गेली. सगळी मेंढर शांत चरत होती तर लाल्या या सगळ्यावर एका उंच खडकावर बसून नजर ठेवत होता. अचानक सगळी मेंढर आक्कीच्या दिशेने कान टवकारुन पाहू लागली; कुत्रा सुद्धा दगडावरून उठून तिच्या दिशेने पाहत गुरगुरू लागला. आक्कीला हा सगळा प्रकार पाहून हायस वाटलं व हसतच ती म्हणाली "ए बयांनो आग अस काय पाहता? 'चरा की गुमान! परंतु मेंढ्यानी खूपच गलका केला. त्या मोठयाने ओरडायला लागल्या. कुत्रासुद्धा मोठमोठ्याने भुंकत आक्कीच्या दिशेने धाऊ लागला. आता तिला जाणवलं खरच काही भयानक घडलंय म्हणून ती कुत्रा धावतो त्या दिशेने पाहू लागली आणि क्षणात तिच्या पायाखालची जमीनच खसकली; तिचा गळा पूर्ण कोरडा पडला; तोंडावर हात मारून घेतला आणि अंगात पूर्ण बळ आणून ती बाभळीच्या दिशेन पळू लागली. कारण दोन लांडगे तिच्या मुलाकडे वेगाने येत होते. कुत्र्याने वेगात जाऊन एकाच्या मानेला पकडले होते. दुसरा बाळाला धरणार तोच आक्कीने धडपडत येऊन त्याच्या डोक्यात दगड मारला. तसा तो मागे कोलमडून पडला. पण लगेच सावरून त्याने आक्कीवर धावून जायचा पवित्रा घेतला. हा सगळा गोंधळ पाहून मुलं खूपच रडत होत. तो लांडगा मोठमोठाली सुळे दाखवत कधी आक्कीकडे तर कधी बाळाकडे पाहत होता. पूर्ण शक्तीनिशी त्याला ती काठीने अडवत होती. दुसरीकडे कुत्रा व लांडगा यांच्या तुंबळ लोळवा लोळवी चालली होती. दोघ रक्तभम्भाळ झाले होते; माघार कुणीच घेत नव्हतं. तिसरीकडे मेंढ्या घाबरून पूर्ण माळभर सैरावैरा पळत फिरत होत्या.

आक्की त्या लांडग्याचा काही निभाव लागू देत नव्हती. म्हणून त्याने आपला मोर्चा मेंढ्याकडे वळवला; तो दिसेल त्या मेंढीमागे धावत सुटला. तो तिकडे जाताच आक्कीने बाळाला उचलून घेतले. तिचा थोडाका होईना जीव भांड्यात पडला. इकडे कुत्र्याने त्या दुसऱ्या लांडग्याला घायाळ करून पिटाळून लावले होते. मात्र दुसरीकडे तो थोराड लांडगा अजूनही मेंढ्यामागे सैतानासारखा धावत होता. आक्की सारं चित्र पाहून वैतागली होती. बाळाकडे पहावं कि मेंढ्या तिला काहींच सुचत नव्हतं. कुत्र्यातसुद्धा आत्ता काहीच त्राण नव्हते तो हि जखमी होऊन पडला होता. मूल रडतच होते; शेवटी आक्की वैतागली आणि तिने बाळाला खाली ठेऊन दिले व कुत्र्याला हलु नको असा इशारा करून ती पुन्हा काठी घेऊन त्या लांडग्याच्या दिशेने धाऊ लागली. त्याने एका मेंढीला पकडले होते. ती जिवाच्या आकांताने त्याला काठी मारू लागली. त्याच्यावर काहीच परिणाम होत नव्हता. त्याने मेंढीला घट्ट पकडून ठेवले होते. शेवटी त्याच्या अंगावर काठी मुडून पडली पण त्याने काही सोडलं नाही मेंढीला. आक्की सुद्धा हताश होऊन खडकावर बसून धायमोकलून रडू लागली. थोडावेळ रडत बसली आणि काय मनात आलं रडतच बाभळीच्या दिशेने वेगाने धावत सुटली. तिने धडपडत टोपलीतुन विळा काढला व परत लांडगा जिथे होता तिथे गेली. तोवर कुत्रासुद्धा उठून उभा राहिला होता. तिने क्षणाचाही विचार न करता त्याच्यावर सपासप विळयाने वार केले. तसा कळवळून तो लांडगा तिच्यावर फिरला पण त्याक्षणी आपल्या अंगातील संपूर्ण शक्तीनिशी कुत्र्याने येऊन त्याच्या मानेला पकडले. याच आवेशात आक्कीने त्याच्या पोटात विळ्याने घाव घातले; तो धाडकन जमिनीवर जाऊन कोसळला. काही क्षणात सगळीकडे शांतता पसरली. दिवस बुडायला आला होता. सर्व मेंढर पुन्हा चरायला लागली; कुत्रासुद्धा आपल्या वेदना लपवून पाहऱ्यासाठी उंच खडकावर जाऊन बसला होता. आक्की मात्र कितीतरी वेळ हातात रक्ताने माखलेला विळा घेऊन लांडग्याच्या धूडाकडे बघत बसली होती. इतक्यात मेंढ्या चित्कार करू लागल्या; कुत्रासुद्धा प्रेमाने शेपूट हलवत खडकावर उभा राहिला. रामा पळतच बाभळीच्या दिशेने गेला; रडणाऱ्या पोराला उचलून तो तडक आक्की बसली होती त्या दिशेने गेला; त्याला खूपच राग आला होता. चालता चालता रागातच तो म्हणाला; "ए अंबाबाई काय लावलंय तु! हे बोलत बोलत तो जवळ आला त्याने तिच्याकडे बघितलं तर एका हातात विळा रक्ताने माखलेला, साडीवर रक्ताचे डाग, एका बाजूला लांडगा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला तर दुसऱ्या बाजूला अर्धमेल्या अवस्थेत झाम आलेली ती मेंढी! सर्व प्रकार त्याच्या लक्षात आला. तो बाळाला घेऊन खाली बसला त्याने त्याच्या गमछाने तिचा रक्ताने आणि घामाने माखलेला चेहरा पुसला. ती तशी तंद्रीतून बाहेर आली आणि त्याला बिलगून मोठमोठयाने रडायला लागली. तिचे डोळे पुसत तिला समजावंत तो म्हटला. "शांत रहा औषद आणलय पोराला! आणि अस शेळीवानी का रडतीस; वाघीण हाय तू वाघीण! आख्खा लांडगा मारला तु! चल उशीर झाला आवर! दिवस क्षितीजाला टेकला होता. सर्व मेंढ्या पुढे आणि रामा आक्की बाळ व कुत्रा त्यांच्या मागे विजयाच्या उन्मादात वाड्याकडे निघाले........आक्की मात्र खूप विचारात पडली आपलं तर ठीक आहे पण आपल्या मुलाचं ही भवितव्य जर असच असलं तर? तिच्या अंगावर सररकण काटा आला आणि मनातल्या मनात म्हटली "नाही नाही तो शाळा शिकलं आणि खुप मोठा साहेब होईल! मी शिकवलं त्याला; तो नाही जगणार हे असलं जीवन!!!

# आता मी "नाही" म्हणायला शिकले



उर्मिला देवेन. जपान

दिवाळीचा सण जवळ होता, मला खूप काम होती, कामाचं लोड खूप होतं. सगळं मलाच करायचं होतं. दिवाळीचा फराळ, खरेदी, घर सजावट सगळं प्रत्येकाच्या आवडी निवडी जपून मॅनेज करणं सोपं नव्हतंच. सगळंच नीट व्हायला पाहिजे असंच वाटत होतं. कामाच्या गर्दीत माझी मी गुंग होती. मनात धाकधुक होती प्रत्येकाच्या मनासारखं झालं नाही तर त्यांना काय वाटेल. सर्वांना विचारून मग कामी लागावं म्हणून विचार केला. सहज सर्वांना त्यांच्या आवडीच काय ते विचारावं म्हणून मी चहाच्या वेळी विचारलं, तर सासरे म्हणाले,

"मला खुशखुशीत चकल्या हव्यात... ते काय ते काही बाहेरचं वापरू नकोस... सगळीकडे काय सारखा स्वाद वाटतो. चकली पावडर आणि काय ते मसाला मिळतो, नको रे बाबा. घरच हवंय आता." सासू चहा पीत हळूच म्हणाली,

"शुगर फ्री काहीतरी हवंय, मला बाई गोड चालत नाही, तुला तर माहित आहे. तुझ्या हातच्या लाडवाची चव आजही जिभेवर आहे, पण काय करू, नाही ना खाता येणार. पण तू ना काहीतरी नवीन कर माझ्यासाठी, शुगर फ्री. काय ते शुगर फ्री स्वीटनर मिळतं ना मॉलमध्ये, वापर ते आणि कर माझ्यासाठी लाडू, आवडतील मला."

आता शुगर फ्री, आणि घरी करायचं म्हटलं तर सुगरण तरी काय करणार... नवीन एक्सपिरिमेंट तोही दिवाळीच्या तोंडावर!

नवरोबाने पेपरमध्ये शिरलेली मान बाहेर काढली आणि परत ती नुसती हलवली, आणि म्हणाले, "मस्त खमंग चिवडा, पातळ पोह्यांचा... काय आपण बाहेरचा खातोच ना, मला कसा तोंडात ठेवला कि विरघळला पाहिजे... अहा... दिवाळी कशी चिवड्याशिवाय नाही, काय हो बाबा."

"नाही रे, मला चकली हवी, मस्त खुशखुशीत, तिखट, कुरकुरीत, काटेदार, मन कसं तृप्त होतं मग... अरे फटाक्यात चक्कर आणि फराळात चकली नसली तर दिवाळी काय! सुनबाई करा हा तुमच्या हातची मस्त, झणझणीत... तसं वर्षभर आपण हे खात असतोच पण दिवाळीच्या फराळाची मजा काही औरच."

मी काही बोललीच नाही, चाहूचे कप घेतले आणि स्वयंपाक खोलीकडे निघाले. दिवाळीत साऱ्यांना खुश करणं अवघड होतं. मुलांचा धिंगाणा घरात चालूच होता. त्यांच्याकडे बघून सुखावले, मनातच म्हणाले,"करूदेत, कधी नव्हे ते सुट्या माझ्या लेकांना... पण बाई हा पसारा कसा आवरू..."

मी स्वतःच आवरून, लगेच कामाला लागली, प्रत्येकाची फर्माईश पूर्ण करता करता मला दुपारचे ३ वाजले. सासूबाईंच्या मैत्रिणी गप्पा करायला घरी आल्या. त्यानी चहा आणि नाश्त्याचं करायला सांगितलं. मी ते घेऊन बाहेर आली, सगळ्या मला पाहून जरा दचकल्या, कुजबुज करत हसायला लागल्या, सासूबाई कानात येऊन म्हणाल्या

"तुझी ओढणी कुठे आहे? जरा आवरून यायचं ना बाहेर. काय हे, बघ पीठ लागून आहे तुझ्या चेहऱ्याला, कशीही बाहेर येतस!"

मला माझीच लाज वाटली, मी लगेच आत निघून गेली. संध्याकाळी मला ह्यांच्या सोबत शॉपिंगला जायचं होतं. हे ऑफिसमधून आल्या आल्या ओरडू लागले,

"किती वेळ लागणार आहे तुला? माझ्याकडे वेळ नाही. लवकर ये. काय करतेस दिवसभर?"

मी कशीबशी तयार झाली, बाहेर आली, तर कळलं की हे शॉपिंगला त्यांच्या आईला घेऊन गेले. मला बाई वाईट वाटलंच पण स्वतःला घर आवरण्यात बिझी करून घेतलं.

लक्ष्मी पूजनाचा दिवस उजळला, माझा फराळ तयार होता, सगळं घर चकचकीत होतं. मुलंही आनंदात होते. सगळे पूजेच्या तयारीला लागले होते. मीही तयार व्हायला गेले, माझी साडी काढली, तर आठवलं की मी तिला फॉलपिकोला टाकलीस नव्हती. मन नाराज झालं, जुनीच साडी नेसायला घेतली, तिचेही काठ जरा मागच्या वेळी जोडव्यामध्ये अटकून खराब झाले होते. दागिने बघितले तर मंगळसूत्राचा एक पदर तुटलेला होता, गडबडीत सोनाराकडे न्यायला विसरली होती. माझी कुठलीच वस्तू जागेवर नव्हती. कशीबशी तयार होऊन, पूजेसाठी बसायला आले तर नणंद आणि जावई आधीच पूजेत बसलेले. मी एक नजर अहोवर टाकली पण त्यांना काय फरक पडणार होता, लाडाची बहीण आणि जावई पूजेत बसले होते!

मी सारखी किचन मध्ये ये-जा करत होती, कुणी काही मागत होतं, तर कुणी काही. धड बसायलाही भेटलं नाही. ये जा करत तळपाय आणि पोटऱ्या दुखत होत्या. फार थकली होती, जरा बसली तर पतीदेव ओरडले,

"आईला मदत कर दिवे घरात लावायला, तुला कळत नाही का घरच्या लक्ष्मीचं काम आहे ते."

मी आता कुठे टेकले होते, तर लगेच मदतीला गेले. मागच्या आठ दिवसापासून काम करून करून माझी वाट लागली होती.

दोन दिवसांनी भाऊ वहिनी भेटायला आले, वहिनीला मिठी मारली, ती कानात हळूच बोलली,

"हे काय करून ठेवलंय स्वतःच? भर दिवाळीत तू का अशी दिसतेस? सगळं ठीक ना?"

दोन आपुलकीचे शब्द एकल्यावर मी ढसाढसा रडायला लागली... आणि रडतच झोपीतून उठली, बघते तर काय मी माझ्या बेडवर होते. ते एक स्वप्न होतं... पण बरच काही बोलून गेलं, मला झोप तर लागलीच नाही, पण ठरवलं की आत्ता प्रत्येक गोष्टीला 'हो' म्हणायचं नाही, हो म्हणून स्वतःची फरफड करून घ्याची नाही.

ह्या दिवाळीने मला माझ्यातल्या मीची जाणीव करून दिली,  मीच का करू सर्व काम, घर काय माझं एकटीच आहे? 'नाही' म्हणण्यात काय वाईट आहे. फार फार तर काय, हिला काही येत नाही असंच म्हणतील ना, म्हणू देत, मला कुठे सासरचे कितीही मेहनत घेतली तरी उत्तम म्हणणार आहेत.

सकाळी उठली तेव्हा मी स्वतःलाच बदलेली वाटली. स्वप्नातल्या सारखंच सर्वांचं डिमांड ठेवणं सुरु झालं, सासू म्हणाली,

"एखादा शुगर फ्री पदार्थ कर की, तुला तर नवीन पदार्थ करायची हौस आहे."

मी म्हटलं "तुम्हाला नाही खायचं तर नका खाऊ, मला साधेच गोड पदार्थ उत्तम येतात, आणि नवीन काही एक्सपिरिमेंट करून माझ्या एकुलत्या एका सासूला मला आजारी करायचं नाही. लाडू आवडतात तुम्हाला माहित आहे, एखादा प्रसाद म्हणून खायला काही हरकत नाही, पण नको बाबा नवीन काही उगाच."

त्याही हसल्या, हसतच म्हणाल्या,

"मीच काहीतरी मार्केट मधून घेऊन येईल. तू नेहमीच काय ते तुला हवं ते कर.

कशाला माझ्या एकुलत्या एका सुनेला नुसता तो त्रास."

सासऱ्यांना चकलीची भारी आवड, मला आधीच माहित होतं की ते चकली बनविण्यात नेहमीच सासूची मदत करायचे. पण सुनेच्या स्वयंपाकघरात लुडबुड कधी त्यांनी केली नव्हती.

मी म्हटलं, "तुम्ही शिकवणार असाल तर आपल्या चकल्या खुशखुशीत होतील, अगदीच तुम्हाला आवडतात तश्या."

हे एकल्यावर सासऱ्यांना खूपच बरं वाटलं त्यानीं लगेच होकार दिला आणि सामान आणण्यासाठी हौशीने निघून गेले.

मुलांना आकाश दिवा बनवायला सांगितला, उलट बजावलं, घर घाणेरडं केलं तर काहीही घेऊन देणार नाही.

माझ्यातला बदल नवऱ्याला जाणवला होता. ते घरातून बाहेर जात होते, तेव्हाच मी त्यांच्या हातात माझी नवीन साडी दिली आणि म्हटलं

"त्या कॉर्नरच्या पिको फॉलच्या दुकानात देऊन या, आणि आठवणीने परत येतांना घेवून या."

दुपारी सासू बाहेर निघाल्या होत्या, मी त्यांना म्हटलं

"माझे दागिने जरा सोनाराकडे द्या ना, तुमच्या ओळखीचा आहे ना तो नाक्यावरचा सोनार. मला त्यातलं काहीच समजत नाही. तुम्ही एवढ्या आवडीने माझ्यासाठी हे मंगळसूत्र घडवलं, बघा ना त्याचा एक पदर कसा तुटला हो."

सगळे त्यांच्या मार्गी लागले होते. मी आनंदात किचनमध्ये पाय ठेवला. स्वतःच्या आवडीचे बेसनाचे लाडू बनवले आणि खमंग चिवडा. चकली सासऱ्यांसोबत करायची म्हणून सामान बाजूला काढून ठेवलं.

कामवाल्या बाईने घरगुती फराळाचा छोटासा उद्योक सुरु केला होता, तिला थोडी माझ्याकडून मदत म्हणून करंज्या आणि अनारसे बनवायला सांगितले, जे बनवंतांनी मला फार वेळ लागतो. आता माझ्याकडे भरपूर वेळ होता. रूममध्ये गेले निवांत बसून मोबाईलवरून सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आणि सर्वांच्या ग्रहण करत वाचल्या. मित्रमैत्रिणीच्या ग्रुपवरचे मेसेज वाचले आणि पोस्टही केले. मन फ्रेश झालं.

लक्ष्मी पूजनाच्या दिवशी भारी भक्कम स्वयंपाकाचा बेतही केला नाही, वेळ लागणारे पदार्थ टाळत अगदीच सोपा स्वयंपाक केला. सासूने खटकलं मला,

"काय ग, ह्या वेळी दिवाळी काय अशीच असणार काय?"

मीही म्हटलं, "काय आई, फराळाचे पदार्थ खाऊन पोट खराब होईल आपलं म्हणून साधाच केलाय. आणि आपण काय कधीही आवडलं ते बनवतोच ना!"

पुढे काही त्या बोलल्याचं नाही.

मला तयारीला भरपूर वेळ मिळाला, छान तयार झाले आणि खाली पूजेच्या ठिकाणी आले. मला सगळे बघतच राहिले,

"चला घरची लक्ष्मी आली आता, सगळे पूजेला बसा"

असं म्हणतच सासऱ्यांनी सर्वांना पूजेला बसायला सांगितलं.

मीही माझा मान सोडला नाही, ह्यांचा हात धरून पूजेत बसली. पूजा संपली आणि सगळे त्यांच्या कामाला निघाले, मुलं आजोबांसोबत फटाके फोडायला गेले. सासूबाई पणत्या सगळीकडे ठेवायला गेल्या. आम्ही दोघंच हॉलमध्ये होतो. ह्यांनी काही म्हणायच्या आताच मी म्हटलं,

"आईला मस्त जमतं ना पणत्या सजवणं, मलाही शिकावं लागेल त्यांच्याकडून."

तेही हसले, म्हणाले, "नंतर काय शिक, आधी इकडे ये, खूप सुंदर दिसत आहेस तू."

आनंदात जेवण आटोपली आणि आम्ही दोघेही आमच्या खोलीत निघून आलो.

दुसऱ्या दिवशी, सगळे फराळ खात असतांनाच मी माझी छोटीशी बॅग घेऊन खाली आले आणि ह्यांना म्हटलं,

"तुम्ही माहेरी सोडून देता की मी टॅक्सी बोलवू? मी जरा आईकडे जावून येते, रात्रीपर्यंत येईल."

सासू आणि नणंद बाई माझ्याकडे बघत होत्या, त्या काही बोलण्याआधी मीच म्हटलं,

"तुम्ही तुमच्या लेकीसोबत दिवस घालवा, माझी लुडबुड कशाला, मी जावून येते. तसंही खूप वेळ तिकडे मला करमायचं नाही."

त्यांनीही हसतच हो जावून ये म्हटलं. तेवढ्यात सासरे ह्यांना म्हणाले,

"घरी गाडी असतांना सुनबाई टॅक्सिने माहेरी जाणार का? तू पण जा सोबत, अंधार होण्याआधी घरी परत या."

मला अजून काय हवं होतं, मी कितीही म्हटलं असतं तरी हे तयार झाले नसतेच माझ्यासोबत यायला पण आत्ता वडिलांचा शब्द नाही मोडू शकले.

एवढ्या वर्षानंतर मला चक्क लक्ष्मी पूजनाच्या दुसऱ्याच दिवशी माहेरी जोडीने बघून आईला आनंदही झाला आणि आश्चर्यही. पाय धुवायला पाणी देतांना वहिनी मला म्हणाली,

"हा एवढा मोठा चमत्कार झाला तरी कसा? "

मी मनातल्या मनात हसत म्हटलं "तो चमत्कार माझ्यात झालाय."

तिने हसून धक्का दिला, मी हसले, म्हणाले,

"वहिनी तुही ये जावून, आहे मी दिवसभर इकडे."

आईला मोठं कौतुक वाटलं, मुलीने एवढ्या वर्षाने का होईना घरची परंपरा म्हणून दिवाळीच्या दुसऱ्याच दिवशी जावयाला माहेरी आणलं होतं. मुलगी सासरी नाही तर सासरच्या लोकांच्या मनात नांदत आहे ह्या विचाराने तिला जावयाचा किती मान करू नि किती नाही असचं झालं.

वहिनीने परत टोला मारला, मी परत मनात हसले, कारण मी आता नाही म्हणायला शिकले.

मी आता मुळीच टेन्शन घेत नाही. मुख्य म्हणजे मी "नाही" बोलायला शिकली आहे, हो म्हणून फसण्यापेक्षा नाही म्हणून मोकळं व्हायचं. नको त्या गोष्टीच टेन्शन घेऊन स्वतःलाच त्रास करून घेण्यात काय अर्थ.

ही दिवाळी माझ्यासाठी लखलखीत आणि मला प्रकाशमय करणारी होती.

स्वतःच अस्तित्व कसं जपायचं, हे आपल्याच हातात असतं. मग तुम्हीही नाही म्हणायला सुरवात कराच, वेडे बनून पेढे खाण्यात मजा असते राव!

# Photography





Kedar Deshpande, California





Sheetal Rangnekar, California





Anil Joshi, California

Devki Kokatay
9004963530
Amita Kokatay
7738384538

Arttrickles

We make customised homedecore, stationery & accessories from resin..!!

Everything you Imagine
can be real with
Creativity

arttrickles@gmail.com

@arttrickles

# मंगळसूत्र





**Ashwini Gaiki,**
**California**

हे दशावतारी मंगळसूत्र १०० वर्षांपूर्वीचे आहे. मंगळसूत्र व कोल्हापुरी साज ह्यांना एकत्र करून हा पारंपारिक दागिना घडविलेला आहे. ह्याच्या काही पदकांमध्ये मत्स्य, कूर्म, नरसिंह इत्यादी अशा काही अवतारांचा समावेश केलेला आहे. ह्याशिवाय काही रत्नांचाही उपयोग केलेला दिसतो.



**Sweta Patki,**
**California**



**Arti Pagare,**
Ohio

# मंगळसूत्र





Siya Kharkar,
California



Sonali Bhave,
California





Monica Joshi,
California

# मंगळसूत्र







**Manisha Phanasgaoankar, California**











# मंगळसूत्र





**Deepali Deshpande, California**

माझ्या कडे असलेल्या विविध पारंपारीक सोन्याच्या मंगळसूत्रां पेक्षा मला माझ्या कलेक्शन मधले हे मंगळसूत्रं सर्वात जास्तं आवडते!

गळ्या भोवती बसणारे , फार मोठ्या आकाराचे किंवा वजनदार नसले तरीही एक 'बोल्ड' स्टेटमेन्ट करण्याची करामत हे छोटेसे मंगळसूत्रं नक्कीच करते!

डमरुच्या आकाराचे मीनाकारी केलेल्या पदकाचे मंगळसूत्रं आणि नेकलेसेस ही कलकत्याच्या स्थानिक कारागिरांची खासियत आहे त्यामुळे हे मंगळसूत्रं मी २००६ मधे कलकत्त्याहून मागवले होते!

एकदम रिझनेबल किंमत असून उत्तम क्वालिटी, इतक्या वर्षानंतर अजुनही त्याचा 'चार्म' टिकवून आहे आणि म्हणूनच माझं सर्वात आवडतं डिझाइन आहे!

**Indo western Design Mangalsutra**





**Raju Joshi, California**

# मंगळसूत्र



Mahalaxmi locket

**Swati Kulkarni, California**



**Supiya Kulkarni, California**







**Sheetal Rangnekar, California**



# टी ब्रेक



सुप्रिया वारे, मुंबई

'चहाला वेळ नसते पण वेळेला चहा लागतोच'मलाही.

'सवाष्णीने कुंकवाला आणि सज्जन माणसाने चहाला कधी नाही म्हणू नये' आणि मी सज्जन आहे.पुण्यात चहाला 'चहा' नाही म्हणत, अमृततुल्य म्हणतात.

सकाळचा चहा, दोघांनी वेळात वेळ काढून सोबत घ्यायचा. ते दोन क्षण निवांत. नाश्त्याबरोबरचा चहा, पोहे, उपमा यांना कंपनी द्यायला घ्यायचा. ऑफिसमध्ये मीटिंग, मग चहा, अं नाही नाही, ग्रीन टी, हेल्थ कॉन्शस लोकांचा. नाहीतर कटींग चहा, चायपे चर्चा. घरचा चहा म्हणजे 'अगं, जरा चहा टाक गं' कॅटेगरीतला. सर्दी झाली की चहात आलं, चहापत्ती घालून बनवलेला कडक चहा. चिंब भिजल्यावर कुल्हड चहा. मोठ्या हॉटेलमध्ये किंवा विमानात मसाला चहा. या झक्कास चहाची तरतरी आणणारी अनेक रुपे.

'नदीचे मूळ आणि ऋषीचे कुळ शोधू नये' म्हणतात. चहाबाज शर्मिलाला गेल्या महिन्यात 'चहाचे मूळ' शोधण्याची संधी मिळाली. शर्मिला कोण? ईश्श्य अहो मीऽच. तर आपले राजेश आणि शर्मिला ('आराधना' आठवतीय नं? मेरे सपनोंकी रानी कब आयेगी तू?) दार्जिलिंगला निघाले. राजेशने तीन 'टी इस्टेट' शॉर्टलिस्ट केल्या. आपण आता चहाचे मळे म्हणू या. एक खूप बजेटच्या बाहेर होता. एक दार्जिलिंग शहराच्या अति जवळ होता. शेवटी 'गिंग टी रिसॉर्ट'ची वर्णी लागली. झालं, शर्मिला स्वप्नात रंगली.चहाच्या मळ्यामधे कोण गं उभी? चहापत्ती खुडते मी रावजी, रावजी, ओठाला कप लाउनी, चव घ्या कुणीतरी.

जून महिन्यातल्या प्रसन्न सकाळी राजेश आणि शर्मिला बागडोगरा विमानातळावर उतरले. 'गिंग'ची गाडी तयार होती. पोचायला चार तरी वाजणार. पोटापाण्याची सोय ड्रायवरला विचारली. तोंडातल्या तोंडात तो 'गुड्री' असं परत परत बोल्ला. सगळे येणारे लोक तिथेच थांबतात, म्हटल्यावर निर्धास्त. काहीतरी 'बरं' खायला नक्की मिळेल. जेव्हापासून चढायला लागलो, तेव्हापासून धुकं होतं. दहा फुटांपलीकडचं दिसत नव्हतं. जेवायला गाडी थांबली. गुडरीक टी लाऊंज (Goodricke). नाव – मार्ग्रेट'स डेक. चहाची लागवड कुर्सोंगला (Kurseong) १८६४ मधे झाली. मालकाची मुलगी, मार्ग्रेट, इथल्या हिरव्यागार निसर्गाच्या प्रेमात पडली. तिला इंग्लंडला परत जायचं नव्हतं. असाध्य आजारात तिचा दुर्दैवी मृत्यु झाला. तिच्या आठवणी जपण्यासाठी चहाच्या मळ्याला 'मार्ग्रेट'स् होप' नाव दिलं. तिथे मशरुम सूप, व्हेज ग्रिल सँडविच आणि त्यांच्या मळ्यातला मस्कटेल (muscatel) चहा घेतला. चहाला पण अशी नावं असतात? कडक, मीठी, खुशबूदार. नाहीतर वाह! ताज. एवढंच माहीत. चहासोबत पीनट बटर कुकीज आणि ग्रीन टी कुकीज. ही चव वेगळी होती. कदाचित या हवेचा परिणाम असेल. नाहीतर आपण मुंबईकर खरं म्हणजे टपरी चहावाले!

नंतर राजेश आणि शर्मिला पोचले, 'गिंग' चहामळ्यात, व्हाया दार्जिलिंग. सतत धुक्याची चादर असल्याने फारसे दिसत नव्हते. दाटीवाटीने बांधलेली घरे, हॉटेल्स, 'होमस्टे'चं जागोजाग आलेलं पीक, घरं म्हणजे रस्त्याच्या लेवलला पहिला मजला आणि खाली पाच मजले, नेपाळी-चिनी चेहऱ्याची माणसं, रंगीबेरंगी स्वेटर, कोट, जॅकेटची गर्दी, 'घूम' स्टेशनच्या थोडी अलीकडे रस्त्याला येऊन मिळणारी टॉय ट्रेन, स्थानिक लोक





अजिबात लक्ष देत नाहीत तिच्याकडे, पण पर्यटकांना मात्र प्रचंड आकर्षण. थांबून बघणार, फोटो, व्हिडिओ काढणार. मग होतो ट्रॅफिकचा खोळंबा. अरुंद रस्त्यावर दोन गाड्या आणि ट्रेन एका वेळी जाऊ शकत नाही. ट्रेन पण अशी की सतत मांजरीसारखी आडवी येते.

पोचल्यावर 'हाय टी'. त्यांचाच ग्रीन टी आणि आलू पकोडे. चहामळ्याचं एकूण क्षेत्रफळ ६०० हेक्टर. १८६४ साली बांधलेला बंगला. राजेश-शर्मिलाची रुम निळ्या थीमची. भिंती, डेकोर, चादरी, उशा, अभ्रे, पडदे सगळी निळाई. खिडकीतून डायरेक्ट स्वर्गीय दृष्य. खिडकीची चौकट, समोर दूरदूरपर्यंत फक्त हिरवाई, धुकं, हिमालय, निळे आकाश. खोलीत दर्जेदार टीकवूड फर्निचर आणि मोकळी-ढाकळी प्रशस्त बाथरुम. बाथरुममध्ये वेतापासून बनविलेली खुर्ची, टीपॉय, धुवायचे कपडे ठेवायला बास्केट, २ वॉश बेसिन असा राजेशाही जामानिमा होता. प्रत्येक खोलीत दगडी फायरप्लेस. पण हिवाळ्यात, बर्फवृष्टी होताना, फायरप्लेसच्या उबेत चहाचा कप (की वाईनचा ग्लास?) हातात घेऊन फुर्र फुर्र सुर्र सुर्र करत घोट घ्यावा, खिडकीतून बाहेर बघत बसावं, एखादं पुस्तक वाचावं, गप्पा माराव्या किंवा मनाला येईल ते काहीही करावं.

साथीला बिलियर्ड टेबल, लायब्ररी (चहावरची पुस्तकं लय भारी), लॉबी, जेवणाचा विभाग, बाहेर पोर्च, बगीचा, गजीबो (ज्यात बसून रोज सकाळच्या वाफाळत्या कॉफीचा आस्वाद घेतला, चहाचे मळे बघता बघता कॉफी? चेंज नको का? एऽक मऽग कॉफीचा, शंभर कऽप चहाऽचे...चे ए ए) आणि एक ओपन व्ह्युइंग डेक होते. गजीबोमध्ये नुसतं बसावं, समोरचा कॅनव्हास न्याहाळत. दर क्षणाला समोरचे दृश्य बदलत जाते. कधी हलकी उन्हाची तिरीप. कधी पूर्ण धुकं...काहीच दिसत नाही. इथे धुक्याची चादर अलगद एका डोंगरावरुन पलीकडे जाते. ढगांचा तर नाच सुरू होता. चहा पिताना ऊन पडलं, संपता संपता गिंग हाऊस धुक्यात हरवलं. ते ६ दिवस चहामय झाले इतके की शेफने एक दिवस चहाबरोबर चहाच्या कोवळ्या पानांचे पकोडे केले होते. गुलबक्षी, ओव्याची पानं, कोकमाची कोवळी लालसर पानं यांची भजी शर्मिलानं खाल्ली होती. दुग्ध-शर्करा योग तसा चहा-चहाची भजी योग!

दार्जिलिंगच्या बहुतेक सर्व चहामळ्यात छोटी छोटी खेडी वसली आहेत. ते तिथले जुने रहिवासी. बहुतांशी तेथील लोक मळ्यावर आणि चहा फॅक्टरीत काम करतात. मॅनेजर लोकांच्या बंगल्यावर काम करतात. माळी, स्वैपाकी, ड्रायवर म्हणून. शर्मिला



आणि राजेश या छोट्या, टुमदार खेड्यांमधून फिरले, 'गिंग'च्या एका माणसाच्या सोबतीने. भुरभुर पाऊस आला तर एका शिव-मंदिरात थांबले. बंगलीवजा घरे, कट्ट्यावर रंगीबेरंगी फुलझाडांच्या कुंड्या, समोर अंगण, दोन घरांच्या मधून चढत जाणाऱ्या पायऱ्या, मागच्या परसात भाजी किंवा मका लावलेला, काही ठिकाणी राखणदार कुत्रे उगाचच भुंकणारे, ओलसर सर्द हवा असल्याने मुटकुळे करून बसलेल्या मांजरी. मस्त फेरफटका झाला. कडकडून भूक लागली. राजेश म्हणाला सुद्धा – आजचं जेवण आपण कमावलंय.

'मिरीक लेक' अतिशय निसर्गरम्य ठिकाण. हा रस्ता भारत-नेपाळ सीमेला लागून जातो. खरं म्हणजे रस्ता हीच सीमा आहे. एका बाजूला पश्चिम बंगाल आणि रस्त्याची दुसरी बाजू नेपाळ. कधी विरळ, तर कधी दाट धुके, ड्रायवरला विचारलं, तुला रस्ता कसा दिसतोय? शर्मिलाला तर मागे बसून पुढचं दोन फुटांवरचं दिसत नाहीये. तर तो म्हणाला, रस्त्याच्या बाजूला पांढरी पट्टी आहे, तिच्या भरोसे. ये तो कुछ भी नही, काला फॉग होता है, वो बहुत डेंजर. एकदम अंधेरा जैसा. उसमे कुछ नही दिखता. काला फॉग? माय गॉड! मिरीक सरोवर नैसर्गिक आहे. लेकच्या एका बाजूला मिरीक गाव, बगीचे आणि दुसऱ्या बाजूला 'धुपी' झाडांचे (सूचिपर्णी झाडांची एक जात) जंगल. जंगलात छोट्या ट्रेकिंगच्या वाटा आहेत. सरोवराचे दोन्ही किनारे जोडणारा एक छोटा पूल आहे. शर्मिला ड्रीम सीक्वेन्समधे. ये हसीं वादियां ये खुला आसमान...

मिरीक सरोवराच्या काठावर 'गुडरीक टी लाऊंज' आहे. तत्काळ गुगल केलं, त्यानं दाखवलं, दीड-दोन किमी अंतर. गाडीनं एक वळण घेतल्यावर लगेच आलं. गुगल पण असं कधीकधी चकवा देतं.

चहा फॅक्टरीला जाताना चहाची खुडणी करणाऱ्या बायका दिसल्या. साधारण १५ बायकांचा एक गट. फक्त बायकाच हे नाजुक काम करतात. चहाचं झाड बोन्सायसारखं दिसतं. अगदी १०० वर्ष जुनं असलं तरी. वरती आलेली कोवळी फक्त तीन पाने खुडतात. बाजूची दोन पाने आणि मधली कळी. खुडुन मागच्या टोपलीत टाकतात. अर्ध्या दिवसाच्या शिफ्टमध्ये ६ ते ७ किलो पानं टोपलीत जमा होतात. त्याचे वजन करून ते प्रत्येकीच्या नावासमोर लिहिले जाते. छोट्या ट्रॉलरने ही जमा केलेली पाने फॅक्टरीत आणली जातात. जसं नाशिकची सुला वाइन, नेपा व्हॅलीमधील वाईन, ऑस्ट्रेलियन वाईन चवीला वेगळी लागते, तसा भौगोलिक परिस्थितीनुसार (हवामान, माती, आजूबाजूची झाडेझुडुपे) चहाच्या कपात उतरणारा स्वाद बदलतो. मशीनने कटाई केल्यास पाने तुटतात व अशी पाने थोडक्या वेळात तीव्र, उग्र गंध बाहेर सोडतात. त्याने चहाचा दर्जा खालावतो. याउलट हाताने खुडलेली आख्खी पाने तो गंध आपल्या आत जपतात आणि पाण्यात मुरल्यावर तो पाण्यात उतरतो. प्रिमियम चहाची ही निशाणी.

आलेली पाने मोठ्या हॉलसारख्या खोलीत जाळीदार ट्रेमध्ये पसरून ठेवली जातात. या खोलीत तापमान आणि आर्द्रता नियंत्रित केली जाते. या प्रक्रियेला विदरिंग (withering) म्हणतात. यात पानांमधले ५०% पर्यन्त पाणी निघून जाते.

नंतर सुरू होते पानं चुरगळण्याची (bruising) प्रक्रिया. यात ठरते, ग्रीन टी, व्हाइट टी, ब्लॅक टी की ऊलाँग टी (oolong) बनवायचा ते. त्यानुसार पाने गुंडाळली जातात (rolling), पिरगाळली जातात (twisting) किंवा चिरडली जातात (crushing). इथे पानातल्या पेशी तुटतात आणि oxidation सुरू होते. कापलेल्या सफरचंदाप्रमाणे. जितकं जास्त oxidation, तितका गडद चहाचा रंग. कमी oxidation वाला ग्रीन टी नावाप्रमाणे त्याचा आब राखतो आणि चहाला हलका हिरवा रंग येतो. तर ब्लॅक टी असतो १००% oxidation झालेला. इतर काही प्रकारच्या चहासाठी पाने स्टीम, रोस्ट किंवा फ्राय पण करतात. विविध स्वादाच्या चहासाठी तुळस, गुलाब पाकळ्या, संत्रा साल, वेलची, सुंठ, पुदिना, जस्मिन मिसळले जातात.

शेवटी उरलीसुरली आर्द्रता काढून पाने पॅकिंगसाठी तयार होतात. तीन-चार चाळण्यांमधून त्यांचे वर्गीकरण होते. 'गिंग' मधला चहा फक्त एक्सपोर्ट होतो, भारतात विकला जात नाही. शर्मिलाला त्यांचे गेस्ट म्हणून मिळाला. किम्मत ६००० रु. किलो. पाव किलो सोसायटी चहा १४० रु ला घेणारी शर्मिला हबकलीच.

राजेश आणि शर्मिलानं गिंग मधला फर्स्ट फ्लश आणि सेकंड फ्लश टेस्ट केला. एका कपाला २.५ ग्रॅम चहा पानं. पाणी उकळवून त्यातले बुडबुडे यायचे बंद झाले की चहापानांवर ते ओतायचे. ५ मिनिटं झाकण ठेवून मुरुन द्यायचा. कपात गाळायचा. प्रत्येक चहा किती ग्रॅम घ्यायचा आणि किती वेळ मुरवायचा, याचं गणित वेगळं. मापून घ्यायला छोटासा वजनकाटा आणि वेळ मोजायला तीन रंगीत वाळूच्या घड्याळांचा सेट. ३, ४, ५ मिनिटे. शर्मिलाला भातुकलीची आठवण झाली.

फर्स्ट फ्लश म्हणजे मोसमातील पहिला चहा, चहांमधील शॅम्पेन. वसंत ऋतुमध्ये झाडांना कोवळी पालवी फुटते ती पाने. खुडणीचा काळ मार्च महिन्याच्या आसपास. हा सर्वात महाग चहा. ह्याला हलका, ताजा, मधुर स्वाद असतो.

सेकंड फ्लश म्हणजे उन्हाळ्यात खुडलेला. जून महिन्याच्या दरम्यान. नंतर पावसाळ्यात खुडणी करत नाहीत. त्यावेळेस बागेची मशागत, नवीन झाडे लावणे, तण काढणे, साफसफाई करणे इत्यादी कामे करतात. विंटर फ्लश म्हणजे हिवाळ्यात केलेली खुडणी.

'गिंग'मधला सगळा चहा सैंद्रिय (Organic) आहे. झाडांवर कोणत्याही प्रकारची कीटकनाशके फवारली जात नाहीत. इतके चहा प्यायल्यावर त्यांना विचारलं – मग आम्ही नेहमी सोसायटी, ब्रुक बॉन्ड, ताजमहाल चहा पितो तो कोणता? सगळ्यांचं एकजात मौनव्रत! खोदून खोदून विचारल्यावर सीटीसी, डस्ट अशी उत्तरं दिली. डस्ट म्हणजे चहाची धूळ? म्हणजे सॉर्टिंग करून झाल्यावर उरलेला कचरा? अरे बापरे!

कॅलिमपाँगला जाताना वाटेत ताजी गाजरे, मुळे आणि बीट घेतले, शेफला दिले. म्हटलं, बनाओ कुछ रंगबिरंगी सॅलड. तो दिवस स्वच्छ सूर्यप्रकाशाचा होता. कांचनजंगा हिमाच्छादित शिखरांची पूर्ण रांग याची देही याची डोळा पाहिली. तिथला एक स्थानिक माणूस म्हणाला, दोन महिन्यांनंतर आज दर्शन झाले. टुरिस्ट लोकांना खुश करायला मारला नक्की डायलॉग!

तिकडे एबीपी माझा पाहिला. महाराष्ट्रात त्यावेळेस सत्तांतर नाट्य रंगले होते. राजेश आणि शर्मिला मात्र....काय झाडी...काय डोंगार...काय हॉटेलचा चहा...दार्जिलिंग ओक्के हाय!



# अस्मिता



श्रीपाद टेंबे: पुणे

बैठकीच्या खोलीत माधवराव आणि आशाबाई चिंतेत बसले होते. त्या दोघांच्या चेहऱ्यावरचा रंगच जणू उडून गेला होता. काय बोलावे कसे बोलावे ते त्यांना समजत नव्हते. त्याला कारण देखील तसंच होत. नुकताच एमपीएससीचा निकाल लागलेला होता. त्यांचा एकुलता एक मुलगा प्रकाश पोलीस उपनिरीक्षकपदाची परीक्षा पास झाला झाल्यामुळे घरातील आनंदाचे वातावरण काहीं दिवस टिकून राहिलं. परंतु ते आनंदाचे वातावरण लवकरच ओसरले. याला कारण पण तसचं होत. प्रकाशने आपल्या ठरलेल्या लग्नाला विरोध करत स्पष्टपणे नकार दिला होता. माधवरावांनी त्यांच्या जिवलग मित्राच्या म्हणजे विजयराव देशपांडे यांच्या मुलीशी म्हणजे अस्मिताशी विवाह निश्चित केलेला होता. पदवीधर झाल्यानंतर प्रकाश एमपीएससीच्या परीक्षेची तयारी करत होता. तर देशपांडे यांची मुलगी अस्मिता ही एका खाजगी शाळेत शिक्षिका म्हणून नौकरी करत होती. अस्मिता नौकरीला तर प्रकाश घरीच होता. मात्र ही उणी बाजू मैत्रीच्या आड आली नाही. अस्मिताने देखील आपल्या आई बाबांची इच्छा म्हणून आनंदाने लग्नाला होकार दिला होता. आणि इकडे प्रकाश पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण होताच एकदम बदलून गेला होता. त्याचा स्वार्थ, प्रतिष्ठा अचानक उफाळून आली. मागची परिस्थती विसरून तो आता बरोबरीची भाषा बोलायला लागला होता.प्र काशच्या बोलण्यात गुर्मी व एक प्रकारचा उद्धामपणा आलेला होता.

तो अतिशय तावातावाने म्हणाला, 'बाबा तुम्ही तुमचे मित्र विजय देशपांडे यांना माझा लग्नाला असलेला नकार कळविला की नाही? त्यांना लवकरात लवकर कळवून टाका. आता हे लग्न शक्य नाही म्हणावं नाहीतर बसतील ते आशा लावून'.

प्रकाशच्या अशा या बोलण्यावर माधवरावांना खरतर खूपच राग आलेला होता. तरी त्यांनी रागावर नियंत्रण ठेवले आणि त्याला म्हणाले, 'अरे बेटा प्रकाश आता असं कसं ठरलेले लग्न मोडता येईल. आमचे संबंध फक्त मैत्रीचेच नाही तर रक्ताच्या नात्यांपेक्षाही अधिक जवळचे आहेत. असा उताविळपणा करणे योग्य नाही. पुन्हा एकदा शांतपणे विचार कर'.

'बाबा आता कसला आला आहे विचार? मी पोलीस उप निरीक्षक होणार आहे. तुम्हाला माहित आहे ना पोलीस उप निरीक्षक म्हणजे काय चीज असते? त्याचा काय रुबाब असतो? काय त्याची ऐट असते? ती देशपांडेंची मुलगी अस्मिता आपली साधी शिक्षिका. कसं काय जमणार आम्हा दोघांचे ? माझं सर्कल मोठ मोठ्या पोलीस अधिकाऱ्यांचे राहील. तुमच्या मैत्रीपायी माझ्या आयुष्याचा कशाला बळी घेताय बाबा?' प्रकाश त्याच्याच मस्तीत होता.

'प्रकाश ही मस्ती बरी नव्हे. मागचे दिवस तू सोयीस्करपणे विसरलास आहे बघ. अरे तुमचे लग्न ठरले तेंव्हा अस्मिता नोकरीला होती आणि तू बेरोजगार. तिने तुला नकार दिला असता तर कसं वाटलं असतं तुला? मात्र अस्मिताने तू बेरोजगार आहे हे माहित असूनही तुला स्वीकारले होते. तिने तिच्या आई वडिलांचा आणि आमचा शब्दाचा मान ठेवला, तेंव्हा तुला नाही आठवली बरोबरी? नीट विचार कर. माधवराव अतिशय काकुळतीला येऊन बोलत होते. त्यांच्या पत्नी आशाबाई झाल्या गोष्टींमुळे एकदम हताश आणि निराश झाल्या होत्या. काय करावे हे त्यांना उमजत नव्हते.

'बाबा माझा आता विचार पक्का झाला आहे. तो म्हणजे नकार. या माझ्या निर्णयात आता बदल होणे शक्य नाही. आणि हो महत्वाचे  म्हणजे तो नकार तुम्हीच त्यांना कळवायचा आहे' प्रकाश म्हणाला.

'मला असा निरोप देता येईल असे वाटत नाही. माझ्याकडून हे होणे नाही. नकार द्यायचा असेल तर तो तुलाच द्यावा लागेल आणि तो देखील त्यांच्या घरी जाऊन विजयराव, त्यांची पत्नी आणि अस्मिता यांच्या समोर. आम्ही फक्त तुझ्या सोबत येणार. तू आमचा मुलगा असला तरी अस्मिता देखील आम्हाला मुलीसारखीच आहे'. माधवराव अक्षरशः पोटतिडकेने  बोलत होते.

'अगदी हेच कारण असेल तर मी चलेन तुमच्या सोबत त्यांच्या घरी माझा नकार सांगायला. घाबरतो तो की काय कुणाला? चला आपण उद्याच जाऊ देशपांडेंच्या घरी'. असं म्हणत प्रकाश घराबाहेर पडला.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी प्रकाश आपल्या आई वडिलांसोबत देशपांडेंच्या घरी आले. चहा-पाणी, जेवण इत्यादी सगळे आटोपल्यावर गप्पागोष्टी करण्यासाठी सर्वजण बैठकीत येऊन बसले. विजयराव त्यांच्या पत्नी आणि त्यांची लाडकी लेक अस्मिता विशेषकरून फारच आनंदात दिसत होते. 'काका मला तुमचे आशीर्वाद हवे आहे, अस्मिता म्हणाली.

अस्मिताच्या म्हणण्याला पाठींबा देत विजयराव म्हणाले, 'प्रकाशराव तुम्हाला सर्वांना एक अतिशय आनंदाची बातमी सांगायची आहे'. 'विजयराव तुमची आनंदाची बातमी थोड्या वे राहू दे बाजूला. अगोदर आमच्या प्रकाशला जरा जास्तच महत्वाचे सांगायचे आहे. ते अगोदर ऐका आणि मगच सांगा तुमची आनंदाची बातमी'. माधवराव म्हणाले.

आपल्या वडिलांचे असं रोखठोक, सडेतोड शब्द ऐकून प्रकाश काहीसा कावरा बावरा झाला. तरीही तो सगळं बळ एकवटून म्हणाल,' काका,काकु आणि अस्मिता आता मी काय सांगणार आहे ते नीट आणि शांतपणे ऐकून घ्या. मला तुम्हाला माझ्या आणि अस्मिताच्या लग्नाच्या बाबतीत मी घेतलेला निर्णय सांगायचा आहे. जसं तुम्हा सर्वांना माहितच आहे की मी पोलीस उप निरीक्षक पदाची परीक्षा पास झालो आहे. ज्याप्रमाणे सरकारकडून आदेश प्राप्त होतील त्याप्रमाणे मला कामावर रुजू व्हावे लागेल. मिळालेल्या बातमीनुसार तसा आदेश एक दोन दिवसात मिळेल असा अंदाज आहे. असो महत्वाचे सांगायचे म्हणजे अस्मिता एक साधी शिक्षिका आहे आणि मी पोलीस उप निरीक्षक. आमची बरोबरी कशी होईल? माझ्या मतानुसार मला माझ्या पदाच्या प्रतिष्ठेला शोभेल अशा एका मुलीशी लग्न करायला पाहिजे. त्यामुळे मला अस्मिताशी ठरलेले हे लग्न मोडायचे आहे'. प्रकाश एका दमात सारे काही बोलून गेला.

प्रकाशचे असल्या प्रकारचे बोलणे अस्मिता आणि तिच्या आई वडिलांसाठी अनपेक्षित आणि धक्कादायक होते. सगळ्यांचा मुड एकदम बदलून गेला. सारेच सुन्न होऊन बसले होते. विजयराव कसबस स्वत:ला सावरत म्हणाले,'काय ऐकतो आहे आम्ही प्रकाश? हे कसं शक्य आहे, माधवराव हे काय बोलतो आहे प्रकाश? काय ठरवून आलात तुम्ही हे भलतच. अरे चांगली नोकरी म्हणून काय कोणी असं ठरलेले लग्न मोडतो का? पद प्रतिष्ठा पाहून आम्ही हे नाते जोडले नव्हते. मला एका प्रश्नाचे उत्तर दे बर प्रकाश, जर लग्नानंतर तुझी ही निवड झाली असती तर काय केलं असत तू?

विजयरावांच्या या सर्व प्रश्नांच्या भडीमारामुळे माधवरावांना तर रडू आवरतच नव्हते. प्रकाश मात्र आपल्या म्हणण्यावर, निर्णयावर ठाम होता. तो म्हणाला, 'मी हवं तर तुम्हा सर्वांची क्षमा मागतो. मला माफ करा. मात्र माझ्या भविष्यासाठी या बंधनातून मुक्त करा, आणि हे लग्न मोडायला मला परवानगी द्या'.हा  सर्व प्रकार सुरु असतांना अस्मिता आतल्या खोलीतून बाहेर आली, आणि हसत हसत म्हणाली, 'लग्न मोडायला आला आहे ना तुम्ही? ठीक आहे मोडते मी हे लग्न. मंजूर आहे मला प्रकाशने घेतलेला निर्णय. आणि हो महत्वाचे म्हणजे यासाठी प्रकाश तुला माफी वगेरे मागायची काहीच गरज नाही.'

तिने पुढाकार घेऊन टेबलवर ठेवलेला पेढ्यांचा पुडा आपल्या हातात घेतला. त्या पुड्यातील पेढे काढत माधवराव, आशाबाई आणि प्रकाशला पण दिले. अस्मिताच्या अशा वागण्यामुळे तिघांना सणसणीत चपराक बसल्याचा भास झाला. अस्मिताने आपले लग्न मोडल्याबद्दल पेढे वाटले हे पाहून माधवराव खचले. शब्द निघत नव्हते तरी पण ते म्हणाले, 'मुली आज तू आम्हाला लाजवलस बघ. यापेक्षा दुसरी शिक्षा आम्हाला असूच शकत नाही. अगदी योग्यच केलं तू हे. नालायक मुलाशी लग्न मोडणे म्हणजे एक अतिशय चांगली गोष्ट केलीस तू. तुझ्या धैर्याची मी दाद देतो. याचा आनंद साजरा करायलाच हवा'.

'काका, अहो मला असे लाजवू नका. कारण जे काही होत असतं ते चांगल्यासाठीच होत असतं यावर माझा विश्वास आहे. 'असं अस्मिता माधवराव आणि

आशाबाईच्या पाया पडत म्हणाली.बैठकीतील वातावरण थोडे सैल व्हावे म्हणून विजयराव मध्येच म्हणाले, 'बरं का माधवराव लग्न मोडले हे एका दृष्टीने बरेचं झाले.मात्र इथे तुम्हाला मी हे सांगू इच्छितो की पेढे लग्न मोडल्याबद्दल अजिबात नव्हते. पेढे वाटण्याचे खरे कारण वेगळेच आहे. आम्ही मघापासून तेच सांगायचा प्रयत्न करत होते, पण तुम्ही सांगूच दिले नाही. तशी संधी दिलीच नाही. आता अस्मिताच सांगेल सार काही तुम्हाला'.

'काका, काकू ज्या वेळेस प्रकाश पोलीस उप निरीक्षकाच्या परीक्षेची तयारी करत होता, त्याचवेळेस मी देखील माझी शिक्षेकेची नोकरी सांभाळून युपीएससीची परीक्षा दिली होती. मला क्षमा करा. ही गोष्ट मी तुमच्यापासून लपवून ठेवली, कारण मला तुम्हाला सरप्राईज द्यायचे होते. स्वत:ला सिद्ध करू शकले तरच तुम्हाला सांगेन असं ठरवलं होते मी. या परीक्षेसाठी मी खूप मेहनत केली. या परीक्षेचा निकाल परवाच जाहीर झाला आहे. आता तोंडी परीक्षा आहे. त्या परीक्षेची माझी पूर्ण तयारी झाली आहे. मला पूर्ण खात्री आहे कलेक्टर या पदासाठी माझी निवड ही होणारच.

अस्मिताचे हे शब्द ऐकल्यावर माधवराव तर आनंदाने वेडेच झाले, त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. त्यांनी कौतुकाने तिला भरभरून आशीर्वाद दिले.

त्यांना मध्येच थांबवत विजयराव म्हणाले, 'माधवराव अस्मिताच निकाल लागला तिच्याही मनात प्रकाशच्या मनात विचार आला तसा विचार आला होता. ती म्हणाली मी आता कलेक्टर होणार आणि प्रकाशला साधी नोकरी पण नाही. तेंव्हा आम्ही तिची समजूत काढली होती. आमच्या संस्कारामुळे नकाराबाबत परत एकही शब्द काढलेला नाही. आता प्रकाशनेच नकार दिल्याने तिचा प्रश्न आपोआपच मिटला आहे. प्रकाशला आता त्याच्या प्रतीष्ठेप्रमाणे मुलगी शोधण्याचा अधिकार मिळाला आहे. तसाच तो अस्मिताला देखील मिळाला, प्रकाशच्या निर्णयामुळे.'

विजयरावांच्या या तपशीलवार खुलाश्यामुळे प्रकाशच्या चेहऱ्यावरचा प्रकाशच गायब झाला. उतावळेपणामुळे आपण कसा चुकीचा निर्णय घेऊन बसलो, याची त्याला लाज वाटत होती. तो जरा घाबरतच म्हणाला 'काका, काकू, आई, बाबा आणि अस्मिता मी चुकलो, मला एक संधी द्या. मला माफ करा. मी माझा निर्णय मागे घेतो.'

'खबरदार, या संधी साधुला पुन्हा कुणी संधी द्याल तर. आता मी प्रकाशचा बाप नाही तर अस्मिताच काका बोलतो आहे. एका भावी कलेक्टरचा काका. माझ्या या कलेक्टर मुलीसाठी मी स्वत:एखादा कलेक्टर मुलगा शोधीन. माणुसकी जपणारा आणि नात्यांना जपणारा, शेवटपर्यंत निभावणारा. महत्वाचे म्हणजे एका पोलीस उप निरीक्षक आणि कलेक्टरची बरोबरी कशी होऊ शकते? प्रकाशकडे तिरपा कटाक्ष टाकत ते बोलले'. माधवरावांचे ते शब्द एखाद्या धारदार शस्त्रासारखे प्रकाशच्या जिव्हारी लागत होते. पण त्या होणाऱ्या वेदना निमुटपणे सहन करण्याशिवाय त्याच्याकडे दुसरा पर्याय नव्हता. तो अतिशय खिन्नपणे आणि उदास चेहऱ्याने शून्यात पाहत बसला. आयुष्याच्या मोठ्या जुगारात डाव हरलेला जुगाऱ्यासारखा...!!!!

## मी कोरडी

**उमा पाटील, धुळे**

न केलेल्या गुन्ह्यासाठी
मी फोडते खडी
मी कोरडी... मी कोरडी... ॥धृ॥

पुढे डोकावताही येत नाही
मागे वळून बघताही येत नाही
बसून राहते तासन् तास मी
घालून हाताची घडी... ॥१॥

सोडून दिले परमेश्वरावर
जेवढे होते जंगम स्थावर
चालण्याचा रस्ता सरळ आहे पण
माझ्या नशिबाची रेषाच वाकडी... ॥२॥

कधी शिकणार मी दुनियादारी
सोडून लाचारी, कधी होणार व्यवहारी
खाऊन-पिऊन कसे राहायचे सुखात
शिकवतात मला लोके मरतुकडी... ॥३॥

स्विकारावा लागला नियतीचा प्रस्ताव
विसरून गेले चांदण्यांचा गाव
रोज उसवत जाते आपोआपच
कितीदा शिवावी फाटकी गोधडी... ॥४॥

मन लागत नाही इथल्या पसाऱ्यात
जाईन म्हणते दुसऱ्या विश्वात
हे अंतरिक्षातल्या विश्वासू सरदारांनो,
पाठवाल का मला न्यायला तबकडी... ॥५॥





# अनुमती

उत्तेजनार्थ
तृतीय



अमित भावे,कैलिफोर्निया

दुपारचे जेवण झाल्यावर श्रीधर त्याच्या प्रशस्त बेडरूममध्ये आला. त्याने बेडरूमचे दार लावून घेतले आणि तो त्याच्या बायकोशी - शलाकाशी बोलायला लागला, "दिवाळीचं जेवण चांगलंच अंगावर आलंय. ह्या वर्षी दिवाळीला वीकएंड आल्यामुळे छान मजा आली." शलाकाने हसून मान डोलावली व म्हणाली, "हो, ते एक बरं झालं. दोन दिवस खूप धमाल चालू आहे. मुलं आणि नातवंडांनी घर अगदी गजबजून गेलंय. काय गोड बोलतात ही छोटी पिल्लं! अनुपची रिया आणि रोशन. साजिरीचा जेड."

श्रीधर त्यांचे आणखी कौतुक करू लागला, "साधारण एकाच वयाची असल्यामुळे छान जमतं त्यांचं. माझ्या मागे मागे करत असतात. त्यांच्याशी खेळण्यात वेळ कसा जातोय कळत नाहीये. थोड्या वेळानंतर लक्षात येतं की दमायला झालंय. भराभर मुलांच्या मागे नाचायची सवय राहिली नाही आता पूर्वीसारखी." शलाका विषय बदलत म्हणाली, "खरंय पण अनुप आणि साजिरी आवर्जून दिवाळीला सुट्टी काढून आपल्याकडे येतात ते पाहून खूप बरं वाटतं. आपला सण साजरा करायची हौसच काही न्यारी असते." "मुख्य म्हणजे आपल्या जावयाला आणि सुनेला पण हौस आहे दिवाळीची ते बरंय. " "पल्लवीचं काय घेऊन बसलास? ती मराठीच आहे. पण जावई - हुई व्हिएतनामीज असून आवडीने करतो सगळं साजिरीसाठी. त्याचं विशेष कौतुक."

श्रीधरलाही त्याचं खूप कौतुक होतंच, "रांगोळी, आकाशकंदील, पणत्या सगळ्यांत बारकाईने लक्ष घालतो. ह्या वर्षी किल्ला बनवला नव्हता ते त्याच्या लक्षात आलं बरोबर." "हो ना, तुला खाली बसायला जमत नाहीये हे बघून स्वतःच बनवला मुलांबरोबर. मुलांना पण किती मजा आली." "अनुपचं सगळं लक्ष नुसतं फराळात. तसं सगळं बाहेरचंच घेऊन आले म्हणा, पण कडबोळी मात्र पल्लवीला खास तुझ्या स्टाईलची बनवायला सांगितली."

शलाकाच्या चेहऱ्यावर समाधान होतं. ती पुढे म्हणाली, "फराळाचं ताट कसं भरलेलं होतं. शंकरपाळे, चकल्या, चिरोटे, अनारसे सगळं कसं अगदी मनापासून खाल्लं सर्वांनी." "मला मात्र तुझ्या हातचेच बेसनाचे लाडू आवडतात. बाहेर बेसन नीट भाजत नाहीत. कच्चे लागतात." "सोड ते. लाडवांचं काय घेऊन बसलास? सगळे इंडियन कपड्यांत किती सुंदर दिसत होते नाही?". "अगं हो, मगाशी काढलेला आपला हा फॅमिली फोटो बघितलास का? छान आलाय नाही? ह्याची फ्रेम करून घेऊ या." "ह्या वर्षीच्या दिवाळीतल्या फोटोची आणखी एक फ्रेम. लावणार आहेस कुठे आता? भिंतीवर जागा तरी उरल्ये का? आपल्या मुलांचे फोटो काय कमी होते? आता त्यात नातवंडांचे फोटो! म्युझियम होईल एवढे फोटो झालेत तरी हौस काही संपत नाही."

"अगं, एकदा मुलं आपापल्या घरी गेली की आपण आहोत आणि हे फोटो! ह्या फोटोंमुळेच तर आपण आयुष्य काढतोय आता. हे घर फोटोंनी नाही तर आठवणींनी भरलेलं आहे. हा फोटो बघितलास? साजिरी लहान होती तेव्हा तिने संत्र्याचे झाड लावले ना त्या वेळचा. आता केवढे मोठ्ठे झालेय ते झाड! आता डाळिंब, संत्री, प्लम्स सगळी तयार झाल्येत. सगळ्या पिल्लांनी बागेत जाऊन नुसती धमाल केली. झाडांना पाणी घालताना भरपूर भिजून घेतलं सगळ्यांनी." "बघितलं मी. रंगपंचमीची आठवण झाली, नाही? त्यांच्या इथे एवढी थंडी. एक शिकागोला तर एक न्यूयॉर्कला. त्यांना कुठे असं भिजायला मिळतंय? आपल्या कॅलिफोर्नियातलं वेदर अगदी एंजॉय करतात!"

"हो ना, जेड सगळ्यांचा लीडर. हे झाड कोणतं, ते झाड कोणतं सगळं विचारत होता. आणि हल्ली काय सगळ्यांकडे फोन. पटापट फोटो काढत होता. पेरूच्या झाडावर हमिंग बर्डने केलेलं एक जुनं घरटं दिसलं त्याला. मग काय? इतके प्रश्न! ते हमिंग बर्ड कुठे गेले? त्यांचं पिल्लू कुठे गेलं? ते सगळे एकाच घरट्यात का राहात नाहीत? अगदी छोट्या अनुपची आठवण होत होती." "तुला आठवतंय का लहानपणी अनुपला कुत्र्याचं पिल्लू आणायचं होतं. साजिरीचं एकदम उलट. खूप घाबरायची. कोणाकडेही गेलो की गाडीतून उतरून आपल्याला पुढे पाठवायची कुत्र्याला बांधून ठेवलंय का ते विचारायला. मग स्वारी घरात पाऊल ठेवणार."

"अनुप पण काही कमी नव्हता. बांधलंय म्हणून सांगायचा आणि मग साजिरी घरात आली आणि कुत्रा वास घ्यायला आला की तिची गंमत बघायचा. आता दोघांकडेही कुत्री आहेत. साजिरीची भीती हुईमुळे का होईना गेली ते बरं झालं. आपल्याला जमलं नाही ते त्याने केलं." शलाका एकदम काहीतरी आठवून म्हणाली, "मी काय म्हणते, खालच्या बाथरूममधला शॉवर बदलायला हवाय तो दाखवलास का अनुपला? त्याला म्हणावं आहेस तेवढ्यात बदलून टाक. गंजलाय तो. बाकी काही नाही. वापर नाही त्यामुळे लक्षात येत नाही. पण कोणी चालू केला की थेंब थेंब पाणी गळायला लागतं." "विसरलोच बघ. आता झोपून उठलो की आठवण करतो अनुपला." "आणि तो परत जायच्या आधी पेरूचं झाड पण ट्रिम करून घे. तुला काही एकट्याला शिडी घेऊन ट्रिम करायला जमत नाही आता." "अनुपला सांगितलं म्हणजे काहीतरी टाळाटाळ करेल. त्याला गार्डनमधली कामं एवढी आवडत नाहीत. हुईला सांगतो. तो लगेच तयार होईल."

शलाकाने हसून होकारार्थी मान डोलावली, "हो त्याला खूप आवड आहे झाडांची. त्यांच्या तिथे व्हिएतनामला पण कोकणासारखंच असतं. पुढच्या सुट्टीत सगळे जण व्हिएतनामला जायचे आहेत असं सांगत होता काल." "वा, फारच छान! पण तो सांगत होता तेव्हा मी काय करत होतो? मी नाही ऐकलं ते?" "तू मस्त एक डुलकी काढत होतास सोफ्यावर बसूनच.""काय? पल्लवी ते यूट्यूबवरचे व्हिडिओ दाखवत होती तेव्हा सांगितलं?" "मग काय? रियाच्या शाळेत तिने एका पंजाबी गाण्यावर डान्स केला होता. पाठवला होता की तिने व्हॉटसऍपवर. तुझ्या लक्षात म्हणून काही राहात नाही. तोच तिने मोठ्या स्क्रीनवर लावला होता." "माझ्या सगळं लक्षात आहे बरं का. आपल्या घरातला प्रत्येक फोटो कुठे, कधी काढलाय ते परफेक्ट माहित्ये मला." "त्या सगळ्या जुन्या आठवणी. हल्लीचं काही तुझ्या लक्षात राहत नाही बघ."

"एखाद्या गोष्टीत आपण इन्व्हॉल्व्ह झालेलो असू तर ती गोष्ट पटकन लक्षात राहाते. आता ही मुलं फोनवर काय काय पाठवत असतात त्याची लिंक लागत नाही." "ते खरंय तसं. पण तुला आपल्या घरातल्याच आठवणींत जास्त रमायला आवडतं." ."का नाही रमणार? अगं, आपण दोघांनी उभं केलंय, सजवलंय हे घर. प्रत्येक वेळी ट्रीपला कुठे गेलो की तिथून एक्झॉटिक शोपिसेस आणायचीस तू मुद्दाम घरासाठी म्हणून. प्रत्येक सणाप्रमाणे, सिझनप्रमाणे सगळ्या घरातले आर्टिफॅक्ट्स बदलायचीस तू. मुलांच्या किती आठवणी आहेत इथे. जन्मापासून ते कॉलेजचं शिक्षण ते अगदी लग्न होईपर्यंत. सगळं आयुष्य गेलंय आपलं ह्या घरात."

"आणि तुला गार्डनची हौस. गार्डनमध्ये तू कुठून कुठून आणून झाडं लावायचास. दर वीकएंडला किती वेळ ते गार्डनिंग चाललेलं असायचं तुझं. ह्याला खत घाल. ते ट्रिम कर. तिसऱ्याचं आळं नीट कर. कधी संपायचं म्हणून नाही. गुलाब, जास्वंद, शेवंती नुसती रंगांची बरसात असते बागेत. फळफळावळ तर काय विचारूच नकोस." "तेव्हा मेहनत घेतली म्हणून तर आज एवढी फळं मिळतायत घरची. रसरशीत आणि गोड." शलाकाने हसून दुजोरा दिला. "माहित्ये मला तुझी आवड. मी गंमतीनं म्हणत नाही का तू चुकून इंजिनिअर झालास. खरा गार्डनरच व्हायचास." "हो तर, तुझ्या बाबांनी लग्न लावून दिलं असतं का तुझं एका माळ्याशी?"

"आपलं लव्ह-मॅरेज होतं ना? मग? नाही म्हणालेच नसते. आणि मी बरा नुसता

माळी पकडला असता. मी चांगला शोधून शोधून निवडलाय. तू अमेरिकेला यायचा निर्णय घेतलास तेव्हा सुद्धा मला टेन्शन आलं नव्हतं. मला पूर्ण भरवसा होता तुझ्यावर. एका छोट्या अपार्टमेंटमध्ये किती दिवस काढले आपण.” “खूप वेळ गेला तसा सेटल होण्यात. त्यामुळे मुलं सुद्धा उशिरा झाली आपल्याला. पण सगळं अगदी धीरानं निभावून नेलंस तू. तुझा मला नेहमीच आधार वाटत आलाय. म्हणूनच तू होकार दिल्याशिवाय मी कोणताही निर्णय घेत नाही हे माहित्येय तुला.”

“मी कायमच तुझ्या सोबत आहे रे. मी काही तुझी पाठ सोडत नाही. ते जाऊ दे. पण आज अजून तुला झोपायचं नाही? किती वेळ गप्पा मारतोय आपण. मगाशी तर म्हणालास जेवण खूप अंगावर आलंय म्हणून.” “त्याच्या आधी मला एक विचारायचं होतं तुला. अनुप कालच मला म्हणाला की ह्या घरातली ही आपली एकत्र अशी शेवटची दिवाळी.”दोन क्षण थांबून त्याने शलाकाकडे बघितले व पुढे बोलायला लागला, “आपलं आता वय झालंय म्हणून तो आपल्याला शिकागोला त्याच्या इथे कायमचं राहायला बोलावतोय. आणि मुख्य म्हणजे काही लागलं तर तो जवळ असेल आपल्या. पल्लवीचीही तयारी आहे. हे घर पुढच्या दिवाळीपर्यंत विकून टाकायचं आपण. सर्व गाशा गुंडाळून तिकडे जायचं आपण कायमचं. तुला चालेल ना? “ एवढं बोलताना त्याच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या.

शलाका मात्र स्थिर होती. तिने श्रीधरच्या पाठीवरून हात फिरवला व म्हणाली, “हे बघ आधी सावर स्वतःला. डोळे पूस ते. असा हळवा होऊ नकोस. हे कधी ना कधी तरी होणारच होतं. आपला मुलगा आहे तो. म्हातारपणी तोच आपली काळजी घेणार. अरे, आपलं नशीब चांगलं म्हणून तो आपल्याला त्याच्याकडे नेतोय तरी. आपण इथे अमेरिकेत आलो तेव्हा आपण आपल्या आई-बाबांना भारतातच सोडून आलो. त्यावेळी त्यांना काय वाटलं असेल?”

“ते सगळं मला मान्य आहे पण आपलं हे भरलेलं घर असं रिकामं करायचं आणि दुसऱ्याला विकायचं म्हणजे?” “अरे, मग कोण बघेल ह्या घराकडे? दिवसेंदिवस तुलाही होईनासं झालं आहेच की!” “आणि माझी ही सुंदर बाग? हिला मी इतक्या प्रेमाने फुलवली, वाढवली ती अशी सोडून द्यायची?” “अनुप घर विकायचं म्हणतोय ना? मग नवीन येणारा मालक घेईल तिची काळजी. त्याला पण ही बाग नक्कीच लळा लावेल. तू काळजी नको करूस त्याची.” “मग तू तयार आहेस हे सर्व सोडून शिकागोला जायला? तुझा पण किती जीव गुंतलाय ह्या घरात! मला माहित का नाही?”

“घराला घरपण येतं ते माणसांमुळे. शिकागोला आपला मुलगा-सून आणि नातवंडं असणार आहेत जवळ. नातवंडांच्यात छान वेळ जाईल आपला. दोघंही खूप गुणी आहेत. लाघवी स्वभाव आहे दोघांचाही. होईल सवय आपल्याला त्याही घराची. आणि तुझा तर ग्रीन थंब आहे. तिकडे जाऊन त्यांची बाग फुलव. छान रमशील त्या ही बागेत. हे बघ आपल्याच मुलाकडे जातोय आपण. तो स्वतः हट्टाने बोलवतोय. आपल्याला कुठे सिनिअर होम किंवा अस्सिस्टेड लिविंगमध्ये राहायला पाठवतोय? आणि परिस्थिती आली तर ते ही करावेच लागेल. असा हताश होऊ नकोस. मी आहे ना तुझ्याबरोबर.”

“तुझी तयारी असेल तर मग माझीही हरकत नाही. माझ्या मनावरचे ओझे खूप हलके झाल्यासारखे वाटतेय.” तेवढ्यात त्यांच्या बेडरूमचे दार वाजवून अनुप आत येतो. “बाबा, अहो तुम्ही अजून झोपला नाहीत? आणि कोणाशी बोलत होतात एकटेच?” अरे, हा काय झोपायलाच निघालो होतो. पण त्या आधी तुझ्या आईला सांगत होतो काल तू जे काय मला विचारलेस त्याच्याबद्दल. घर विकायचं म्हणजे तिला विचारायला नको? तिचे पण घर आहे हे. मी असा एकटाच कसा येणार तिला सोडून तुझ्याकडे?” “बाबा, अहो काय हे? आईला जाऊन इतकी वर्षं झाली!” “बाळा, अरे हो म्हणाली रे तुझी आई. तिची काही हरकत नाही बघ तुझ्याकडे यायला. ती तयार होईल का ह्याचीच काळजी होती मला. आम्ही दोघेही स्वखुशीने येऊ तुझ्याकडे. तिने अनुमती दिलेय हे घर विकायला!”



# The Empty Envelope



Natasha Dighe Badri. New Jersey, USA.

‘Is there life after death?’ I wondered. I knew my time had come. It was either death in a pile of trash or, if the legends were true, painful rebirth in the form of recycling. I was slowly resigning myself to the idea. I had a good life. As a beautiful, decorative envelope carrying a wedding invitation, I was sent with joy and received with joy.

I was carefully opened and the invitation card within me was read and kept by my side on a table in the living room. I saw snatches of day to day life as the family living there went through their routines. I saw them hurry to work and school. I saw them watch TV and chat and laugh after a long day. Then, one day they came all dressed up and picked up the wedding invitation headed out, I can safely assume, to attend the wedding. I still lay on the side table, which was now getting covered with more mail and envelopes.

I knew that my job of successfully delivering the invitation to the wedding was accomplished. I was empty and would sooner or later have to go. It was then that I was pondering over the question of life after death. One evening, the man of the house whose name was written on me, addressed as ‘Mr.—and family’ came and began going through the pile of mail on the side table. As he read through each, he sorted them into piles, one carefully on the table and another haphazard on the floor. I was the last to land on the floor pile.

He was about to heap us up in his hands when his little daughter came skipping along and asked, “Are you throwing those away, Daddy? Can I keep the pretty one?” “Sure,” he smiled and waited as she happily picked me up. The rest of the pile he carried off. I was carefully turned over a couple of times and observed. Then the little girl hurried off to find her school bag and pulled out some colorful stickers. She pasted them onto me to cover up the addresses and other writing.

It was as if I was getting a makeover. Then with colored pens, she neatly wrote her name down on me. She showed me to her parents later and said, “Doesn't it look pretty? It was already nice, golden with the red design along the borders but my stickers look great on it too. I think I'll keep my treasures in it.”

So, my thoughts of death can wait. For now, I won't even be empty. I am going to be the keeper of a little girl's treasures.

# सिनेमातील सायन्स!!
# नाकतोड्याचे घड्याळ

"पा" सिनेमाच्या सुरुवातीला जया बच्चन म्हणतात "इंट्रोड्यूसिंग अमिताभ बच्चन"... आणि त्या काळ्या नाकतोड्याची व सोनेरी लंबकाची पहिली झलक बघायला मिळते. एकच शब्द मनात येतो - "सही!!"

१०-१५ मिनिटात पुन्हा सिनेमात तो काळा नाकतोडा दिसतोच... "I have waited for this 100 years" लिहिलेली स्टायलिश कापडी बॅग घेऊन विद्या बालन वेंधळयासारखी मागे बघत पुढे चालत असते नि त्याच वेळी तिथे अभिषेक नेहमीप्रमाणे रनिंग करता करता क्षणभर दम खात असतो. दोघे एकमेकांना धडकतात, ओशाळवाणे हसतात, ओळख करून घेतात आणि आपापल्या मार्गाने जातात....

इलियाराजाचं "हॉन्टींग" गाणं सुरू होतं - "मुडी मुडी मैं कहाँ कहाँ मैं मुडी इत्तेफाकसे"... पण पुन्हा त्या नाकतोड्याच्या घड्याळाचे जवळून दर्शन ... त्या घड्याळाजवळ त्यांच्या भेटीगाठी घडत राहतात आणि परत परत तोच काळा नाकतोडा....

काय झालं काय आहे ह्या डिरेक्टर बाल्कीला? साधी सर्फची 'दाग अच्छे है' सारखी ॲड फिल्म असली तरी दिग्दर्शन करताना बाल्की अगदी लहान-सहान गोष्टींकडे लक्ष देतो. मग इथे असं नाकतोड्याचं घड्याळ सारखं सारखं का दाखवतो आहे?? इतकं 'स्टनिंग' घड्याळ जगात कुठे असावं? आणि कोकीळेचे घड्याळ ठीक आहे... असं नाकतोड्याचे घड्याळ कुणी आणि का बांधले??

Image credit: Wikimedia





सीमंतिनी, कॅलिफोर्निया

ह्या प्रश्नांची उत्तरे मिळवायला अंदाजे तीनशे वर्ष (1700 साल) मागे जावे लागेल.

त्याकाळात खलाशांना "रेखांश समस्या" the longitude problem भेडसावत असे. आज आपल्याला हे झटक्यात जीपीएस मुळे कळतात मात्र त्या काळी किती यातायात होत असे! जहाज समुद्रात असताना दिशा अक्षांश-रेखांशावरून ठरवली जाई. अक्षांश ठरवताना फार अडचण येत नसे कारण सूर्याची स्थिती व सेक्स्टंट नावाचे यंत्र वापरून काम होत असे. सध्या इंग्रजी जास्त प्रचलित असल्याने हे यंत्राचे नाव जरा अप्रशस्त वाटेल पण लॅटिनमध्ये त्याचा अर्थ ६० डिग्री मोजणारे यंत्र इतका साधा आहे. अनुभवी खलाशी दिवसाच्या लांबीवरून अक्षांश बऱ्यापैकी अचूक सांगू शकत.

तऱ्हा वेगळी. पृथ्वी फिरते त्यामुळे दर चार मिनिटाला रेखांश बदलतो. त्यामुळे तो ठरवता येणे कठीण होते. मूळ बंदर सोडून किती वेळ झाला, कुठल्या दिशेने गेलो, आणि सेक्स्टंटने ठरवलेला अक्षांश ह्या तीन गोष्टी कळल्या तर रेखांश ही कळेल पण ह्यात गोंधळ असा होता की त्या काळात घड्याळे तयार करून घ्यावी लागत. ही घडयाळे सहसा धातूची असायची, त्यांना वंगणाची गरज पडायची आणि समुद्राच्या आर्द्र हवेत तेल (grease) गोठल्याने चुकीची वेळ दाखवायची.

ब्रिटन साखर व कापूस याची मोठी निर्यात करत असे. मात्र घड्याळे नसल्याने, रेखांश चुकल्याने साखर, कापूस घेऊन जाणारी २०% जहाजे समुद्रात हरवून जात आणि मोठे नुकसान होई. ब्रिटन सरकारने ही रेखांशाची समस्या सोडवायला वीस हजार पौंडाचे इनाम जाहीर केले. आजच्या भाषेत बहुतेक हे चौदा लाख पौंड होतील. अर्थात लगेच बरेच हौशे-नवशे-गवशे समस्येचे "उत्तर" घेऊन आले. पण जवळजवळ शंभर वर्ष ह्या समस्येचे समाधान होईना.

जॉन हॅरिसन हा खरंतर व्यवसायाने एक साधा सुतार. वयाच्या सहाव्या वर्षी देवी उठल्या तेव्हा त्याचे मन रमवायला म्हणून त्याला घड्याळ दिले आणि त्याला घड्याळांचा नाद लागला. वयाच्या विसाव्या वर्षीच त्याने मोठे लंबकाचे घड्याळ तयार केले होते. त्याची ही घड्याळे महिन्याला एक सेकंद मागे पडत पण त्या काळात हे जवळजवळ अचूक मानले जात होते कारण इतर घड्याळे दिवसाला एक सेकंद मागे पडत. ब्रिटीश सरकारने बक्षीस जाहीर केल्याचे कळल्यावर हॅरिसन ग्रीनिचला गेला. पण त्याच्या कौशल्याबद्दल सगळ्यांना शंका होती. त्याने एक प्रवासाला योग्य (पोर्टेबल) घड्याळ तयार केले आणि हंबर नदीवर त्याची चाचणी घेतली. त्याचे कौशल्य बघून त्याला संधी मिळाली.

पुढच्या तीस वर्षात हॅरिसनने एकूण चार घड्याळे तयार केली. तेव्हा परिस्थिती गंमतीची असे - आधी दोन-चार वर्ष घड्याळ तयार करायचे, मग समुद्रावर घेऊन जायचे, बरोबर हव्या त्या देशात पोहोचलो तर घडयाळ सरस. जरा इकडे तिकडे झाले तर रेखांश चुकल्याने जहाज कुठेतरी बेटावर धडकेल, चक्काचूर होईल, किंवा "जाना था जापान पहूंच गये चीन" प्रकार होणार.

पहिली तीन अर्थातच समुद्रातील चाचणीत काठावर पास झाली. चौथे घड्याळ बांधले तेव्हा जॉन तसा म्हातारा झाला होता. त्याचा मुलगा घड्याळ घेऊन वेस्ट विंडीज बेटांच्या सफरीवर गेला. ते घड्याळ अतिशय सरस निघाले आणि रेखांशाचा प्रश्न सुटला याची सर्वांची खात्री पटली. मात्र लॉन्जिट्यूड बोर्डात भांडणे होऊन हॅरिसनला फक्त निम्मी रक्कम मिळाली. शेवटी राजाने गोंधळाची दखल घेऊन त्याला सेवेबद्दल इनाम दिले.

... आता कुणी म्हणाल "अगं, नाकतोड्याचे काय ते तर सांग!"

हॅरिसनच्या घड्याळाचे हजारपेक्षा अधिक विविध भाग होते. त्यात एक भाग "सुटका यंत्रणा" म्हणून असतो ज्याचे काम लंबक सातत्याने हलता ठेवणे आहे. हॅरीसनने "नाकतोड्याची सुटकायंत्रणा" तयार केली म्हणजे नाकतोड्याचे पाय जसे चालतात तसे दोन लाकडी भाग सतत गियर फिरवत. आणि त्यामुळे लंबक हलता राहत असे. अशा पद्धतीची ही पहिली यंत्रणा होती आणि तिचा वापर हॅरिसनने आपल्या पहिल्या तीन घड्याळात केला. आणि त्यावरून "पा" मधले कॉर्पस क्लॉक आले.

(इमेज क्रेडीट: https://en.wikipedia.org/wiki/Grasshopper_escapement#/media/File:Grasshopper-escapement_colored.gif)


आता सन १७६५ मधून थेट सन २००५ मध्ये जाऊ -

युनिव्हर्सिटी ऑफ केम्ब्रिजच्या एका लायब्ररीचे स्थलांतर होणार होते. ज्या बिल्डींग मध्ये स्थलांतर करायचे होते ती इमारत जुनी होती. सन १८६६ मध्ये बांधलेली. तिथे प्रवेशद्वार नवे करणे किंवा जुने बंद करणे यासाठी शहरातील प्लॅनिंग ऑफिसची परवानगी आवश्यक होती. इमारतीचे एक प्रवेशद्वार बंद करायला परवानगी मिळेना. काहीतरी शक्कल लढवावी लागणार होती. डॉ जॉन टेलर यांना बोलावण्यात आले. ते नुसते संशोधक आणि केम्ब्रिजचे माजी विद्यार्थी नव्हते तर घड्याळांचा अभ्यास करणारे होते. त्यांनी नाकतोड्याच्या घड्याळाची कल्पना मांडली. एक मोठे घड्याळ लावून ते प्रवेशद्वार झाकून टाकायचे.

तेच हे "पा" मध्ये दिसणारे ते कॉर्पस क्लॉक.

हे घडयाळ तयार करण्यासाठी सुमारे एक मिलियन पौंड खर्च आला. आर्किटेकट, ज्वेलर्स असे दोनशे विविध विषयातील तज्ञ यावर काम करत होते. जवळजवळ पाच वर्षाच्या कष्टानंतर घड्याळ तयार झाले. याचे उदघाट्न डॉ स्टीफन हॉकिंग यांनी २००९ मध्ये केले. आजही केंब्रिज मध्ये जेव्हा पर्यटक येतात तेव्हा हे घडयाळ जरूर बघतात.

ह्या घड्याळात एकूण ५० वेगवेगळी वैशिष्ट्ये किंवा गंमती आहेत. नाकतोड्यासारख्या दिसणाऱ्या त्या काल्पनिक कीटकाचे नाव आहे - क्रोनोफेज उर्फ "काळतोड्या". हा दर तीस सेकंदाला तोंड उघडतो नि मिनीटाला बंद करतो- जणू काळ खातो. (नंतर डॉ टेलर यांनी



अशा प्रकारचे चार वेगवेगळे क्रोनोफेज तयार केले आहेत पण हा पहिला सर्वात प्रेक्षणीय आहे).

लंबकाचे सोनेरी प्लेटिंग आणि लाटा 'बिग बँग'चे प्रतीक आहे. आणि दर तासाला ठोका पडतो त्याचा आवाज कॉफीनवर हातोडीने खिळे ठोकल्यागत आहे. घड्याळावर लिहीले आहे - mundus transit et concupiscentia eius, म्हणजे 'जग आणि त्यातील इच्छा नश्वर आहेत'.

एक गंमतीचा भाग जो सिनेमाला अगदी चपखल लागू पडतो - हे घड्याळ इलेक्ट्रिक मोटर वर चालते आणि घड्याळाचा लंबक कधी मध्येच हळू चालतो तर कधी भरभर चालतो. असं का केलं डॉ टेलर यांनी? कारण "वेळ" ही संकल्पना तशी सापेक्ष आहे. म्हणजे एखाद्या प्रिय व्यक्ती बरोबर असताना वर्ष क्षणासारखे वाटते तर अप्रिय व्यक्ती बरोबर क्षण युगासारखे भासतात. जसं "पा" मध्ये विद्या आणि अभिषेक भेटतात आणि त्यानंतर त्यांच्या भेटीगाठी होत असतात... तो वेळ झरझर जातो...

हिंदी सिनेमा बघताना फार डोकं लावू नये. "अमर, अकबर.. " मधले रक्तदान सोसलेल्यानी तर सिनेमात विज्ञान, शास्त्र इ शोधायला तर अजिबात जाऊ नये. पण असं अचानक सायन्स सापडलं आणि ते ही इतकं चपखल की "पुंडलिकभेटी परब्रह्म" इतका आनंद.

आता मुद्द्याचा प्रश्न - हे सगळं आर. बाल्की यांना माहिती असेल आणि त्यांनी समजून-उमजून ही लोकेशन वापरली असेल की...फॉरीन आऊटडोअर असल्याशिवाय ए-लिस्ट कलाकार सिनेमा करत नाहीत म्हणून रस्त्यावरचे घड्याळ अशी बजेट-फ्रेंडली लोकेशन घेतली असेल ;)? आपल्याला कधीच कळणार नाही ... J

References:


https://www.corpus.cam.ac.uk/about/college/introduction-corpus-clock

https://longitudeprize.org/the-history/

https://www.johnctaylor.com/the-chronophage/corpus-chronophage/

https://www.britannica.com/biography/John-Harrison-British-horologist

https://www.rmg.co.uk/stories/topics/harrisons-clocks-longitude-problem




Anil Joshi, California

# आज जाने की जिद ना करो

स्वतःचे काम संपले तरी उगाचच तिचे काम संपेपर्यंत तिची अबोल सोबत करणारा तो, तो,

तिला स्टेशन वर सोडायला येतो तो तो

तिलाही ते हवेच आहे असा तो.

स्टेशन वर गाडी येईपर्यंत हळुवार गप्पा,

नजरेनेच तिच्या अवखळ बटांचे केलेले कौतुक ......

स्टेशनवरच्या गर्दीमुळे त्याच्या बाहुपाशात नसूनही तितकीच जवळ असलेली ती ....

तिला कोणाचा धक्का लागू नये म्हणून तिला खांद्याला धरून हलकेच सावरणारा तो ..

_एक गाडी सुटली ..-

अजून एक गाडी सोडण्याला दोघांच्या नजरेची संमत्ती ..

आता मात्र उशीर झालेला ..

जायलाच हवं असं सांगणारा घड्याळाचा काटा ..

गाडीत शिरल्यावरही तिचं त्याच्या जवळ आपलं मन सोडून जाणं,

त्याने तिचे निसटते झालेले स्पर्श उरात दडवून ठेवणं ..

हुरहूर पुनर्भेटीची ...

अजून थोडा वेळ वेळ हवा होता ना !!!

पुन्हा फोनवरून मेसेजवर सांगणे ..

तिचे हसरे डोळे , लाजरा चेहरा ..

त्याच्या ओठावर ....तिच्या स्पर्शाच्या लाजऱ्या बुजऱ्या मधाळ अशा अनेक कहाण्या ...असे हे भेटीची न संपणारी आवर्तने मनात उमटवणारे गाणे ... आज जाने की जिद ना करो ...... आज जाने की जिद ना करो ......

पाकिस्तानी कवी फय्याज हाश्मी ह्यांनी लिहिलेले आणि सोहेल राणा ह्यांनी स्वरबद्ध केलेल्या ह्या गाण्याची मोहिनी अशी आहे की प्रत्येक पिढीतल्या गायकांना ह्या गाण्यात स्वतःची हुरहूर व्यक्त करावीशी वाटते फरिदा खानुंम, आशा भोसले ,अर्जित सिंग,शफाकत अमानत अली, पपोन, आणि कितीतरी गायकांनी हे गाणे म्हटले आहे.

प्रत्येक वेळेस तीच असोशी , तीच न संपणारी ओढ ..अमर्याद ..

तसं तो असतोच तिच्या मनात सतत .. शॉपिंग करताना एखादा शर्ट पाहून वाटून जातंच .. किती छान दिसेल ना हा शर्ट त्याला .....

वाऱ्याची गार झुळूक पावसाची वर्दी देताच...पावसाच्या टपोर थेंबांना त्याच्या सह झेलावं असं वाटतंच तिला ....तिला सोडून मोटारसायकल वरून परतताना वळणावळणाच्या रस्त्यावर वाटतंच त्याला की मागून त्याला वेढून टाकणारे नाजूक हात हवे होते त्याच्याबरोबर ….. अजून काही वेळ ……

सतत अपूर्णतेची गोडी वाढवणारे हे गाणे -



श्रेया राजवाडे, मुंबई

आज जाने की ज़िद ना करो

आज जाने की ज़िद ना करो

यूँ ही पहलु में बैठे रहो

आज जाने की ज़िद न करो

हाय मर जाएंगे

हम तो लुट जाएंगे

ऐसी बातें किया ना करो

आज जाने की ज़िद ना करो

आज तू नुसता माझ्या जवळ बसून रहा ,

मला सोडून निघण्याबद्दल काहीच बोलूच नको रे ..

माझ्या हृदयात तरंग उमटवणारे तुझे शब्द जीवघेणे ठरतायत माझ्यासाठी. माझ्या भावनांचा कल्लोळ कशी आवरू ...

कशी सावरू ..

आज नको ना म्हणूस 'जातो' म्हणून...

वक़्त की कैद में ज़िन्दगी है मगर

चंद घड़ियां यही हैं जो आज़ाद है

इनको खो कर मेरी जानेजाँ

उम्र भर ना तरसते रहो

आज जाने की ज़िद ना करो

सगळं आयुष्य कामाच्या व्यापात जगरहाटीत अडकलंय.

मोठ्या मुश्किलीने हे निवांत क्षण मिळालेत.

फक्त तुझ्या माझ्या साठी ..

प्रेमाचे अत्तर उधळण्यासाठी ..

पुन्हा कधी असे निवांत क्षण मिळतील कोण जाणे ..

आज जाऊया ना एकमेकांच्या सहवासात हरवून ..

पुन्हा खंत वाटत राहील निसटलेले हे सुंदर क्षण आठवून ...

आजचे क्षण हे फक्त तुझे नि माझे ....

आयुष्यभर असे जपून ठेवायचे ...

थांब जरासा जाऊ नकोस निघून ...

ह्या प्रेमकणांना घे जरा वेचून ...

तुम ही सोचो ज़रा

क्यूँ ना रोकें तुम्हें

जान जाती है जब

उठ के जाते हो तुम

जान जाती है जब

उठ के जाते हो तुम

तुमको अपनी क़सम जानेजां

बात इतनी मेरी मान लो

आज जाने की ज़िद ना करो

तुझ्या सहवासाचा प्रत्येक क्षण अमृत कण आहे माझ्यासाठी.

तुझ्यासाठी मुद्दाम केलेला चहा ,

तू माझ्याच कपातून पिण्याचा धरलेला आग्रह ,

तुझ्या रोखलेल्या नजरेने माझी सैरभैर झालेली नजर ,

कसं सगळंच वेडावून टाकणारं ..

त्यात तुझं असं निघून जाणं ..

कसं सहन करावं मी ..

अजून थोडा वेळ थांब...

कितना मासूम रंगीन है ये समां

हुस्न और इश्क़ की आज बैराज है

कल की किसको ख़बर जानेजाँ

रोक लो आज की रात को

आज जाने की ज़िद ना करो

तू येणार म्हणून मी मुद्दाम माळलेला मोगऱ्याचा गजरा..

समुद्रावरला गार गार वारा

त्या सुगंधाने आसुसलेला तुझा चेहरा

तुझी ओढ पाहून जीव होई बावरा

रात्र उतरते चंद्रप्रकाशात न्हाऊन

घे भावनाही माझ्या तू समजून

जाऊ नकोस थांब ना रे जरा

बघ साद घाले हा धुंद मोगरा

आज जाने की जिद ना करो.....

आज जाने की जिद ना करो.....

## तू आणि मी एकच

### निकिता सातव

जे माझ्या मनी
ते तुझ्या ओठी
जे मला आवडी
ते तुझ्या कृती||

हास्य माझ्या मुखी
ज्याला तूच कारणी
बाह्यरुपी जरी वेगळी
असे चित्त एकरुपी||

काटा लागी मला
त्याची कळ तुला
दुःख माझ्या उरी
आश्रू तुझ्या डोळी||

मित्र, प्रियकर, जीवनसाथी
अशी ना-ना रूपं तुझी
भाळे खूप तू मैत्रीरुपी
जो पाऊलो-पाऊली सावरी||

भासे न कधी एकटी
असतोस नेहमी सोबती
जीव किती तुझ्यावरी
ज्यापुढे प्रेमव्याख्या अपुरी||

करुनी सात वचने पूर्ती
हातात हात घेऊनी
असेच राहू साथी
अनंत वर्षे लोटली तरी||

# घरोघरी_मातीच्या_चुली

अनिल... त्याचे बाबा हॉस्पिटल मध्ये आहेत हे कळल्यावर मिळेल ती फ्लाईट घेऊन पुण्याला आला होता. बाबा ना हार्ट अटॅक आला होता. एकुलता एक लेक अमेरिकेत होता...... मग बाबांचे विद्यार्थी मदतीस आले आणि त्यांनी हॉस्पिटल मध्ये दाखल केले. तसाच अनिल ला फोन केला. आई हादरून गेली होती. आई आणि बाबा दोघेही कॉलेज मध्ये प्रोफेसर होते. आता रिटायर झाले होते. अजूनही ते विद्यार्थ्यांना मदत करत असत. त्यांना मार्गदर्शन करत. त्यांचे विद्यार्थी रोज त्यांच्या घरी येत होते, त्यांचे मार्गदर्शन घेत होते आणि त्यांना लागेल ती मदत ही करत होता. अनिल आल्यावर बाबांनी त्याचा हात धरला आणि आईची नेहमी काळजी घेइन असे वचन घेतले. मुलाचा हात हातात घेऊन त्यांनी डोळे मिटले ते कायमचे! विद्यार्थी, नातेवाईक जमले होते. आई तर ढासळून गेली होती. हे सर्व अचानक घडले होते.

सर्व दिवस केले गेले. त्या नंतर अनिल ची परत जायची वेळ आली. आईस म्हणाला आई तू माझ्या बरोबर चल! खूप आग्रह करू लागला....आई म्हणाली.... अनिल आत्ता पर्यंत मी आणि बाबा अनेक वेळा तुझ्या घरी अमेरिकेत येऊन गेलो. मला अमेरिका काही नवीन नाही. पण सध्या मी इथेच राहायचे ठरवले आहे. बाबांची मला क्षणो क्षणी आठवण येईल. अरे आम्ही पन्नास वर्ष एकत्र काढली आहेत. पण मला आता माझे जीवन जगू दे. तू काळजी करू नकोस. माझे विद्यार्थी मला मदत करतील. आणि वाटलं तर मी हक्काने तुझ्या घरी येईन..

जड अंतःकरणाने अनिल परत गेला. अनिलच्या आई मालती बाई आता एकट्या राहिल्या होत्या. अनिल गेल्यावर रात्री नीट झोप आली नाही. अग चहा करतेस ना! हे बघ मी दूध घेऊन आलो आहे. अनिलच्या बाबांचा आवाज आला.

आणि क्षणात मालतीबाई ना जाणवले की ते आता नाहीत तर दूध आपल्यालाच आणायला हवे. त्या उठल्या. साडी नीट केली आणि दूध आणायला बाहेर पडल्या. सकाळी शांत पुणे खूप छान वाटले. दूध आणि भाजी बाबा सकाळी बाहेर पडून घेऊन येत. आज त्या प्रथमच इतक्या पहाटे बाहेर पडल्या होत्या. आणि त्यांचे मन खूप प्रसन्न झाले. वाटेत तीन चार ओळखीच्या बायका भेटल्या. त्यांनी खूप प्रेमाने चौकशी केली. मालती बाईंचा एक तास कसा गेला हे कळलेच नाही. आज त्यांना प्रथम कळले की बाबा रोज दूध आणण्याचे निमित्त करून सकाळी बाहेर का जात होते. तोपर्यंत मालती बाईंची योगासने व्हायची आणि मग गरम गरम ताज्या दुधाचा चहा!! आज योगासने राहिली आणि चहा घेण्यास बाबा ही नाहीत!!!

पण मालती बाई गरम चहा प्यायल्या आणि त्यांना खूप बरे वाटले. त्या नंतर त्यांनी योगासने केली. आणि अनिल चा पोचल्याचा फोन आला. त्याच्याशी आणि घरातील सर्वांशी खूप वेळ गप्पा मारल्या. सर्वांनी अमेरिकेत येण्याचा आग्रह केला. मालती बाई म्हणाल्या नक्की येईन हो लवकर! तेवढ्यात दाराची बेल वाजली. कामवाल्या मावशी आल्या होत्या. जेवण करून दुपारी मालती बाईंनी थोडी झोप काढली मग थोडे फ्रेश होऊन चहा घेतला. घरातील साडी बदलून त्या भजन ग्रुप मध्ये गेल्या. तिथे त्यांना त्यांच्यासारखी मुले अमेरिकेत असलेल्या बायका भेटल्या आणि त्यांनी एकमेकिंचे फोन घेतले जे आत्तापर्यंत केले नव्हते. आणि एकमेकींना बागेत दुसऱ्या दिवशी भेटायचे ठरवले.

दुसऱ्या दिवशी सहा बायका आणि काहींचे मिस्टर भेटले. त्यांनी आठवड्यातून एकदा भेटून काहीतरी ॲक्टिविटी करायचे ठरवले. हळू हळू ग्रुप वाढू लागला. भेंड्या, सहली, एकत्र नाटक सिनेमा बघणे असे होऊ लागले आणि लवकरच त्यांचा NRI Parents नावाचा WhatsApp ग्रुप तयार झाला. त्यांच्यात इतर गावचे आई वडील सामील होऊ लागले. एक मेकांना भेटू लागले. अडी अडचणीत मदत करू लागले.

मग सर्वांनी मिळून एकदम अमेरिकेत आपल्या मुला कडे किंवा मुली कडे जायचे ठरवले. बघता बघता ३०० आई बाबा तयार झाले. सर्वांनी मिळून न्यूयॉर्क पर्यंत चार्टर्ड फ्लाईट करायचे ठरवले आणि तिथून मग आपल्या गावी जायचे असे ठरले. जाण्याची आणि येण्याची तारीख ठरली. तसे रीसर्वेशन केले आणि मुंबई विमानतळावर ३०० आई बाबा प्रथम भेटले. काय वर्णावा तो आनंद!!!! न्यूयॉर्क पर्यंत चा प्रवास इतका मजेत कधीच झाला नव्हता.

नंतर ही सर्वांनी भेटायचे ठरवले. Whatsapp नंबर तर सर्वांकडे होतेच....मग काय आनंदात प्रवास झाला. प्रत्येक गावात त्यांना नेण्यास आलेल्या मुलांची



कांचन अकोलकर, कॅलिफोर्निया

एक मेकांशी ओळख झाली. आई बाबा इतरांना नियमित भेटत राहिले. इतकेच नव्हे तर अमेरिकेत ही सर्वांनी मिळून अनेक सहली केल्या....या ट्रीप मध्ये मालती बाई ही होत्या आणि त्यांचा या सर्व activity मध्ये प्रमुख भाग होता हे वेगळे सांगायला नको....

आई आल्याने अनिल आणि कुटुंब खूप आनंदात होते. घरो घरच्या मातीच्या चुली एकत्र आल्या आणि सर्वांना खूप आनंद देऊन गेल्या....

## अशी आई तू

**निकिता सातव, सिएटल**

नऊ महिन्यांचा खडतर प्रवास करत,  
नव्या जीवाची आतुरतेने वाट बघणारी  
अशी माऊली तू ||१||

बाळाच्या काळजीपोटी,  
प्रचंड धाडसाने बुरुंज सर करणारी  
अशी हिरकणी तू ||२||

स्वतः ढाल बनून, अंगावर घाव घेत,  
तान्ह्याचं रक्षण करणारी  
अशी लक्ष्मीबाई तू ||३||

संस्काराचे बाळकडू पाजत,  
अति शिस्तीची पण मन मृदू असणारी  
अशी जिजाई तू ||४||

ऊन, वारा, पाऊसाला न जुमानता,  
इवल्याश्या रोपट्याला जन्म देणारी  
अशी धरणीमाई तू ||५||

तहान, भूक, झोप विसरून,  
लेकराला फुलासारखं जपणारी  
अशी जननी तू ||६||

आणि जिचे ऋण फेडायला,  
अनंत जन्म अपुरे पडतील  
अशी आई तू ||७||

# दिवाळी आणि रांगोळी

चित्रा मेहेंदळे, मुंबई



दिवाळी आणि रांगोळी या घट्ट मैत्रिणी आहेत.

रांगोळी शिवाय दिवाळी होऊच शकत नाही.

हल्ली च्या रांगोळ्या वेगळ्या,काळाप्रमाणे बदललेल्या.. वेळे अभावी,बाजारात मिळणाऱ्या रेडिमेड , वेगवेगळ्या आकर्षक माध्यमातल्या! फोल्डिंगच्या !कोणीतरी केलेल्या ,पण आपले दार सजवणाऱ्या!

नाहीतर संस्कार भारती सारख्या! सुंदर रंगावर , पांढऱ्या जाडसर रांगोळीने गालिच्या सारख्या काढलेल्या !पटकन मनांत भरणाऱ्या!

पारंपारिक पध्दतीने काढलेल्या ठिपक्याच्या रांगोळ्या काही घरांच्या दारासमोर अजूनही दिसतात!

पण मी सांगणार आहे प्रदर्शनात काढल्या जाणाऱ्या रांगोळ्यां बद्दल !ज्या काही जणांनी कधी पाहिल्याही नसतील.

त्यासाठी मी १९७२ सालचा माझा अनुभव सांगणार आहे .

दिवाळीत ,मुंबईत दादरला गेले होते.....

तिथे कित्ते भंडारी हॅाल जवळ पाटी दिसली “रंगावली प्रदर्शन...... रंगावलीकार - गुणवंत मांजरेकर...”२० पैसे तिकीट “..

हे ही नविन होते ...

रांगोळी रस्त्यावर , अंगणात , गॅलरीत गेरूवर काढायची ! त्याला कसले पैसे?..कसले तिकीट? .असेच वाटले ..

आम्ही गॅलरीत , चाळीत ,मजल्यावरच्या सगळ्या मुली मिळून रांगोळी काढत होतो. त्यावेळी जसं कोणाच्याही घरात , मनांत डोकावत असू , तसंच एकमेकींच्या रांगोळीतही हक्कानी डोकावतां यायचे, मदत करता यायची . तेव्हा आमची रांगोळी म्हणजे...ठिपक्यांची, नाहीतर गालिचा , सतरंजी, फुलं , मोर नाहीतर हंस! त्या पलिकडे नाही.

पण इथली रांगोळी फारच वेगळी होती .

इथल्या हॅालच्या दरवाज्याला पडदा होता. आत गेले, तर क्षणभर काही दिसेचना ... हॅालची इतर दारं, खिडक्या बंद होती !त्यांना जाड काळे पडदे लावून काळोख केला होता .. जरा पुढे गेल्यावर पाहिले..... आणि पहातच राहिले। ... ही रांगोळी आहे? काळ्या कारपेटवर हेमा मालिनी , इंदीरा गांधी,अमिताभ बच्चन ,सुनिल गावस्कर, स्मिता पाटील ह्यांचे मोठे करून ठेवलेले फोटो वाटत होते..

प्रत्येक रांगोळीवर २ फुटावर, वायर सोडून,१ शेड लावून दिवा होता! जरा जवळ गेल्यावर , ती रांगोळी आहे , आणि दिव्यामुळे चकाकते आहे , हे कळले . मी अक्षरश: भान हरपून पहात राहिले .

अशा २५ तरी रांगोळ्या होत्या.. मग स्टेजवर जायला लागले . तिथून खाली पाहिले तर एक मोठी रांगोळी... गुणवंत मांजरेकरांनी काढलेली... अतिशय देखणी .. अतिशय तरल रंग.. पातळ थर रांगोळीचा !पेंटिंग किंवा फोटो असावा ,अशा त्या रांगोळ्या वाटत होत्या... मी अशी रांगोळी कधीच पाहिली नव्हती ..... वेडी झाले ... त्या रांगोळीने माझे आयुष्यच बदलून गेले.

ही रांगोळी काढायची पध्दतच वेगळी आहे .

प्रदर्शनात ब्राऊन पेपर जमिनीवर चिकटवून त्यावर रांगोळी काढली जाते.हा पेपर पण अतिशय काळजी घेऊन चिकटवायचा . चारी बाजूने ,१ इंच गम लावून , दोघांनी धरून ,मध्ये अजिबात चूण येणार नाही ह्याची काळजी घेऊन लावावा लागे . मधे हवा पण रहाता कामा नये ह्याची विशेष काळजी घ्यावी लागायची.

मग त्यावर पेन्सिलीने पूर्ण स्केच काढायचे.. अगदी बारीक तपशिलांसह.

पूर्ण रांगोळी काढायला २०/२५ तास लागायचे ,त्यातले ३/४ तास हे स्केच काढायला लागायचे.

..या रांगोळीचे रंगही वेगळे असतात . त्यांना “लेक कलर्स” म्हणतात . खडे असतात , त्याची कुटून पावडर करायला लागते.. रंग एकदम पक्का असतो . काळा रंग तर एकदा वापरला , तर हात साबणानीच धुवायला लागतो .त्याशिवाय जातच नाही हाताचा रंग! आपले साधे रंग पांढरी रांगोळी घातली की फिके होतात, पण ह्या रंगांचे तसे होत नाही. चाळलेल्या रांगोळीत हे रंग हातांनी चांगले घासून एकत्र केले कि हवी



ती रंगाची छटा मिळू शकते. गुणवंत मांजरेकर सरांकडे ४ महिने रांगोळी शिकायची संधी मला मिळाली.

तुम्ही कधी एखाद्या गाण्याच्या कार्यक्रमात वादकाला तल्लीन होऊन वाद्य वाजवतांना, जवळून पाहिलंय?...तबल्यावर वरचे , सतारी वरचे त्यांचे जलद गतीने फिरणारे हात, आणि चेहऱ्यावरचे समरसतेचे भाव.... बघत रहावे असे असतात ना? तसेच झाले माझे.. सर रांगोळी काढतांना बघून…खूप शिकायला मिळालं सरांकडून!

आमच्यापैकी सगळेच हौशी कलाकार होते .कोणीच चित्रकला शिकलेले नव्हते. पण पहिल्या दिवशी काढलेली रांगोळी , आणि शेवटच्या दिवशी काढलेले व्यक्ती चित्र , ह्यात जमिन आस्मानाइतका फरक होता . ...इतरही रंगांची माध्यमं वापरून चित्र काढणे त्यामुळे सोपे गेले.आमचा ५/६ जणांचा छान ग्रूप जमला .. काही नुकतीच शाळा संपवून आलेली, काही कालेज! बरीचशी दादरची होती , जवळपास रहाणारी !आम्ही एकत्र येऊन खूप प्रदर्शनं भरवली.सांगायला अभिमान वाटतो की आमची ही मैत्री ,५० वर्ष झाली ,तरी पण अजून टिकून आहे ... रांगोळीने मला काय दिले? तर..एक रंगीत आयुष्य दिले , तशी ही जिवाभावाची मैत्री दिली....


आम्ही क्लास मध्ये पहिल्या दिवशी रांगोळी काढायला घेतली आणि इतकं भारी वाटलं म्हणून सांगू?.... रांगोळीचा स्पर्शच मस्त वाटला !एक ब्लॅक अँड व्हाईट देखावा , जुन्या मासिकातून शोधून आणला होता . आकाशातले ढग आणि पाणी जास्त होते .. चंद्र आणि प्रतिबिंब पण होते ...प्रत्येक भागासाठी रांगोळी घालायची पध्दत वेगळी , रंग मिक्स करायचं टेक्निक वेगळं... ४ तास कसे गेले कळले नाही . बॅार्डर कशी काढायची ते कळले. पण रांगोळी पुरी झाली नाही.

जातांना पुठ्यावर काढलेली रांगोळी पुसून टाकायची आणि पुठ्ठा भिंतीला उभा करून ठेवायचा....सरांनी आधीच सांगितलं होतं...इतकं वाईट वाटलं ना पहिल्या दिवशी रांगोळी पुसतांना... आम्ही सगळेच हळहळतं होतो... पण काय करणार? रांगोळीला हा क्षणभंगुरतेचा शापच आहे ना! ती जास्त टिकत नाही, आणि इथे तर आम्हालाच दरवेळी पुसायची होती.......

नंतर आठवडाभर मी घरी प्रॅक्टीस केली. घरी जागा नव्हती. स्वयंपाकघरात , ओट्यापुढच्या छोट्या चौकोनात रांगोळी खडूनी काढायची आणि नंतर घरी कोणी यायच्या आत पुसून टाकायची.

थोडी जमायला लागले… रांगोळी काढायला पण आणि पुसायला पण! मग क्लासमध्ये रांगोळी पुसतांना वाईट वाटेनासे झाले.

त्या रांगोळीने मला एक वेगळाच दृष्टिकोन दिला.आपल्या जिवनाचा मी रांगोळीशी





संबंध जोडायला शिकले. आपलं जीवन पण या रांगोळीसारखचं नाही का?.... आपण या जगात येतो , तेव्हा आपली पाटी कोरी असते. आपण नविन नविन गोष्टी शिकतो. आणि आपल्या आवडीचे एकेक रंग त्यात भरत जाऊन .. आपल्या आयुष्याचे चित्र , स्वप्न रंगवत जातो. रांगोळी जशी पुसली जाते , तसे कधी कधी आपल्या आयुष्याचेही होते. अपयश, काही अडचणी,आजारपण, ह्यामुळे आपले आयुष्यही विस्कटते. पण निराश होऊन , कोमेजून न जाता, परत त्या अडचणींवर मात करत, नविन स्वप्न बघायला सुरवात होते.... नव्यानी रंगाची जमवाजमव कराविशी वाटते.....परत नव्यानी! पुढच्या रविवारी रांगोळी काढाविशी वाटायची ,तसेच!.... आपले आयुष्यही क्षण भंगुर आहे . उद्या काय होईल माहित नाही. कधी संपेल ,माहित नाही.मग आत्ताचा,आलेला हा क्षण ,रंगात बुडून, रंगीत , सुरेख करू या ...... हे मला रांगोळीनी शिकवलं!

सर म्हणाले होते , ज्यांची रांगोळी चांगली येईल , त्यांना प्रदर्शनात रांगोळी काढायला घेणार ! ... आणखी काय हवं होतं? ..

मग घरी प्रॅक्टीस जोरात सुरू झाली.

त्या वेळी घरच्या काहींच मत, ह्या रांगोळीबद्दल चांगलं नव्हतं.... उगीच गैरसमज! चांगली , घरंदाज लोकं “अशी” रांगोळी काढत नाहीत म्हणे! “पाहिली का तुम्ही कधी कुठली रांगोळी मी शिकतेय ती?”.... “नाही!”...... मग उगीचच नकार घंटा कशाला ?पण नविन स्वीकारणे काहींना जमत नाही.म्हणून असा विरोध असतो..

मी एक दिवस बोर्ड आणला आणि घरी त्यावर एक रांगोळी काढली ... ती पाहून मग विरोध कमी झाला....

त्यावर्षी प्रदर्शनात ,आमच्या ग्रूपमधल्या सर्वांनाच संधी मिळाली ... त्याचा आनंदच वेगळा होता!

मराठी नट ,शंकर घाणेकरांची, रांगोळी मी काढली. सरांनी एक दोन सुधारणा सांगितल्या.. पण रांगोळी चांगली आल्याचे समाधान मला मिळाले.

१९७३ साली मी दिवाळीत दादरला पहिली रांगोळी काढली . नंतर १९७४ मध्येही मांजरेकर सरांनी मला रांगोळी काढायला बोलावले. ते वर्ष रायगड किल्याला , शिवाजी महाराजांच्या राज्याभिषकाला,३०० वर्ष , झाली , म्हणून सर्वत्र साजरे होत होते . सरांनीही रायगड हाच विषय घेऊन, रांगोळी प्रदर्शन भरवले होते.

त्यावेळी मी रायगडावरच्या गंगा सागर तलावाची आणि जगदिश मंदीराची रांगोळी काढली होती. किती छान रायगडावरचे फोटो होते.मला तोपर्यंत वाटायचं , रांगोळीला ठराविक विषयच हवेत . पण जसं चित्र काढतांना , काहीही विषय चालतो , तसंच रांगोळीलाही विषयाचे बंधन नाही . काहीही रांगोळीने काढू शकतो. हे तेव्हा कळले . मांजरेकर सरांनी तेव्हा राज्याभिषकाची मोठी रांगोळी काढली होती. सर आणि इतर काही रांगोळी काढणारे ४ दिवस हॅालवरच रहात असतं. सर्व दारं , खिडक्या बंद, लाईट्स , ह्यामुळे उकडहंडी व्हायची नुस्ती... त्यात मांडी घालून , इतके तास बसायचं!पायाची वाट !कंबर वाकून , दुखायची! ज्यांनी अशी रांगोळी काढली असेल त्यांनाच कळेल हे सर्व .पण

हा त्रास रांगोळी काढतांना जाणवायचा नाही. रांगोळी काढतांना एक झपाटलेपण असायचे!

राज्याभिषेकात जवळ जवळ दिडशे व्यक्ती होत्या. त्यांचे भरजरी कपडे, दागिने ,राज्य दरबार, सर्वच बारीक काम! किती पेशन्स हवेत ! सलाम कलाकारांना !ती रांगोळी काढतांना पहाणे , हाही एक आनंद होता. त्यानंतरही मी काही प्रदर्शनात रांगोळ्या काढल्या . आमच्या घराजवळच्या हालमध्ये ६ वर्ष स्वतंत्र प्रदर्शन भरविलें.

८० साली आम्ही भारताबाहेर ऑफिसमधून बदली झाल्यामुळे गेलो. मला वाटले आता माझी रांगोळी संपली .पण मी रांगोळी घेऊन गेले होते. त्यामुळे कुवेत ,दुबईलाही मी रांगोळी काढत राहिले . इतकचं नव्हे तर तिथल्या महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमात

तिथे जाऊन रांगोळी काढायला वेळ नसायचा ,तर घरी एका बोर्डवर रांगोळी काढून, त्याच्यावर दुसरा बोर्ड झाकण म्हणून ठेऊन , गाडीच्या डिकीत घालून घेऊन रांगोळी घेऊन जायचे. ही रांगोळी चिकटवलेली नसायची. हातांनी चिमटीतून सोडून घातलेली असायची. खूप काळजी घेऊन ती न्यावी लागायची. पुसली जाईल कि काय अशी कायम धास्ती असायची . पण एकदाही ती पुसली गेली नाही.

तिथे पांढरी रांगोळी संपल्यावर समुद्रावरची वाळू घेऊनही रांगोळी काढायचा प्रयत्न केला.

भारतात परत आल्यावर, मी थोडी लहान रांगोळी ,घरी काढून त्यावर काचेचे झाकण ठेऊन ( फोटो फ्रेम सारखे) रिक्षातूनही नेऊ लागले.नंतर घरी घेऊन येऊन ती रांगोळी कपाटाखाली , किंवा कोचाखाली ६/६ महिने ठेवत असे. रंग जरा फिकट व्हायचे पण थोडे जास्त दिवस रांगोळी रहायची.

आधी आम्हाला प्रदर्शनासाठी शाळा किंवा एखाद्या हॅालची जागा फुकट किंवा थोडे भाडे देऊन मिळायची. पण नंतर सर्वच कमर्शियल झाल्यामुळे आम्हाला प्रदर्शनासाठी जागा मिळेनाशी झाली. त्यामुळे अशी प्रदर्शनं भरविणे हळू हळू कमी होत गेले. फार कमी ठिकाणी अशा रांगोळ्या आताही काढल्या जातात . आणि प्रदर्शनं भरविली जातात.रांगोळीतून पैसे कधीच मिळत नाहीत. कारण विकण्यासारखे त्यात काहीच नसते. आम्ही हौसेखातर , आमच्याच पदरचे पैसे खर्च करून प्रदर्शन भरवली आहेत. रांगोळी ही नेहमीच एक उपेक्षित कला राहिली आहे. त्याचे मात्र वाईट वाटते. तसेच.. इतर आर्टिस्टना मान मिळतो, प्रसिध्दी मिळते ,

मानधन मिळते तसे ह्या रांगोळी कलाकारांना कधीच मिळत नाही.

तरी रांगोळी काढणे रांगोळी कलाकार सोडत नाही .

रांगोळी ची सर इतर पेंटिंग ला कशी येणार? प्रत्येक माध्यमाचं एक वेगळं टेक्निक असतं! वेगळा फिल असतो! त्या माध्यमातला निर्मितीचा आनंद वेगळा असतो . मला ही रांगोळी आवडते.रांगोळी सगळ्यात कठिण, आव्हान देणारी, चुकली तर सुधारायला चान्स कमी असणारी , आणि जमली तर पूर्ण समाधान देणारी, फोटोच्या रूपात आठवण म्हणून कायम जवळ रहाणारी माझी सखीच मी समजते


Nautical Tax Services

- Individual / Business Taxes
- LLC / Partnership / Corp / Scorp
- Non profit organization tax
- First time tax filling, ITIN
- Students tax filling
- Bookkeeping / Reconciliation
- Back year taxes

IN PERSON & ONLINE SERVICES

Students & Seniors get Discounts

Call for free consultation
818-472-0411




Nautical Tax Services

We provide tax services to individuals, businesses and nonprofit organizations, no matter how big or small. Every tax return requires detailed attention. We strive to give our clients the same type of personalized and thorough service that meets their business or individual needs.

nauticaltaxservices@gmail.com | www.nauticaltaxservices.com
23309 BEACHCOMBER LN, VALENCIA, CA 91355

# भारताचे सर्वोच्च न्यायालय आणि स्वामी विवेकानंद

उत्तेजनार्थ
द्वितीय



संजय श्रीकृष्ण पाठक: मालेगाव कॅम्प

११ सप्टेंबर १८९३ या दिवशी अमेरिकेतील शिकागो येथे आयोजित करण्यात आलेल्या जागतिक सर्वधर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी आपल्या भाषणातून साऱ्या जगाला हिंदू धर्मातील विश्वबंधुत्वाच्या कल्पनेचा परिचय करून दिला. तेव्हापासून सारे जग स्वामीजींच्या विचारांनी प्रभावित झाले आहे .स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा प्रभाव भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकाल पत्रांवरही पडला आहे .सर्वोच्च न्यायालयाच्या निकालपत्रांवर स्वामीजींच्या विचारांचा प्रभाव कसा पडला आहे हे सोदाहरण विशद करणारा हा लेख .

वकिली व्यवसायाशी संबंध असलेल्या कुटुंबात स्वामी विवेकानंदांचा जन्म झाला होता. त्यांचे पणजोबा राममोहन दत्त हे एका इंग्रज वकिलाकडे व्यवस्थापक होते . विवेकानंदांचे आजोबा दुर्गाप्रसाद हे निष्णात कायदेपंडित होते. विवेकानंदांचे वडील विश्वनाथ दत्त हे ' धर अँड दत्त ' नावाच्या कायदा सल्लागार कंपनीत वकील होते . या कंपनीत विश्वनाथ दत्त यांनी आशुतोष धर यांच्याशी भागीदारी केली होती. वकिली व्यवसायात स्थैर्य प्राप्त झाल्यावर विश्वनाथ दत्त हे स्वतंत्रपणे वकिली करू लागले . कलकत्ता उच्च न्यायालयात ते वकिली करत.

त्या काळात ' नरेंद्रनाथ ' या नावाने ओळखले जाणारे विवेकानंद, निमाईचंद्र बोस या वकिलांच्या कंपनीत शिकाऊ लेखनिक म्हणून नोकरीला लागले. वकिली करण्यास पात्र होण्यासाठी नरेंद्रनाथ ही नोकरी करू लागले. ' मेट्रोपोलिटन इन्स्टिट्यूट ' या महाविद्यालयात ( हे महाविद्यालय सध्या विद्यासागर कॉलेज या नावाने ओळखले जाते ) विवेकानंदांनी कायद्याच्या तीन वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला होता. कायद्याची भाषा तपशीलवार व संतुलित असते. ती पुराव्यानिशी मांडली जाते. कायद्याची भाषा वापरण्याच्या पद्धतीचा मोठा प्रभाव विवेकानंदांवर पडला होता. त्या पद्धतीचा वापर ते त्यांच्या भाषणांमध्ये आणि व्याख्यानांमध्ये करीत.

कायद्याची भाषा वापरण्याच्या पद्धतीचा जसा प्रभाव विवेकानंदांवर पडला तसाच विवेकानंदांच्या विचारांचा प्रभाव भारताच्या न्यायव्यवस्थेवर पडला आहे . स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा किंवा मतांचा उल्लेख भारतातल्या विविध न्यायालयांकडून, आणि खास करून सर्वोच्च न्यायालयाकडून, अनेक खटल्यांच्या निकालपत्रांमध्ये करण्यात आला आहे . आजही स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा किंवा मतांचा उल्लेख अनेक खटल्यांच्या निकाल पत्रांमध्ये केला जातो.

स्वामीजींचे कोणते विचार सर्वोच्च न्यायालयाने कोणत्या खटल्यांच्या निकालपत्रात उद्धृत केले आहेत हे पाहणे उद्बोधक ठरेल ! अशा अनेक खटल्यांपैकी काही निवडक खटल्यांचा उल्लेख आणि त्या खटल्यांच्या निकालपत्रातील विवेकानंदांच्या विचारांचा उल्लेख या लेखात केला आहे.

### खरी गरज आहे ती अशा शिक्षणाची

शालेय शिक्षणासाठीच्या राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा ( National Curriculum Framework for School Education ) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (N.C.E.R.T.) तयार केला होता. तो आराखडा प्रसिद्धही केला गेला. आराखडा प्रसिद्ध होताच, आराखड्याच्या विरोधात एक खटला सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आला. केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाशी ( Central Advisory Board for Education ) सल्लामसलत न करताच एन.सी.ई.आर.टी. ने तो आराखडा तयार केला आहे आणि म्हणून तो बेकायदेशीर आहे असं म्हणत एकानं सर्वोच्च न्यायालयात या आराखड्याच्या विरोधात खटला दाखल केला होता. सल्लागार मंडळाशी सल्ला मसलत न करता, एन.सी.ई.आर.टी. चं राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करण्याचं कृत्य कायद्याला धरूनच आहे असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने त्या प्रकरणात दिला.

प्राचीन काळी भारतात शिक्षण देण्यासाठी गुरुकुल पद्धतीचा अवलंब केला जात असे. शिक्षणासाठीच्या राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आराखड्याच्या संदर्भातील त्या खटल्याच्या निकालपत्रात सर्वोच्च न्यायालयाने भारतातल्या प्राचीन गुरुकुल पद्धतीची प्रशंसा केली. स्वामी विवेकानंदांनी मांडलेल्या शिक्षणविषयक विचारांचा उल्लेख आपल्या निकालपत्रात करत सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं – " आपली सध्याची शिक्षणपद्धती ही फक्त माहितीवर आधारित ज्ञान देत असते. विद्यार्थी हा एक आदर्श माणूस बनावा आणि तो समाजातला एक उपयुक्त घटक बनावा या उद्दिष्टाकडे आजच्या शिक्षणपद्धतीत पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. स्वामी विवेकानंदांनी स्पष्टपणे सांगितलं आहे : निरुपयोगी ठरणारी आणि आयुष्यभर गोंधळात टाकणारी माहिती एखाद्याच्या मेंदूत कोंबणे म्हणजे शिक्षण नव्हे. जीवन घडविणाऱ्या , मनुष्य घडविणाऱ्या, चारित्र्य घडविणाऱ्या आणि विविध विचार आत्मसात करण्याची क्षमता प्राप्त करून देणाऱ्या शिक्षणाची आपल्याला गरज आहे. शिक्षण म्हणजे फक्त माहिती देणे एवढंच जर असेल तर मग ते देण्यासाठी ' ग्रंथालय ' आणि ' विश्वकोश ' नावाचे सर्वश्रेष्ठ शिक्षक जगात आहेतच की ! "

### माणूस उन्नत करणे हे उद्दिष्ट

व्यावसायिक महाविद्यालयांसह, विनाअनुदानित अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या आणि अल्पसंख्यांक दर्जा नसलेल्या खासगी महाविद्यालयांवर राखीव जागा आणि शुल्क आकारणी याबाबतची आपली धोरणे आणि इतर नियम राज्य सरकार लादू शकत नाही असा निकाल एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. त्या प्रकरणाच्या निकालपत्रात दर्जेदार शिक्षणाच्या आवश्यकतेवर सर्वोच्च न्यायालयाने भर दिला होता .

स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण मठाचे तेरावे अध्यक्ष स्वामी रंगनाथनंद यांचे विचार न्यायालयाने त्या निकालपत्रात उद्धृत केले होते. ते विचार असे — " व्यक्तिमत्त्वाचा सातत्याने विकास होणे, चारित्र्यात सातत्याने प्रगती होणे आणि जीवनाच्या दर्जात सुधारणा होणे म्हणजे शिक्षण. प्रत्येक अनुभवातून आध्यात्मिक पोषण करण्याची शिक्षित मनाची क्षमता असते, मग तो अनुभव भले पराभवाचा असो किंवा विजयाचा असो , दुःखाचा असो की आनंदाचा असो ! शिक्षण म्हणजे मनाला प्रशिक्षित करणे, मेंदूत काहीतरी कोंबणे नव्हे ! "

" आपल्याला चारित्र्य घडविणारे , मनाची शक्ती वाढविणारे , बुद्धी प्रगल्भ करणारे आणि स्वावलंबी बनविणारे शिक्षण हवे आहे. शिक्षणाचा आणि प्रशिक्षणाचा शेवट मनुष्य निर्माणात झाला पाहिजे. शिक्षणाचे उद्दिष्ट माणूस उन्नत करणे हे असले पाहिजे. जे शिक्षण प्रवृत्ती आणि भावनांवर ताबा ठेवण्यास शिकवतं ते खरं शिक्षण ! "

### मूलभूत मूल्यांचा ऱ्हास

अयोध्येतल्या वादग्रस्त प्रार्थनास्थळाविषयीच्या प्रकरणात न्यायालयाने विवेकानंदांनी केलेल्या धर्माच्या व्याख्येचा आधार घेतला आहे . तो पुढीलप्रमाणे — " स्वामी

विवेकानंद धर्माच्या बाबतीत म्हणतात : धर्म हा काही उपदेश देणे, तत्वे सांगणे आणि बौद्धिक वादविवाद करणे एवढ्यापुरताच मर्यादित नाही. धर्म हा वास्तवात आहे आणि ती वाढत जाणारी गोष्ट आहे . धर्म ही एक वस्तुस्थिती आहे."

न्यायालय पुढे म्हणते – " आपण या प्रार्थनास्थळाच्या वादाच्या मुळाशी जर गेलो तर विवेकानंदांनी सांगितलेला हाच विचार मनात येतो. आपल्या राज्यघटनेत नमूद केलेल्या मूलभूत मूल्यांच्या होत असलेल्या ऱ्हासात या वादाचे मूळ आहे ".

हिंदूंच्या भावना दुखावण्याची शक्यता निर्माण करणाऱ्या एका पुस्तकावर बंदी घालण्याबाबत एक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. त्या याचिकेच्या निकालपत्रात न्यायालयाने म्हटलं — " पुस्तकाच्या योग्यतेबद्दल किंवा त्याच्या चिथावणीखोर भाषेबद्दल आम्ही कोणतंच मत व्यक्त करू इच्छित नाही .मत व्यक्त करण्याआड अनेक गुंतागुंतीचे घटक आहेत. असंस्कृत माणसाचं एखादं कृत्य पुढारलेल्या समाजाचं मनोरंजन करू शकतं. एखाद्या धर्मात , पंथात , देशात किंवा एखाद्या काळात पाळली जाणारी एखादी अघोरी प्रथा ही काहींच्या दृष्टीने पवित्र कृत्य किंवा पवित्र प्रथा असू शकते . स्वामी विवेकानंदांनी धर्माच्या स्वरूपाविषयी अत्यंत परखड शब्दात आपले विचार मांडले आहेत . काही कट्टरपंथीय लोक स्वामी विवेकानंदांनी धर्माविषयी मांडलेल्या परखड मतांमुळे दुखावले जाऊ शकतात. स्वामी विवेकानंद म्हणतात —- एकीकडे आपण म्हणतो की माझा धर्म स्वयंपाकघरात आहे . स्वयंपाकाची भांडी माझा देव आहे. पण दुसरीकडे आपण असंही म्हणतो की, मी सोवळ्यात आहे हं ! मला शिवाशिव केलेली चालत नाही ! " ( पं.जवाहरलाल नेहरूंनी त्यांच्या ' डिस्कव्हरी ऑफ इंडिया ' या पुस्तकात, पृष्ठ क्रमांक ३३९ वर स्वामी विवेकानंदांच्या धर्माविषयीच्या या मताचा उल्लेख केला आहे.)

' द्या आणि घ्या '

नागरिकांच्या परदेश गमनावर बंदी घालण्याच्या सरकारच्या निर्णयाविषयी निकाल देताना आपल्या निकालपत्रात सर्वोच्च न्यायालयाने परदेश प्रवासाच्या महत्त्वाबाबत चर्चा केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने निकालपत्रात स्वामी विवेकानंदांचे काही विचार नमूद केले आहेत .

न्यायालयानं म्हटलं आहे — " स्वामी विवेकानंदांनी पूर्व आणि पश्चिम यांचा संगम घडवून आणला होता. मागील शतकात झालेल्या आपल्या देशाच्या पतनाची योग्य कारणमिमांसा स्वामी विवेकानंदांनी केली आहे. स्वामीजी म्हणतात — इतर देशांबरोबर संबंध न ठेवणं आणि त्यांच्याबरोबर न मिसळणं हे आपल्या देशाच्या पतनाचं मुख्य आणि एकमेव कारण आहे . आपण आपली तुलना इतर देशांशी कधीच केली नाही. आपण इतर देशांची दखलही कधी घेतली नाही . आपण कूपमंडूक ( म्हणजे विहिरीतल्या एखाद्या बेडकाच्या ) वृत्तीचे होतो. "

स्वामी विवेकानंदांचे विचार उद्धृत करून न्यायालय पुढे म्हणतं —- " भारताच्या दुर्दशेच्या आणि पतनाच्या अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचं कारण हे आहे की, भारतानं एखादा शिंपला जसा स्वतःला कवचात अडकवून घेतो तसं स्वतःला संकुचित करून घेतलं होतं. भारतानं इतर वंशांच्या लोकांना आपली रत्ने आणि आपले खजिने कधी दाखवलेच नाहीत आणि कधी दिलेही नाहीत.आर्यावर्ताच्या बाहेरच्या तहानलेल्या देशांना भारतानं जीवनदायी सत्ये देण्याचं नाकारलं. आपण बाहेर कधी गेलोच नाही. आपण इतर देशांशी आपली तुलना कधीच केली नाही. आपण इतर देशांची दखल कधीच घेतली नाही. हे आपल्या पतनाचं मोठं कारण आहे. राजा राममोहन रॉय यांनी अलिप्तपणाची ही भिंत तोडली. तो छोटासा दणका दिल्याच्या दिवसापासून भारतात थोडाफार जिवंतपणा दिसू लागला आहे. त्या दिवसापासून भारताच्या इतिहासानं आणखी एक वळण घेतलं आहे. भारत आता वेगानं वाटचाल करू लागला आहे. भूतकाळात आपल्या समोरचे प्रतिस्पर्धी ताकदीने लहान आणि संख्येने कमी होते. पण आता मात्र प्रतिस्पर्ध्यांचा महापूर आपल्याकडे येत आहे. त्यांचा प्रतिकार आता कोणीही करू शकणार नाही किंवा त्यांना कोणीही अडवू शकणार नाही. म्हणून आता आपणच बाहेर गेलं पाहिजे . ' द्या आणि घ्या ' असा जीवनाचा मूलमंत्र आहे. आपण नेहमी घेतच राहणार आहोत का ? पश्चिमात्यांच्या पायापाशी बसून धर्मासकट सर्वच गोष्टी आपण त्यांच्याचकडून शिकणार आहोत का? त्यांच्यापासून आपण तंत्रज्ञान शिकू शकतो. इतरही अनेक गोष्टी शिकू शकतो. पण आपणही त्यांना काहीतरी शिकवलं पाहिजे. म्हणून आपण बाहेर गेलं पाहिजे. पाश्चिमात्य जगाकडून आपल्याला जे काही हवं आहे ते आपण घेतलं पाहिजे . त्याच्या बदल्यात आपण त्यांना आपली समर्पणवृत्ती, आस्था, पावित्र्य, आध्यात्मिकता दिली पाहिजे. आपल्या या पवित्र भूमीच्या कल्याणासाठी आपण आपल्याकडच्या आध्यात्मवादाची आणि पाश्चिमात्त्यांच्या भौतिकवादाची देवाण-घेवाण केली पाहिजे. समानतेचं नातं नसेल तर मैत्री होऊ शकत नाही. एक पक्ष नेहमीच शिक्षकाची भूमिका बजावतो तर दुसरा पक्ष नेहमी त्याच्या पायाशी बसतो. अशा स्थितीत समानता निर्माण होऊ शकत नाही . तुम्हाला इंग्रज किंवा अमेरिकनांशी बरोबरी करायची असेल तर तुम्ही त्यांच्याकडून शिकण्याबरोबर त्यांना तुम्ही शिकवलंही पाहिजे. आगामी अनेक शतकांपर्यंत त्यांना शिकवता येईल एवढं भरपूर ज्ञान तुमच्याजवळ आहे."

काही निकालपत्रांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा उल्लेख प्रत्यक्षपणे जरी केला नसला तरी त्यांच्या कल्पनांचा आणि विचारांचा उल्लेख अप्रत्यक्षपणे मात्र केला आहे . केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारे यांच्या विरुद्धच्या खटल्यांमध्ये तसेच व्यक्ती- व्यक्तीं मधल्या खटल्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालपत्रात विवेकानंदांच्या विचारांचा उल्लेख केला आहे . " द कम्प्लीट वर्क्स ऑफ स्वामी विवेकानंद " या पुस्तकातील स्वामीजींच्या विचारांचा उल्लेख तर अनेक खटल्यांच्या निकालपत्रात सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांनी केला आहे. स्वामी विवेकानंदांचे विचार जिवंत ठेवण्याचेच काम भारताचे सर्वोच्च न्यायालय एक प्रकारे करीत आहे !

विचार आजही उपयुक्त

स्वामी विवेकानंदांना धर्माच्याच बाबतीत रस होता असं नाही. तर मानवी जीवनाला स्पर्श करणाऱ्या विज्ञान , कला , साहित्य , इतिहास राजकारण यासारख्या अनेक विषयात त्यांना रस होता. भारताच्या प्रगतीत अडथळा आणणाऱ्या गरिबी, अशिक्षितपणा , जातीयवाद, शोषण यासारख्या अनेक समस्यांवर विवेकानंदांनी आपले विचार मांडले आहेत. या समस्यांवर त्यांनी फक्त विचारच मांडले आहेत असं नाही तर या समस्यांवर त्यांनी उपायदेखील सांगितले आहेत . त्यांनी सांगितलेले उपाय शंभराहून अधिक वर्षांपूर्वी जेवढे उपयुक्त वाटत होते तेवढेच ते आजही उपयुक्त वाटतात !

१४ फेब्रुवारी १८९७ रोजी स्वामीजींनी भारताच्या स्वातंत्र्याचा ठाम निर्धार व्यक्त केला होता. भारतीयांना उद्देशून स्वामी विवेकानंद म्हणाले — " पुढील पन्नास वर्षे आपल्यासमोर एकच ध्येय असलं पाहिजे आणि ते म्हणजे आपली ही प्रिय भारतमाता पारतंत्र्यातून मुक्त करणे ."

स्वामीजींचं ते बोलणं भविष्यसूचक ठरलं ! पन्नास वर्षांनंतर भारत खरोखरच स्वतंत्र झाला. स्वामीजी आज प्रत्यक्ष जरी नसले तरी त्यांचा तो निर्धार आपल्याला आजही मार्गदर्शन करीत आहे .देशाच्या प्रगतीसाठी कार्यकारी मंडळ, कायदेकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांचं कामकाज सुरळीतपणे चाललं पाहिजे. लोकशाही जिवंत राहण्यासाठी आणि विकसित होण्यासाठी भारतीय घटनेचं रक्षण करणं आवश्यक आहे . भारतीय घटनेचं रक्षण करण्याची एक जादा जबाबदारी न्यायमंडळावर टाकण्यात आली आहे.

स्वामी विवेकानंदांची शिकवण आणि त्यांचे विचार यांचा आपल्या निकालपत्रात योग्य असा उल्लेख करून भारतीय न्यायव्यवस्था विवेकानंदांच्या स्वप्नातला तेजस्वी भारत प्रत्यक्षात आणत आहे!



Sheetal Rangnekar, California


# Maratha Warrior Queen Ahilyabai Holkar



Dr Major Nalini Janardhanan, Pune

Ahilyabai Holkar was an efficient Maratha Queen who lived during the 18th century. She was an ardent devotee of Lord Shiva and her entry into Indian History was a twist of fate. Rajmata Ahilyabai Holkar was not born into a royal lineage. She was born on 31 May 1725 in Chondi village of Ahmednagar, Maharashtra. Her father Mankoji Shinde, who belonged to the Dhangar (Shepherd) community, was the Patil of the village. Then girls did not go to school, but Mankoji taught her to read and write.

Malhar Rao Holkar, the ruler of Malwa and also the commander(Subedar) of Peshwa Baji Rao, had to stop in Chondi on his way to Pune. There he stayed in Mankoji's house as a guest for a few days when he could interact with the 8-year-old Ahilya. Recognizing her intelligence, kindness, efficiency and strength of character, Malhar Rao selected the girl as the bride for his son Khande Rao.



After her marriage in 1733 to Malhar Rao's son, he became her mentor and had an important role in grooming her into a great queen. Malhar Rao's wife Gautamabai also instilled values in the young Ahilya.

When Ahilyabai's husband Khande Rao was killed in the battle of Kumbher in 1754. Malhar Rao prevented Ahilya from committing Sati. A year after that she was crowned the queen of the Malwa kingdom. Malhar Rao died in 1766. Khande Rao's son Male Rao Holkar became the ruler of Indore in 1766, but he too died in 1767. After that, Ahilyabai took over Indore and appointed Tukoji Rao Holkar as the Chief of Army. She moved the capital to Maheshwar (M.P) on the banks of the Narmada river. Trained both in administrative and military matters by Malhar Rao, she ruled Malwa from 1767 until she died in 1795.

Ahilyabai's accomplishments include the development of Indore from a small village to a prosperous and beautiful city. She also built forts and roads in Malwa, sponsored festivals and gave donations for worship in many Hindu temples. She built dozens of temples, ghats, wells, tanks and rest-houses across India stretching from the Himalayas to pilgrimage centers in South India. The Bharatiya Sanskritikosh lists the sites she embellished as Kashi, Gaya, Somnath, Ayodhya, Mathura, Hardwar, Kanchi, Avanti, Dwarka, Badrinath, Rameshwaram and Jagannathpuri. She made sure that a widow was allowed to adopt a son and retain their husbands' wealth. In 1996 leading citizens of Indore instituted an award in Ahilyabai's name to be bestowed annually on an outstanding public figure. The prime minister of India gave away the first award to Nanaji Deshmukh.

Ahilyabai's capital at Maheshwar was a tapestry of literary, musical, artistic and industrial achievements. She was a lover of literature, art and culture. She welcomed stalwarts like Marathi poet Moropant, Shahir Anantaphandi and Sanskrit scholar Khushali Ram. Craftsmen, sculptors and artists received salaries and honors in her capital. She established the textile industry and introduced the tradition of the Maheshwari sarees.

Ahilyabai was a devotee of Shiva. Her building works and charities at Varanasi (Uttar Pradesh) include the reconstruction of the Kashi Vishwanath Temple in 1780 (which had been previously demolished and converted into a mosque by Aurangzeb in 1669), construction of 9 temples including those of Shri Tarakeshwar, Shri Gangaji, Ahilya Dwarkeshwar, Gautameshwar, reconstruction of Ghats including Manikarnika Ghat, Dashashwamedh Ghat, Janana Ghat, Ahilya Ghat, Shitala

Ghat, construction of Uttarkashi Dharmashala, Rameshwar Panchkoshi Dharmashala, Kapila Dhara Dharmashala and gardens.

Constructions and charities credited to Ahilyabai are Sapta-puris or seven sacred towns (Ayodhya, Mathura–Vrindavan, Haridwar, Kashi, Kanchi, Avantika and Dwarka) and the four dhams or quarters of Aryavarta which are Badrinarain, Dwarka, Rameshwar and Jagannath.

Ahilyabai arranged for water from Ganges to be sent to some temples every year. They were:

-Rameshwara and Pasupateshwara temples (Tamil Nadu),

-Mallikarjunaswamy, Tirupati Balaji and Subrahmanyeshwara temples (Andhra Pradesh),

-Janardanaswamy, Rajarajeshwara and Padmanabhaswamy temples(Kerala),

-Mahabaleshwara temple(Karnataka),

-Dwarkadhish, Ranchhorji, Utkanteshwara, Matrugaya, Loteshwara and Somanath temples (Gujarat)

-Tryambakeshwara, Panchavati, Siddheshwara, Bhimashankara, Pandharpur Panduranga, Vriddheshwara, Vaijanath and Ghrishneshwara temples (Maharashtra)

-Eklingji and Nathdwara Shrinathji temples (Rajasthan),

-Mahakaleshwara and Omkareshwara temples (Madhya Pradesh),

-Kashi Viswanath temple (Uttar Pradesh)

- Vaidyanath temple(Jharkhand).

Ahilyabai had constructed roads lined with trees & Dharamshalas that connected Haridwar, Mathura, Prayag, Ayodhya, Varanasi, Gaya, Deogarh, Bardhaman, Medinipur, Puri, Tirupati, Srikurmam, Kanchipuram, Srirangam, Madurai, Ramanathapuram, Kanyakumari, Thiruvananthapuram, Gokarna, Pandharpur, Prabhas Patan and Dwarka for the benefit of sadhus and pilgrims. These pilgrim roads fell out of use after the introduction of railways in India. As per official records, 43 other towns like Kurukshetra, Nemisharanya, Pushkar, Ellora, Chitrakut, Prayag and Pandharpur also received her attention. She built temples, ghats, wells and tanks in some of these towns. She sanctioned annual expenses for illumination and annual gifts to many temples. She donated money from her personal resources to charity.

She organized a good postal system and all soldiers and subjects had faith that, in case of their death in the field or unprovoked violence, their family will be taken care of by Devi Ahilya. As a Maratha historian observes, “Devi's name had become synonymous with charitable institutions.” Though a pious lady who devoted considerable time to prayers and meditation, she attended to the state business for at least six hours a day with the utmost regularity. From 1766 till her death in 1795, Ahilyabai ruled a large part of central India. Her 30 years long rule is regarded as a “model of benevolent and effective government.”

Marathi books written about Ahilya

- Punyashlok Ahilya by M. S. Dixit
- Ahilyabai by Hiralal Sharma
- Ahilyabai Charitra by Purshottam
- Ahilyabai Charitra by Mukund Vaman Barve
- Karmayogini by Vijaya Jahagirdar
- Dnyat Adnyat Ahilyabai Holkar by Vinaya Khadapekar
- Pal Samaaj on Samaaj

Honors:

- A commemorative stamp was issued in her honor on 25 August 1996.
- In Thane, Maharashtra, a children's park has been named ‘Ahilyadevi Holkar Udyan’ and a road has been named after her.
- Former Lok Sabha Speaker Sumitra Mahajan has written a book “Matoshree” based on the life of Ahilyadevi Holkar.
- A film titled Devi Ahilya Bai was produced in 2002.
- A documentary for UGC-CEC channel VYAS was made by Educational Multimedia Research Centre, Indore about her life and times.
- Indore International Airport is named Devi Ahilya Bai Holkar Airport in her honor.
- There are two universities named Devi Ahilya Vishwa Vidyalaya in Indore, Madhya Pradesh, and Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University in Solapur, Maharashtra.
- In 2006, a statue of Ahilyabai Holkar was unveiled on the premises of the Parliament Library Building by Vice-President Bhairon Singh Shekhawat.
- In the 1994 Hindi TV series The Great Maratha, Ahilyabai's character was portrayed.
- In 2016, a TV serial titled Punyashlok Ahilybai Holkar aired on Colors Marathi.
- Since 2021, a TV serial titled Punyashlok Ahilyabai is being aired on Sony.

· State Highway 15 (West Bengal) has been renamed Ahilyabai Holkar Road.

· A statue of Ahilyabai has been installed in the Kashi Vishwanath Dham by Prime Minister Narendra Modi.

"The reign of Ahilyabai, of Indore in central India, lasted for thirty years. This has become almost legendary as a period during which perfect order and good government prevailed and the people prospered. She was a very able ruler and organizer, highly respected during her lifetime, and considered as a saint by a grateful people after her death."- Jawaharlal Nehru, The Discovery of India (1946)

. "In latter days from Brahma came,

To rule our land, a noble dame,

Kind was her heart and bright her fame,

Ahilya was her honored name." -Joanna Baillie, English Poem (1849)

· Sir John Malcolm wrote about her, "Her first principle of Government appears to have been moderate assessment and an almost sacred respect for the native rights of the village officers. She heard every complaint in person and although she continually referred cases to the courts of equity and arbitration she was always accessible, patient and unwearied in the investigation of most insignificant cases when appeals were made to her for decision."

· "Indore long mourned its noble Queen, happy had been her reign and her memory is cherished with deep reverence unto this day."- Annie Besant

Lokmata Ahilyabai's rule is known for "trophies of peace and not war". Her 3-decade reign was marked by peace, absence of famine and social harmony. Her subjects had implicit faith in her benevolence and she was the final court of appeal whom anyone could approach with the hope of getting help or justice. It was a golden period in history. Even the British, whom she opposed steadfastly, praised her as a truly great ruler. John Keay called her 'The Philosopher Queen'.

Punyashlok Devi Ahilyabai made a place for herself in an era of maledomination. A bastion of woman empowerment, a benevolent ruler, social reformer, educationist, philanthropist and supporter of women's rights, she truly deserves an honorable place in the history of India. She is a role model and true inspiration for women. My humble tributes to the great lady!

JAI MALHAR!

# गुलमोहर माझ्या मनातला

**मुग्धा माधव केळकर**

प्रेमाचा रंग घेत बहरला,

गुलमोहर माझ्या मनातला ॥

कधी पिवळा, कधी केशरी,

कधी प्रीत लालीमा बिखरी,

रंगरंगात, पानात फुलला,

गुलमोहर वाटेत सजला।

नसे उपमा याच्या दिमाखाला

गुलमोहर माझ्या मनातला ॥

ऊन्हाचा दाह सोसुनी,

मोहरावे पानोपानी,

देत गारवा, कसे लढावे

हे गुलमोहरांने सांगावे।

देई सुख आनंद जीवनाला,

गुलमोहर माझ्या मनातला ॥

सोडूनी तरुला येत भूवरी,

मऊ गालीचासम पसरावे,

आयुष्य हे क्षणभंगूर जरी,

लोकांच्या सदा कामी यावे।

सांगतो जीवन रीत जगाला,

गुलमोहर माझ्या मनातला ॥

आयुष्य माझे गुलमोहर व्हावे,

गुलमोहराचे मी फूल व्हावे,

सदा सुखी, आनंदात जगावे, जीवनाला पूर्णत्व मिळावे।

येऊदे अर्थ माझ्या जीवनाला,

सांगे गुलमोहर मनातला ॥

गुलमोहर माझ्या मनातला ॥

# लेखन स्पर्धा विजेते :

प्रथम पारितोषिक ६००० रुपयांचं

लेख: "संस्कृती म्हणजे नक्की काय"  लेखिका: संध्या सावंत, ठाणे

दुसरं पारितोषिक ५००० रुपयांचं

लेख: "कवितेची जन्मकथाऋण - श्री.दि.इनामदार"

लेखक : किरण शिवहर डोंगरदिवे, बुलडाणा

उत्तेजनार्थ प्रथम पारितोषिक २००० रुपयांचं

कथा: "माळरानाची वाघीण"

लेखिका: भाग्यश्री महाजन, नाशिक

उत्तेजनार्थ दुसरं पारितोषिक २००० रुपयांचं

लेख: "भारताचे सर्वोच्च न्यायालय आणि स्वामी विवेकानंद"

लेखक: संजय पाठक : मालेगाव

उत्तेजनार्थ तिसरं पारितोषिक: २००० रुपयांचं

कथा:अनुमती लेखक अमित भावे, कैलिफोर्निया

ह्या सर्वांचं पुन्हा एकदा मन:पूर्वक अभिनंदन

# अनुक्रमणिका नंबर अकरा



महेश सोवनी, नांदेड

"पहा जोशी मॅडम. बोर्ड कसा दिसतो आहे?' काळे मॅडमनी दोन्ही हातात बोर्ड धरून विचारले. नूतन मराठी शाळा पहिलीसाठी प्रवेश चालू. वह्या, पुस्तके, गणवेश, ये-जा करण्यासाठी वाहन सर्व काही मोफत, बोर्ड वर लिहिले होते.'छान झाला आहे. थोडा सा डाव्या बाजूला वळव. हा, आता झाला सरळ.' मुख्याधिपिका जोशी मॅडम चष्म्याच्या काड्या धरत म्हणाल्या. वयाच्या सोळाव्या वर्षी चष्मा लागल्यावर जी त्याच्या काड्या सावरण्याची सवय त्यांना लागली ती वयाच्या छपन्नाव्या वर्षी ही कायम होती. ह्या शाळेतील शिक्षक, लिपिक, शिपाई आणि सब कुछ म्हणजे जोशी आणि काळे बाई. काळे बाईंना सुद्धा चांगली दहा वर्षे झाली होती नोकरीत. शासनाच्या धोरणाप्रमाणे प्राथमिक शाळेत शिपाई, लिपिक पदेच नाहीत. मराठी शाळेला जशी गळती लागली तसे शिक्षक कमी कमी होत गेले. राहता राहिल्या केवळ या दोघी, सर्वात वरिष्ठ शिक्षिका.

'अगं, बोर्ड चे किती पैसे झाले सांग?' जोशी मॅडम म्हणाल्या.'राहू द्या हो मॅडम,' काळे बाई बोर्ड बाजूला ठेवत म्हणाल्या.'राहू द्या कसे. बोर्ड तू ही विकतच आणलास ना. कितीला आणलास करून?''सोळाशे ला.' काळे मॅडमना जोशी बाईंचा हा हिशोबी स्वभाव आवडायचा. कधी कधी त्या अतिरेक करतात असेही वाटायचे. आता चहा प्यायला गेलं आणि काळे मॅडमनी बिल दिले तर लगेच का कोणी पर्स उघडून स्वतःचा हिस्सा देते? पण जोशी मॅडम द्यायच्याच.'हे घे आठशे रुपये. माझा हिस्सा.' असे म्हणत जोशी मॅडमनी पर्स उघडून पैसे काढून दिले.

'पण मला कधी कधी प्रश्न पडतो कि बोर्ड लावून काही फायदा होतो का. मागच्या वेळी बोर्ड लावला तरी पटसंख्या सोळा च्या वर गेली नाही.' काळे बाई म्हणाल्या.' 'आपण करत राहायचे गं. माध्यमिकचे सर बघ प्रत्येक वस्तीत, झोपडपट्टीत जावून विद्यार्थी मिळवतात.''त्यांचे सोडा. सहा पगार येतात त्यांच्या घरात. दोन मुले, सुना, बायको सगळेच नोकरीला. विद्यार्थी ने-आण करायला नऊ हजार रुपये खिशातून देतात ते. मी तर वर्ष झाले नवीन साडी घातली नाही.' 'साडी घातली नाही गं, नेसली म्हणावं.' जोशी मॅडम म्हणाल्या.'मॅडम तुम्ही मला चुका सांगता म्हणून मी एवढी सुधारले, पण तरी ही म्हराटी काय सुधारत नाही बघा.'जोशी मॅडम गालातल्या गालात हसल्या.'सॉरी, म रा ठी, मराठी सुधारत नाही.' काळे बाई म्हणाल्या. 'मी दोन नववीतल्या पोरांना बोलावलं आहे. मदत करतील ते बोर्ड लावायला.' त्या पुढे म्हणाल्या.

'एक जमाना होता, आपल्या शाळेत प्रवेश मिळण्यासाठी पालक सकाळ पासून रांगा लावायचे. आणि आता आपण विद्यार्थी मिळवण्यासाठी दारोदार भटकतो.' जोशी मॅडम म्हणाल्या.'हो मॅडम, पण गरज आपल्यालाच ना? पटसंख्या नाही भरली तर शाळा बंद पडेल आणि आपल्याला शासन पाठवेल मग गडचिरोलीला. सगळं इंग्लिश मिडीयममुळे झाले.''पालकांना तरी दोष देवून काय उपयोग? सरकारी, मोफत शिक्षण म्हणजे कमी प्रतीचे शिक्षण असा समज झाला आहे पालकांचा. खाजगी शाळा म्हणजे बासमती तांदूळ आणि आपले रेशनचे तांदूळ अशी गत झाली आहे.'

'तांदळावरून आठवले आज मला खिचडीचा तांदूळ पोती मोजून द्यायचा आहे ठेकेदाराला.' काळे मॅडम खुर्ची वरून उठल्या.'हे ही काम आता तुझ्याकडे दिले का?''मला शिजवावा लागत नाही नशीब! केवळ पोती मोजून सही करावी लागते.'इतक्यात एक चकचकीत मर्सिडिस गाडी शाळेच्या पटांगणात येवून थांबली. गाडीवर डॉक्टरचे स्टीकर लावले होते. जोशी मॅडम पदर नीट करत बाहेर गेल्या. गाडीतून एक तरुण जोडपे आणि एक छोटी मुलगी उतरले. जोशी मॅडमनी त्यांचे स्वागत केले.

'मी डॉक्टर पुराणिक. सिविल सर्जन म्हणून नुकताच रुजू झालो. ही माझी कन्या सावी. हिच्या पहिलीच्या प्रवेशासाठी चौकशी करण्यासाठी आम्ही आलो.' डॉक्टर पुराणिक उंचे पुरे, रुबाबदार, भारदस्त व्यक्तिमत्व होते. मिसेस पुराणिक काहीश्या ठेंगण्या पण तुकतुकीत कांतीच्या होत्या. सावी तर अगदी बाहुलीच होती.'या ना. आत ऑफिसमध्ये बसून बोलू.' असे म्हणून जोशी बाई त्यांना आत घेवून गेल्या.'मी स्वतः झेड पी च्या शाळेत शिकलो. मी झालोच कि डॉक्टर. ह्या इंग्लिश मिडीयम शाळात लाख लाख रुपये फी. माझ्या एम बी बी एस च्या शिक्षणाला सुद्धा एवढा खर्च आला नाही.' डॉक्टर पुराणिक म्हणाले.'आणि एवढे करून हातात काय पडते? माझ्या भाच्याचे बघत आहोत आम्ही. तिसरीला आहे आता. इंग्लिशच काय मराठी सुद्धा धड वाचता येत नाही त्याला.' मिसेस पुराणिक म्हणाल्या.'म्हणून आम्ही ठरवले कि मुलीला मराठी माध्यमातच घालायचे.' डॉक्टर पुराणिक म्हणाले 'एकदा आमची शाळा बघून घ्या. तसं सगळं छानच आहे, पण आपण एकदा बघितलेली बरी.' जोशी बाई म्हणाल्या. त्यांनी त्यांना शाळा फिरवून दाखवली. ते पहिलीच्या वर्गात गेले.'पहिलाच वर्ग इथेच भरतो का?' मिसेस पुराणिक यांनी विचारले.'हो. एका ओळीत पहिलीला बसवतो, एका ओळीत दुसरीला. पट संख्या कमी आहे. चाळीस मुला मागे एक शिक्षक. त्यामुळे दोन वर्ग एकच शिक्षक सांभाळतो.' जोशी मॅडम काचरत म्हणाल्या. बोचरे असले तरी सत्य सांगणे भाग होते.

'बरे आहे कि मग. पहिली बरोबर दुसरीचा सुद्धा अभ्यास होइल हिचा.' डॉक्टर पुराणिक म्हणाले. त्यांच्या या उत्तराने जोशी मॅडम आश्वासित झाल्या.'पहिलीतील मुलानांही दुसरीतील कविता पाठ होवून जातात.' मागून काळे बाई आल्या व म्हणाल्या. 'आमच्या लहानपणी तर चार वर्ग एकत्र भरायचे.' डॉक्टर पुराणिक म्हणाले.जोशी बाईंनी डॉक्टर पुराणिक यांना काळे मॅडमची ओळख करून दिली. 'आमच्या टॉयलेट्स सुद्धा एकदम स्वच्छ आहेत.' काळे बाई म्हणाल्या. सावी आणि तिची आई टॉयलेट्स बघून आले.'खरंच स्वच्छ आहेत.' मिसेस पुराणिक म्हणाल्या. 'आणि कमोड सुद्धा आहे.' सावी म्हणाली. 'एवढ्याशा मुलांना कशाला कमोड?' मिसेस पुराणिक म्हणाल्या. 'एखादे मुल दिव्यांग असेल तर, त्या साठी.' जोशी मॅडम म्हणाल्या.

'हो, शासनाच्या नियमा प्रमाणे त्या सर्व पूर्तता कराव्याच लागतात. हिच गोष्ट आवडती मला सरकारी संस्था बाबत, मग ती शाळा असो कि दवाखाना, त्यांना शासनाचे सर्व नियम पाळावेच लागतात. खाजगी शाळात कुठले आलेत प्रशिक्षित शिक्षक. बी ए, बी कॉम झाल्येल्या मुली लग्न ठरे पर्यंत कमी पगारावर काम करतात. त्याच मुलांना शिकवणीसाठी बोलावतात. त्यांचा पेट्रोल, मोबाईलचा खर्च निघतो. त्या त्यातच सुखी. मी म्हणतो, सगळ्यात जास्त पगार शिक्षक आणि सैनिक यांना दिला पाहिजे. देश तेच घडवतात.' डॉक्टर पुराणिक म्हणाले.'खरं आहे.' काळे बाईंनी सहमतीदर्शक मान डोलावली. 'एक वर्ष घालून बघा आमच्या शाळेत.' जोशी मॅडम म्हणाल्या. प्रवेशासाठी आधार कार्ड आणि जन्म दाखला लागेल, असे जोशी मॅडम नी सांगितल्यावर, मिसेस पुराणिक म्हणाल्या, 'ओरिजिनल?''नाही. झेरॉक्स.' जोशी बाई म्हणाल्या. उद्या कागदपत्रे घेवून येतो, असे म्हणून डॉक्टर पुराणिक गेले. जाताना शाळा आवडल्याचेही ते सांगून गेले. 'अशी चांगली मुले आली तर शाळेचे नाव परत होईल.' जोशी मॅडम म्हणाल्या. 'चांगली मुले म्हणजे कोण? श्रीमंतांची?' काळे बाईंनी विचारले. 'नाही गं. चांगली म्हणजे ज्यांच्या घरात शैक्षणिक वातावरण आहे अशी. घरात थोडे करून घेतलेले असले कि आपले काम थोडे सोपे होते.'

'पण तसे वातावरण नसलेल्या मुलांना शिकवणे हे ही आपलेच काम नाही का?' 'अगं, तो मुद्दाच नाही आहे. मला म्हणायचे आहे कि, जरा घरात अभ्यास करून घेतला जाणारी मुले आली कि ती विविध स्पर्धेत चमकतात आणि शाळेचे नाव होते. मग प्रवेश आपोआप वाढतात.' 'हे तर माझ्या लक्षातच आले नाही. म्हणजे मग आपल्याला हा प्रवेशाचा बोर्ड लावायची गरज नाही.''बोर्ड तर लावावा लागेल. पण तो अभिनंदनाचा असेल. आपले विद्यार्थी स्कॉलरशिप, एन टी एस, एम टी एस च्या परीक्षेत चमकतील ना.''हो, मग पट संख्या वाढेल, आणि आपल्याला कोणीही गडचिरोलीत फेकणार नाही अतिरिक्त शिक्षक म्हणून. किती छान होइल हो जोशी मॅडम असे झाले तर. पण ती श्रीमंताची पोर बसेल का आपल्या शाळेत? आपल्या वर्गातील पंखे सुद्धा चालत नाहीत.'

'पंखे करून घेवू आपण, आणि मुलांचे नसतात असले काही नखरे. त्यांना बागडायला बरोबरीची मुले मिळाली कि खुश असतात ती.''वर्गाच्या दरातील फरशी तुटली आहे. ती ही बसवून घ्यायला हवी. उगाच त्या पोरीच्या पायाला लागायला नको.''मी आणते सिमेंट उद्या. घरात बांधकामाचे उरले आहे थोडे. आपणच बसवू.''एक मात्र खरे मॅडम, ही डॉक्टरांची पोर आपल्या शाळेत येणार म्हटल्यावर मलाही कॉलर जरा ताठ झाल्या सारखे वाटत आहे.''तूच म्हणते आहेस म्हणून बरे बाई. नाही तर मला तर सगळी मुले

सारखीच असे म्हणत समाजवादाचा धडाच शिकवला असतास तू. बरं, आज उकडीचे मोदक आणले आहेत. तुला आवडतात ना?''जोशी मॅडम, पण आज कसे काय मोदक?''अगं असेच, मुलगा कर म्हणाला म्हणून केले. माझ्या ह्या मुलीलाही आवडतात म्हणून आणले. तुम्ही आम्हाला आपले माना अगर ना माना आम्ही तुम्हाला आपले मानतो.''अहो आम्हाला पण तुम्ही आवडताच कि. पण फक्त तुम्हा लोकांचे जरा जास्तच स्पष्ट असतंय बघा.'

'अगं, इतकं स्पष्ट बोलता येणे ही सुद्धा एक कला आहे. बरं, तू आरामात बसून खा. मी जरा ही माहिती पाठवून येते. वरून फोन आला आहे. एकदम अर्जंट.''त्यांना काय जातंय अर्जंट म्हणायला. इकडे प्राथमिक शाळांना ना लिपिक ना शिपाई, आणि ह्यांना सगळे अर्जंट''छान पुष्पगुच्छ आणलास कि.' जोशी मॅडम म्हणाल्या.'होय. आज येताना बाजारात दिसला. म्हटले छान दिसेल तुमच्या टेबल वर. आज येतील ना डॉक्टर?''अच्छा, हा पुष्पगुच्छ डॉक्टर येणार म्हणून.''नाही हो, तुमच्या साठीच आणला आहे मी.''अगं, गम्मत करती आहे मी. खरं सांगू मी पण त्यांचीच वाट बघत आहे. एक चैतन्यच आले आहे बघ काल पासून.'

'होय. इतका मोठा माणूस. रग्गड पैसे असणारा, मुलीला कोणत्याही मोठ्या शाळेत घालू शकणारा, मुलीला आपल्या शाळेत घालणार हा त्यांनी आपल्यावर दाखवलेला विश्वास आहे. हे फिलिंग जगातले सगळ्यात भारी फिलिंग आहे. आपण कोणी तरी आहोत, आपलेही काम महत्वाचे आहे असे वाटायला लागले आहे.' काळे बाई म्हणाल्या.पण ही सुखद भावना फार काळ काही टिकली नाही. कारण डॉक्टर पुराणिक किंवा त्यांच्या घरातील कुणीही त्या दिवशी आलेच नाहीत. आले ते काळे काळे मेघ, आणि त्या मागे दडलेली घोर निराशा.

त्यानंतर एक आठवडा उलटूनही  प्रवेश घ्यायला ना डॉक्टर आले, ना इतर कोणी पालक. जोशी बाई आणि काळे बाई खिन्न मनाने ऑफिस मध्ये बसल्या होत्या.'उद्या पासून शाळा सुरु होईल. ह्या वर्षी फक्त दहा प्रवेश झाले गं. तर मी गावभर सांगून ठेवले डॉक्टर साहेबांची मुलगी आमच्या शाळेत येणार आहे म्हणून. वाटले हे ऐकून तरी पालक आपल्याकडे वळतील. पण कुठले काय.''असच चालू राहिले तर, आपण अतिरीक्तच होवू. मग गडचिरोली का कुठे पाठवतील तिथे जावे लागेल.''घर बांधायला काढले आहे. ह्यांची बदली दुसऱ्यागावी. मुलाचे लग्नाचे बघायचे आहे. माझे तर अवघडच होईल बघ सगळे.''कोविडमुळे लोकांच्या नोकऱ्या गेल्या, पण इंग्लिश मिडीयमची हौस गेली नाही.' काळे बाई म्हणाल्या.

'लोकांना कशाला बोलायचे, तू तरी कुठे तुझ्या मुलाला आपल्या शाळेत घातलेस.''खरं सांगू जोशी मॅडम, माझी खूप इच्छा होती मुलाला आपल्या शाळेत, मराठी माध्यमात घालायची. पण घरात माझे काहीही चालतच नाही.  कधी कधी वाटते कि हा महिन्याच्या महिन्याला पगार येतो ना, म्हणून मला घरात तरी ठेवून घेतले आहे.''अगं, एवढी शिकलेली तू, कमावती. तुला काय वाटते ते बोल ना स्पष्टपणे घरच्यांशी.''तो ही प्रयत्न केला. पण म्हणतात .... म्हणतात तुझी शाळा नको शिकवू आम्हाला.''नवऱ्याला तरी समजाव. चांगला इंजिनिअर आहे ना तो.''आता पर्यंत कधी बोलले नाही. कशी बोलणार चूक माझीच. एक दिवस त्यांनी माझी चॅट्स पहिली. काहीही अश्लील वगैरे नव्हते त्यात. पण मी माझ्या एका जुन्या मित्राच्या संपर्कात आहे, हे त्यांना कळले.'  'जुना मित्र?' 'प्रियकर.''हे तुझ्या नवऱ्याला कोणी सांगितले?'

'मीच सांगितले लग्नाअगोदर. बाहेरून कळण्यापेक्षा मी सांगणे बरे असे वाटले मला. सगळं माहित असूनही त्यांनी मला स्वीकारले. पण आता ही चॅट्स पाहिल्यापासून बोलतच नाहीत माझ्याशी.  आता जर का घर सोडून लांब जावे लागले मला, तर सगळंच संपले. सध्या मुलाकडे पाहून तरी मला घरात ठेवले आहे.' 'मुलाकडे नाही, पगाराकडे पाहून.' 'कसेही असुद्या हो. मने दुरावली तरी अजून घर तर नाही दुरावलेले मला. पण आता. बाईला एकटे राहणे ती कितीही शिकलेली असली तरी अवघडच.'

'अगं, असं काय बोलतेस. जे शिक्षण जगण्याचा आत्मविश्वास नाही देऊ शकत ते कसले शिक्षण.''जोशी मॅडम, खरं सांगते नाही हो माझ्यात बळ एकटीने दूर कुठेतरी जाऊन राहण्याचे. मी सदैव दहा माणसात राहिलेली. अगदी कोपऱ्यावरच्या वाण्याच्या दुकानात जायचे म्हटले तरी भाऊ-बहिण कोणी तर सोबत असायचेच. पण दूर कुठे तरी दुर्गम भागात माझ्या सोबत येवून राहू शकतील असे कोणच नाही हो घरात. आता सगळे आपापल्या व्यापात व्यस्त. आणि नोकरीही सोडू शकत नाही मी. मग, माझी काहीच किंमत नाही उरणार.'

आपल्या मानसपुत्रीची कशी समजूत काढावी हे जोशी बाईना समजेना. काय सांगावे तिला, दे नवऱ्याला सोडून. छे...छे... ते तर शक्य नाही. एकत्र कुटुंबात वाढल्यामुळे झाली असेल का ही अशी. ना कोणता निर्णय स्वतंत्रपणे घेवू शकते ना एकटी कुठे राहू शकते. आता ती अशा वयाच्या टप्प्यात होती कि तिला नव्याने घडवणे अवघड होते. पण तिला असे अगतीकही त्या पाहू शकत नव्हत्या.


'तू इथेच राहशील. तशी वेळच आली तर मी राजीनामा देईन. म्हणजे माझ्या जागेवर तू राहशील इथे.''अहो, मॅडम काय बोलताय. तुम्ही कशाला राजीनामा देताय?'

'अगं खरंच. तुला माहिती नसेल, कधी बोलले नाही तुला. माझ्या नोकरी करण्याला सासरी विरोध होता. काय गरज आहे तुला नोकरी करण्याची, असे म्हणत सासूबाईनी टोकले होते. पण मी भांडून भांडून लागले नोकरीला. पण आज खरेच वाटते गं, काय गरज होती मला नोकरी करण्याची. सकाळी उठून मी स्वैपाक करुन शाळेत यायचे. मुलगा म्हणायचा, गार अन्न जात नाही. कैकवेळा तर मी त्याला आजारी सुद्धा सोडून आली आहे. आज खूप क्षल्य वाटते गं त्याचे. खरंच मी खूप क्रूर होते. मुलगा माझ्यापासून खूप दूर गेला आहे, हे मला समजते गं. पण आता मी काहीही करू शकत नाही. एक चांगली आई मी कधीच होऊ शकले नाही, ही बोच मला शेवटपर्यंत राहील. आजही तो मोदक करा असे म्हणाला नाही. हल्ली तर तो माझ्याशी बोलत देखील नाही. मीच दरी सांधण्याचा प्रयत्न करते. त्याचाच भाग म्हणून आज मोदक केले. पण तो मला भूक नाही म्हणत निघून गेला.'

आकाशात जोराचा गडगडाट झाला. दोघीच्या डोळ्यातून धारा बरसल्या.एवढ्यात पटांगणात एक गाडी आली.'अगं, डॉक्टर पुराणिक आले वाटते.' जोशी बाई म्हणाल्या.'मॅडम भलत्या वेळी काही तरी थट्टा करू नका. मला किती टेन्शन् आले आहे.'जोशी बाई काही बोलतील एवढ्यात डॉक्टर पुराणिक आणि सावी त्यांच्या ऑफिस समोर आले होते.

'या डॉक्टर.' जोशी बाई म्हणाल्या.'माफ करा. मला थोडा उशीर झाला.' डॉक्टर म्हणाले.'अहो नाही. शाळा उद्यापासून सुरु होणार आहे.' काळे बाई म्हणाल्या.'सावीची आजी, म्हणजे तिच्या आईची आई अचानक वारली, हार्ट अटॅकने. आम्हाला तिकडे जावे लागले. तिची आई अजून तिथेच, म्हणजे तिच्या माहेरीच आहे. आम्ही दोघेच आलो परत ऍडमिशनसाठी. ही कागदपत्रे.' असे म्हणत त्यांनी बॅग मधून कागदपत्रे काढली.

काळे बाईंनी रजिस्टरला नोंद केली. अनुक्रमणिका नंबर अकरा सावी अरुण पुराणिक.




Meenakshi Ingle, Dubai

# वर्डलमहिमा



गौतम पंगू, न्यू जर्सी

"Aai, Baba, what are you doing? I didn't know you were hiding here to do THAT! " अचानक बेडरूमचं दार उघडून आत आलेली आमची मुलगी किंचाळली, आणि आम्ही जे करत होतो ते लपवता लपवता आमची तारांबळ उडाली. नाही, नाही.... कुठलाही गैरसमज व्हायच्या आधी सांगतो की आम्ही दुसरंतिसरं काही करत नव्हतो तर मुलगी तिच्या खोलीत खेळण्यात मग्न आहे असं समजून बेडरूमच्या दोन कोपऱ्यांत बसून आपापल्या फोनवर वर्डल सोडवत होतो!

मागच्या काही महिन्यांपासून दररोज 'वर्डल' हा शब्दखेळ सोडवायचा नाद अनेक लोकांसारखा आम्हांलाही लागलाय. आमच्या मुलीलाही ते सोडवायचं असतं. पण तिला अजून आमची थोडी मदत लागते. त्यामुळं ती सोडवायला लागली की आम्हांला हाका मारत सुटते. सोमवार ते शुक्रवार आम्ही दोघं दिवसभरात पाचदहा मिनिटं वेळ मिळाला की आपापलं वर्डल सोडवून घेतो आणि मग संध्याकाळी ती शाळेतून आली की तिला वर्डल सोडवायला मदत करतो. पण वीकेंडला सगळेच घरी असतात. त्यामुळं ती सोडवायला बसायच्या आत आपापलं वर्डल सोडवून टाकायची आम्हांला घाई असते. त्यात तिला मोठमोठ्यानं कॉमेंट्री करत वर्डल सोडवायची सवय आहे. त्यामुळं तिचं " मी दोन गेस केले. आता मला कळलंय की दुसरं अक्षर L आहे आणि E तिसरं अक्षर नाही आहे" वगैरे सुरु झालं आणि आम्ही अजून सोडवलं नसलं की अक्षरश: कानावर अपशब्द पडत असल्याप्रमाणं कान झाकून तिथून पळत सुटतो. जोवर आमचं वर्डल सोडवून होत नाही तोवर चुकूनसुद्धा एकमेकांचे सेलफोन स्क्रीन दिसू नयेत म्हणून ग्रहणात थेट सूर्याकडं बघायचं टाळतात तसं आम्ही एकमेकांच्या फोनकडं थेट बघणं टाळतो. चुकून कुणी तोंडातून 'व' जरी काढला तरी "मी अजून सोडवलेलं नाही. त्याबद्दल माझ्याशी काही बोलू नको!" असं ओरडतो. शेवटी एकदाचं प्रत्येकाचं वर्डल सोडवून झालं की आम्ही एकमेकांशी मोकळेपणानं बोलायला मोकळे होतो!

यातला गंमतीचा भाग सोडला तर गेल्या काही महिन्यांत वर्डलनं मिळवलेली लोकप्रियता आश्चर्यकारक आहे. आश्चर्यकारक यासाठी की सध्याच्या काळात लोकप्रियतेसाठी आवश्यक समजल्या जाणाऱ्या कुठल्याच गोष्टी वर्डलमध्ये नाहीयेत. हा खेळ दिवसातून एकदाच खेळता येतो. ते झालं की दुसऱ्या दिवशीच्या नवीन वर्डलची वाट बघावी लागते. म्हणजे बिंजिंग वगैरे भानगडी नाहीत. वर्डल खेळायला कुठं अकाउंट उघडावा लागत नाही, साईनप करावं लागत नाही, पैसे द्यावे लागत नाहीत. शिवाय हिंसा, सेक्स, शिवराळ भाषा किंवा कुठले वादग्रस्त विषय यांचाही वर्डलशी संबंध नाही. दररोज एक पाच अक्षरी शब्द सहा प्रयत्नांत गेस करायचा इतकाच हा 'बेसिक' गेम. शब्दसंपत्ती आणि लॉजिकल गेसवर्क यांच्यावर आधारलेला. हा काही मिनिटांत खेळून संपतो. त्याचं रुपडंसुद्धा अगदी बाळबोध म्हणावं असंच. तरीही (किंवा कदाचित त्यामुळंच) वर्डलला इतकी लोकप्रियता मिळावी ही आश्चर्याची आणि आनंदाची गोष्ट आहे. आणि उत्तर न फोडता आपला स्कोअर शेअर करायची सोय असल्यानं सध्याच्या 'इन्स्टंट कम्युनिकेशन' च्या काळात या खेळाद्वारे लोक एकमेकांशी जोडले जातायत हेही चांगलंय. अर्थात माझ्या माहितीचे असेही काही महाभाग आहेत की जे कॉम्प्युटरवर आधी खेळतात आणि एकदा शब्द कळाला की सेलफोनवर पुन्हा 'खेळून' पहिल्याच प्रयत्नात उत्तर आल्याचे स्क्रीनशॉट्स टाकून मिरवतात. किंवा नुसता स्कोअर न पोस्ट करता उत्तर पोस्ट करून दुसऱ्यांचा आनंद हिरावून घेतात. खास अशांना उद्देशून उद्याच्या वर्डलचं उत्तर MORON हे असणार आहे अशी आतल्या गोटातली बातमी आहे!

पण वर्डल खेळायला मजा येत असली तरी अलीकडंच निक नावाच्या माझ्या एका मित्राच्या बाबतीत त्यामुळं मोठा दुःखद प्रसंग घडला. तो आणि त्याची गर्लफ्रेंड मेगन दोघं न चुकता एकत्र वर्डल सोडवायचे. पण एके दिवशी घरी आला तर मेगन सोफ्यावर अश्रू गाळत बसली होती.

"हे, आर यू ओके? रडायला काय झालं?" त्यानं काळजीनं विचारलं. "आज मला केटीनं वर्डलमध्ये तिनं कोणते शब्द ट्राय केले त्याचा स्क्रीनशॉट पाठवला," मेगन मुसमुसत म्हणाली.

"बरं मग?" "तुला माहितीये तिचे पहिले दोन गेसेस काय होते?" "काय?" "Crane आणि Pious." "ओके! मग यात रडण्यासारखं काय आहे? चांगले गेसवर्ड्स आहेत की हे!" त्याला अजूनही काही समजत नव्हतं.

"ऑफ कोर्स हे चांगले वर्ड्स आहेत निक! हे आपण ठरवलेले वर्ड्स आहेत, विसरलास?" मोठा हुंदका देत मेगन म्हणाली. "अं, हो. पण म्हणून काय झालं? ते बाकी कुणी वापरायचे नाहीत का?" "रिअली निक? मागच्या वीकेंडला पार्टीच्या वेळी तू केटीशी गुलूगुलू गप्पा मारत होतास तेव्हा तूच तिला हे वर्ड्स सांगितलेस नं? खरं सांग..."

"अं, हो बहुतेक. म्हणजे आम्ही वर्डल स्ट्रॅटेजीज शेअर करत होतो तेव्हा सांगितले असतील..."

"हाऊ कुड यू, निक? मी बाकी काहीही सहन करू शकेन , पण आपले वर्डलचे शब्द तू दुसऱ्या मुलीबरोबर शेअर केलेस? हा माझा विश्वासघात आहे! यू हॅव चीटेड ऑन मी!"

"हे तू काय बोलतेयस? नुसते शब्द शेअर करणं हे चीटिंग आहे?" निकचा त्याच्या कानांवर विश्वासच बसत नव्हता.

"'नुसते' निक, 'नुसते'? धिस इज वर्डल वी आर टॉकिंग अबाउट! मला नाही वाटत मी यानंतर तुझ्याबरोबर राहू शकेन. यू आर अ चीट अँड अ फ्रॉड!" ती फणकाऱ्यानं म्हणाली.

"काय म्हणालीस? CHEAT आणि FRAUD? हे दोन्ही चांगले गेस वर्ड्स आहेत. बघ नं, दोन्हीमध्ये दोन स्वर आहेत आणि तीन बऱ्यापैकी कॉमन व्यंजनं आहेत. नाही का? आपण उद्या ते वापरून बघूया? " वर्डलवेड्या निकनं मेगनच्या बोलण्यातलं फक्त एवढंच टिपलं.

"आय कान्ट बिलिव्ह यू निक! जा आणि हे शब्दसुद्धा तुझ्या केटीबरोबर शेअर कर. तू आणि तीच सोडवा वर्डल!" मेगनच्या रागाचा कडेलोट झाला आणि ती त्याला सोडून निघून गेली. इमोशनल चीटिंग, फिजिकल चीटिंग सारखं वर्डल चीटिंगमुळं तुटलेलं हे कदाचित पहिलं नातं असावं.

जॉश वार्डल या वर्डलच्या निर्मात्यानं हा खेळ आपल्या मैत्रीणीबरोबर खेळण्यासाठी तयार केला होता. आपल्या खेळाचे असेही परिणाम होतील याची त्याला नक्कीच कल्पना नसणार. अर्थात त्याला याचीही कल्पना नसावी की हा खेळ अचानक इतका प्रसिद्ध होईल की तो रोज खेळणाऱ्यांची संख्या फक्त दोन महिन्यात ९० वरून वीस लाखांवर जाईल आणि न्यूयॉर्क टाइम्स सात आकडी रकमेला हा खेळ विकत घेऊन आपल्याला मालामाल करून टाकेल! न्यूयॉर्क टाइम्सनं वर्डल विकत घेतल्यावर त्याचं स्वरूप बदलून जाईल म्हणून मी धास्तावलो होतो. पण सुदैवानं अजून तरी तसं झालेलं नाही. अजूनही वर्डल फुकट आहे, दिसायला आधी होता तसाच आहे , खेळताना जाहिरातींचा मारा सुरु झालेला नाही आणि अधूनमधून येणारे EPOXY, CAULK सारखे अतरंगी अपवाद वगळता बाकी शब्दही चांगले असतात.

न्यूयॉर्क टाइम्सला सद्बुद्धी सुचो आणि त्यांच्याकडून वर्डलचं स्वरूप यापुढंही बदललं न जावो ही इच्छा! तोपर्यंत आपणही डोक्याला चालना देणारा हा खेळ खेळण्यासाठी रोज पाचदहा मिनिटं खर्ची घालत राहू आणि आपले (खरेखुरे) स्कोअर्स शेअर करत राहू!

आणि हो, तुमच्या 'वर्डल स्ट्रॅटेजीज' काय आहेत? जमलं तर मला नक्की कळवा!







## तुझं माझं नातं

**श्रेया राजवाडे, मुंबई**

तुझं माझं नातं कधी कुणाला कळलच नाही
निर्मल निरागस बावनकशी सोनं त्यांना कधी दिसलच नाही

कसं दिसणार ....
एवढं शुद्ध काही बघायची सवय आहे का कुणाला ?
लखाखत्या सोन्याची झळाळी हवी ना सहन व्हायला !

तुला पाहताच माझं मन माझं राहत नसे
सतत तुझ्या सहवासाची ओढ मनाला वाटत असे

सतत तुला कुरवाळावं, तुझा मऊ स्पर्श जपून ठेवावा
तुझ्या अंगाला येणारा लोण्या-तुपाचा गंध हवा हवासा वाटावा

तुझ्या मोहक हसण्याने पडायची भूल मनाला
शिक्षा तुला झाली की वेदना मात्र मला

कसं आवरणार होते स्वतःला तुझ्याजवळ येण्यापासून
वात्सल्याचा अखंड झरा कसा ठेवावा कोंडून

तुलाही माझी अशीच ओढ होती ..
तुझ्या साऱ्या तक्रारीना माझी कूस पुरेशी होती

खऱ्या अर्थाने मी तुझी सखी होते
तुझ्या साऱ्या सुख दुःखात तुझी सावली झाले होते

तुझ्या वेणूची भूल कोणाला नाही पडणार ?
संसार ताप विसरावे असे कोणाला नाही वाटणार ?

ना शब्दांची गरज ना कुठल्या स्पर्शाची ...
वेणूचे सूर कानी पडता होळी साऱ्या दुःखांची

लोक सारे स्वतः च्या अपूर्ण स्वप्नात दंग
देती वात्सल्याला प्रणयाचा विपरीत रंग

राधा झाली धारा निर्व्याज प्रेमाची
उधळण करी तुजवर अपूर्ण मातृत्वाची

# मदर्स डे

"मदर्स डे! मातृदिन! म्हणजे प्रत्येक मातेचा आणि मातृत्वाचा सन्मान करण्याचा दिवस! कित्येक वर्षांपूर्वी अमेरिकेत येऊन स्थायिक होईपर्यंत मला कल्पनाही नव्हती, की असा काही दिवस असतो व तो मोठ्या प्रमाणात साजरा होतो. मे महिन्याचा दुसरा रविवार हा अमेरिकेत व इतर अनेक देशांमध्ये मदर्स डे म्हणून साजरा केला जातो. अनेक जण जरी कितीही दूर राहात असले तरी त्या दिवशी आपल्या आईची गाठ घेण्याचा प्रयत्न करतात, निदान फोनवर तरी बोलतात, एखादी भेटवस्तू व छानसे शुभेच्छापत्र ह्यांद्वारे तिचा सन्मान करतात. केवळ आपल्याच आईचा नव्हे तर मातृत्वाचा, म्हणजे घरातील प्रत्येक आईचा सन्मान केला जातो.

आज जरी ह्या दिवसाला इतके महत्त्व प्राप्त झाले असले तरी ह्याचा इतिहास केवळ एका शतकाचा आहे. विसाव्या शतकाच्या सुरवातीला ॲना जार्विस ह्या अमेरिकन सामाजिक कार्यकर्तीने मदर्स डे ची कल्पना लोकांपुढे मांडली व सातत्याने पाठपुरावा करून ह्या कल्पनेचा व्यापक प्रसार केला. आज अमेरिकेत व जगातील अनेक देशांमध्ये मे महिन्यातील दुसरा रविवार मदर्स डे म्हणून साजरा केला जातो, व ह्याचे संपूर्ण श्रेय ॲना जार्विसला आहे.

अमेरिकेत आल्यावर मदर्स डे विषयी कळल्यावर माझ्या मनात जो प्रश्न आला, आणि मला खात्री आहे की इथे आलेल्या अनेक भारतीयांच्या मनातही हा प्रश्न आला असणार, तो म्हणजे भारतीय संस्कृतीत मातेला इतके महत्त्व असतानाही भारतात 'मदर्स डे' कसा काय नाही?

ह्या प्रश्नाचे एक सोपे उत्तर कदाचित असेही देता येईल की, भारतात वेगळ्या मदर्स डे ची गरजच नाही. कारण 'एव्हरी डे इज मदर्स डे'! भारतीयांच्या घरगुती व सामाजिक जीवनात मातेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोणत्याही मराठी माणसाला विचारले की तुझ्या हृदयाला भिडलेले गाणे किंवा कविता कुठची, तर हमखास जी उत्तरे यातील त्यांत माधव ज्युलियनांची 'प्रेमस्वरूप आई' किंवा यशवंतांची 'आई, म्हणोनी कोणी' ह्या कविता अग्रभागी असतील. मराठीतील सर्वोत्तम चित्रपटांची यादी बनवायला घेतली तर 'श्यामची आई'ला त्यात स्थान द्यावेच लागेल. फार काय सांगू? व्यावसायिक दृष्ट्या अत्यंत यशस्वी हिंदी चित्रपट 'दीवार'चे उदाहरण घ्या. ह्या चित्रपटातील सलीम-जावेद ह्या लेखकद्वयीने लिहिलेले संवाद इतके गाजले की त्यांची एक रेकॉर्ड सुद्धा निघाली होती. ह्या संवादांपैकी जो संवाद सर्वात लोकप्रिय झाला तो म्हणजे – नायक (अमिताभ बच्चन) आपल्या भावाची (शशी कपूरची) हेटाळणी करून त्याला विचारतो, "आज मेरे पास प्रॉपर्टी है, बिल्डींगे है, बँक बॅलन्स है, बंगला है, गाडी है. तुम्हारे पास क्या है?" ह्यावर त्याचा भाऊ उत्तर देतो, "मेरे पास माँ है". हा संवाद इतका लोकप्रिय होण्याचे कारण हेच आहे की भारतीयांच्या मनामध्ये आईचे स्थान सर्व भौतिक संपत्तीपेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे.

आपण भारतीय केवळ आजच नव्हे तर अगदी प्राचीन काळापासून मातेला सर्वश्रेष्ठ मानत आलो आहोत. उदाहरण द्यायचे झाले तर आपल्या देवांचेच बघा. एक नाही, दोन नाही, तर तब्बल तेहतीस कोटी देव असताना आपण म्हणतो, 'न मातु: परं दैवतम्'. आई ही सर्व देवांहून श्रेष्ठ आहे – मदर इज सुप्रीम गॉड. रामायणातील एक कथा प्रसिध्द आहे. रामाने रावणाचा वध करून लंकेचे राज्य जिंकले. पण स्वत: तिथे राज्य न करता ते रावणाचा भाऊ बिभीषण ह्याच्या ताब्यात दिले. त्यावेळी लक्ष्मण रामाला म्हणाला, "इथे लंकेत इतकी समृध्दी व सुबत्ता असताना, आणि इथले लोक तुलाच लंकेचा राजा होण्याचा आग्रह करत असताना, आपण अयोध्येत कशासाठी परत जायचे?" त्यावेळी रामाने जे उत्तर दिले तो श्लोक अतिशय प्रसिध्द आहे. श्लोक असा आहे,

अपि स्वर्णमयी लंका, न मे लक्ष्मण रोचते |

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ||

म्हणजे, लंका जरी सुवर्णनगरी समजली जात असली, तरी माझ्या दृष्टीने माता आणि मातृभूमी या स्वर्गाहूनही श्रेष्ठ आहेत.

आपण मदर्स डे च्या निमित्ताने मातेचे उपकार स्मरतो, पण मातृभूमीचे काय? शिक्षणासाठी, व्यवसायासाठी, किंवा इतर कारणांनी आपण इतक्या लांबवर आलो आणि इथेच स्थायिक झालो. इथे आल्यावर मातृभूमीला दर दोन वर्षांनी १०-१५ दिवस भेट देण्यापलीकडे आपला मातृभूमीशी संबंध राहात नाही. पण मग मातृभूमीलाच इथे आणले तर? प्रश्न असा पडेल की मातृभूमीला इथे आणायचे म्हणजे नेमके काय करायचे?



संजय गोखले, न्यू यॉर्क

केवळ दोन चिमटी माती खिशात भरुन आणली किंवा कोणत्याही नदीचे गडूभर पाणी इथे आणले म्हणजे मातृभूमीला घेऊन आलो असे होत नाही. पण ह्यावरही उपाय आहे. आपण मातृभाषेच्या माध्यमातून मातृभूमीला इथे आणू शकतो. जेव्हां जेव्हां आपण मराठी बोलतो, वाचतो, लिहितो, मराठीतून विचार करतो, तेव्हां तेव्हां आपली प्रिय मातृभूमी इथे प्रत्यक्ष साकारते. आणि म्हणूनच मराठीचे संरक्षण आणि संवर्धन हे आपले परम कर्तव्य आहे.

भाषा कधी एकटी येत नाही. भाषा आली की आपली संस्कृती येणार. भाषा आली की आपल्या कला, आपले साहित्य, आपले खेळ, हे सर्व काही निश्चितपणे येणार. आज अनेक जण ह्यासाठी प्रयत्न करत आहेत. अमेरिकेतील अनेक शहरांतील उत्साही लोक वेगवेगळी मराठी नियतकालिके प्रसिद्ध करत असतात. सगळ्यांनाच ह्यांत लेखक म्हणून सामील होता आले नाही तरी वाचक, वर्गणीदार किंवा देणगीदार ह्या नात्याने निश्चित सहभागी होता येईल. अमेरिकेतील पन्नासेक शहरांमध्ये आज छोटी-मोठी महाराष्ट्र मंडळे कार्यरत आहेत. त्या त्या परिसरातील प्रत्येक मराठी माणसाला आपापल्या मंडळाच्या कार्यक्रमाद्वारा आपल्या संस्कृतीशी नाते टिकवून ठेवण्याची सुवर्ण संधी प्राप्त झाली आहे. अधून मधून थोडी फार भांडणे झाली म्हणून बिघडले कुठे? अहो, तो तर मराठी माणसाचा स्थायीभावच आहे. अमेरिकेला आलं म्हणून तो सोडायचा कशाला? आणि त्यामुळे आपापल्या मंडळापासून दूर कशाला राहायचे?

ह्या सर्व प्रयत्नांतून आपण मराठी भाषा टिकवून धरू शकू व आपल्या मातृभूमीची एक प्रतिकृती इतक्या दूरवर राहूनही आपल्या उराशी बाळगू शकू. पण आपण गेल्यावर काय? आपली पिढी नामशेष झाल्यावर हे सर्व नष्ट होणार का? हा वारसा आपण अमेरिकेतील आपल्या पुढच्या पिढीला देऊ शकू का? त्या दृष्टीने आज अनेक शहरांतून जे लोक मोठ्या निष्ठेने आणि चिकाटीने मराठी शाळा चालवत आहेत, त्यांचे आपल्या सर्वांवर मोठे उपकार आहेत. ह्या शाळांमधील शिक्षकांचे व तिथे नियमित जाऊन मराठी शिकणाऱ्या मुलांचे, आणि त्यांच्या उत्साही पालकांचे, जितके कौतुक करावे तितके थोडे आहे!

प्रत्येक मराठी शाळा हे आपल्या मातृभाषेचे व मातृभूमीचे मंदिर आहे! पण पूजा फक्त मंदिरातच होऊ शकते असे नाही. ती घरच्या घरीही करता येते. आपण घरी बोलताना मराठीतूनच बोलायचे असा निश्चय केला तर? निदान प्रयत्न करायला तरी काय हरकत आहे? तसे केले तरच आपण भविष्यातही मराठी राहू.



# थोडीशी गफलत



अरविंद देशपांडे, पुणे

‘माझ्या अमेरिकेच्या मुक्कामात एक छोटीशी गंमतीदार घटना घडली ती अशी आहे. नेहमीप्रमाणे सुनेबरोबर संध्याकाळी किरकोळ खरेदी करण्यासाठी मॉलमध्ये गेलो. अमेरिकेतील मॉल खूपच मोठे असून सर्व प्रकारच्या वस्तू तेथे खरेदी करण्यासाठी उपलब्ध असतात. उदा. फळभाजी, फळे, वाण जिन्नस, स्टेशनरी इत्यादी. प्रत्येकजण मॉलमधील कार्ट घेऊन ठिकठिकाणी विभागात जाऊन आवश्यक वस्तू घेतो व काउंटवर येतो व स्वत:चे क्रेडीट कार्ड दाखवून वस्तू खरेदी करतो व मॉलमधून बाहेर जातो.

आम्ही दोघेजण मॉलच्या बाजूला उभे होतो. थोडेफार सुनेला सहकार्य करण्याच्या हेतूने तत्परतेने नजर चुकीने दुसरीच कार्ट आपलीच आहे या समजुतीने घेऊन पार्किंगमध्ये गाडीपाशी आलो व सर्व सामान गाडीच्या मागे ट्रेकमध्ये घालू लागलो. सर्व सामान चढवताना थोडीशी शंका आली व सर्व सामानाच्या वस्तू आपल्या नाहीत कारण त्यामध्ये मटण, मासे पाकिटमध्ये सिल केलेले होते. तसेच वाईनच्या बाटल्या न्यूडल्स इत्यादी अमेरिकन लोकांच खादापदार्थ होते थोडेसे आम्ही जरा बुचकळ्यात पडलो. क्षणभर काय करावे हे समजत नव्हते. आम्ही दोघेजण पाहुणे म्हणून परदेशात आलो असल्याने चोरीचा गुन्हा आपल्यावर होणार नाही ना! या भीतीने दोघेजण चिंतातूर झालो.

तेवढ्यात सुनेने मोठ्याने हाक मारली व ओरडून म्हणाली, अहो, तुम्ही चुकून दुसरीच कार्ट आणली आहे. इकडे अमेरिकन मॅडम कार्ट शोधत असून मोठ्या आवाजात ओरडत आहे व म्हणत आहे - ‘सम बडी माय कार्ट थिप! आम्ही घाबरत घाबरत सर्व सामानाच्या वस्तू कार्टमध्ये घालून पळत पळत आलो व मॅडमला नम्रतेने म्हणालो, ‘एक्स्ट्रिमली सॉर्गी मॅडम, बाय मिस्टेक वुई टूक युअर कार्ट. काइंडली एक्सक्युज अस.’ ती मॅडम आमच्याकडे पाहून हसत म्हणाली, ऑल राईट, नेव्हर माइंड. थँक यू फॉर रिटर्न माय कार्ट,’ असे म्हणून निघून गेली सूनबाई म्हणाली, अशी गडबड पुन्हा करू नका. ही अमेरिका आहे. निष्कारण संकट ओढवून घ्याल असे म्हणून आम्ही सर्वजण घरी परतलो.

# अध्यात्म आणि आपण



श्री. वसंत प्रल्हाद कुलकर्णी, पुणे.

‘सर्वधर्मसमभाव’ हा आपल्या भारतीय लोकशाहीचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. यामुळेच भारतात अनेक धर्मीय गुण्यागोविंदाने राहत आहेत. प्रत्येकांना आपआपल्या धर्माचे आचरण करण्यास मोकळीक आहे. प्रत्येक धर्माला अध्यात्माची एक स्वतंत्र बैठक आहे. अनेकांच्या तोंडून अध्यात्म हा शब्द सर्रास ऐकायला मिळतो. देव, धर्म या संबंधित आचरण अध्यात्माशी जोडले गेले आहे. ‘मी अध्यात्मिक आहे कारण मी दररोज देवपूजा करतो.’ ‘संध्याकाळी आमच्या इथे दिवेलागणीला सर्वजण शुभंकरोती म्हणतात, छान अध्यात्मिक वाटते.’ ‘गावात सप्ताह चालू आहे, अध्यात्मिक वातावरण आहे गावात.’ अशी वाक्ये कानावर पडत असतात. देव, धर्म या संबंधित आचरण करणं म्हणजे ‘अध्यात्म’ आणि आचरण करणारे ‘अध्यात्मिक’ असे सर्वसाधारणपणे संबोधले जाते. आज एकविसाव्या शतकात देव, धर्म या संकल्पनांचा नीट विचार करण्याची आवश्यकता आहे. रुढी, परंपरा यांचा व्यवस्थित विचार करून कालबाह्य गोष्टी सोडून देवून नव्याने ‘अध्यात्म’ या संकल्पनेकडे पाहणे गरजेचे आहे. ‘अध्यात्म’ ही संकल्पना व्यापक करण्याची गरज आहे. याचा अर्थ देव, धर्म न मानणे, नास्तिकतेचा स्वीकार करणे असे बिलकूल नाही. देव, धर्म यावरची आपली श्रद्धा तपासून घेऊन आजच्या काळात आचरण करताना त्यात काळानुरूप बदल करण इतकाच आहे. एकूणच काय तर ‘अध्यात्म’ ही संकल्पना उमजून घेऊन, त्यात काळानुरुप बदल करून, ती थोडीशी व्यापक करण्याची आज गरज आहे. त्याचबरोबर केवळ उपचार म्हणून धार्मिक विधी उरकण्याची आणि जगताना मात्र अत्यंत मनमर्जीने जगायची माणसांची आजची प्रवृत्ती बदलण्याची गरज आहे.

माझ्या मते अध्यात्म या शब्दांची फोड करून ही संकल्पना समजून घेतली पाहिजे. अध्यात्म = अध्य + आत्म. आता हे दोन शब्द आपण खालील प्रकारे समजून घेतले तर अध्यात्म ही संकल्पना अधिक व्यापक होईल. अध्य म्हणजे अध्ययन ( अभ्यास ) तर आत्म म्हणजे आत मधून. याचाच अर्थ आपण आपले स्वतःचे अध्ययन करायचे, स्वतःचा अभ्यास करायचा म्हणजे अध्यात्म. आपण काय बोलतो, आपण काय बघतो, आपण कसा आणि काय विचार करतो, आपण काय खातो, पितो एकूणच काय तर आपल्या प्रत्येक कृतीचा अभ्यास करायचा, त्या तपासून बघायच्या. स्वतःच आत्मपरीक्षण करायचं म्हणजे आध्यात्म होय. आज अशा अध्यात्माची खरी गरज आहे. आज माणूस म्हणून आपण माणूसपणाच्या सर्वच मर्यादा ओलांडून जगत आहोत. याच एक उदाहरण म्हणजे आजचे वाढते वृद्धाश्रम. ज्या आईवडिलांना म्हातारपणी सांभाळायला कोणी नाही त्यांच्यासाठी खरतरं वृद्धाश्रम असायला हवीत पण आज वृद्धाश्रम तपासून पाहिली तर असे कमी वृद्ध असतील ज्यांचं कोणीच नाही म्हणून ते तिथे आहेत. घरात मुले, सुना, नातवंडे असतानाही बरीच वृद्ध मंडळी वृद्धाश्रमात आहेत. घरात मतभेद होतात, जागा पुरत नाही, त्यांच्या आजारपणाकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही....कारण कोणतही असो पण मुलांचा संसार सुरू झाला की घरातील वृद्ध अडचण बनू लागतात. वृद्धाश्रमात जागा मिळावी तसेच तिथे कशा सोयी सुविधा आहेत, घरापासून किती अंतरावर आहे हे इंटरनेटवर तपासून घरातील वृद्धांना तिथे सोडून, वर दर रविवारी येईन भेटायला असं सांगून, चांगलं वृद्धाश्रम मिळालं म्हणून मनातल्या मनात देवाला हात जोडून आभार मानणारी त्यांची मुलं. यांना अध्यात्मिक म्हणायचं का ?

आज माणसांचे मनंच नाही तर त्यांचे आचार, विचार कोत्या प्रवृत्तीचे बनू लागले आहे. यश, पैसा, प्रसिद्धी म्हणजेच जीवन अशी समजूत झाली आहे. गरजेपेक्षा अधिक मिळवण्याची धडपड माणसाला स्वस्थता लाभू देत नाही. पेशंटच्या आजारापेक्षा त्याच्याकडून जास्तीच बिल कसं मिळवता येईल यासाठी धडपड करणारे डॉक्टर, एखाद्या सामान्य माणसाचा प्रश्न सोडविण्यापेक्षा त्याच्याकडून मिळणाऱ्या फीच्या रकमेवर डोळा ठेवून असणारे वकील, आपल्या कलेपेक्षा अंगप्रदर्शन केले की आपली इंडस्ट्रीत इमेज वाढेल अशी मानसिकता बाळगून असणारे कलाकार, मैदानावरच्या खेळापेक्षा मैदानाबाहेरील सट्ट्यावर डोळा ठेवून असलेले खेळाडू.........अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. आपले शिक्षण काय आहे, आपल्याकडे कोणती कौशल्ये आहेत, या कशाचेच भान नाही. कारण आम्ही कधी स्वतःला तपासून पाहत नाही. इतक्या सगळ्या सजीवांमध्ये आपल्याला मनुष्य जन्म मिळाला आहे याचे भान ठेवून आपण आपल्या स्वतःला तपासून पाहणे आवश्यक आहे. केवळ बाह्यांगाचा विचार न करता आपल्या मनातील विचार तसेच आपले वर्तन याची तपासणी करणे म्हणजे अध्यात्म असे जर मानले तर पर्यायाने सर्वांनी आध्यात्मिक बनायला काहीच हरकत नाही.

# “जपुया आपल्या वेलींना..!”



डॉ शिल्पा चिटणीस जोशी स्त्रीरोग व वंध्यत्वतज्ञ कोथरूड पुणे

‘समोर बसलेल्या आईच्या चेहऱ्यावर प्रचंड मानसिक ताण दिसत होता..गेल्याच आठवड्यात ही आई सोळा वर्षांच्या मुलीला अनियमित पाळीसाठी घेऊन आली होती .

“डॉक्टर,तुमच्याशी अगदी खासगी विषयावर बोलायचं होतं..खरंतर कोणाशी बोलावं कळतच नव्हतं,मग वाटलं तुम्हीच काहीतरी मार्ग काढाल..”बोलता बोलता अश्रू दाटून आले आईच्या डोळ्यात आणि ओघळलेच खाली..“मनमोकळेपणाने बोला हो,आपण काढू मार्ग..”..मी

“डॉक्टर मला आणि माझ्या नवऱ्याला मुलीच्या क्लासमध्ये मीटिंग ला बोलावलं होतं आज ..त्यांनी सांगितलं की ही आणि हिच्या ग्रुपची मुलंमुली क्लास नंतर चक्क दारू आणि सिगारेट पिताना आढळली त्यांना.. काही मुलं ड्रग्जही घेतात म्हणे..आम्ही इतके शॉकमध्ये गेलोय दोघं..काही सुचतच नाहीये..”

क्लिनिक मध्ये आलेली आई ही एकटीच नाहीये..असे अनेक पालक आज अशा संकटांचा सामना करत आहेत.आणि आपली मुलं बाहेर आणि कधी कधी घरात सुद्धा काय करताहेत याची कल्पनाच नसलेले पालक संख्येने सर्वाधिक आहेत.

सोळासतरा वर्षाची असलेली ही कवळी पोरं पोरी असले उद्योग करताना आज सर्रास दिसत आहेत.या बाबतीत इकडे तिकडे थोड्या चौकश्या केल्यावर जी माहिती कळतेय की अतिशय धक्कादायक आहे.पुण्याच्या अगदी सुसंस्कृत आणि मध्यमवर्गीय वस्तीत शाळांच्या बाहेर फक्त तीस रुपयाला गांजाची पुडी मिळते .या मधल्या पावडर चा चुरा करून कागदाच्या नळीत गुंडाळून ही मुलंमुली हे सिगरेट सारखं ओढतात.याचा एक प्रकारचा वास येतो पण याची जराही कल्पना नसलेल्या बिचाऱ्या पालकांना तो वास ओळखता येत नाही.ड्रग्ज घेऊन ही मुलं बिनधास्त क्लास,कॉलेज कधी कधी परीक्षेला पण जातात. दुचाकी चालवताहेत .हे सगळं अंगावर काटा आणणारं आहे.बालमानसोपचार तज्ञ डॉ भूषण शुक्ल यांच्या माहितीनुसार समाजातल्या उच्चभ्रू स्तरातल्या बऱ्याच घरातली मुलं ड्रग्ज च्या व्यसनासाठी त्यांच्याकडे नेहेमीच आणली जातात आणि हे प्रमाण वाढत आहे. पालक,पोलीस आणि सामाजिक संस्था यांनी खडबडून जागं होऊन याबद्दल जनजागरण आणि कायदेशीर मोहीम उघडण्याची गरज आहे.

एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गांजा या मुलांना सकाळपासून कधीही ओढता येतो .दारू ही सुद्धा तितकीच हानिकारक असते पण ही मुलं अल्पवयीन असल्यामुळे उघडपणे त्यांना ती विकतही घेता येत नाही आणि सरसकट सगळीकडे पिताही येत नाही.दारूचा वास लपून राहत नाही किंवा घरी,हॉस्टेल मध्ये दारू पिणे अवघड असते.यातली कुठलीच समस्या गांजा ओढणाऱ्यांना नाही.

क्लिनिक मध्ये वेगवेगळ्या आरोग्य समस्यांसाठी येणाऱ्या तरुणींमध्ये नियमित स्मोकिंग आणि ड्रिंक्स घेणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढत आहे.स्मोकिंग बद्दल या मुली बोलल्या नाहीत तरी त्यांच्या ओठांवर आणि दातांवर पडलेल्या काळ्या डागांवरून ते लगेच लक्षात येत. औषधे लिहून दिल्यावर ती घेत असताना ड्रिंक्स घेतली तर चालतील का असंही मुली बिनधास्त विचारतात काही वेळा..

मग मुलं करतात व्यसनं तर मुलींनी का नाही करायची? असा अपरिपक्व आणि असमंजस विचार करणाऱ्या मुली आणि तरुणी आहेतच पण पुरुषांच्या बरोबरीने व्यसने करणे ही स्त्रीमुक्ती नव्हे हे त्यांना आज समजावून सांगण्याची गरज आहे .तंबाखु,सिगरेट ,अतिप्रमाणात दारू पिणे याचे परिणाम स्त्रीच्या शरीरावर खूप लवकर आणि जास्त वाईट प्रमाणात होतात.स्त्रीची प्रजनन संस्था खूप नाजूक आणि गुंतागुंतीची असते.तंबाखु सारखी विषारी सवय स्त्रीच्या शरीरावर दूरगामी दुष्परिणाम करू शकते.प्रमाणाबाहेर ड्रिंक्स घेण्यात अजून एक फार मोठा धोका मुली आणि स्त्रियांवर लैंगिक अत्याचार होण्याचा ही आहे.पार्टीला गेल्यावर प्रमाणाबाहेर ड्रिंक्स घेतल्यामुळे अथवा कोणीतरी ड्रिंक्स मध्ये मादक द्रव्ये मिसळल्यास मुलींची शुद्ध पूर्णपणे हरपू शकते.अशा अवस्थेत त्यांचा कोणीही गैरफायदा घेऊ शकतो.आणि शुद्धीवर आल्यावर सुद्धा या मुली कोणाकडे आणि कशी तक्रार करणार?मग गिळून गप्प बसण्याची वेळ येते.अशा गोष्टी वाचायला भयानक वाटतात पण घडत आहेत आजूबाजूला.मुली पार्टीला गेल्या तर त्यांनी त्यांचे ड्रिंक कधीही नजरेआड होऊ देऊ नये ही एक काळजी त्या घेऊ शकतात.पार्टीला जाताना आपले अगदी जवळचे आणि विश्वासातले मित्रमैत्रिणी असावेत.अनोळखी ठिकाणी आणि लोकांबरोबर पार्टीला न गेलेले उत्तम.याबद्दल मुलींशी बोलायला हवं.

आजकालच्या पिढीला पूर्वीच्या मानाने खूप लहान वयात प्रौढपणा येतो आहे.मागच्या पिढीला करमणूकीची साधने,खाण्यापिण्याच्या गोष्टी,बाहेर जाऊन मौजमजेची ठिकाणे आणि हातात खेळणारा पैसा ह्या सगळ्याच गोष्टींची वानवा होती.आताच्या पिढीला खूप कमी वयात या सगळ्या गोष्टी मिळतात त्यामुळे त्यातली त्यांची मजाच कमी होतीये. मग अजून अजून काहीतरी एक्ससायटींग शोधायच्या नादात ही मुलं ड्रग्ज च्या नादाला लागताहेत की काय अशी शंका येते.ह्या काही गोष्टी म्हणजे समृद्धीचे शाप आहेत खरं तर..

अजून एक मोठी समस्या म्हणजे लहान वयात मुलांना लागणारे पोर्नोग्राफी चे व्यसन. घराघरात खूप कमी पैशात इंटरनेट उपलब्ध झाले,मुलं तासनतास कॉम्प्युटर समोर बसू लागली आणि पालकांचं लक्ष नाही असं बघून बरोबरीच्या किंवा मोठ्या मुलांच्या “मार्गदर्शना” खाली पोर्नोग्राफी बघण्याचा नाद लागणं सोपं झालं. असे व्हिडिओज बघून नकळत्या वयातली मुलं सुद्धा कधी कधी लैंगिक गुन्हे करायला प्रवृत्त होतात .अतिप्रमाणात पोर्नोग्राफी चा नाद लागल्यामुळे अभ्यासातून लक्ष उडणे,अस्वस्थता येणे ह्या गोष्टीसुद्धा होऊ शकतात.

खरं तर पोर्नोग्राफी मुळे हीच मुलंमुली जेव्हा मोठी होतील तेव्हा त्यांचं लैंगिक आयुष्य सुरवातीपासूनच अडचणीत सापडू शकतं कारण पोर्नोग्राफी मध्ये अमानवी आणि अशास्त्रीय गोष्टी दाखवल्या जातात.त्या आभासी जगातल्या गोष्टी खऱ्या आहेत असं समजून चालल्यास खऱ्या आयुष्यात या मुलामुलींचा भ्रमनिरास होऊ शकतो.

पुढची समस्या आहे ती समज येण्याआधी ही मुलंमुली शारीरिक संबंधांमध्ये गुंतताहेत याबद्दल ची.हल्ली अगदी बाराव्या तेराव्या वर्षांपासूनच मुलामुलींना गर्लफ्रेंड आणि बॉयफ्रेंड असतात.अपरिपक्व वयात टीव्ही वरच्या सिरिअल्स आणि सिनेमे मुलांना खरं तर पचवता येत नाहीत आणि मग नको त्या गोष्टी करायला जातात.यात peer pressure म्हणजे मित्रमंडळी चा दबाव हाही मोठा घटक असतो.अशा गोष्टीतून अल्पवयीन मुलगी जर प्रेग्नंट राहिली तर मग मात्र परिस्थिती अतिशय गंभीर वळण घेऊ शकते .कारण कायद्यानुसार हा बलात्कार मानला जातो.शारीरिक संबंध परस्पर सहमतीने झाले असले आणि मुलगा वयाने लहान असेल तरीही तो कायद्याच्या कचाट्यात सापडू शकतो .

अठराव्या वर्षानंतर कायद्याची भीती नसली तरी अगदी थोड्या ओळखीनंतर किंवा नात्याला कोणतीही भावनिक खोली नसताना केवळ थ्रिल म्हणून शारीरिक संबंध ठेवणे ही सुद्धा झपाट्याने फॅशन होते आहे.या मुलामुलींना मग “sex is overrated” या उक्तीचा लगेच प्रत्यय येतो आणि त्यांची नाती लवकर उकलायला लागतात.तुम्ही दुसऱ्या व्यक्तीत मानसिक खोलवर गुंतलेले असाल तरच शारीरिक संबंध खरे अर्थपूर्ण आणि सुखकारक होतात आणि त्यासाठी नातं खुलायला भरपूर वेळ हवा हे या तरुणाईला पटवून द्यायची खूप निकडीची गरज आहे.

तर असे भरपूर प्रश्न हात जोडून उभे आहेत आजच्या पालकांसमोर.पण घाबरून न जाता परिपक्व पालकत्व स्वीकारल्यास ह्या प्रश्नांची उकल होऊ शकेल.

सर्वात महत्वाचं म्हणजे या तरुण पिढीचा विश्वास संपादन करणे आणि अगदी कमी वयापासून नियमित सुसंवाद साधणे.चांगल्या वाईटाची ओळख मुलांना

लहानपणापासून करून द्यायला हवी.मोठ्यांच्या गप्पांमध्ये त्यांना सामील करून घ्यायला हरकत नाही .अचानक मुलं वयात आल्यावर त्यांना व्यसनं कशी वाईट हे सांगण्यापेक्षा पालकांच्या वागण्याबोलण्यातून मुलं शिकत असतात.

वयात आल्यावर मुलामुलींना एकमेकांचे आकर्षण वाटणे साहजिक आहे.त्यांच्याशी मोकळेपणाने बोलून आत्ता त्यांचं वय फक्त मैत्री करायचं आहे,मित्रमैत्रीणींचे ग्रुप जरूर असावेत पण एकाशी वेगळे नाते जोपासण्याची ही वेळ नाही हे त्यांना पटवून देत येऊ शकते.तसेच तुमचं शरीर तुम्हीच जपायचं आहे,पुढचा मागचा विचार न करता कोणत्याही व्यक्तीशी लैंगिक संबंध म्हणजे स्वतः च्या शरीराशी प्रतारणा आहे .याचे शरीरावर कसेच मनावरही खूप दूरगामी परिणाम होऊ शकतात हे मोकळेपणाने बोलायला पाहिजे मुलांशी.. नुसते पोकळ नैतिकतेचे आणि तथाकथित संस्कृतीचे धडे देण्याचा प्रयत्न केला तर ही मुलंमुली साफ दुर्लक्ष करतात .पालक करत असलेली सर्वात मोठी चूक म्हणजे सगळ्या प्रकारच्या स्वातंत्र्यावर बंदी आणणे.तरुण उसळतं रक्त तुम्ही फार काळ थोपवून धरू शकत नाही,ते अजूनच उसळतं ,त्याला योग्य प्रवाहाची दिशा दिली तरच ते आटोक्यात राहतं. आपल्या मुलांची लैंगिकता स्वीकारणे हे सुद्धा भारतीय पालकांना अजूनही अवघडच जातं. या वयातल्या मुलांकडून छोट्या मोठया चुकाही होणारच .चुका केल्यावर त्या पालकांकडे येऊन कबुल करण्याचा विश्वास पालकांनी मुलांमध्ये निर्माण करायला हवा .

गांजा सारख्या मादक द्रव्यांबद्दल शास्त्रोक्त माहिती पालक आणि मुलंमुली कोणालाच नसते .गांजा हानिकारक नसतो असा एक अतिशय धोकादायक गैरसमज तरुणाई मध्ये पसरलेला आहे.गांजा ला weed/pot वगैरे फॅशनेबल नावे देऊन ही नशा करणारे मुलंमुली" कुल" समजले जातात.वास्तव हे आहे की अजून विकसित होत असलेल्या मेंदूवर गांजाचे अतिशय वाईट परिणाम होऊ शकतात.मेंदूची ग्रहणशक्ती,स्मरण शक्ती कायमची कमी होऊ शकते .ही नशा नियमित करणारी मुलं पूर्णपणे व्यसनाधीन होऊ शकतात अथवा त्यांच्यात मानसिक आजार निर्माण होऊ शकतात.याच्या पूर्ण आहारी गेलेल्या मुलांचं आणि त्यामुळे पालकांचं पुढचं आयुष्य बरबाद होऊ शकतं.त्यामुळे याबद्दल ची सगळी माहिती मुलांना आपण होऊन मुलांना आधीच दिली तर परिस्थिती त नक्की फरक पडू शकेल.

मुलांकडे त्यांच्या नकळत बारीक लक्ष ठेवणे हे पालकत्वाचे सर्वात महत्त्वाचे अंग आहे. अचानक बदललेली मित्रमंडळी,अभ्यासातून उडालेले लक्ष,एकदम कमी झालेली अथवा वाढलेली भूक,सतत बंद दाराआड राहणे या गोष्टी धोक्याचा इशारा असू शकतात.बऱ्याच वेळा काही गोष्टी लक्षात आल्या तरी पालक मुलांना घाबरून विचारत नाहीत,गप्प बसतात. इथून पुढे अधोगतीची सुरवात होते.वेळप्रसंगी मुलांना खडसावून जाब विचारायची हिम्मत पालकांमध्ये असायलाच हवी मात्र वयात आलेल्या मुलांवर हात कधीही टाकू नये.तुमचा धाक नजरेत असावा .

अजून एक अत्यंत नाजूक विषय म्हणजे या वयात क्वचित कधीतरी मुलगा अथवा मुलगी यांना त्यांच्या लैंगिकतेबद्दल मनात संभ्रम येऊ शकतो .त्यांना समलैंगिक असल्याची जाणीव होऊ शकते.ही जाणीव त्या कोवळ्या मनालाही हादरवून टाकणारी असू शकते.बदलत्या काळानुसार पालकांनी मुलांच्या अशा वेगळेपणाचा स्वीकार करायची तयारी ठेवायला हवी .थोडा मोकळा दृष्टीकोन ठेवला तर कुटुंबाची विस्कटणारी घडी पालक वेळेत निस्तरु शकतात.

पूर्वीच्या काळाच्या मानाने या मुलामुलींची आयुष्य प्रौढपणाकडे जरा लवकरच वळत आहेत.त्यामुळे लहान वयातच यांना स्त्रीपुरुष नात्यातील तणाव,ब्रेक अप इत्यादी गोष्टींचा सामना करायला लागतोय पण त्यासाठी असलेली परिपक्वता आणि समज मात्र अजिबात आलेली नसते.परिणामी या पिढीत नैराश्याचे प्रमाणही खूप वाढतंय.बऱ्याच वेळा पालकांच्या हे वेळेत लक्षात येत नाही किंवा कधी कधी लक्षात आलं तरी त्यावर उपाययोजना वेळेवर केल्या जात नाहीत.मित्रमंडळी,सोशल मीडिया यातून अचानक बाहेर जाणे,सारखे झोपून राहणे,कमी झालेली भूक,काहीही करायला एनर्जी नसणे,सतत अस्वस्थ असणे अथवा रडणे ही लक्षणे नैराश्याची असू शकतात .यासाठी वेळेवर मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यास पुढचा खूप मोठा मनस्ताप वाचू शकतो.

सुरवातीला क्लिनिक मध्ये आलेल्या आईला समुपदेशनाचा हा मार्ग सापडला आणि मग आई आणि मुलगी यांच्यात एक नव्या निरोगी आणि प्रामाणिक नात्याची सुरवात झाली.

तर पालकहो आपल्या जोमाने वाढणाऱ्या वेलींना कुठे कीड तर लागत नाहीये ना ह्यावर प्रेमळ लक्ष ठेवायला हवं.आणि दिसलीच कीड तर वेळीच न घाबरता ती उखडून फेकायला हवी,मात्र वेलींची मुळं न दुखावता .कोणताही चतुर माळी हेच करतो मग त्याचा वेलू गगनापरी जातोच..हो ना?

# मातीतच राहतो मी....

## सुजाता काळे, पाचगणी

आताच आलो होतो
पाय वळवून गावाकडे मी,
रंगीत शहराची तालीम
लगेचच फिरवू कसा मी.

भरकटलो वर्षानुवर्षे
आताच वळलो होतो,
शेताच्या मातीत आता
बीज बनून रूजलो मी.

धावलो स्वप्नांच्यामागे
क्षणाची उसंत नव्हती
आताच कुठेसा रोजच
हृदयाशी बोलतो मी.

कोंदटलेल्या श्वासात
मज बांधून घेतले होते.
आता कुठेसा गावात
प्राणवायू शोषतो मी.

हिरवळ गर्द हिरवी
चहुकडे पसरलेली
रोखून ठेवी गावात
शहरी कसा येऊ मी.

हा बांध शेतावरचा
ओलांडू न देई मजला
खुणेनंच सांगतो नाते
मातीशी जोडतो मी.

आता नको ते मजला
वाळू, सिमेंट, घमेले
डोक्यावरील ओझे
मातीत सोडतो मी.

मातीत परिश्रम करुनि
पेरतो मी रक्त-घाम
माझाच बनून आता
मातीतच राहतो मी.

# वेळ

"त्या दिवशी पहाटेच माईंना धाप लागली . त्यांना श्वास घेण्यास त्रास झाला. एवढया पहाटे दवाखाने बंद .... काय करावे? मॉर्निंग वॉकला निघालेल्या स्नेही डॉक्टरांनी तपासले. दवाखाना उघाडल्यावर ताबडतोब ॲडमिट करायवयास सांगितले. माईंच्या सुनेने रेवतीने कसं बसं बळजबरीने त्यांना चहा बिस्किटे खायला घातली. ते शेवटचे होते असं त्यावेळी तिच्या कल्पनेतही नसणारं.....
सकाळी दवाखाना उघडल्याबरोबर माईंना दवाखान्यात नेल. डॉक्टरांनी त्यांना ॲडमिट करुन घेतलं. लगबगीनं तपासलं. सगळया तपासण्या झाल्या आणि डॉक्टरांनी माईंची शेवटची स्टेज आहे असं घोषित केलं. रेवतीने डॉक्टरांशीच वाद घातला. काहीही बडबडु नका म्हणाली...... नाडी तपासली तर ठोके खूप कमी. बी.पी. कमी..... 80–52 . ..... तो नंतर कमी कमीच होत गेला..... आधीच त्यांना लो बी ।पी चा त्रास. डॉक्टर म्हणाले की किडनी फेल आहे. रक्त चढवावं लागेल. प्लाज्मा पण दयावा लागेल. धावाधाव सुरू झाली होती..... नाईलाज ..... त्यांना श्वास घ्यायला त्रास होत होता म्हणुन वेंटिलेटर लावले. कोण जाणे त्यावेळी रेवतीला वेंटिलेटर जणु देवचं भासला. तिच्या मते वेंटिलेटर वर ठेवलं म्हणजे माई नक्कीच वाचणारं. आशा सोडली नव्हती.....

गेल्या दोन – तीन वर्षांत माईंच्या पोटात पाणी होत होते. त्यांच्या मुलीने व डॉक्टर जावयाने मोठया दवाखान्यात नेवून खूप वेळा उपचार केले. पण वय साथ देत नव्हते. त्यात आप्पा गेल्यापासून त्या शरीराबरोबर मनानेही खचल्या होत्या. गेली बारा पंधरा वर्षे त्यांनी सोरायसिस सारखं असाध्य दुखण सोसलं होतं।त्यात संधीवाताचा त्रास . हालता चालता नीट येत नव्हते. आयुष्यभराच्या काबाड कष्टाचा आवाज आता चलता चालता हाडांतून येत होता. तितक्यात डॉक्टरांनी "नातेवाईकांना बोलावून घ्या" असे सांगितले. माईंच्या धाकटा लेकानं 'हाय' खाल्ली. त्याला रडु आवरेना. काय कराव सुचेना पण कळवावं तर लागणार होतं. माईंच्या मुलीला कळवलं. तर मुलगी व जावई लगेचच निघाले. खरचं मुलीची माया जगवेगळी असते. दोन अडीच तासात दोघेही हजर. माई नेहमी म्हणायच्या की डॉक्टर भुंग्यासारखी गाडी चालवतात.....

डॉक्टरांनी येऊन रिपोर्ट पाहीले. त्यांना कळुन चुकले की आता माई काही वाचणार नाहीत. पण माईंचा जीव कुठेतरी दुसरीकडेच अदकला होता. त्यांच्या दादामधे. 'दादा' त्यांचा मोठा मुलगा. तो वयाच्या तेराव्या वर्षी शिक्षणासाठी घराबाहेर गावाबाहेर पडला. तो पुन्हा कधीच घरचा झालाच नाही. खरं तर शिक्षणासाठी गेलेली मुले क्वचितच खेडयात माघारी येतात किंवा बहुधा पाहुणा म्हणुनच घरी येतात. माईंचा मुलगाही गेला तो परगावचाच झाला. त्याचे शिक्षण, नोकरी, लग्न, मुले सगळं काही शहरातच झालं. माई पूर्वी कधी कधी वर्षा दोन वर्षातून त्याच्याकडे जायच्या. नंतर नंतर तेही बंद झालं. शहरी संस्कृती बरोबर गावची संस्कृतीचं पटत नाही हे त्यांना कळुन चुकले होते. माईंचे यजमान आप्पा त्यांच्या भावा बहीणीच्या जबाबदारीचे आझे पेलता पेलताच गेले. त्यामुळे स्वतःच्या संसाराकडे व मुलांकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. आणि माईंच्या मनात कायमचा खेद राहिला की त्यांच्या मुलगा त्यांच्यापासून कायमचा दूर गेला. त्या नहेमी त्यांच्या मैत्रिणींबरोबर बोलत असत की एकदा माझ्या तावडीत येऊ दे गं.... मला त्याच्याशी मन भरून गप्पा मारायच्या आहेत. जो गेला तो गेलाच. एकदा माझ्या तावडीत सापडू दे. नेहमी आला की लगेच निघुन जातो. राहातचं नाही. असे म्हणत म्हणत चाळीस वर्षे निघून गेली. आणि माईंना त्यांच्या मनातले काही बोलता आलेच नाही. त्या आयुष्यभर झुरतच राहील्या . नंतर नंतर त्रागा करू लागल्या की "आता मला त्यांचे तोंड देखील पहायचे नाही. माझ्यासाठी त्याच्याकडे वेळ नाही. त्याला म्हणावं की मी मेल्यानंतरही येऊ नकोस. मला अग्नी पण देऊ नकोस. एक दोनदा तर दादांना फोन वर बोलतनाही अश्याच रागावल्या.

माणसाचं काय असतं ..... हे कधी कधी कळतचं नाही. जे हाती नसतचं त्याचा हव्यास असतो.बरे असो .....अश्या माईंच्या 'साहेब झालेल्या मोठया मुलाला रेवतीने फोन केला व म्हणाली , " दादा माईंची तब्येत खूप गंभीर आहे. त्यांना दवाखान्यात ॲडमिट केलं आहे. डॉक्टरांनी नातेवाईकांना बोलवून घ्यायला सांगितले आहे. पण..... दांदानी नेहमीसारखी यावेळीही येण्यासाठी अनिच्छा दाखवली. "मला वेळ नाही. खूप अर्जंट कामे करायची बाकी आहेत. उदया आले तर नाही का चालणार? रेवती म्हणाली की दादा डॉक्टरांनी लास्ट स्टेज सांगितली आहे. मी माझे सांगायचे काम केले. तुम्ही काय ते ठरवा. असे म्हणत रेवतीने फोन ठेवला. मी विचार केला की सोश्यल मीडियाने माणसांना जोडल आहे की तोडल आहे. पूर्वी लग्न पत्रिका महिना महिना आधी लोकं पाठवत असतं. नातेवाईक कार्यक्रमास हजर होत. पण मृत्यु पावलेल्यांच्या बातमीचे पत्र सर्व विधि उरकले तरीही मिळत नसे. पण आता तर तस नाही.....



सौ. सुजाता काळे, पाचगणी

तर काय..... माईंच्या दादांना कळवण्याचे कर्तव्य रेवतीने केले.
आता 'वेळ' दादांची होती कर्तव्य पार पाडण्याची. त्यादिवशी संध्याकाळ होत आली तरी माईंची तब्येत काही स्थिर होत नव्हती. रेवती व विभाताई दिवसभर माईंजवळचं होत्या. दिवसभरात माईनी अनेकवेळा दादाबद्दल विचारलं. सकाळी बोलत होत्या तोपर्यंत बोलल्या नंतर इशा–याने विचारू लागल्या. त्या दोघी काय बोलणार. त्यांच्याकडे त्यांच्या प्रश्नाचे उत्तर नव्हते. त्यांना या क्षणीही त्यांच्या दादाशी बोलायचे होते. मनातलं साठवलेलं सगळं बोलायचं होत. राग, प्रेम ब झुरणारा झरा वाहु दयायचा होता. पण हळुहळु त्यांची स्थिती खालावून गेली. शरीरातील एक एक अंग काम करेनासा झाला. संध्याकाळी ब्लड प्रेशर अगदी लो झाला. आता त्यानां खाणाखुणा पण करता येत नव्हत्या. वाचेने साथ सोडली होती.... त्राण नहता..... तोंडावर लावलेले वेंटीलेटर काढ म्हणुन त्यांनी रेवतीला वारंवार सांगितले. पण तिच्या हातात काही नव्हते. त्यांना रक्ताच्या बाटल्या व प्लाज्मा देऊन काही उपयोग झाला नव्हता. देवाची प्रार्थना करण्याशिवाय दूसरा पर्याय नव्हता.

आणि.........संध्याकाळी माईंचा दादा आला. आल्या आल्या माईंची चौकशी केली व आय सी यू मधे भेटायला गेला. माईंना हाक मारली. आम्ही सगळे खुष होतो की माईंना आनंद होईल. पण..... हे काय माईंनी चक्क मानच फिरवली. दादांचा चेहराही पाहीला नाही. आम्हा सगळयांना आश्चर्य वाटले की हीच ती माई आहे का? जी आयुष्यभर दादाशी पोटभर बोलायचं म्हणत होती. आज काय झालयं? दादांनी तीन चार वेळा हाक मारली. पण माईंनी फिरवलेली मान पुन्हा वळवली नाही. आज काय झालयं माईला? कारण वेगळचं होतं..... त्यावेळी माईंकडे वेळ होता पण दादाकडे नव्हता. आज माई मरणाच्या दारात आहे आणि दादा दवाखान्याच्या दारात..... आज दादाकडे वेळ आहे पण माईंकडे नाही. मी समजू शकले की माईंना वाटले असेल की अंतिम क्षणी भेटायला आला आहे जेव्हा बोलणचं अशक्य होतं. आता त्या बोलण्याच्या स्थितित नव्हत्या.

पहाटे पहाटे माई गेल्या..... त्यांचे अंत्यसंस्कार झाले. अग्नि देताना वर्षोवर्षीचा दादाचा उमाळा दाटून आला..... दादाने हबंरडा फोडला..... माई..... माई तू माझ्याकडे एक वेळ पाहीलं नाहीस..... एक वेळ.....फक्त एक वेळ .....पण त्यांना कुठे माहित होतं की माईंची ती 'वेळ..... आता टळून गेली होती.....!!



# पाऊस माझा

रसिका दास्ताने-सांगवीकर

पाऊस माझा भुरभुरणारा
मनात माझ्या रुणझुणणारा

आठव परिमळ
स्वप्नांचा दरवळ
श्वास सुगंधित मंतरणारा

आनंदाची शिंपण
उत्साह उधळण
रांगोळी प्रीतीची फुलवणारा

असावं किती खास
जगावेगळी आस
प्रवास सारा उलगडणारा

नवीन परिचय
जगण्याचा आशय
स्वतःच्याच प्रेमात पाडणारा

रुजते स्वप्नबीज
होते जग काबीज
आयुष्यात बहर आणणारा

मन जाते ढगात
रंगी रंगले सात
वेड्यांना शहाणपण देणारा

# माय मराठीचा सोहळा

सुजाता काळे, पाचगणी

तू चंदनाचा टिळा
शोभते केसरी कपाळा।
सुगंध चराचरात
माय मराठीचा लळा॥

तुज स्पर्शे जिव्हेंद्रिंय
अमृतवाणी माळा।
तृप्त होतसे कर्णेद्रिंय
मराठियांचे भूषण भाळा॥

स्फुरतसे तुज स्मरूनि
हृदये कंपन माळा।
अथांग भरारी नभी
क्षण आनंदाचे डोळा॥

गुढी मनामनात मराठी
भरुनी कौतुके मावळा।
युगे युगे गातील स्वर्ण
माय मराठीचा सोहळा॥





Mangala Tata, California

# ठेच

निशा गायकवाड

" धाडु" असा केवढ्यांन तो मोठा आवाज पूर्ण ऑफिसभर झाला , मेहतांच्या केबिनचा दरवाजा जोरात बंद करून रागाने पाय आपटत जानव्ही तिच्या केबिनमध्ये निघून गेली, जानव्ही मेहतांची पर्सनल सेक्रेटरी , तीन वर्षांपूर्वी तिने हे ऑफिस जॉईन केलं होत, दिसायला जेमतेम , स्वस्तातले कपडे घालूनही हिला फ्याशनची आवड आहे हे तिच्या राहणीमानातून लख्ख डोकवायचं, नवीन होती तेव्हा काहीशी घाबरलेली, संकोचलेली, मेहताने हि अशी मुलगी पी.ए.म्हणून का निवडावी ह्याच सुरवातीला सर्वानाच आश्चर्य वाटलं, पण नंतर मात्र तीच राहणीमान, बोलन वागण सगळच एकाएकी बदललं एक प्रकारचा आत्मविश्वास आला होता तिच्यात , साधे कपडे घालणारी एक साधारण मुलगी आता हायप्रोफाईल दिसू लागली होती,हि किमया दोन – तीन महिन्यातच घडून आली होती .

हि सर्व मेहतांची कृपा हे कुणी सांगायला नको "जानव्ही ना ती फक्त मेहताच्या जीवावर उड्या मारते बाकी येतंय काय तिला कामातलं, नुसते नखरे करायला कामावर यायचं लिपस्टिक लाव ,सेल्फी काढत बस , येणाऱ्या जाणाऱ्या वर फुकटचा रुबाब चढव, मेहतांच्या केबिन मध्ये गेली कि तासभर तरी काय बाहेर येत नाही" अश्या आडून आडून चर्चा ऑफिसभर होऊ लागल्या ,ऑफिसमधली ज्योती हि जानव्ही ची जिवलग मैत्रीण होती.जानव्ही जेव्हा नवीन होती तेव्हा ज्योतीनेच तिची सर्वांशी ओळख करून दिली होती. लंच हवर मध्ये जानव्हीला तिने आपल्यासोबत जेवायला बसवलं होत , त्यादोघी रोज कामावरून घरी जाताना सोबत निघत.नंतर मेहता जानव्हीला थांबवून घेऊन लागले मग मात्र ज्योतीने तिच्या सोबत जाण बंद केल .

जानव्ही आणि मेहतांची वाढती जवळीक तिने खुद्द जानव्हीच्या तोंडून ऐकली होती , तिने जानव्हीला समजवण्याचा खूप प्रयन्त केला पण लहानपणापासून कधीही चांगलं खायला, चांगल ल्यायला, न मिळालेल्या जानव्हीला तिचा हा उपदेश नकोसा व्हायचा दोघींची भांडण व्हायची मग मात्र ज्योतीने तिच्यासोबत काहीही संबंध ठेवला नाही पण आज तिला जानव्हीशी बोलावसं वाटलं.

तिने जानव्हीला मेसेज केला "ऑफिस सुटलं कि आपल्या नेहमीच्या बस स्टॉप वर भेटूया".

जानव्हीने "नको मला आज कुणालाही भेटायची इच्छा नाही" असा रिप्लाय दिला.

तरीही ज्योती ने "भेट , तुला बर वाटेल" त्यानंतर जानव्हीने काही रिप्लाय दिला नाही पण

नेहमीच्या ठिकाणी दोघी भेटल्या.

"काय झालं आज केबिन मध्ये"

"जाऊदे ग, माझंच नशीब फुटकं म्हणून हि वेळ माझ्यावर आली"

"तुझ्या नशिबामुळे नाही तर तुझ्या वाहवत जाण्यामुळे हि वेळ तुझ्यावर आली , तुला मी कित्ती वेळा सांगितलं ' "बस्स कर यार प्लीज मला लेक्चर नको देऊस परत" जानव्हीने तिला मधेच थांबवलं. "ठीकेय, तू म्हणशील तस तुला राग येतो ना माझा जाते मी, काळजी घे" ज्योती जायला निघाली. जानव्हीने तिला हात धरून अडवलं आणि तिच्या गळ्यात पडून पुन्हा रडायला लागली, ज्योतीने तिला काहीवेळ तसेच राहू दिल, तिच्या रडण्याचा भर ओसरल्यानंतर, "आता सांगशील काय झालं" ज्योतीने विचारलं.

"मेहता बोलतात उद्यापासून ऑफिसला येऊ नकोस" "का?" "त्यांच्या घरी म्हणे समजलंय आमच्या नात्याबद्दल, पण मला माहित आहे मेहता खोट बोलतायेत माझ्याशी " "कशावरून" "आज काल ते फारसं बोलत नाहीत माझ्याशी, मला वेळ नाही देत, आमचं वरचेवर बाहेर फिरणं व्हायचं, पण आता ते सतत मिटींग्स आहेत असं सांगतात, आणि त्या सर्व मिटींग्स अचानक ठरलेल्या असतात माझ्याकडे त्यांचं काही अपडेट नसत""त्या मेहताचा नाद सोड, आणखीन किती दिवस हि चैन, तुला माहितीये ऑफिसमधले सर्व तुला किती घाण बोलतात, माझ्यावर थोडासा तरी विश्वास ठेव ,मी नेहमी सांगितलं हा वाईट मार्ग आहे ,अजूनही वेळ गेली नाहीये, ते बोलतायत ना तर खरंच नको येउस उद्या पासून कामावर , शोध दुसरी नोकरी, बघ तुझ्याकडे पैसे आहेत, पण आज तू इतकी डिप्रेस होतीस, एक माणूस तरी आलं तुला विचारायला, आयुष्यात पैशाने सगळं मिळत पण आपली मनापासून काळजी माणसं नाही मिळत, ती माणसं कमव" जानव्हीला सगळं पटत तर होत "ठीकेय ज्योती, मी नाही भेटणार पुन्हा मेहताला" "मी आहे तुझ्यासोबत नेहमी" ज्योतीने तिला आनंदाने मिठी मारली.

जानव्हीने नोकरी सोडली मेहताचा नंबर ब्लॉक लिस्ट मध्ये टाकला ,मेहताला तीच घर माहित न्हवत , मेहताने पण विषय सोडून दिला, त्याचे खरंच दुसऱ्या एका बाईशी संबंध होते , ती बाई त्याला पैशांच्या बाबतीत लुबाडून पळून गेली होती , हे प्रकरण खरंच आता त्याच्या घरी समजलं होत, काही महिने गेल्यानंतर मेहताला जानव्ही ची परत आठवण झाली पण तिला शोधायचं कसं, ज्योती आणि जानव्हीची मैत्री त्याला माहित होती, ज्योती कडे विचारानं त्याला प्रशस्त वाटेना, एच, आर.कडे तिचा पत्ता विचारणं म्हणजे हा पुन्हा जानव्हीला शोधतोय हे पूर्ण ऑफिसभर कळणार, पुन्हा कदाचित माझे ग्रह उलटले आणि जर माझ्या घरी कळलं तर काही आपली खैर नाही हे तो जाणून होता, पण तरीही जानव्ही त्याला कोणत्याही परिस्थिती हवी होती, मेहताला जरी तीच घर माहित न्हवत तरी ती कोणत्या वसाहती मध्ये राहते हे मात्र त्याला ठाऊक होत, खूपदा तो तिला रात्री गाडीने घरी सोडायचा पाच सहा म्हाडाच्या इमारतींपैकी एका इमारती मध्ये तीच घर होत, तो रोज ऑफिस सुटल्यावर तासभर जाऊन तिकडे गाडीत बसून तिची वाट पाहू लागला जवळ जवळ आठ दिवसानंतर नवव्या दिवशी जानव्ही त्याला त्या रस्त्यावरून घरी जाताना दिसली , त्याने पटकन गाडीतून उतरून तिला गाठलं.

"सर, तुम्ही आणि इथे" जानव्ही ने आश्चर्याने मेहताला विचारलं,

"हो तुझ्यासाठी" मेहताच इमोशनल नाटक सुरु झालं

"का, ती सोडून गेली वाटत " जानव्ही शांतपणे म्हणाली.

"जानू,, प्लिज असं बोलू नकोस , तुझ्याशिवाय कुणीच न्हवत कधीच न्हवत"

"हो का, मग मी नोकरी सोडल्यानंर आज वेळ मिळाला तुम्हाला "

" अग नाही खूप प्रॉब्लेम्स होते, म्हणून नाही येता आलं आणि तसही तू माझा नंबर ब्लॉक करून टाकलास फोन कसा करू तुला"

"हो, केला मी ब्लॉक तुमचा नंबर आणि तुम्हालाही प्लिज जा इथून"

ती जायला वळली तसा मेहताने तिचा हात पकडला

"मिस्टर मेहता मी इथे राहते इथे तमाशा नका करू प्लिज:" जानव्ही रागाने आपला हात सोडवून घेत म्हणाली.

"बर, तू म्हणशील तस, एकदा भेट मला, आपण बोलू, प्लिज फक्त एकदा भेट" मेहता विनवून म्हणाला.

"ठीकेय कुठे भेटायचंय"जान्व्हीला एकदाचा सोक्षमोक्ष लावायचा होता .

त्यादिवशी पहिल्यांदा जेव्हा मेहतांनी तिचा इंटरव्ह्यू घेतला होता ते फक्त तिच्या कडे बघत होते ,मेहतांनी फक्त तुझ्या घरी कोण असत इतकंच तिला विचारलं होत.ह्या कामाची तिची गरज ओळखून तिला नोकरी दिली होती.

त्याच्या तीनचार दिवसातच जानव्हीला मेहतांकडून तू असे कपडे घाल अजून छान दिसशील अश्या सूचना मिळू लागल्या, त्या नंतर अचानक एक दिवस त्यांनी त्यांच्या बायकोचा विषय काढला ती कशी आहे ती कशी त्यांना त्रास देते त्यांच्याकडे कस तीच अजिबात लक्ष नाही असं म्हणून तिच्या समोर रडू लागले, जानव्हीला कित्ती बिचारे आहेत मेहता ह्यांना आधाराची गरज आहे असं वाटू लागलं होत, मग नकळत ती त्यांची काळजी घेउन लागली होती त्यांना काय हवं नको ते बघू लागली होती ते तिला चांगलं राहण्यासाठी पैसे देऊ लागले तीपण ते सांगितलं ते करू लागली होती,

जानव्हीला सगळ्या जुन्या गोष्टीं आठवू लागल्या.

त्या रात्री नेमका ज्योती चा फोन आला

"काय मॅडम, काय चाललंय"

"छान चाललंय, मस्त वाटतंय, तुला मी खूप मिस करते"

"जानव्ही, काय झालं"

"आज मेहता आले होते मला भेटायला, मला भेटायला बोलावत आहेत"

जानव्ही तू अजिबात जाणार नाहीयेस"

"ज्योती, मी जाणार आहे , मला जायचंय"

"तुझ्या गरजा नाही भागत का तुझ्या पगारात, कशासाठी पुन्हा तेच करतेयस"

"तू पण येशील का सोबत"

"अजिबात नाही," ज्योतीने रिप्लाय दिला.

"प्लिज माझ्यासाठी आयुष्यात पुन्हा तुला त्रास देणार नाही"

ज्योतीने फोन कट केला

मेहता आणि जानव्ही भेटले

"बोला सर, काय बोलायचं होत" जानव्हीने मेहतांना विचारलं.

"माझे सर्व प्रॉब्लेम्स तुला सांगायचेत, मी इतक्या दिवस कुठे होतो, माझ्या आयुष्यात काय काय झालं""पण आता तुम्ही मला हे का सांगताय"" मी तुला खूप मिस करत होतो, तू पुन्हा माझ्याकडे याव असं मला मनापासून वाटतंय""तुम्हीच मला नोकरीवरुन काढून टाकलं, मी कुठे सोडून गेले होते तुम्हाला "

"अग माझ्या फॅमिली मध्ये आंपल्याबद्दल माझ्या एका चुलत भावाकडून समजलं म्हणून मी तुला नोकरी सोडायला सांगितली, त्याच्याकडे आपल्या खाजगी क्षणांचे फोटोज आहेत आणि जर त्याला हवी ती रक्कम दिली नाही तर तो सर्व फोटोज माझ्या बायकोला दाखवेन अशी धमकी त्याने मला दिली हे सर्व सोर्टऑफ करेपर्यंत इतके दिवस गेले, "

"तुम्ही किती खर बोलता मला चांगलंच माहित्ये"

"मी खोटं नाही बोलत जानव्ही,"

"तरीही माझा विश्वास नाही, मला तुमच्यात काहीही इंटरेस्ट नाही"

"इंटरेस्ट नाही म्हणजे , का नाहीये, आता नाही लागत पैसे, दागिने ,नवीन कपडे, मोबाईल्स, कि आता कुणी दुसरा पुरवतो ह्या सर्व वस्तू"

"तुम्ही काय समजता मला, मी तुमच्या सोबत ह्या सर्व वस्तू मिळत होत्या म्हणून होते, चुकताय तुम्ही, हो मला तुम्ही पैसे ,दागदागिने ,कपडे , चांगल्या हॉटेल मध्ये जेवण सर्व काही दिलत, मला ते सर्व आवडतही होत , पण मी अडकले होते तुमच्यात , मला सगळं कळत होत , हे चुकीचं आहे ज्योतीने मला नेहमी सांगितलं पण खरतर मी तुमच्यात इन्व्हॉल्व्हड झालेय हे तिलापण नाही कळलं , तिला पण मी सर्व पैशांसाठी करतेय इतकंच वाटत राहील, त्या दिवशी मी तुम्हाला मिस लीना सोबत ड्रिंक घेताना आपल्या नेहमीच्या हॉटेल मध्ये पाहिलं होत तुम्ही खोटं बोलून त्या दिवशी मला भेटायचं टाळून तिला भेटलात, मग मात्र मी तुमचा पिच्छा पुरवला, तुम्ही आणखीन खोटं बोलत गेलात पण त्यादिवशी घरी समजलंय असं सांगून मला नोकरी सोडायला लावलीत, त्या नंतर आज पर्यंत माझं काय झालं ह्याच्याशी तुम्हाला काही घेणंदेणं न्हवत आणि आज माझी आठवण आली ती सोडून गेल्यानंतर, तुमच्या सारखी माणसं हि पैशाच्या जोरावर काहीही कराल पण कुणाचं खरं प्रेम कधीच मिळवू शकत नाही, आणि आता राहिला प्रश्न तुमच्या आयुष्यात परत येण्याचा तर ते आता शक्य नाही कारण एकदा मला ठेच लागलीये आणि माझं प्रेम हे इतकं स्वस्त नाहीये जे मी तुमच्यावर उधळू, काळजी घ्या स्वतःची आणि प्लिज पुन्हा माझ्यासारख्या कोणत्याही मुलीचा गैरफायदा घेऊ नका"

असं बोलून ती उठली , शेजारी तीच लक्ष गेल , ज्योती तिच्याकडे पाहताच राहिली, जानव्ही पाठोपाठ ज्योती देखील हॉटेल च्या बाहेर आली.

"आयुष्यात पैशाने सगळं मिळत पण आपली मनापासून काळजी माणसं नाही मिळत, ती माणसं कमव" असं म्हणालीस होतीस ना तू बघ मी आज तुला कायमच कमावलं हो कि नाही."

# Three charolya

**भूषण सहदेव तांबे, मुंबई**

विज्ञान:

विज्ञानाला आता जोपासा
आयुष्यात प्रगती कराल,
अंधश्रद्धेला महत्व दिल्यावर
कायमचे अंधारात राहाल.!

गुरु:

गुरु एक आदर्श व्यक्तिमत्व
पाठीराखा असतो जीवनाचा ,
ध्येय गाठण्या पायरी चढता
उपयोग होई त्यांच्या संस्कारांचा.!

जिजाऊ:

जिजाऊंनी दिली शिकवण
त्यांचे आदर्श मोठे संस्कार,
शिवबाने घडवला इतिहास
स्वराज्यस्वप्न केले साकार.!



Avinash Sadhu, California

# उलट्या नामे तरला वाल्या जाणा मतितार्थ

मुग्धा माधव केळकर , बडोदा

“ उपासना* म्हणजे स्वतःला जे पाहिजे ते मिळविण्यासाठी केलेली धडपड किंवा मेहनत. कितीही अडथळे वाटेत आले, दुःखाचे डोंगर कोसळले तरी मनाने कमकुवत न होता, खंबीरपणे त्यांना सामोरे जाणे. मनाला समर्थ बनविणे म्हणजे उपासना. वाल्या कोळीची गोष्ट सर्वश्रुत आहेच. आपली बायको व मुले आपल्या पापात भागीदार होणार नाहीत हे ऐकल्यावर,

वाल्याने स्वतःला बदलायचे असा निर्णय मनापासून घेतला. त्याने दरोडा घालणे, लुटणे, ठार मारणे हे सर्व सोडायचे आणि श्रीरामांसारखे सत्वशील बनायचे ठरवले. *राम* नामाचा ध्यास घेतला. *राम* आचरणात आणायचा निश्चय केला. एका दरोडेखोर, गुन्हेगार प्रवृत्तीच्या व्यक्तिमत्त्वाने सत्वशील बनायचे ठरवले होते. अवघड कार्य होते सोपे नव्हते सारे. पण एखादी गोष्ट मनापासून कराविशी वाटते त्यावेळी ती गोष्ट साध्य करण्यासाठी मनुष्य अपार मेहनत करायला तयार होतो. त्याने कास धरली ती *राम* नाम जपाची. त्याने राम मंत्र उलटा म्हणायला सुरुवात केली असे म्हणतात की त्याने *मरा मरा* पासून सुरुवात केली. इथे *राम* आणि *मरा* हे दोन्ही परस्पर विरोधी शब्द. त्याचाच अर्थ असा की, तो जे काही आधी करत होता त्याच्या उलट (विरुद्ध), त्याला जगायचे, वागायचे होते. म्हणजे चोरीमारी, डाका, खून, लुटमार सोडून रामासारखे सत्वशील बनायचे होते. सोपे नाही स्वतः ला बदलणे. त्याचा मनात उत्पन्न होणारा संपत्तीचा मोह, लोभ, तसेच ज्या शारीरिक बलाचा उपयोग तो मारहाण व जीवे मारण्यात करत असे त्या बलाचा अभिमान/अहंकार नष्ट करायचा होता म्हणजेच या सर्व वाईट विचारांना *मरा* म्हणायचे होते. विचार मनात येता क्षणी त्या विचाराला तिलांजली द्यायची होती. वाल्याला पदोपदीच नाही तर क्षणोक्षणी येणाऱ्या वाईट विचारांना *मरा* म्हणत समूळ नष्ट करायचे होते. म्हणजेच त्या विचारांना आधी *मरा मरा* म्हणत मारायचे होते तेव्हाच सत्वशील विचारांना जागा होणार होती. राम बनता येणार होते. वाईट व दुष्ट प्रवृत्तींना *मरा मरा* म्हणत *राम* बनण्याचा प्रवास होता तो.

वाल्या कोळ्याचा वाल्मिकी ऋषी बनायला काही तपे लागली. असे सांगतात की, वाल्याचा नामजप अखंड चालूच होता. हा नाम जप म्हणजे नुसते तोंडाने *राम राम* म्हणणे नाही तर तसे आचरण करणे. तो ज्या रानात बसला होता, तेथे वाल्या कोळ्याच्या भोवती रानातील लाल मुंग्यांनी वारूळ बनविले, तरीही वाल्या कोळी उठला नाही. इथे हे नुसते शब्दार्थ नाहीत तर मतितार्थ लक्षात घ्यायचे आहेत. *रानात* म्हणजे सगळ्या विकारांच्या गराड्यात राहून अनेक प्रकारचे मोह मोहात टाकायला तयार असतील ती स्थिती. त्या प्रत्येक मोहाच्या क्षणांना दूर लोटून स्वतःला सिद्ध करायचे आहे. *बसणे* हे क्रियापद पहा. म्हणजे आयुष्य एक प्रकारे थांबलय. झालेला मनाचा बदल अजून प्रत्यक्षात दिसून येत नाही अशी स्थिती. तरीही न डगमगता *वाल्या कोळी उठला नाही* म्हणजेच तो आपल्या विचारांवर ठाम राहिला. कालांतराने वाल्याचे सगळे शरीर मुंग्यांच्या वारुळाखाली झाकले गेले. आता इथे पुन्हा *वारूळ आणि मुंग्या* या शब्दांचा अर्थ.

मुंग्या जेव्हा मातीवर वारूळ बांधतात तेव्हा त्या मातीचा पोत आणि रासायनिक गुणधर्म पूर्णपणे बदलून टाकतात, तिला अत्युत्तम बनवतात. वारुळाच्या जमिनीवरील भागापेक्षा जमिनींच्या आतील भागातील मातीमध्ये सर्व पोषकद्रव्यांची मात्रा जास्त आढळते. रामनामाच्या सत्वशील मुंग्यांनी वाल्यामधील वाईट विचारांना पोखरून नष्ट केले होते. अंतर्मन शुद्ध केले होते. उरले होते ते फक्त सत्व विचार. त्यासाठी बराच कालावधी लागला होता पण वाल्या कोळ्यामधे अंतरबाह्य बदल घडला होता. त्याच्यामधील वाईट प्रवृत्ती पूर्ण पणे नाहिशी होऊन फक्त सत्वगुण शिल्लक राहिले होते. त्यासाठी त्यांने अतिशय वेदना सहन केल्या होत्या, अथक परिश्रम घेतले होते. हे परिश्रम म्हणजेच *राम मंत्राचा जप किंवा उपासना.*

मनुष्याने जर मनात आणले तर परिश्रमपूर्वक तो आपल्यात अमुलाग्र बदल घडवू शकतो. पाहिजे तो फक्त दृढनिश्चय आणि दृढ विश्वास.





# कुसुमची दिवाळी



जयवंत नारायण चव्हाण, रत्नागिरी

आज सकाळ पासूनच संध्या थोडी खुश होती, कारण आईने काल सांगितल्या प्रमाणे बरोबर आज तिला नेमकं दिवाळीच्या दिवशी तिच्या नोकरीवर रुजू होण्याचं पत्र मिळालं होतं ते सुद्धा ऐन दिवाळीच्या तोंडावर.

लेक खुश होती पण आईच्या चेहऱ्यावर मात्र थोडं थोडं गंभीर वातावरण होतं, कारणही योग्यच आहे एका लहानशा झोपडपट्टी मध्ये आपला नवरा मुलगी जेमतेम नऊ दहा महिन्यांची असेल तेव्हा आजारपणामुळे देवाघरी गेला, आणि आता ती सोळा वर्षांची होई पर्यंत कुसुम ने तिचा सांभाळ कसाबसा केला, पहाटे चार वाजता तिचा दिवस सुरू होई तो रात्री अकरा ला संपे, लवकर उठून सगळं आवरून संध्याच आटपून तिला म्युनिसिपालटी च्या शाळेत पाठवत, लेक तिथे संध्याकाळी पाच वाजे पर्यंत असेल कुसुम ची ह्या मधल्या काळातली आपल्या लेकीची काळजीच नसे कारण म्युनिसिपालटीच्या शाळेत दुपारच्या जेवणापासून ते संध्याकाळच्या चहा पर्यंत सगळं होतं, मग मात्र पाच पासून रात्री अकरा पर्यंत आपली लेक आपल्या पासून सहा तास काय करत असेल, कशी असेल याची मात्र चिंता तिला सतावत असे, आणि लेकीने पण आईला ठाम सांगितलं आई तू माझी काळजी नको करूस ह्या वेळेत कारण मी फक्त सहा तास तुला सांभाळून घेते ग पण तू तर मला आयुष्यभर सांभाळून घेतलंस, हे सहा तास काही नाही ग, हे लेकीचं वाक्य कुसुम ला खूप भावलं, आणि ती मनमोकळे पणाने आपलं घर काम करू लागली,

संध्याकाळी पाच ते रात्री अकरा ह्या सहा तासात संध्या काय करत असेल ? तर ती लेक आपल्या आईला कामात हातभार लागावा ह्या साठी शहराजवळच असणाऱ्या एका वाचनालयात साफ सफाई चं काम करत होती, तिथल्या ग्रंथपालांनी तिला काम करायला नाही सांगितलं पण बापडी पोर आपल्या मनातलं सगळं त्यांना सांगून मोकळी झाली, तिची ही जिद्द पाहून महाशयांनी सुद्धा तिला समजून घेतले,

पाच वाजता शाळा सुटल्यावर ती वाचनालयात यायची आणि साहेब तिला आल्या आल्या आजचे वर्तमानपत्र वाचायला द्यायचे, मग स्पर्धा परीक्षेची पुस्तक, अवघं वय सोळा असून सुद्धा सोळाव वरीस धोक्याचं याला अपवाद ती लेक होती, मनात काहीतरी करण्याची खूप जिद्द होती तिच्यात, हे हेरूनच त्या हिऱ्याला पैलू पडण्याचं काम ग्रंथपाल करीत होते तिला खूप पुस्तके वाचायला मिळत, वाचनालय रात्री दहा ला बंद होत तो पर्यंत ती तिथे असे तिच्या मनाला वाईट नको वाटायला म्हणून महाशय तिला थोडं साफ सफाई च काम देत, आणि महिना पंधराशे रुपये स्वतःच्या खिशातून देत, त्यांनी सुद्धा मनावर घेतलेलं की ह्या मुलीला तिचं स्वप्न साकार करून द्यायचं,

उरलेला ऐक तास संध्या आपल्या झोपडीच्या बाहेर आईची वाट बघत बसलेली असायची.आई आल्यावर दोघे माय लेक एकत्र जेवण करीत व एका नव्या आशेच्या सूर्योदयाच्या गोड स्वप्नांनी दुसऱ्या दिवशी उठून आपला नेहमीचा दिनक्रम चालू ठेवत.

असं करता करता संध्या वयाच्या एकविसाव्या वर्षी केव्हा आली ते कळलंच नाही,नुकतंच तिने कॉलेज संपून लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत टॉप होऊन यश संपादन केलेलं आणि तिला तहसीलदार पदाची मना सारखी नोकरी सुद्धा भेटलेली, तिच्या आणि कुसुम च्या प्रयत्नांच चीज झालेलं आज दिसत होतं,ऐन दिवाळीच्या तोंडावरच तीच जॉइनिंग लेटर आलेलं.इतकी वर्षे थोडी दुःखात, संकटात गेलेली दिवाळी आज आपल्या आयुष्यात सुखाची आली ती आपल्या प्रयत्नांनी आणि आपल्या लेकीच्या कर्तुत्वांनी तिला साथ देणाऱ्या त्या म्युनिसिपालटी च्या शाळे पासून ते वाचानालयातल्या ग्रंथपालां पासून तिच्या स्वतः मुळे...

हे सर्व आपल्या नजरेने पाहून कुसुमच्या डोळ्यातून आनंदाश्रू येऊ लागले आणि यंदा मात्र संध्या आणि कुसुम ची दिवाळी सुखाची पार पडणार होती...






# मिलन

आज सकाळ पासून पाऊस सुरु होता . रोजच्याप्रमाणे मी धावतच बस स्टॉप वर आलो . जोरात पडणाऱ्या पावसाने छत्रीवरून पद्धतशीरपणे पावसाच्या धारा पडत होत्या . त्या अंगावर पडू नये म्हणून प्रत्येक जण अगदी अखडत आपापल्या बसची वाट पाहत होते . मी समोर पाहिले तर बस नव्हती . इकडे तिकडे पाहू लागलो . स्टॉपवरचे सगळे आपल्याच तालात असल्यासारखे . इतक्यात एक आवाज आला . प्रीतम बस गेली . ओ गॉड ! असे म्हणून मी लगेच वळलो आणि रिक्षा पकडण्यासाठी जाऊ लागलो . मागे वळून मी पाहिले कि आपल्याला सांगितले कुणी ? स्टॉपवरचे सर्वजण तर मक्ख होते . एक व्यक्ती जात होती . याने आपल्याला सांगितले ? ऑफिसची वेळ झाल्याने मी लगेच ऑफिससाठी रवाना झालो . दिवसभर मी अस्वस्थ होतो . आमच्या स्टॉपच्या आजूबाजूला तो रोज भटकत असे . कधी कधी पानठेल्यावर पेपर वाचताना मी त्याला पाहिले आहे . अंगात मळकट कपडे, केस वाढलेले. कधी कधी तो आपल्याचकडे पाहत आहे कि काय असा भास होत असे . पण कोण तो ? अन मला नावाने कशी हाक मारली त्याने ? माझे नाव माहित आहे म्हणजे हा नक्कीच नागपूरचा.

पण इथे नाशिकला ? या अवस्थेत ? ओ शिट !! डोके फिरायची वेळ आली . संध्याकाळी बस मधून उतरल्यावर पाच - सात मिनिटे मी त्याला शोधले . पण तो दिसला नाही . नंतर महिनाभर तो मला दिसलाच नाही . एक दिवस बसमधून गावात जात असताना तो अचानक मला दिसला . मी लगेचच बस मधून उतरलो आणि सरळ त्याच्या समोर जाऊन उभा राहिलो . त्याला मी जवळून निरखू लागलो , तसा तो जायला निघाला . ए थांब ! कोण तू ? मला कसा ओळखतोस ? मी विचारले . मी ? तुम्हाला ? कुठे काय ? मी नाही ओळखत तुम्हाला साहेब . तो म्हणाला . खोटं बोलू नकोस . त्यादिवशी तूच मला बस गेली म्हणून सांगितले . ते केस बाजूला कर तोंडावरचे . मी म्हणालो . त्याने केस बाजूला केले आणि म्हणाला प्रीतम ! प्लीज तू निघ !

निशिकांत ? ओ गॉड ! निशा , हि काय अवस्था केलीस ? का झालास असा ? मी विचारले . प्रीतम प्लिज लोक संशयाने बघताय तुझ्याकडे . तू माझा नाद सोड व मला पुन्हा भेटू नकोस . माझं जीवन मलाच जगू दे . तो म्हणाला . मी काहीच ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हतो . त्याचा हात धरला व बाजूच्याच कटिंग सलून मध्ये घेऊन गेलो . आजूबाजूचे लोक बघत होते . नंतर ऑटोने घरी आणले त्याला . त्याला कपडे दिले माझे . तयार होऊन आला तो आणि मी बघतच राहिलो . निशा अजूनही तसाच स्मार्ट . पण अतिशय अशक्त झाला होता .

प्रीतम का आणलेस मला ? आता रुळलो होतो मी तसे जगण्यात . शिवाय समाजाचाही त्रास होईल तुला .तुझ्या एरियातले सगळे लोक ओळखतात मला , एक भिकारी म्हणून - निशिकांत म्हणाला . निशिकांत तू जरावेळ चूप बसशील का ? हे बघ , हा भिकारी माझा कॉलेजचा मित्र आहे हे समजल्यावर मी काही न करता जगू शकेन का ? शांत चित्ताने मला सर्व सांग . तुला पूर्ण पुन्हा जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणल्याशिवाय मी सोडणार नाही - मी म्हणालो . प्रीतम पाश्च्याताप होईल तुला . तू हि रिस्क घेऊ नकोस . मी वाटल्यास दुसऱ्या गावी जाईन . तुला पुन्हा दिसणारपण नाही . पण - पण आता पुन्हा मी चांगल्याप्रकारे जगू शकेन असं वाटत नाही - तो म्हणाला .मी म्हणालो - निशिकांत , तुला तर मी सोडणार नाहीच . त्यामुळे तो विचार सोडून मला सांग असे काय झाले ?

तो सांगू लागला - प्रीतम , माझ्या रूम जवळच राहत असलेल्या निशाशी माझे सूर जुळले होते . आमची पहिली भेट झाली त्याला हा सतत कोसळणारा पाऊस साक्षी आहे . अनाथालयात तर मला चांगली वागणूक मिळाली , पण बाहेरच्या जगात स्वतंत्रपणे राहताना एकटेपणा खूपच जाणवायचा . मला पुण्याला नोकरीचा कॉल आला . सुट्टी मिळाल्यावर मी पुन्हा येई पर्यंत ती माझी वाट पाहणार होती . एक एक दिवस मला युगा सारखा वाटायचा. पण फोन आणि पत्राची सोया नव्हती . गरिबी माणसाचा किती छळ करते याची जणू पदोपदी जाणीव होत होती. आठ महिन्यांनी मला सुट्टी मिळाली . मला तर तिच्या शिवाय या दुनियेत कुणीच नव्हते . मी तडक नागपूरला आलो .

हॉटेलमध्ये बॅग ठेवून मी निशाच्या घरी आलो . पाहतो तर घराला कुलूप . आजू बाजूला चौकशी केली . पण कुणीच सांगू शकले नाही कि ती आणि तिची आई चार महिन्यांपूर्वी कुठे गेले . एकदम हातपाय गळायला लागले . एवढ्यामोठ्या जगात मी कुठे शोधू ? पुन्हा पुण्याला जाऊन नोकरी करू ? कुणासाठी जगू ? सेवाग्राम एक्सप्रेस मध्ये बसलो रात्री . सकाळी नाशिकला उतरलो . त्र्यंबकेश्वरला अश्रूंचा अभिषेक घातला व तिथेच आजूबाजूला राहू लागलो . जवळचे सर्व पैसे संपले . मी रस्त्यावर आलो .नंतर



किशोर श्रीकांत केळापूरे, नागपूर

मी , हा असा . उगीच वेड्या आशेवर जगतोय .

त्याचे सांगून झाले . पण मलाही काही सुचत नव्हते . दुसऱ्या दिवसापासून मी नियमित ऑफिसला जाऊ लागलो . संध्याकाळी आम्ही बाहेर फिरायला जात असू . निशिकांत फक्त एकदाच कॉलेज मध्ये 'बहुत प्यार करते है तुमको सनम ' हे गाणे गायला होता हे मला पक्के आठवत होते . एक दिवस गावात फिरत असताना तीच धून एका ऑर्केस्ट्राच्या ऑफिसमधून ऐकू आली . मी निशिकांतला घेऊन सरळ वर ऑफिसमध्ये आलो . प्रीतम इथे कशाला आलो आपण ? निशिकांत म्हणाला . हे बघ निशिकांत . तुझ्याजवळ असलेल्या कलेचे सार्थक झाले पाहिजे . शिवाय स्थिरस्थावर होण्यासाठी तुला काहीतरी तर करायलाच पाहिजे - मी म्हणालो .

नंतर मॅनेजरशी बोलून निशिकांतला तालमीसाठी तिथे पक्के केले आणि मॅनेजरला त्याच्याविषयी थोडी कल्पनाही दिली. सात-आठ महिने प्रॅक्टिस झाल्यावर एका सार्वजनिक कार्यक्रमात निशिकांतलाही गाण्याची संधी मिळाली . एका प्रसिद्ध रंगमंदिरात कार्यक्रम ठरला होता . निशिकांतला स्वतःच्या पायावर उभा असलेला मला बघायचा होता . हॉल गच्च भरलेला होता . कार्यक्रम सुरु झाला . मी मात्र निशिकांतची स्टेजवर येण्याची वाट पाहत होतो . मध्यंतर झाले तरी त्याचे गाणे झाले नव्हते . मध्यंतरानंतर कार्यक्रम पुन्हा सुरु झाला .

संचालकांनी घोषणा केली ' आवाज के दुनिया के दोस्तो , आज हम ला राहे एक उभरते हुए कलाकार को , मिस्टर निशिकांत ' ! येस्स निशिकांतच हा !! त्याने त्याचे आवडते गाणे सुरु केले - 'बहुत प्यार करते है तुमको सनम ' ! काय सुंदर गात होता तो . गाणे संपले अन टाळ्यांचा कडकडाट झाला . मला तर इतका आनंद झाला कि कधी एकदा आनंदाने त्याला मिठी मारतो असे झाले . त्याने दुसरे गाणे सुरु केले . ' अकेले है चले आओ जहाँ हो ' .

साईड स्क्रीनवर त्याचे डोळे खरंच कुणाला तरी शोधत आहे हे स्पष्टपणे जाणवत होतं . गाणे अर्धे झाले असेल तोच हॉलमध्ये एक जोराचा हुंदका ऐकू आला , अन कुणीतरी स्टेजकडे धावत असताना दिसले . ती स्टेजवर गेली आणि निशिकांतला मिठीच मारली . संचालकांनी माईकचा ताबा घेतला आणि सांगितले ' दोस्तो ये कार्यक्रम का पार्ट नही , हकीकत है मिस्टर निशिकांत को अपनी मंजिल मिल गयी है ! ईश्वर उन दोनोंको अब कभी जुदा न करे ' . ती दोघे हॉलच्या बाहेर आले . स्टेजवर कलाकारांनी ' न जाने कहा तुम थे , न जाने कहा हम थे ' हे गाणे सुरु केलं होतं . मीही कार्यक्रम सोडून बाहेर आलो .

मुसळधार पाऊस सुरु होता . ती दोघे पावसात भिजून नुसतेच एकमेकांकडे बघत होती . मला पाहताच निशिकांत म्हणाला ' प्रीतम तुझे अनंत उपकार आहेत माझ्यावर '. आज मी त्याला मुळीच टोकले नाही .

करू दिला अश्रूंचा पाट मोकळा . पावसाचे आणि मीलनाचे किती अतूट नाते असते हे मी आज अनुभवत होतो . माझी नजर सहज वर गेली . त्या मेघदूताना पाहून वाटले कि हे मेघदूतांनो जा सांगा त्या जगन्नियंत्याला कि विरहा नंतर मीलन अत्यंत सुखद जरूर आहे , पण इतकाही विरह कुणाच्या वाट्यालादेऊ नकोस की जीवनच उध्वस्थ व्हावे '. भयंकर गडगडाट झाला . जणू त्यालाही माझे म्हणणे तात्काळ पटले होते .

# *सोशल मीडिया आणि समाज स्वास्थ्य*

आ"मनुष्य हा एक सामाजिक प्राणी आहे आणि इतर अनेक प्राण्यांसारखाच तो कळप बनवून राहतो. तोच आपला समाज. पण इतर प्राण्यांपेक्षा अधिक बुद्धिमान असल्यामुळे त्याने निरनिराळे शोध लावून आपल्या सभोवतालची भौतिक परिस्थिती अनुरूप बनवली आहे. अतुलनीय बुद्धी, वाचा आणि विचार करण्याची शक्ती यांचा उपयोग करून त्याने आपला समाज अतिप्रगत आणि श्रेष्ठ (खरोखरीच का ?)बनविला आहे.

पण जशा नाण्याला दोन बाजू असतात तसेच या बाबतीतही झाले आहे. अतिहावरटपणा, हव्यास यामुळे आणि व्यक्ती स्वातंत्र्याच्या अतिरेकामुळे समाजाच्या नैतिक आणि सामाजिक मूल्यांचा ऱ्हास होऊन तो आपल्या समाजाचे स्वास्थ्य मात्र हरवून बसला आहे. यामध्ये सिंहाचा वाटा आहे तो म्हणजे सोशल मीडियाचा अतिरेक आणि अनियंत्रित वापर यांचा.

*सोशल मीडिया म्हणजे काय?*

ोशल मीडिया किंवा सामाजिक माध्यमे याचा साधा, सरळ, सोपा अर्थ आहे - समाजामध्ये वैचारिक, सांस्कृतिक, सामाजिक देवाण-घेवाण करण्याची साधने.

*सामाजिक माध्यमे आणि त्यांचे बदलते स्वरूप- काल आणि आज*

कालानुरूप सामाजिक माध्यमांचे स्वरूप खूप बदलले आहे. सुरुवातीला शेकोटी शेजारील, पारावरच्या गप्पाटप्पा, त्यानंतर पत्रलेखन, वर्तमानपत्रे, नियतकालिके, मासिके, त्यानंतर रेडिओ, दूरचित्रवाणी असे स्वरूप होते. नंतर डिजिटल आणि दृकश्राव्य क्रांतीचे युग आले आणि आले ई-मेल, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम इत्यादी.

*सामाजिक माध्यमे आणि बिघडणारे समाज स्वास्थ्य*

'अति तेथे माती' या उक्तीप्रमाणे या माध्यमांचा अनियंत्रित आणि अतिप्रमाणात वापर यामुळे समाज आपले स्वास्थ्यच हरवून बसला आहे. धमकीचे आणि पांचट मेसेज, अतिरंजीत लेख, अफवा, अश्लील आणि आक्षेपार्ह छायाचित्रे, आर्थिक गुन्हेगारी, न वाचताच पुढे पाठवा ही वृत्ती व सवय, 'लाईक' किती, 'कमेंट' किती याची लालसा आणि सतत 'ऑनलाईन' राहण्याची चटक असे उत्तरोत्तर भयानक स्वरूप या भस्मासुराने धारण केले आहे. त्यामुळे समाजाचा नैतिक आणि वैचारिक ऱ्हास होऊन या दलदलीत समाज अधिकच रुतत चालला आहे.

*काय आहेत या बिघडलेल्या समाज स्वास्थ्याची कारणे?*

*अतिकार्यमग्नता आणि वेळेचा अभाव-*

पूर्वी नियंत्रित गरजा, नियंत्रित कार्यालयीन वेळा यामुळे कुटुंबाशी, समाजाशी, मित्रमंडळी आणि नातेवाईकांशी चर्चा, गप्पा, प्रत्यक्ष वैचारिक देवाण-घेवाण याकरिता वेळ मिळत होता. पण आता तसे राहिले नाही. गरजा अनियंत्रित, काम सतत आणि वेळ अपुरा असे दुष्टचक्र सुरू आहे आणि त्यामुळे बिघडले आहे स्वतःचे, कुटुंबाचे मानसिक आरोग्य. मग प्रत्यक्ष गाठीभेटीपेक्षा सामाजिक माध्यमांवर भर देऊन आपण बिघडवतो आहोत आपले समाज स्वास्थ्य देखील.

*एकल कुटुंब पद्धतीचा अस्त-*

पूर्वी तीन-चार पिढ्या आणि चुलत -मालत असे भले मोठे कुटुंब असे. त्यामुळे प्रत्यक्ष भेटी, चर्चा होत असत. आता मात्र चौकोनी, त्रिकोणी आणि काही ठिकाणी तर समांतर रेषांची कुटुंबे आढळतात. घरे भली मोठी पण बोलायला कोणी नाही. त्यामुळे व्यक्ती मन मोकळे करण्याकरता सामाजिक माध्यमांचा उपयोग करतो आणि हळूहळू त्याच्या आहारी जातो आणि त्याचा अक्षरशः गुलाम बनतो.

विंग कमांडर (निवृत्त) डॉ राजेश शांताराम जोशी सातारा , महाराष्ट्र

*आत्मकेंद्रीतपणा आणि स्वमग्नता -*

स्वतःच्याच जगामध्ये राहणे, दुसऱ्याला कमी किंवा तुच्छ लेखणे,गर्विष्ठपणा आणि तथाकथित उच्चभ्रूपणाच्या भ्रामकतेने आलेले मौन यामुळे झालेला भावनिक आणि मानसिक कोंडमारा असह्य होतो. त्यावर उपाय म्हणून सहज उपलब्ध आणि कोणाचेच नियंत्रण नसलेले सामाजिक माध्यम जवळ केले जाते आणि मनुष्य त्याच्या आहारी जातो.

*सहज उपलब्धता -*

डिजिटल क्रांती आणि उंचावलेल्या आर्थिक जीवन स्तरामुळे भ्रमणध्वनी, संगणक, माहिती तंत्रज्ञान सहज आणि स्वस्तात उपलब्ध झाले आहे. ते सतत आणि सर्वत्र उपलब्ध असते. त्यामुळे समाजाला त्याची आधी सवय आणि मग चटक लागते आणि त्याची वाईट फळेही भोगावे लागतात.

*खोटी स्तुती आणि जहाल टीका-*

सामाजिक माध्यमे सतत आणि सर्वांना उपलब्ध असल्याने त्यावरील माहिती, छायाचित्रे, चलचित्रे कोणीही पाहू शकतो आणि प्रतिक्रिया देऊ शकतो. त्यामुळे खोटी वरवरची स्तुती आणि बोचरी टीका कोणीही करू शकतो आणि बऱ्याच वेळा याचा गैरफायदा असामाजिक तत्वे देखील घेतात. या एकाच कारणामुळे कितीतरी लोकांचे आयुष्य उध्वस्त झाले आहे आणि एकूणच समाजाचा नैतिक आणि मौलिक ऱ्हास झाला आहे.

*व्यक्ती 'स्वातंत्र्य' की 'स्वैराचार'? -*

'स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे' या उक्तीचा प्रत्यय सामाजिक माध्यमांमध्ये नेहमीच येतो. व्यक्ती स्वातंत्र्य कुठपर्यंत उपभोगायचे आणि कुठे थांबायचे हेच माहिती नसल्याने पाळले जात नाही आणि मग आभासी वाद, निंदा हे लिखित हिंसाचाराचे रूप धारण करतात आणि समाजस्वास्थ्य बिघडवतात.

*स्वतःबद्दलचा फाजील अति आत्मविश्वास -*

सामाजिक माध्यमांमध्ये वैयक्तिक माहिती ,छायाचित्रे, चलचित्रे शेअर करताना हा नेहमी दिसून येतो. मग ती व्यक्ती निंदा, अफवा आणि इतर गुन्हेगारी यांना बळी पडते आणि मग उरते ती केवळ स्वप्नांची राखरांगोळी!

*सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास -*

सध्या समाजात एकूणच मूल्याधारित जीवनशैलीचा ऱ्हास झाला आहे आणि हे सर्व सामाजिक माध्यमांमध्ये प्रतिबिंबित होत आहे.

*संयमाचा आणि स्वयंशिस्तीचा अभाव -*

सामाजिक माध्यमे कधी, कुठे, केव्हा ,किती वेळ आणि कशाप्रकारे वापरायची याच्या नियमनांबद्दल एकूणच अनास्था समाजात दिसते आणि संयम आणि शिस्तीचा अभाव असल्यामुळे समाज स्वास्थ्य बिघडते.

*हावरटपणा आणि उतावळेपणा -*

'आत्ता लगेच फक्त मलाच हवे' या स्वभावाचा अतिरेक बऱ्याच व्यक्तींकडून सामाजिक माध्यमांचा वापर करताना दिसतो. कुठल्याही गोष्टीला उचित वेळ द्यायला ते तयार नसतात.

*मग सोशल मीडिया हे शाप की वरदान?*

आता हे सर्व असले तरी सामाजिक माध्यमे हा समाजाला मिळालेला शाप आहे असे मात्र नव्हे हं! सामाजिक माध्यमांचा चांगला वापर करून आपण समाज स्वास्थ्य सुधारूही शकतो. महापूर, भूकंप या संकटात मदत, गुन्हेगारांना पकडणे, परदेशातील आणि देशातील नागरिकांना मदत या व अशा अनेक चांगल्या गोष्टींमध्ये बऱ्याच जणांनी सोशल मीडियाचा चांगला वापर केला आहे . चांगल्या गोष्टी शेअर करणे, एकमेकांना मदत करणे यातून सामाजिक माध्यमे ही वरदानही ठरू शकतात. त्याकरिता आपल्याला फक्त काही नियमांचे पालन करायचे आहे. जसे की -

*प्रत्यक्ष भेटीगाठी आणि वैचारिक देवाणघेवाण -*

शक्य असेल तेव्हा सगळ्यांशी प्रत्यक्ष बोलणे, भेटणे, चर्चा करणे आणि मुख्य म्हणजे दुसऱ्यांना वेळ देणे.

*आभासीपणाची जाणीव -*

सामाजिक माध्यमे ही काही प्रमाणात मृगजळासारखी आहेत. त्यामुळे ती वापरताना काय आभासी आहे, काय मूर्त आहे याची जाणीव ठेवणे आणि त्याप्रमाणे उचित आचरण आणि सावधानता महत्त्वाची आहे. आभासी सामाजिक माध्यमांच्या काही मर्यादा आहेत आणि त्या पलीकडे गेल्यानंतर काय परिणाम होतील याची जाण असणे आवश्यक आहे.

*कडक कायदे आणि अंमलबजावणी -*

सामाजिक माध्यमांवर काही प्रमाणात सरकारचा आणि कायद्याचा अंकुश असलाच पाहिजे आणि त्याची कडक अंमलबजावणी झाली पाहिजे तरच गुन्हेगारी आणि अतिरेकी प्रवृत्ती ही सामाजिक माध्यमांना लागलेली कीड नाहीशी होईल.

*छंद आणि सामाजिक कार्यांची जोपासना -*

यामुळे एकूणच व्यक्तीचा आणि समाजाचा स्तर उंचावण्यास मदत होईल आणि निरोगी समाजाचा उदय होईल.

*सांस्कृतिक मूल्यवर्धन -*

दया, परोपकार, बंधुता, देशभक्ती इत्यादी संस्कृती मूल्यांची जपणूक आणि संवर्धन यामुळे समाजाची सर्वांगीण प्रगती होईल आणि हळूहळू हे सामाजिक माध्यमांमध्ये परावर्तित होईल.

*सामाजिक माध्यमांचा उपवास किंवा सुट्टी -*

दिवसातून काही तास, महिन्यातून काही दिवस जाणीवपूर्वक सामाजिक माध्यमांपासून दूर राहणे आणि आभासी जगातून दूर मूर्त जगात जगणे, कुटुंब आणि समाजाला वेळ देणे, आत्मचिंतन करणे.

*आत्मसंयमन आणि स्वयंशिस्त -*

हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. सामाजिक माध्यमांमध्ये किती गुंतायचे, कुठे थांबायचे, काय पाहायचे आणि काय नाही, काय आणि कसे लिहायचे, व्यक्त व्हायचे याबाबतीतला संयम आणि शिस्त हीच निरोगी समाजाची गुरुकिल्ली आहे.

सामाजिक माध्यमे ही आग आणि पाण्याप्रमाणे आहेत. आग ही जोपर्यंत नियंत्रित असते तोपर्यंत ऊब देते, अन्न शिजवते पण अनियंत्रित झाली की घरादाराची राखरांगोळी करते. पाणी हे जीवन आहे, ते मळे फुलवते पण अतिरेक झाला की महापूर आणून सर्वस्व बुडवते. तसेच सामाजिक माध्यमे जोपर्यंत मर्यादित आहेत तोपर्यंत वरदान ठरतील आणि अमर्यादित झाली की शाप. या माहितीच्या महाजालात आणि सोशल मीडियाच्या चक्रव्यूहात आत्मसंयम आणि स्वयंशिस्तीची लक्ष्मणरेषा आपले संरक्षण करेल आणि समाजस्वास्थ्यही अबाधित ठेवेल. परंतु ही लक्ष्मणरेषा आपली आपणच आखायची आहे आणि आपणच ती पाळायची आहे.






Vaidehi Dandekar, California

# Children & Young adult Section

During last year, 2021, we weathered the CORONA virus and its variants, Jan 6, insurrection, climate-related catastrophic events in many parts of the world, the beginning of the Russia-Ukraine war, and many many more favorable and unfavorable events. Our surroundings do have an impact on us and only time will tell its significance, magnitude, and severity.

Our surroundings also impact the way we think and express ourselves. I have always believed that children should express themselves freely. Hence I have just compiled an unedited version of their writings, paintings, and other creations for 2022, MCF Diwali e-ank.

Some of the children who contributed to this section in the past few years are now in college. When they reflect upon their journey so far and by design or by chance come across their own articles, paintings or creations from the prior MCF e- ank, they will most certainly enjoy and appreciate their own creations in a new light. So just sit back, relax, and enjoy the creations of our young contributors of the 2022 MCF Diwali Ank.

***Editor***,

**Smita Dandekar**, California








**Diya Desai**
Age: 10 years
Newbury Park, CA, USA





[All credits go to owner]

→


"Some Day my Prince Will Come" (original by Adriana Caselotti)

Translated by: Arya Joglekar (helped by Neha Kulkarni)

स्नो व्हाईट आणि सात बुटक्यांमधील संवाद:
"एक होती राजकुमारी..."
"ओह, तूच ती राजकुमारी का?"
"...अणि ती पडली प्रेमात..."
"प्रेमात पडणं अवघड असतं का?"
"खरं सांगायचं तर, अगदी सोप्पं होतं ते.
राजकुमार खूप आकर्षक होता. तो माझाच होता."
"तो बलवान आणि देखणा होता का?
तो सशक्त आणि उंच होता का?"
"त्याच्या सारखा दुसरा कोणीच कुठेच नव्हता."
"त्याचं तुझ्यावर प्रेम आहे, असं तो तुला म्हणाला का?
त्याने तुझं चुंबन घेतलं का?"
"तो खुप कल्पना विश्वात रमणारा होता.
मी प्रतिकार करू शकले नाही.
एक दिवस माझा राजकुमार येईल.
एक दिवस आम्ही त्याच्या किल्ल्यावर जाऊ आणि
नेहमी आनंदी राहू.



Arya Jogalekar
Age: 13 years
San Francisco, USA



जेंव्हा कधी वसंत ऋतू येईल तेंव्हा परत नव्याने
आम्हांला आमचे प्रेम मिळेल.
पक्षी गात असतील आणि लग्नाचे वारे वाहत
असतील तेंव्हा माझी सगळी स्वप्ने पूर्ण होतील."

English~

A conversation between Snow White & the 7 Dwarves:

Once there was a Princess
Was the Princess, you?
And she fell in love.
Was it hard to do?
Well, it was very easy
Anyone could see that the Prince was charming
The only one for me
Was he strong & handsome?
Was he big & tall?
There's nobody like him, anywhere atall.
Did he say he loved ya?
Did he steal a kiss?
He was so romantic
I could not resist
Someday my prince will come
Some day we'll meet again
And away to his castle we'll go
To be happy forever I know
Someday when spring is here
We'll find our love anew
And the birds will sing & wedding bells will ring
Someday when my dreams come true







Saili Dandekar Sahdeo
Age: 3 years
Oakland CA



Sunanda Clifford
Age: 10 years
Oakland CA , USA

The first art piece is a school project. I was having trouble finding inspiration for it and then I thought about the five elements. I drew a volcano to represent fire, waves for water, air for air, mountains for earth and an empty space for ether/space. But as you can see I did not finish it. I got very rushed by time.





The second art piece I did for fun at home. It is a car with skis on top. There is also a sun disguised as a flower. I drew this because I was bored and had nothing to do.

Finally the third and last art piece I did in second grade at school. It is me but I did not have enough time to finish it so I don't have a shirt.





Anvita Bhave
Age: 16 years
Los Angeles, USA

*Shades of Happiness*



If happiness was a dice, it would have an infinite number of faces. Impossible to cover them all, this portfolio's purpose is to demonstrate the range of forms that happiness can take.

The definition of happiness is subjective to each person; some view it as success, others as family or culture. In America, chrysanthemums are considered symbols of joyousness and well-being, and similar to how no two petals on this flower are identical, there are infinite shades of happiness.

*Inhibition*

In this piece, a butterfly with a human body is standing on the edge of a cliff, with smaller butterflies flying above. The humanoid butterfly is beautiful but too scared to fly; happiness is out of reach. The others, although having a less intricate design, are carefree as they soar. This piece conveys how beauty doesn't always equal happiness, and how sometimes, beauty can be restricting and inhibiting.





*Rupture*

Throughout this portfolio, color is a metaphor, symbolizing life, family, wonder, etc. Similarly, the lack of color is also a symbol, representing pain, loneliness, fear. This piece especially highlights this; the leftmost house is grandiose, yet devoid of color, as if life has been leached from it. Contrastingly, the smaller quaint cottage is full of vibrancy, with flowers blooming in the windowsills. It exudes a homey feeling, energy bursting from the colors. This piece portrays a divide, depicting the limited role money plays in happiness. Happiness is attained through family and community, not grand things— as the rupture exemplifies.

*Shattered*




I see happiness as a range, a spectrum. On one side, white— complete happiness. On the other, black— complete unhappiness. Happiness and unhappiness are two sides of the same coin, one can't exist without the other, and so, in demonstrating the shades of happiness, including unhappiness is necessary. This piece serves that purpose, with the achromatic coloring and the man looking resigned and depressed. The darkness surrounds him, even creeping in near his face. This represents him being consumed by his fears and problems, leaving him shattered.

*Mysore Palace*

Mysore Palace, which I visited during my India trip, is the royal residence of the Wadiyar dynasty. I was in awe at its beauty, not a single pillar was unadorned. This particular hall was especially astonishing, with its green blue arches and curling golden vines. This piece symbolizes heritage; similar to how the Mysore Palace inspired me and gave me happiness, culture can evoke feelings of pride and connectedness in others too, making people happy.





*Stairway to Omniscience*

It remains a mystery whether all the knowledge in the world can make one happy, but this piece depicts that happiness— intellectual contentment. The stairs are made of books, spiraling higher until they disappear. The white light at the top is complete omniscience; the point where one will have gained all of the knowledge and there are no steps left. To some, what brings happiness is not family or money, but rather knowledge.



Chaitanya Dandekar
Age: 16 years
Kensington CA

Roughly two months ago, I was introduced to Chinmaya Mission. I had heard of it before, but never truly knew what its main purpose was, or what its many programs had to offer to young people like me. My parents participated in many Hindu camps and programs growing up in the United States. As a second generation Hindu-American, I felt that it was important to carry on the passion for learning Hindu philosophy, just as my parents had done. I had never been to a Chinmaya Mission program before, but had participated in other various Hindu programs throughout the years including Hindu American Foudation's Dharma Ambassador program. However, many of these programs were close to home, or virtual. Because of this, Chinmaya Mission was a completely new experience for me, as I had the chance to fly to the East Coast to be in the Washington D.C. ashram. The ashram is in the small suburban town of Chantilly, Virginia, about an hour drive from Capitol Hill. Luckily, throughout my camp experience, I was not the only newcomer, as my maternal cousin brother and sister participated in the camp, too. I stayed with them at their home in Maryland. Every morning, the three of us would rise at 7:30, and leave the house by 8:00 AM, desperately hoping that the traffic on Virginia's Route 50 would spare us that morning.

The program began promptly at 9:00, which would give us the perfect and precise amount of time needed to check in to the ashram, and follow the starting procedures. These included removing our shoes, signing in on a clipboard, and putting on our face masks. However, the two most important things about checking in to the ashram were ensuring that we received chandan on our foreheads before we left the lobby to go upstairs, and prostrating to the Shiva statue in the main hall before we entered. This was something that was mandatory for everyone. Our main Acharya, Vivek Ji, a direct disciple of Swami Tejomayananda, who had been with the mission for many years, told us this: Chinmaya Mission doesn't force you to love God. The program doesn't even force you to believe in God. Unlike any other religion, Hinduism does not force you to do anything. It only encourages you. This was the main reason behind the prostration towards the Shiva murti. Additionally, Vivek Ji spoke about the fact that his kids were still quite young, and that they

could not yet recite complex Sanskrit shlokas. As a result of this, instead of learning how to recite such shlokas, they were taught to be grateful and thankful for the resources which they possess, and how lucky they are. In other words, complex shlokas and recitations to convey your love and appreciation to the Lord, regardless of if you believe in Him or not, are not always needed. I learned that a simple "Thank you Bhagvan for all you do and all you have given us," is enough to show your devotion. Such teachings and values are what Chinmaya Mission tries to convey to its youth participants.

Our daily discourses and lectures were followed with a grand lunch. One of Chinmaya Mission's many goals is to strive for a zero-waste policy, and to be as environmentally conscious as possible. Most days, plates and utensils were not used during our meals. We simply ate over napkins, sitting cross-legged on the wooden floor in small huddles of the close-knit circles of friends we had formed over the course of the camp. After eating, everyone went into the dishwashing room to wash their own dishes, (if they were used that day), and then dried them.


Through learning such values and many others, we were learning to be natural. This, "learning to be natural" was the main theme of the program. Each day, a new set of values was learned through a main topic. Such topics, such as insecurities, selfishness, grounding your mind and body, as well as endurance were all related back to sacred scripts and Hindu philosophical teachings. Our master texts, the Ramayana and Sri Rama's Reveries, (written by Swami Tejomayananda) helped symbolize these themes. Whether it was through workshops of writing letters to people we had hurt or had been hurt by, drawing out our challenges we have faced on paper plates and offering them to Shiva, or testing our physical and mental endurance by being in the Virginia sun for 4 hours doing farm-work, at one point or another, each one of these values was put to test in the camp. All in all, every single one of these experiences brought us together. The complaining, criticizing, and even some crying that was done throughout such challenges put a new perspective on how we live every single day. Truly embodying the values we learned made us realize how special it meant to be together, learning and enjoying one another's company. Even the events that may seem insignificant or small, such as playing Kho-Kho inside, (though mostly resulting in slipping and falling on the office-carpeted auditorium), or challenging ourselves by eating spaghetti and pasta with our hands only, made us all closer. Such experiences taught us to put ourselves out there, because there would always be someone to catch us if we fell. They taught us to speak our minds, and to say things how we truly wanted to say them. Experiences like sprinting after doing athletics for an hour without water breaks taught us to build our endurance, and push ourselves to the appropriate limit. Wearing chandan daily taught us to have a cool mind, something necessary for returning peace and calmness into your body. These experiences not only taught us to love and

appreciate ourselves before we tried to understand others, but also ensured that we would always be grateful for the things we had, and that we gave back to our community and society for every good thing, or bad thing which happened to us. Even if bad things happened, or will happen, we were taught to always have a positive outlook, and try our best to interpret the situation with a positive mind. In other words, every single day, we learned unique values, and when such teachings were summed up, we were taught to live naturally, and be our natural selves. However one interprets that, depends solely on their outlook on life. Thankfully, the outlook shared at Chinmaya Mission can be looked through from anywhere in the world, and at any moment, regardless of who you are, who you have been, or who you will become.





Samruddhi Gomase
Age: 14 years
Chhattisgarh, India





# बेअक्कल

मोहना प्रभुदेसाई जोगळेकर
शार्लोट

Picture Artist
Tejal Hinge
Age: 13 years



एकदा मजा झाली. आईने न सांगता मी सगळं केलं. दात घासले, आंघोळ केली, नाश्ता गुपचूप खाल्ला. एकदम शहाण्यासारखी वागले. आईला धक्काच बसला. बाबाला वाटलं मला अक्कल आली.

दादा म्हणाला,

"काहीतरी गडबड आहे." तो गडबड शोधायला खोलीत गेला. माझ्या खोलीत, त्याच्या खोलीत. परत आला.

"काय रे? काय गडबड केली इराने?" आईने विचारलं.

"काही नाही." तो पुटपुटला. त्याला गडबड सापडलीच नाही. दादाची फजिती झाली. मी टाळ्या वाजवल्या.

बाबा गडबड शोधायला खोलीत गेला. चित्र घेऊन आला.

मी घाबरले. आईच्या मागे लपले.



"इराने काढलंय हे चित्र?" आईने कौतुकाने विचारलं.

"नाही." बाबा डोळे वटारून माझ्याकडे बघत होता.

"मग? का आणलंस हे चित्र तू?" आईला काही समजतच नव्हतं.



"या गधडीने चित्रावरचं दादाचं नाव पुसलं..." बाबा डोळे गरागरा फिरवत म्हणाला.

"म्हणजे?" आई गोंधळली.

"चित्र कुणी काढलं?" बाबानी विचारलं.

"मी काढलं." दादा म्हणाला.



"चित्राखाली नाव कुणाचं दिसतंय?" बाबाने विचारलं. दादाने नीट पाहिलं.

"मी माझं नाव लिहिलं होतं चित्राखाली." दादा माझ्याकडे खाऊ की गिळू नजरेने बघत होता.

"इराने ते पुसलं?" आता आईनेही डोळे गरागरा फिरवले.



"आणि तिचं नाव लिहिलं." दादा किंचाळला.

"म्हणून शहाण्यासारखी वागत होती." आई पुटपुटली. दादाने मला ढकललं, केस ओढले. मी पुन्हा बेअक्कल झाले. भोकाड पसरलं.



Kirti Shrikhande

Pennsylvania

# 6 minute Veg Biryani




## Ingredients:

1. Basmati Rice: 3 cups
2. Yogurt: 2 cups
3. Water: 3 cups
4. Paneer: 300 gm
5. Mixed veggies: 2-3 cups (refer the video for list of veggies)
6. Kewara essence: 3 drops (optional)
7. Rose water: 2-3 Tbsp (optional)
8. Saffron Strands: A big pinch
9. Whole garam masala (refer the video for list)
10. Biryani Masala: 2 Tbsp
11. Fresh cilantro: 1 Cup
12. Fresh mint leaves: 15-20
13. Salt: To taste
14. Clarified butter: 2-3 Tbsp
15. Chopped onions: 2 medium
16. Fried Onion: 1 Cup
17. Ginger- garlic paste: 2 Tbsp

## Method:

1. Put Instant pot on saute mode and put all the whole garam masala. Stir well.
2. Add chopped onions and let it become translucent.
3. Add ginger garlic paste. Stir well.
4. Add veggies and paneer one by one and stir well. (refer the video for the list)
5. Add yogurt. Stir well.
6. Add fried onions, 8-10 mint leaves and fistful of cilantro.
7. Add soaked rice and salt (refer the video for the instructions of how to soak the rice for perfect results)
8. Now line the rice with fried onions, 8-10 mint leaves and fistful of cilantro.
9. Add a combination of rose water, kewara and saffron strands.
10. Add water, submerge the rice grains in the water.
11. Put the lid back on sealing mode.
12. Turn off the saute mode and put the pot on “Manual/Pressure Cook” mode on high for 6 minutes.
13. After 6 minutes are done, wait for 5 minutes and release the pressure.
14. Fluff the rice and take it out on a serving plate to stop the cooking further.
15. Garnish it with fried onion and cilantro.

### Pressure Cooker Method:

If you are making it in a normal pressure cooker then follow the same instructions and listen to one whistle on medium flame.

And when the pressure is released just take it out in a serving dish immediately to stop the cooking process.

# Baked Bakarwadi



Sandhya Nadkarni

Boston



**Ingredients:**

Ingredients

For the filling-

Grind together in a paste

2 hot green chilies (or to taste)

8 mint leaves

½ inch fresh peeled ginger

2 cloves of garlic

Combine with-

½ cup shredded dry coconut, dry roasted

¼ cup sesame seeds, dry roasted

1 tablespoon poppy seeds, dry roasted

1 teaspoon onion powder

1 tablespoon sugar

1 teaspoon cumin seed powder

1 teaspoon coriander seed powder

1/8 teaspoon citric acid

Salt to taste

½ cup store bought thin sev

½ cup chopped cilantro leaves

For the dough-

¾ cup besan or chickpea flour

4 tablespoons maida or all-purpose flour

1 teaspoon chili powder (or to taste)

½ teaspoon turmeric powder

½ teaspoon baking soda

Salt to taste

1 tablespoon oil

Water to knead the dough

About 1 ½~2 teaspoons of oil for greasing the baking tray and for brushing the bakarwadis.

**Method:**

Method:

Grind together in a paste, the green chilies, mint leaves, ginger and garlic. Mix with all the other ingredients of the filling. Set aside.

Combine the dry ingredients for the dough. Add the oil and mix it in with your fingertips. Add enough water to form a ball for the dough. Divide in two parts.

Preheat the oven to 350 degrees. Roll out one part of the dough. The dough should be rolled as thin as possible.

Spread ½ of the combined filling over it, leaving about ½ inch margin all around the edges. Roll the dough with filling in a jelly roll fashion, making sure it seals at the long edge.

Cut the roll into pieces about ¾ inch wide. Transfer to a greased baking tray. Repeat with the other half of the dough and filling.

Brush the tops of the cut pieces lightly with oil and bake for 30 minutes. Flip the bakarwadis upside down and bake for another 10 minutes to get an even color all around.

Remove, let cool and store in an airtight container.



Shruti Nargundkar

Melbourne, Australia

# Shakun Unde



Along with the faral and fatake and the killa and kandil, Diwali for Marathi people was also about reading the Diwali Ank - the festival special editions of reputed magazines as well as those of the publications that mushroomed only at Diwali.

Nothing gave us more pleasure than to relax after the early morning faral - the heavy meal coming straight after a pampering oil bath to browse through the Diwali magazines.

The little nip in the air, the lingering heady perfume of that lovely utane, the jasmine oil and the beautiful gulab or chandan Moti soap on our bodies, the strong scent of burnt firecrackers, the mixed aromas of frying from homes around us, the balmy fragrance from the jhendu flowers adorning our homes – if this wasn't how heaven smelled, I wonder how else!

Other kids around me would run out to burst more crackers or collect unspent ones and try and explode them or collect the "stuff" from inside of them to make their own indigenous fatake. But the nerdy yours truly would be happier with the magazines - looking at the glossy ads for jewelry, reading recipes and kids' special sections.

My aunt Anuradha Vaidya's stories, long and short, used to be published in several magazines. Once a whole novel had been published and I used to read her works, more out of pride that it was her work, than a real understanding or appreciation of the largely grown up themes.

With Aai busy in the kitchen, this quiet time allowed some indulgent foray into the world of grown ups. I also remember reading a story about divorce, and being terrorised by the word "ghatasphot" and spent many nights worrying if Aai-Baba would ever go down that path. Once I even attempted reading a short story by G.A. Kulkarni, but beat a hasty retreat – why would anyone write/ publish/ read horror stories during Diwali?

Occasionally, when Aai wasn't looking, a sneak a peek into the double entendre, chavat window cutouts in Jatraa or Awaaz magazine was well worth the risk taken. Also intriguing, especially since it was forbidden, was celebrity gossip from Devyani Chaubal's Chanderi Chewing Gum.

" Babi SSSSS! Aey Babi SSSS! Aai's 'haak' would interrupt my postprandial reverie.

"Shejaari ha faral deun ye!" she would remind me of my annual errand taking steel plates full of sweets and savouries, covered by doilies to our neighbours.

Sigh… time to go… but I would remember this was equally exciting, so I really didn't mind it … for another adventure in terms of neighbours faral awaited.And didn't I lap up all the praise the neighbours would heap on Aai's innovative faral each year.

" What new things has your sugran Aai made this year?" was a question most anticipated; answered by me with equal excitement – for almost every Diwali Aai would make something unusual, rare or different!

Like these Shakun Undas that I made for Shishir's birthday this week – reconstructed from memory of the one time Aai had made them and a bit of help from the Internet.

## Ingredients:

½ cup chana dal

½ cup gur, grated or brown sugar

½ tsp cardamom powder

½ tsp grated nutmeg

1 tsp lightly toasted poppy seeds

½ cup fresh coconut, grated

½ cup plain flour

½ cup rice flour

A pinch of baking powder

A pinch salt

Oil to deep fry

## Method:

Pressure cook the chana dal until well done, but not too soft. Drain the water – you can use this for "katachi amti".

Mix the gur or sugar with the boiled chana dal. Add the cardamom and nutmeg. Process the mixture in a food processor or a kitchen mill (puran yantra). If the mixture is too loose, you may need to microwave it for a couple of minutes to make it firm. Add the poppy seeds and coconut and mix well. Allow the mixture (puran) to cool and shape into small balls.

Heat oil in a kadhai.

In another bowl, mix the plain flour and the rice flour with some water and make a thick smooth batter.

Add the salt and the baking powder.

Dip the puran balls into the batter and drop into the hot oil.  Batch fry a few balls at a time. The balls will take some time to turn golden brown, due to the rice flour. But once well fried, the balls turn a nice colour.

Drain on kitchen paper and serve warm.



Vaidehi Dandekar, California

# Contributors

## Contributors:

Natasha Dighe, New Jersey

Blog: https://natashadighe.blogspot.com/

Hemant Pohonerkar, India

Blog: https://vicharnavneethemant.blogspot.com

Prasad Karshetty Rangoli Artist, India

Sandhya Rege Nadkarni, Boston, USA

Blog: https://indfused.com/

Ravi Rane, India

Comic Illustrator

Sanjay Ghogale, India

Comic Illustrator

Blissful Stuff by Poona, Rangli artist

https://www.youtube.com/c/PoonamBorkar

Kirti Shrikhande, Pennsylvania

https://youtube.com/c/KirtisKitchenKatta

Shruti Nargundkar, Australia

https://shrutinargundkar.blogspot.com/

Omkar Udas, Canada

Blog: omkarudas.com




www.marathicultureandfestivals.com